हिंदी साहित्य में उपन्यास विधा समाज के बहुआयामी जीवन को अभिव्यक्त करने वाली महत्वपूर्ण साहित्यिक विधा के रूप में विकसित हुई है। उपन्यासकार अपने समय के सामाजिक परिवेश, मानवीय अनुभवों और सांस्कृतिक मूल्यों को कथा के माध्यम से अभिव्यक्ति देता है। भारतीय समाज की संरचना में ग्रामीण जीवन का विशेष स्थान रहा है, इसलिए हिंदी उपन्यासों में ग्राम्य जीवन और उससे संबंधित सांस्कृतिक तत्वों का चित्रण व्यापक रूप से दिखाई देता है। ग्रामीण संस्कृति केवल जीवन-निर्वाह की व्यवस्था तक सीमित नहीं होती, बल्कि उसमें लोकपरंपराएँ, सामाजिक आस्थाएँ, सामुदायिक सहयोग की भावना, पारिवारिक संबंधों की आत्मीयता तथा प्रकृति के साथ मनुष्य के निकट संबंध जैसी अनेक विशेषताएँ समाहित रहती हैं। गाँव का सामाजिक जीवन उत्सवों, लोकगीतों, रीति-रिवाजों और पारंपरिक विश्वासों के माध्यम से अपनी विशिष्ट पहचान बनाता है। हिंदी उपन्यासकारों ने अपने साहित्य में ग्रामीण समाज के इन विविध आयामों को अत्यंत यथार्थपरक रूप में प्रस्तुत किया है। प्रेमचंद के उपन्यासों में किसान जीवन की आर्थिक कठिनाइयों और सामाजिक विषमताओं का गहन चित्रण मिलता है, जबकि फणीश्वरनाथ रेणु की रचनाओं में ग्रामीण समाज की लोकसंस्कृति, बोली-बानी और जनजीवन की जीवंतता विशेष रूप से उभरकर सामने आती है। इसी प्रकार नागार्जुन के साहित्य में भी ग्राम्य जीवन की संघर्षशीलता और सामाजिक यथार्थ का प्रभावशाली चित्रण देखने को मिलता है। समकालीन परिवर्तनों के प्रभाव से ग्रामीण समाज के जीवन-मूल्यों और

सांस्कृतिक स्वरूप में भी परिवर्तन दिखाई देने लगे हैं। शिक्षा, तकनीकी विकास और शहरी संपर्क ने ग्रामीण जीवन की संरचना को प्रभावित किया है, जिसका प्रभाव साहित्य में भी परिलक्षित होता है। इस दृष्टि से हिंदी उपन्यासों में ग्रामीण संस्कृति का अध्ययन भारतीय समाज की सांस्कृतिक जड़ों, सामाजिक संरचना और परिवर्तनशील प्रवृत्तियों को समझने के लिए अत्यंत महत्वपूर्ण है।

हिंदी उपन्यासों में ग्रामीण जीवन का चित्रण

हिंदी उपन्यासों में ग्रामीण जीवन का चित्रण अत्यंत यथार्थवादी और संवेदनशील रूप में किया गया है। उपन्यासकारों ने गांवों के सामाजिक ढांचे, जातिगत व्यवस्था, आर्थिक संघर्ष और सांस्कृतिक परंपराओं को अपने साहित्य में प्रमुख स्थान दिया है।

ग्रामीण जीवन की सबसे बड़ी विशेषता सामूहिकता है। गांव में व्यक्ति अकेले नहीं बल्कि पूरे समुदाय के साथ जुड़ा रहता है। परिवार, जाति, पंचायत और गांव की सामूहिक व्यवस्था उसके जीवन को प्रभावित करती है।

हिंदी उपन्यासों में यह सामूहिकता कई रूपों में दिखाई देती है। गांव के लोग एक-दूसरे के सुख-दुख में सहभागी होते हैं। विवाह, त्योहार और अन्य सामाजिक अवसरों पर सामूहिक सहभागिता ग्रामीण संस्कृति की महत्वपूर्ण विशेषता है।

प्रेमचंद के उपन्यासों में ग्रामीण संस्कृति

हिंदी उपन्यासों में ग्रामीण संस्कृति का सबसे प्रभावशाली चित्रण प्रेमचंद के साहित्य में मिलता है। उन्होंने अपने उपन्यासों में किसानों की समस्याओं, जमींदारी प्रथा और सामाजिक विषमता को गहराई से प्रस्तुत किया है।

उनका प्रसिद्ध उपन्यास "गोदान" ग्रामीण जीवन का सबसे सशक्त दस्तावेज माना जाता है। इस उपन्यास में होरी और धनिया के माध्यम से किसान जीवन की कठिनाइयों, गरीबी और सामाजिक शोषण का चित्रण किया गया है।

"होरी ने चिलम के कई कश लगाकर कहा- मजूरी करना कोई पाप नहीं है। मजूर बन जाय तो किसान हो जाता है। किसान बिगड़ जाय तो मजूर हो जाता है। मजूरी करना भाग्य में न होता तो यह सब विपत क्यों आती? क्यों गाय मरती ? क्यों लड़का नालायक निकल जाता?" [1]

"किसान पक्का स्वार्थी होता है, इमसें सन्देह नहीं। उसकी गाँठ से रिश्वत के पैसे बड़ी मुश्किल से निकलते हैं, भाव-ताव में भी वह चौकस होता है, ब्याज की एक-एक पाई छुड़ाने के लिए वह महाजन की घण्टों चिरौरी करता है, जब तक पक्का विश्वास न हो जाय, वह किसी के फु सलाने में नहीं आता, लेकिन उसका सम्पूर्ण जीवन प्रकृति से स्थायी सहयोग है। [2]

"वृक्षों में फल लगते हैं, उन्हें जनता खाती है, खेती में अनाज होता है, वह संसार के काम आता है; गाय के थन से दूध दोहता है, वह खुद पीने नहीं जाती, दूसरे ही पीते हैं; मेघों से वर्षा होती है, उसे पृथ्वी तृप्त होती है। ऐसी संगति में कुत्सित स्वार्थ के लिए कहाँ स्थान" [3]

प्रेमचंद ने ग्रामीण समाज में मौजूद जातिगत भेदभाव, आर्थिक असमानता और सामाजिक अन्याय को भी उजागर किया है। उनके उपन्यासों में गांव केवल एक भौगोलिक स्थान नहीं बल्कि एक जीवंत सामाजिक व्यवस्था के रूप में सामने आता है।

"आदमी का बहुत सीधा होना भी बुरा है। उसके सीधेपन का फल यही होता है कि कुत्ते भी मुँह चाटने लगते हैं। आज उधर तुम्हारी वाह-वाह हो रही होगी कि बिरादरी की कैसी मरजाद रख ली। मेरे भाग फूट गये कि तुम जैसे मर्द से पाला पड़ा। कभी सुख की रोटी न मिली।" [4]

"मेरे जहन में औरत वफा और त्याग की मूर्ति है, जो अपनी बेजबानी से, अपनी कुर्बानी से, अपने को बिल्कुल मिटाकर पति की आत्मा का एक अंश बन जाती है। देह पुरुष की होती है, पर आत्मा स्त्री की होती है। आप कहेंगे, मर्द अपने को क्यों नहीं मिटाता ? और से ही क्यों इसकी आशा करता है? मर्द में वह सामर्थ्य नहीं है। वह अपने को मिटायेगा, तो शून्य हो जायेगा। वह किसी खोह में जा बैठेगा और सर्वात्मा में मिल जाने का स्वप्न देखेगा, वह तेज प्रधान जीव है, और अहंकार में यह समझकर कि वह ज्ञान का पुतला है, सीधा ईश्वर में लीन होने की कल्पना किया करता है। स्त्री पृथ्वी की भाँति धैर्यवान है, शक्ति-सम्पन्न है, सहिष्णु है।" [5]

"पुरुष में नारी के गुण आ जाते हैं, तो वह महात्मा बन जाता है। नारी में पुरुष के गुण आ जाते हैं, तो वह कुलटा हो जाती है। पुरुष आकर्षित होता है स्त्री की ओर, जो सर्वांश में स्त्री हो। मालती ने अभी तक मुझे आकर्षित नहीं किया। मैं आपसे किन शब्दों में कहूँ कि स्त्री मेरी नजरों में क्या है? संसार में जो कुछ सुन्दर है, उसी की प्रतिमा को मैं स्त्री कहता हूँ" [6]

'रेणु' के उपन्यासों में ग्रामीण संस्कृति

हिंदी साहित्य में आंचलिक उपन्यासों ने ग्रामीण संस्कृति के चित्रण को नई दिशा दी। फणीश्वरनाथ 'रेणु' का उपन्यास "मैला आंचल" आंचलिकता का सबसे महत्वपूर्ण उदाहरण है।

इस उपन्यास में बिहार के ग्रामीण जीवन, लोक संस्कृति, बोली, लोकगीत और सामाजिक संबंधों का अत्यंत सजीव चित्रण मिलता है। रेणु ने गांव के जीवन को भीतर से समझकर प्रस्तुत किया है।

"चरणकमल धरी शीश ! सबसे पहले रामदास माटी देता है ! उसके बाद लछमी दासिन मुट्ठी-भर माटी महन्थ साहेब की सफेद चादर पर डाल देती है। फिर फूलों की माला। साधु लोग कुदाली से गोर में मिट्टी भरने लगते हैं। चरनदास कहता है, "महन्थ साहेब को लगाकर दस महन्थों को माटी दिया है। माटी देना भी नहीं जानेंगे ?"

गाँव के 'कीरतनियाँ लोग' समदाउन शुरू करते हैं-

"हाँ रे, बड़ा रे जतन से सुगा एक हे पोसल, माखन दुधवा पिलाए। हाँ रे, से हो रे सुगना बिरिछी चढ़ि बैठल पिंजड़ा रे धरती लोटाए... ?"[7]

"गौर के बाद रामदास खैजड़ी बजा-बजाकर 'निरगुन' गाता है-"कँहवाँ से हंसा आओल, कँहवाँ समाओल हो राम, कि आहो रामा हो, कोन गढ़ कयल मोकाम, कवन लपटाओल हो राम डिम डिमिक डिमिक...

"सुरपुर से हंसा आओल, नरपुर समाओल हो राम, कि आहो रामा हो, कायागढ़ कयला मोकाम, मायहि लपटाओल हो राम !" [8]

आंचलिक उपन्यासों की विशेषता यह है कि वे किसी विशेष क्षेत्र की संस्कृति, भाषा और जीवन शैली को केंद्र में रखते हैं। इससे ग्रामीण संस्कृति का अधिक वास्तविक और प्रामाणिक चित्रण संभव हो पाता है।

बालदेव धुनी के पास बैठकर बीजक के पन्ने उलटता है-

"बीजक बतावे बित्त को
जो बित्त गुप्ते होय,

शब्द बतावे जीव को
बूझे बिरला कोय॥" [9]

रागदरबारी में ग्रामीण संस्कृति

"वेदान्त हमारी परम्परा है और चूँकि गुटबन्दी का अर्थ वेदान्त से खींचा जा सकता है, इसलिए गुटबन्दी भी हमारी परम्परा है, और दोनों हमारी सांस्कृतिक परम्पराएँ हैं। आज़ादी मिलने के बाद हमने अपनी बहुत-सी सांस्कृतिक परम्पराओं को फिर से खोदकर निकाला है। तभी हम हवाई जहाज़ से यूरोप जाते हैं, पर यात्रा का प्रोग्राम ज्योतिषी से बनवाते हैं; फॉरेन ऐक्सचेंज और इनकमटैक्स की दिक्कतें दूर करने के लिए बाबाओं का आशीर्वाद लेते हैं, स्कॉच व्हिस्की पीकर भगन्दर पालते हैं और इलाज के लिए योगाश्रमों में जाकर साँस फुलाते हैं, पेट सिकोड़ते हैं।" [10]

निष्कर्ष

हिंदी उपन्यासों में ग्रामीण संस्कृति का चित्रण भारतीय समाज की वास्तविकता को समझने का महत्वपूर्ण माध्यम है। उपन्यासकारों ने गांवों के जीवन, संघर्षों, परंपराओं और सामाजिक संबंधों को अत्यंत संवेदनशीलता के साथ प्रस्तुत किया है।

प्रेमचंद से लेकर आधुनिक लेखकों तक हिंदी उपन्यासों में ग्रामीण संस्कृति एक केंद्रीय विषय के रूप में उपस्थित रही है। इन उपन्यासों के माध्यम से हमें ग्रामीण समाज की समस्याओं, जीवन मूल्यों और सांस्कृतिक विरासत को समझने का अवसर मिलता है।

इस प्रकार हिंदी उपन्यास न केवल ग्रामीण जीवन का साहित्यिक चित्रण करते हैं, बल्कि भारतीय समाज की सांस्कृतिक पहचान को भी संरक्षित करते हैं। इसलिए हिंदी उपन्यासों में ग्रामीण संस्कृति का अध्ययन साहित्यिक और सामाजिक दोनों दृष्टियों से अत्यंत महत्वपूर्ण है।

संदर्भ सूची

1) प्रेमचंद. (1936). गोदान. नई दिल्ली: राजकमल प्रकाशन। (पृ.सं.172) (पृ.सं.10) (पृ.सं.120),(पृ.सं.136),(पृ.सं.136),
2) रेणु, फणीश्वरनाथ. (1954). मैला आँचल. नई दिल्ली: राजकमल प्रकाशन।(पृ.सं.49) (पृ.सं.49) (पृ.सं.36) (पृ.सं.36)
3) शुक्ल. श्रीलाल. राग दरबारी. प्रकाशन वर्ष: 1968 प्रकाशन गृह: राजकमल प्रकाशन (पृ.सं.78)
4) नागार्जुन. (1952). बलचनमा. नई दिल्ली: लोकभारती प्रकाशन।
5) शर्मा, रामविलास. (2000). हिंदी साहित्य और संस्कृति. नई दिल्ली: राजकमल प्रकाशन।
6) द्विवेदी, हजारीप्रसाद. (2003). हिंदी साहित्य की भूमिका. नई दिल्ली: राजकमल प्रकाशन।

डिजिटल बैंकिंग का बैंकिंग रोजगार पर प्रभाव : एक विश्लेषणात्मक अध्ययन

शोधार्थी

प्रियंका कुमावत

विक्रम विश्वविद्यालय, उज्जैन (मध्य प्रदेश)

मार्गदर्शक

डॉ. केशवमणि शर्मा

प्रधानमंत्री कॉलेज ऑफ एक्सीलेंस शासकीय माधव महाविद्यालय, उज्जैन

1. सार (Abstract)

वर्तमान डिजिटल युग में बैंकिंग क्षेत्र में तकनीकी परिवर्तन तेजी से हो रहे हैं। डिजिटल बैंकिंग ने बैंकिंग सेवाओं को अधिक तेज, सुलभ एवं प्रभावी बना दिया है। इस अध्ययन का उद्देश्य यह जानना है कि डिजिटल बैंकिंग का बैंकिंग रोजगार पर क्या प्रभाव पड़ रहा है।

अध्ययन से यह स्पष्ट हुआ कि डिजिटल बैंकिंग के कारण पारंपरिक बैंकिंग नौकरियों में कमी आई है, जबकि तकनीकी और आईटी आधारित नौकरियों में वृद्धि हुई है। इसके अतिरिक्त कर्मचारियों के कौशल, कार्यशैली और कार्य-दबाव में भी परिवर्तन देखा गया।

शोध में 200 बैंक कर्मचारियों से डेटा एकत्र किया गया और सांख्यिकीय परीक्षणों के माध्यम से यह पाया गया कि डिजिटल बैंकिंग का रोजगार पर महत्वपूर्ण और मिश्रित प्रभाव है।

2. मुख्य बिंदु (Key Points)

1 डिजिटल बैंकिंग से कार्य दक्षता में वृद्धि

2 पारंपरिक नौकरियों में कमी

3 तकनीकी कौशल की मांग में वृद्धि

4 रोजगार संरचना में परिवर्तन

5 डिजिटल साक्षरता की आवश्यकता

3. प्रस्तावना (Introduction)

डिजिटल बैंकिंग बैंकिंग सेवाओं का वह रूप है जिसमें ग्राहक इंटरनेट, मोबाइल, एटीएम और अन्य इलेक्ट्रॉनिक माध्यमों के द्वारा बैंकिंग कार्य करते हैं।

भारत में डिजिटल बैंकिंग का विस्तार विशेष रूप से नोटबंदी (2016) और COVID-19 के बाद तेजी से हुआ।

डिजिटल तकनीकों के कारण बैंकिंग सेवाओं की प्रकृति में परिवर्तन हुआ है। पहले जहां शाखाओं पर निर्भरता थी, वहीं अब डिजिटल प्लेटफॉर्म पर सेवाएं उपलब्ध हैं।

इस परिवर्तन का सीधा प्रभाव बैंकिंग रोजगार पर पड़ा है—

- कुछ नौकरियां समाप्त हुई
- कुछ नई नौकरियां उत्पन्न हुई

4. अध्ययन के उद्देश्य (Objectives)

1. डिजिटल बैंकिंग की अवधारणा को समझना
2. बैंकिंग रोजगार पर इसके प्रभाव का अध्ययन करना
3. रोजगार के नए अवसरों का विश्लेषण करना
4. कर्मचारियों के कौशल परिवर्तन का अध्ययन करना
5. डिजिटल बैंकिंग से उत्पन्न चुनौतियों का मूल्यांकन करना

5. साहित्य समीक्षा (Review of Literature –

(1) Mathapati (2019) – International Journal of Trade and Global Business Perspectives

इस अध्ययन में बैंकिंग क्षेत्र में डिजिटल तकनीक के प्रभाव का विश्लेषण किया गया। शोध में पाया गया कि तकनीकी प्रगति का कर्मचारियों की प्रेरणा और कार्य प्रदर्शन पर महत्वपूर्ण प्रभाव पड़ता है।

निष्कर्ष: डिजिटल तकनीक कर्मचारी प्रदर्शन को सकारात्मक रूप से प्रभावित करती है।

(2) Jeyalakshmi & Lakshmi Rani (2019) – Management Insight Journal

इस शोध में डिजिटलाइजेशन और कर्मचारी प्रदर्शन के बीच संबंध का अध्ययन किया गया। अध्ययन में पाया गया कि क्लाउड कंप्यूटिंग, डिजिटल पेमेंट और डेटा एनालिटिक्स जैसी तकनीकें कर्मचारियों की उत्पादकता बढ़ाती हैं।

निष्कर्ष: डिजिटलाइजेशन से कार्य की गति और गुणवत्ता बढ़ती है।

(3) Kadur & Supriya (2022) – International Journal of Scientific Research and Management

इस अध्ययन में बैंकिंग क्षेत्र में डिजिटल ट्रांसफॉर्मेशन और वर्कफोर्स के बीच संबंध का अध्ययन किया गया।

निष्कर्ष: डिजिटल बैंकिंग कर्मचारियों के कार्य तनाव और कार्यप्रणाली को प्रभावित करती है।

(4) Singh et al. (2023) – Journal of Risk and Financial Management (MDPI)

इस शोध में COVID-19 के दौरान डिजिटल बैंकिंग के उपयोग का अध्ययन किया गया।

निष्कर्ष: डिजिटल बैंकिंग का उपयोग तेजी से बढ़ा और बैंकिंग सेवाओं की मांग डिजिटल माध्यमों पर शिफ्ट हुई।

(5) Kavitha (2023) – ResearchGate Publication

इस अध्ययन में डिजिटल बैंकिंग के समग्र प्रभाव का विश्लेषण किया गया।

निष्कर्ष: डिजिटल बैंकिंग से ग्राहक सुविधा और बैंकिंग दक्षता में वृद्धि हुई।

6. शोध प्रविधि (Research Methodology)

1 शोध प्रकार: वर्णनात्मक एवं विश्लेषणात्मक

2 सैंपल: 200 बैंक कर्मचारी

3 डेटा स्रोत: प्राथमिक (प्रश्नावली)

4 सैंपलिंग: यादृच्छिक नमूना

7. डेटा विश्लेषण (Statistical Testing with 200 Respondents)

(A) प्रतिशत विश्लेषण

200 कर्मचारियों में से:

- 130 (65%) ने कहा कि डिजिटल बैंकिंग से कार्य आसान हुआ
- 80 (40%) ने कहा कि रोजगार कम हुआ
- 150 (75%) ने कहा कि नए कौशल की आवश्यकता है

व्याख्या: डिजिटल बैंकिंग कार्य को आसान बनाती है लेकिन कौशल परिवर्तन आवश्यक है।

(B) माध्य (Mean Analysis)

- कार्य दक्षता = 4.1
- रोजगार सुरक्षा = 3.2
- कौशल आवश्यकता = 4.6

व्याख्या: कौशल की मांग सबसे अधिक है।

(C) सहसंबंध (Correlation)

- डिजिटल बैंकिंग और कार्य दक्षता = +0.70
- डिजिटल बैंकिंग और रोजगार = -0.48

व्याख्या:

1 सकारात्मक संबंध → दक्षता बढ़ती है

2 नकारात्मक संबंध → रोजगार घटता है

(D) t-Test

- शहरी कर्मचारियों का Mean = 4.3
- ग्रामीण कर्मचारियों का Mean = 3.5
- p-value = 0.02 (<0.05)

व्याख्या: प्रभाव दोनों क्षेत्रों में अलग है।

(E) Regression Analysis

- β (beta) = -0.50
- R^2 = 0.46

व्याख्या: डिजिटल बैंकिंग रोजगार में 46% परिवर्तन को प्रभावित करती है।

8. चर्चा (Discussion)

अध्ययन से स्पष्ट है कि डिजिटल बैंकिंग रोजगार को समाप्त नहीं करती बल्कि उसकी प्रकृति को बदलती है।

1 तकनीकी नौकरियां बढ़ रही हैं

2 पारंपरिक कार्य घट रहे हैं

3 कर्मचारियों को नए कौशल सीखने पड़ रहे हैं

9. निष्कर्ष (Conclusion)

इस शोध से यह निष्कर्ष निकलता है कि:

- डिजिटल बैंकिंग का बैंकिंग रोजगार पर महत्वपूर्ण प्रभाव है
- रोजगार की प्रकृति में परिवर्तन हो रहा है

- कौशल विकास अनिवार्य हो गया है

परिकल्पना परिणाम:

- H0 → अस्वीकृत
- H1 → स्वीकृत

10. सुझाव (Suggestions)

1. कर्मचारियों को डिजिटल प्रशिक्षण दिया जाए
2. नई तकनीकी नौकरियां विकसित की जाए
3. ग्रामीण क्षेत्रों में डिजिटल जागरूकता बढ़ाई जाए
4. रोजगार सुरक्षा नीतियाँ बनाई जाए

11. संदर्भ (References)

1 Mathapati, C. (2019) – IJTGBP
2 Jeyalakshmi, P.R. (2019) – Management Insight
3 Kadur & Supriya (2022) – IJSRM
4 Singh et al. (2023) – MDPI
5 Kavitha, M. (2023) – ResearchGate
6 Irawan et al. (2023) – AJAP
7 Nalini & Yuvasri (2024) – IJIREM
8 Adıgüzel & Ünal (2026)

भारतातील ग्रामीण विकासावर कल्याणकारी योजनांचा प्रभाव

शरद राजेंद्र पाटील

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड बोदवड, जि. जळगाव

नितेश प्रकाश सावदेकर

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड बोदवड, जि. जळगाव.

सारांश:-

भारत हा विविधतेने समृद्ध देश असून त्याची सर्वात जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारत सरकारने ग्रामीण विकासासाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू करून त्या यशस्वीपणे राबविल्या आहेत. या संशोधन लेखात भारतातील प्रमुख केंद्रीय कल्याणकारी योजनांचा—विशेषतः मनरेगा (MGNREGS), प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण (PMAY-G),प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN, जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन—ग्रामीण विकासावरील प्रभावाचे विश्लेषण करण्यात आले आहे. सरकारी आकडेवारी, Ministry of Rural Development, NITI आयोग व World Bank च्या अहवालांच्या आधारे हे संशोधन करण्यात आले आहे. संशोधनात असे आढळून येते की या योजनांमुळे ग्रामीण गरिबी प्रमाणात लक्षणीय घट झाली असून, पायाभूत सुविधा, रोजगार, आरोग्य व महिला सशक्तीकरणामध्ये उल्लेखनीय प्रगती झाली आहे. मात्र, अंमलबजावणीतील काही त्रुटी, भ्रष्टाचार व लाभार्थी निश्चितीमधील समस्या या योजनांच्या परिणामकारकतेस मर्यादा घालतात. प्रभावी ग्रामीण विकासासाठी बहुआयामी दृष्टिकोन व सुशासनाची आवश्यकता असल्याचे हे संशोधन स्पष्ट करते.

मुख्य शब्द :- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) ग्रामीण विकास, कल्याणकारी योजना, MGNREGS, PMAY-G, PM-KISAN, जल जीवन मिशन, भारत सरकार, सामाजिक सुरक्षा.

१. प्रस्तावना:-

भारतामध्ये ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक असून, २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार ते ६८.८४ टक्के आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार २०२३ मध्ये देशातील ग्रामीण लोकसंख्या जवळपास ९१ कोटींच्या आसपास आहे. ग्रामीण भागात गरिबी, बेरोजगारी, अशिक्षितता, अपुरी आरोग्य सुविधा तसेच मूलभूत पायाभूत सुविधांचा अभाव या समस्या दीर्घकाळापासून दिसून येतात. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर केंद्र सरकारने विविध कल्याणकारी कार्यक्रमांची अंमलबजावणी सातत्याने केली आहे. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सामाजिक व आर्थिक न्यायाची स्पष्ट मांडणी करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे संविधानाच्या कलम ३९ मध्ये संसाधनांचे समतोल वितरण सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे, तर कलम ४१ अंतर्गत नागरिकांना रोजगार, शिक्षण आणि लोकसहाय्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्यावर सोपविण्यात आली आहे. या घटनात्मक तरतुदीच्या आधाराने ग्रामीण विकासासाठी विविध प्रकारच्या योजना सुरू करून राबविण्यात आल्या आहेत.

निती आयोगाच्या २०२३ च्या राष्ट्रीय बहुआयामी गरिबी निर्देशांक अहवालानुसार, भारतातील गरिबांची संख्या २०१५-१६ मधील २४.८५ कोटींवरून २०१९-२१ दरम्यान ११.२८ कोटींपर्यंत कमी झाली आहे. ही घट

प्रामुख्याने विविध शासकीय कल्याणकारी योजनांच्या परिणामकारक राबविल्यामुळे साध्य झाली असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर, प्रस्तुत संशोधनामध्ये प्रमुख योजनांचा ग्रामीण विकासावर झालेल्या परिणामांचा सखोल अभ्यास करण्यात येत आहे.

२. संशोधनाची उद्दिष्टे :-

संशोधनाची विशेष उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत,

१) भारतातील प्रमुख ग्रामीण कल्याणकारी योजनांची ओळख व उद्दिष्टांचे परीक्षण करणे.

२) सदर योजनांच्या अंमलबजावणीतील प्रगतीचे सरकारी आकडेवारीवरुण मूल्यांकन करणे.

३) ग्रामीण पायाभूत सुविधा, आरोग्य, रोजगार व महिला सशक्तीकरणावरील परिणामांचे विश्लेषण करणे.

४) योजनांच्या अंमलबजावणीतील आव्हाने व सुधारणांसाठी शिफारशी सुचविणे.

३. संशोधन पद्धती :-

हे संशोधन वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीवर आधारित आहे. द्वितीयक माहितीचा वापर केला आहे. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारचे वार्षिक अहवाल (२०१४-२०२४) नीती (NITI) आयोगाचे राष्ट्रीय बहुआयामी गरिबी निर्देशांक (MPI) अहवाल, २०२१ व २०२३ जनगणना अहवाल २०११ व SECC (Socio-Economic and Caste Census) २०११ जागतिक बँक व UNDP, मानव विकास अहवाल संसदीय स्थायी समिती अहवाल व CAG (Comptroller and Auditor General) निरीक्षणे. या स्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

४. प्रमुख सामाजिक कल्याण योजनांचे संक्षिप्त विश्लेषण :-

भारत सरकारने ग्रामीण विकासासाठी राबविलेल्या प्रमुख योजनांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

तक्ता १: भारतातील प्रमुख ग्रामीण कल्याणकारी योजना (२०२३-२४)

अ. क्र.	योजनेचे नाव	योजना उद्देश	लाभार्थी (कोटीत)	बजेट (२०२३-२४)
१)	पंतप्रधान ग्राम सडक योजना (PMGSY)	ग्रामीण रस्ते जोडणी	५.९८ लाख गावे	₹१९,००० कोटी
२)	पंतप्रधान आवास योजना-ग्रामीण (PMAY-G)	घरबांधणी सहाय्य	२.९५ कोटी कुटुंबे	₹५४,५०० कोटी
३)	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS)	रोजगार हमी	१५.४ कोटी	₹६०,००० कोटी
४)	प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN)	शेतकरी उत्पन्न सहाय्य	११.८ कोटी	₹६०,००० कोटी

५)	जल जीवन मिशन (JJM)	पिण्याच्या पाण्याचा पुरवठा	१९.२ कोटी घरे	₹७०,०६१ कोटी
६)	स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण (SBM-G)	स्वच्छता व शौचालय	१०.९ कोटी कुटुंबे	₹७,१९२ कोटी

स्रोत: ग्रामीण विकास मंत्रालय वार्षिक अहवाल २०२३-२४, केंद्रीय अर्थसंकल्प २०२३-२४, भारत सरकार.



४.१ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना . (MGNREGS) (सध्याचे बदललेले नाव - पूज्य बापू ग्रामीण रोजगार योजना किंवा विकसित भारत-जी राम जी):-

सन २००५ मध्ये भारतीय संसदेने मंजूर केलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (MGNREGA) अंतर्गत ही योजना कार्यान्वित करण्यात आली. २ फेब्रुवारी २००६ रोजी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातून या योजनेचा शुभारंभ झाला. पहिल्या टप्प्यात देशातील २०० मागास जिल्ह्यांचा समावेश होता. एप्रिल २००८ पासून ही योजना भारतातील सर्व ग्रामीण जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली.या योजनेनुसार प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला दरवर्षी किमान १०० दिवसांचा अकुशल मजुरीवर आधारित रोजगार उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या MGNREGS MIS पोर्टलनुसार, २०२३–२४ या आर्थिक वर्षासाठी सुमारे ₹६०,००० कोटींचा निधी राखीव ठेवण्यात आला होता. या योजनेचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे, कामाची मागणी केल्यानंतर १५ दिवसांच्या आत रोजगार उपलब्ध न झाल्यास संबंधित लाभार्थ्यांना बेरोजगारी भत्ता देण्याची हमी.याशिवाय, महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी एकूण लाभार्थ्यांमध्ये किमान एक-तृतीयांश महिलांचा समावेश बंधनकारक करण्यात आला आहे. प्रत्यक्षात, महिलांचा सहभाग २०२४-२५ या आर्थिक वर्षात ५८.१% इतका उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. ज्यामुळे महिला सशक्तीकरणाला मोठी चालना मिळाली आहे.

४.२ पंतप्रधान आवास योजना - ग्रामीण (PMAY-G) :-

१ एप्रिल २०१६ मध्ये इंदिरा आवास योजनाचे पुनर्रचना करून पंतप्रधान आवास योजना – ग्रामीण (PMAY-G) लागू करण्यात आली. या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांना सुरक्षित व पक्के निवासस्थान उपलब्ध करून देणे हा आहे. या अंतर्गत पात्र BPL कुटुंबांना घरबांधणीसाठी मैदानी प्रदेशात ₹१.२० लाख, तर डोंगराळ व ईशान्य भागात ₹१.३० लाख इतकी आर्थिक मदत दिली जाते. पहिल्या टप्प्यात २०२२ पर्यंत अंदाजे २.९५ कोटी पक्की घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.ग्रामीण विकास मंत्रालयाच्या PMAY-G पोर्टलवरील माहितीनुसार, मार्च २०२४ पर्यंत सुमारे २.९५ कोटी घरे पूर्ण करण्यात आली आहेत. विशेषतः, या घरांपैकी सुमारे ७७% घरे महिलांच्या नावावर किंवा संयुक्त नोंदणीत आहेत, जे महिलांच्या मालकीहक्क व लैंगिक समतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते.

४.३ पंतप्रधान किसान सन्मान निधी (PM-KISAN) :-

२४ फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरू करण्यात आलेल्या पंतप्रधान किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजनेअंतर्गत लघु व अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य दिले जाते. शेतकऱ्यांची कृषी बियाणे,खते खरेदी करण्याची आर्थिक क्षमता बळकट करणे आणि पेरणीसाठी भांडवल पुरवणे या योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ₹६,००० (प्रत्येकी ₹२०००) इतकी रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. PM-KISAN च्या अधिकृत पोर्टलवरील उपलब्ध माहितीनुसार, नोव्हेंबर २०२३ पर्यंत या योजनेच्या १५ हप्त्यांद्वारे एकूण ₹२.४ लाख कोटींपेक्षा अधिक निधी सुमारे ११.८ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आला आहे.

४.४ जल जीवन मिशन (Jal Jeevan Mission) :-

१५ ऑगस्ट २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'हर घर जल' या ध्येयाने जल जीवन मिशनची सुरुवात केली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश २०२४ पर्यंत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला नळाद्वारे सुरक्षित व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा आहे. जल जीवन मिशनच्या अधिकृत पोर्टलवरील आकडेवारीनुसार, मार्च २०२४ पर्यंत सुमारे ७४.७ टक्के, म्हणजेच अंदाजे १४.१ कोटी ग्रामीण घरांना नळाद्वारे पाणीपुरवठा जोडणी प्रदान करण्यात आली आहे. या योजनेसाठी एकूण ₹३.६ लाख कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून, २०२३–२४ या आर्थिक वर्षात सुमारे ₹७०,०६१ कोटींचा खर्च करण्यात आला आहे.

५.ग्रामीण विकासातील कल्याणकारी योजनांची भूमिका – विश्लेषणात्मक अभ्यास :-

खालील तक्त्यात प्रमुख निर्देशकांवरील प्रगतीचे तुलनात्मक विश्लेषण सादर केले आहे.

तक्ता २: ग्रामीण विकास निर्देशकांमधील सुधारणा (२०१४ ते २०२३)

निर्देशांक	२०१४ (आधार)	२०२३ (स्थिती)	सुधारणा %
ग्रामीण विद्युतीकरण	७०%	९९.९%	+४२.७%
स्वच्छ शौचालयांचा वापर	३८.७%	१०० % ODF घोषित	+१५८.७%
पक्की घरे (PMAY-G)	—	२.४ कोटी पूर्ण	नवीन निर्मिती

ग्रामीण रस्ते जोडणी	५६%	९७%	+७३.२%
नळ पाणी कनेक्शन (JJM)	१६.८%	७४.७%	+३४५.२%
ग्रामीण गरिबी दर	२५.७%	११.३% (२०२३ अंदाज)	-५६%

स्रोत: ग्रामीण विकास मंत्रालय, NITI आयोग MPI अहवाल २०२३, जल जीवन मिशन पोर्टल, Ministry of Power, भारत सरकार

५.१ रोजगार व उत्पन्न वाढ:-

MGNREGS च्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागातील लोकांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या, ज्यामुळे शहरांकडे होणारे स्थलांतर काही प्रमाणात आटोक्यात आले आहे. विशेषतः COVID-19 महामारीच्या कालावधीत (२०२०–२१) या योजनेने ग्रामीण अर्थव्यवस्थेला महत्त्वाचा आधार दिला. त्या वर्षात सुमारे ११.१९ कोटी कुटुंबांना या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.

खालील तक्त्यात MGNREGS अंतर्गत विविध वर्षांतील कामगिरी व प्रगतीची माहिती दर्शविण्यात आली आहे.

तक्ता ३: MGNREGS – वार्षिक प्रगती (२०१९-२४)

वर्ष	नोंदणीकृत कुटुंबे (कोटी)	कार्यरत कुटुंबे (कोटी)	महिला सहभाग %	खर्च (₹ कोटी)
२०१९-२०	१४.२	७.८८	५३.५%	७१,६८७
२०२०-२१	१५.५	११.१९	५३.२%	१,११,१७०
२०२१-२२	१५.०	९.७३	५४.७%	९८,४६७
२०२२-२३	१५.४	८.६२	५६.२%	८९,४०४
२०२३-२४	१५.७	७.४ (अंदाजे)	५७.०%	८५,९४०

स्रोत: MGNREGS MIS Portal, Ministry of Rural Development, Government of India (२०२४)

५.२ गरिबी निर्मूलन:-

निती आयोगाच्या २०२३ च्या बहुआयामी गरिबी निर्देशांक अहवालानुसार भारतातील दारिद्र्य रेषेखालील संख्या २०१५-१६ मधील २४.८५ कोटींवरून २०१९-२१ मध्ये ११.२८ कोटींवर आली आहे. २०१३-१४ मध्ये भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण २९.१७% होते, जे २०२२-२३ मध्ये ११.२८% पर्यंत खाली आले आहे.म्हणजे सुमारे १३.५ कोटी लोक गरिबीतून बाहेर पडले. मागच्या गेल्या ९ वर्षांच्या कालावधीत सुमारे २४.८२ कोटी लोक दारिद्र्य रेषेतून बाहेर पडले आहेत.या प्रगतीत MGNREGS, PMAY-G, PM-KISAN आणि जल जीवन मिशन यांसारख्या योजनांचा मोठा वाटा आहे. विशेषतः ग्रामीण भागात गरिबी कमी होण्याचा दर शहरी भागापेक्षा जास्त असून MPI मूल्य ०.२८५ वरून ०.१७६ पर्यंत घटले आहे.

५.३ पायाभूत सुविधांचा विकास:-

PMGSY मुळे ग्रामीण रस्ते जाळयात मोठी वाढ झाली असून मार्च २०२४ पर्यंत ७.३५ लाख किमीपेक्षा अधिक रस्ते बांधले गेले आहेत.राष्ट्रीय महामार्गांमध्ये ६० टक्के वाढ. (९१,२८७ किमी ते १,४६,२०४ किमी) त्यामुळे बाजारपेठांशी संपर्क, कृषी वाहतूक तसेच शिक्षण व आरोग्य सेवांपर्यंत पोहोच सुधारली आहे.२०२४ पासून आतापर्यंत ४५,०००आर किमी पेक्षा अधिक रेल्वे विद्युतीकरण पूर्ण.तसेच, सौभाग्य योजनेमुळे ग्रामीण विद्युतीकरण जवळपास ९९.९% पर्यंत पोहोचले असून २०१९ पर्यंत सर्व ग्रामीण घरांना वीजपुरवठा झाल्याचे घोषित करण्यात आले आहे.

५.४ आरोग्य व स्वच्छता:-

स्वच्छ भारत मिशन-ग्रामीणमुळे ग्रामीण स्वच्छतेत मोठी सुधारणा झाली असून २०१२-१३ मधील ३८.७% शौचालय उपलब्धतेवरून २०१९ पर्यंत देश ODF घोषित झाला; यासाठी १०.९ कोटींहून अधिक शौचालये उभारली गेली. या सुधारणेमुळे आरोग्य स्थितीत, विशेषतः बालमृत्यूदरात, घट झाली आहे.

५.५ महिला सबलिकरण :-

विविध कल्याणकारी योजनांमुळे महिलांच्या सशक्तीकरणाला चालना मिळाली आहे. PMAY-G अंतर्गत बहुसंख्य घरे महिलांच्या नावावर नोंद झाली असून MGNREGS मध्ये त्यांचा सहभाग ५७% पर्यंत वाढला आहे. PM-KISANमुळे महिलांना थेट आर्थिक मदत मिळत आहे. तसेच DAY-NRLM अंतर्गत कोट्यवधी महिला स्वयं-सहायता गटांशी जोडल्या गेल्याने त्यांचे आर्थिक सक्षमीकरण बळकट झाले आहे.

६. अंमलबजावणीतील आव्हाने:-

कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत पुढील प्रमुख अडचणी दिसून येतात:

१) भ्रष्टाचार व गैरप्रकार: MGNREGS मध्ये बनावट जॉब कार्ड, खोटी हजेरी व 'भूत लाभार्थी' यांसारख्या अनियमितता आढळतात.

२) लाभार्थी निवडीत दोष : जुन्या SECC डेटावर अवलंबित्वामुळे काही पात्र लाभार्थी वंचित राहतात, तर अपात्र व्यक्तींना लाभ मिळतो.

३) प्रादेशिक असमानता: योजनांची परिणामकारकता राज्यागणिक बदलते; काही मागास राज्यांत ती तुलनेने कमी आहे.

४) डिजिटल दरी: DBT व आधार-आधारित व्यवहारांसाठी आवश्यक साधने व साक्षरता नसल्याने अनेकांना अडथळे येतात.

५) निधी कमतरता: काही योजनांमध्ये निधी कमी पडल्याने कामे व वेतन वितरणात विलंब होतो.

७. शिफारशी:-

ग्रामीण कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी पुढील उपाय सुचविले जातात:

१) **Socio-Economic and Caste Census (S ECC) डेटा अद्ययावत करणे**: पात्र लाभार्थींची अचूक ओळख करण्यासाठी नवीन सामाजिक-आर्थिक जनगणना आवश्यक आहे.

२) **तंत्रज्ञानाचा वापर**: GIS, सॅटेलाइट व AI च्या मदतीने पारदर्शकता वाढवून भ्रष्टाचार कमी करता येईल.

३) **डिजिटल साक्षरता**: CSC द्वारे ग्रामीण नागरिकांना डिजिटल सेवांबाबत प्रशिक्षित करणे गरजेचे आहे.

४) **सामाजिक लेखापरीक्षण**: सर्व योजनांमध्ये Social Audit लागू करून उत्तरदायित्व वाढवावे.

५) स्थानिक संस्थांचे सक्षमीकरण: ग्रामपंचायतींना अधिक अधिकार व निधी देऊन विकेंद्रित नियोजन बळकट करावे.

८. निष्कर्ष:-

भारतातील कल्याणकारी योजनांनी ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. NITI आयोगाच्या MPI अहवाल (२०२३) नुसार, गेल्या काही वर्षांत कोट्यवधी लोक बहुआयामी गरिबीतून बाहेर आले, ही लक्षणीय प्रगती आहे. MGNREGS, PMAY-G, PMGSY, JJM आणि SBM-G यांसारख्या योजनांनी रोजगार, निवास, पायाभूत सुविधा, पाणी व स्वच्छता या मूलभूत गरजांची पूर्तता केली आहे.तथापि, या योजनांचा अपेक्षित परिणाम साधण्यासाठी अंमलबजावणीतील त्रुटी दूर करणे गरजेचे आहे. सुशासन, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जनसहभाग हे घटक अधिक बळकट करणे आवश्यक आहे. ग्रामीण विकास हा केवळ सरकारी प्रयत्नांवर मर्यादित नसून त्यासाठी शासन, समाज आणि नागरिक यांचे संयुक्त योगदान महत्त्वाचे आहे.राज्यघटनेतील सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय साध्य करण्यासाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी, सतत मूल्यांकन आणि सुधारणा आवश्यक आहे. ग्रामीण विकासाची गती वाढविणे हेच विकसित भारताचे भक्कम अधिष्ठान ठरते.

संदर्भ सूची:-

1) Ministry of Rural Development, Government of India. (2024). Annual Report 2023-24. New Delhi: MoRD, GoI.
2) NITI Aayog. (2023). National Multidimensional Poverty Index: A Progress Review 2023. New Delhi: NITI Aayog, Government of India.
3) MGNREGS MIS Portal. (2024). State-wise Status of Work & Expenditure. Retrieved from https://mnregaweb4.nic.in
4) Comptroller and Auditor General of India. (2023). Performance Audit Report on MGNREGS. New Delhi: CAG of India.
5) Ministry of Jal Shakti. (2024). Jal Jeevan Mission Dashboard. Retrieved from https://ejalshakti.gov.in
6) World Bank. (2023). India Rural Population (% of total population). World Development Indicators. Washington: World Bank.
7) Ministry of Finance, Government of India. (2024). Economic Survey 2023-24. New Delhi: Department of Economic Affairs.
8) International Institute for Population Sciences. (2021). National Family Health Survey (NFHS-5) 2019-21. Mumbai: IIPS.
9) PM-KISAN Portal. (2024). PM Kisan Beneficiary List. Retrieved from https://pmkisan.gov.in
10) Registrar General of India. (2011). Census of India 2011: Primary Census Abstract. New Delhi: Office of the Registrar General.
11) PMGSY Portal. (2024). OMMAS – Online Monitoring and Management System. Ministry of Rural Development, GoI. Retrieved from https://pmgsy.nic.in
12) Dreze, J., & Sen, A. (2013). An Uncertain Glory: India and its Contradictions. Princeton: Princeton University Press.
13) Mahendra Dev, S. (2017). Inclusive Growth in India: Agriculture, Poverty, and Human Development. New Delhi: Oxford University Press.
14) Ministry of Drinking Water and Sanitation. (2019). Swachh Bharat Mission-Gramin Report. New Delhi: GoI.

भारताच्या लोकसंख्या विषयक धोरणाचा अभ्यास

प्रा. डॉ. संजय आनंदा डापके

(सहाय्यक प्राध्यापक)

यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड .ता. सिल्लोड .जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

प्रस्तावना :

२१ फेब्रुवारी १८७२ रोजी भारतात आधुनिक काळातील पाश्चात्य संकल्पनेनुसार लॉर्ड मेयो या व्हाईसरॉयच्या कालखंडात सर्वप्रथम जनगणना करण्यात आली. भारताची लोकसंख्या जगात दुसऱ्या क्रमांकाची आहे. सन १९२१ हे वर्ष भारतीय लोकसंख्येच्या इतिहासात महाविभाजनाचे वर्ष म्हणून ओळखले जाते. कारण त्यानंतर लोकसंख्या वाढीने वेग घेतला. आजच्या स्थितीत अतिरिक्त लोकसंख्येचा संहार ही कल्पनाही करता येत नाही. अशा स्थितीत दोन पर्याय उपलब्ध असतात. एक म्हणजे वाढत्या लोकसंख्येचे पालन पोषण करण्यासाठी उत्पादन क्षमतेत वाढ करणे. दुसरा मार्ग म्हणजे जननदर कमी करून लोकसंख्या वाढ नियंत्रित करणे. यासाठी प्रभावी धोरणाची आखणी केली जाते.

अभ्यास विषयाची उद्दिष्टे.

१) लोकसंख्या या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२) लोकसंख्या विषयक धोरण म्हणजे काय? ते स्पष्ट करणे.

३) कुटुंब नियोजन कार्यक्रमाचा अभ्यास करणे.

४) कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा अभ्यास करणे.

५) पंचवार्षिक योजनाच्या कालावधीतील लोकसंख्येचा अभ्यास करणे.

६) लोकसंख्या विषयक विविध धोरणांचा अभ्यास करणे.

१) लोकसंख्या

लोकसंख्या म्हणजे एखाद्या भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या व्यक्तीची संख्या होय. लोकसंख्या मोजण्याला जनगणना किंवा खानेसुमारी म्हणतात.

२) लोकसंख्या विषयक धोरण म्हणजे काय?

जननदर कमी करण्यासाठी लोकसंख्या वाढीचा दर कमी करण्याच्या उद्देशाने शासनाने जाणीवपूर्वक आखलेला आणि कार्यान्वित केलेला कार्यक्रम म्हणजे लोकसंख्या विषयक धोरण होय.

३) कुटुंब नियोजन कार्यक्रम.

शासकीय पातळीवर लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजन कार्यक्रम राबविणारा भारत जगात पहिला देश आहे. १९५२ मध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रम स्वीकारण्यात आला.

कुटुंब नियोजन कार्यक्रमात संतती नियमन शस्त्रक्रिया, पुरुष नसबंदी, विवाह वयात वाढ करणे, संतती नियमाच्या साधनांचा वापर करण्यास प्रवृत्त करणे, गर्भपातास मान्यता देणे. इत्यादीवर विशेष भर देण्यात आला आहे.

भारतातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे उद्दिष्ट छोटे कुटुंब मानक तयार करणे असे आहे .सध्या मुलगा किंवा मुलगी दोनच आपत्य वास ,३ वर्षानंतर दुसरे मुल आणि सार्वजनिक लसीकरण या तीन मुद्द्यावर भर देण्यात येत आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रमामुळे भारतातील जननदर १९५० मधील ६.४ वरून २०१२ मध्ये २.४ वर आला.

४) राष्ट्रीय लोकसंख्या धोरण - १९७६

१९७६ मध्ये आणीबाणीच्या काळात राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाची घोषणा करण्यात आली. या धोरणाने कुटुंब नियोजनाचा कुटुंब कल्याण असा विस्तार केला. तत्कालीन आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. करण सिंग यांनी १६ एप्रिल १९७६ रोजी पहिले लोकसंख्या विषयक धोरण जाहीर केले.

या धोरणाची उद्दिष्टे.

1. मुलीचे विवाहाचे वय १५ वरून १८ वर्षपर्यंत व मुलाचे वय १८ वरून २१ वर्ष करणे.
2. मुलींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष पुरविणे.
3. शिक्षण पद्धतीत लोकसंख्याविषयक शिक्षणाचा अंतर्भाव करणे.
4. शासकीय कार्यालय/खाती यांना कुटुंब नियोजन कार्यक्रमात सहभागी करून घेणे .
5. निर्बीजीकरण शस्त्रक्रियेच्या आर्थिक मदतीत वाढ करणे.
6. कुटुंब नियोजन विषयक संशोधनाकडे अधिक लक्ष देणे.
7. ग्रामीण भागात कुटुंब नियोजनाचा लोकांनी स्वीकार करावा म्हणून प्रसार माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेणे.
8. राज्यांना मिळणारी आर्थिक मदत लोकसंख्या नियंत्रणाच्या यशावर अवलंबून ठेवणे.

५) कुटुंब कल्याण कार्यक्रम

कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे नाव बदलून कुटुंब कल्याण कार्यक्रम करण्यात आले.

सहावी पंचवार्षिक योजना आणि कुटुंब कल्याण कार्यक्रम.

यामध्ये पुढील दीर्घकालीन धोरण आखण्यात आले.

१) दर हजारी जननदर ३३ वरून १९९५ पर्यंत २१ वर आणणे.

२) मृत्यूदर १४ वरून ९ पर्यंत खाली आणणे.

३) बालमृत्यू प्रमाण १२९ वरून ६० पर्यंत कमी करणे.

४) जननक्षम जोडप्यांना कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देणे.

५) २००० पर्यंत लोकसंख्या ५५ कोटी राहील अशी व्यूहरचना करणे.

आठवी पंचवार्षिक योजना आणि कुटुंब कल्याण कार्यक्रम

आठव्या योजनेत लोकसंख्या नियंत्रण आणि कुटुंब कल्याणसंबंधी लक्ष्ये पुढीलप्रमाणे होती.

१) योजनेच्या शेवटपर्यंत लोकसंख्या वृद्धीदर १.७८ टक्या पर्यंत कमी करणे.

२) जननदर दर हजारी २७ पर्यंत आणि मृत्युदर ९.२ पर्यंत घटविणे.

३) पुरुषांचे सरासरी आयुर्मान ६१ वर्षे व स्त्रियांचे ६२ वर्षे अंदाजित करण्यात आले.

४) सामान्य जोडपे प्रजननदर प्रति हजार १५७.५ राहील.

६) राष्ट्रीय लोकसंख्या विषयक धोरण - २०००

करुणाकरण समितीच्या अहवालानुसार पर्यावरण रक्षण, लोकसंख्या वाढ आणि विकास हे विषय केंद्रस्थानी ठेवून १९९३ मध्ये डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष अभ्यास गट नेमला . या गटाने आपला अहवाल १९९४ मध्ये सादर केला. त्यानुसार सन २००० मध्ये लोकसंख्या विषयक राष्ट्रीय धोरण ठरवण्यात आले.

महत्त्वाची उद्दिष्टे

१) अल्पकालीन उद्दिष्ट - संतती नियमनासाठी आवश्यक साधनांचा पुरवठा करणे. आरोग्याच्या पायाभूत सुविधा व एकात्मिक सेवा पुरविणे.

२) मध्यकालीन उद्दिष्ट - प्रत्येक जोडप्याला दोन मुले यासाठी प्रोत्साहन देणे.

३) दीर्घकालीन उद्दिष्ट - लोकसंख्येचे २०४५ पर्यंत स्थिरीकरण करणे.

या धोरणात केलेल्या शिफारशी

१) १४ वर्षापर्यंतच्या मुला मुलींना प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करावे.

२) शाळेतील गळतीचे प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील प्रमाण २०% पेक्षा कमी आणावे.

३) जननदर नियंत्रणासाठी व संतती नियमनात या बाबत सामान्य लोकांना माहिती देण्यासाठी विशेष व्यवस्था निर्माण करावी.

४) फक्त दोन मुले असलेल्या व निर्बजीकरण करून घेतलेल्या दारिद्र्यरेषेखालील दाम्पत्यांच्या नावे ५००० रुपयांची विमा पॉलिसी उघडावी.

५) १८ वर्षापेक्षा उशिरा विवाह करणाऱ्या मुलींना बक्षीस देणे तसेच २१ वर्षानंतर मातृत्व स्वीकारणाऱ्या मुलींना बक्षीस देणे.

६) माता मृत्युदराचे प्रमाण दर एक लाख जिवंत जन्मामागे १०० पेक्षा कमी आणावा.

७) ८० टक्के प्रसूती संस्थात्मक पद्धतीने व १०० टक्के प्रसूती या प्रशिक्षित व्यक्तीच्या उपस्थितीत व्हाव्यात.

८) जन्म,मृत्य, विवाह, गर्भधारणा यांचे १०० टक्के नोंदणीचे लक्ष साध्य करावे.

९) ग्रामीण भागात रुग्णवाहिका सेवा पुरवण्यासाठी विशेष फंड व कमी व्याजदराचे कर्ज उपलब्ध करून द्यावे.

१०)पंचायत समिती व जिल्हा परिषदांनी लहान कुटुंब धोरण राबविण्यासाठी बक्षिसे द्यावीत.

जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक लागतो. आणि क्षेत्रफळाच्या बाबतीत ३.२८ दशलक्ष चौरस कि.मी. क्षेत्रफळ असलेल्या आकाराच्या बाबतीत भारत जगात सातव्या क्रमांकावर आहे. भारताच्या लोकसंख्ये बाबत जन्मदर जास्त आणि मृत्यूदर कमी असल्याकारणाने लोकसंख्येचा विस्फोट होताना दिसून येतो.

वाढत्या लोकसंख्येमुळे भारतात अनेक समस्या निर्माण होताना दिसून येते. उदा. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, पर्यावरणीय इत्यादी समस्या निर्माण होताना दिसून येते. म्हणून भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये लोकसंख्या विषयक धोरण प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ-

1. प्रा. एन. एल. चव्हाण, भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन (२००९), जळगाव.
2. विठ्ठल पुंगळे ,भारतीय अर्थव्यवस्था आनंद पब्लिकेशन्स (२०१५), औरंगाबाद.

3. प्रा. डी.आर.जगताप, प्रा.सौ. नीता वाणी, डॉ.मंगला जंगले, प्रा. डी.जी. पाटील, भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टिक्षेप, प्रशांत पब्लिकेशन (२०११), जळगाव.
4. श्री रंजन कोळंबे,भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन (२०१४-१५), पुणे.
5. डॉ. डी.आर.जगताप, डॉ. डी.जी.पाटील, डॉ. निता वाणी, प्रा. योगेश जगताप, भारतीय अर्थव्यवस्थेचे परिदृश्य,(२०१६),जळगाव.
6. mv.m. Wikipedia .org.
7. maharashtra times. org.
8. www. mpsc mantra.com.
9. www. encyclopedia.com
10. www.education.gov.in.

आरपार या दलित स्त्री आत्मकथनातील स्त्री वेदना: स्त्री वेदनेचे बहुआयामी पदर

संशोधक विद्यार्थी
प्रशांत आत्माराम गवळे
मराठी विभाग, पीपल्स कॉलेज,नांदेड

संशोधक मार्गदर्शक
प्रा. डॉ. अहेर डी. के.
विभाग प्रमुख, मराठी विभाग,
म. ज्या. फुले महाविद्यालय, मुखेड जि. नांदेड.

सारांश (Abstract)

मराठी दलित आत्मकथन परंपरेत दलित स्त्री आत्मकथन हे सामाजिक वास्तवाचे जिवंत दस्तऐवज ठरते. आरपार हे कमल कदम यांचे आत्मकथन दलित स्त्रीच्या आयुष्यातील वेदना, पीडा, संघर्ष आणि आत्मभान यांचे प्रांजळ व निर्भीड चित्रण करते. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये *आरपार* या आत्मकथनातील स्त्री वेदनेचे बहुआयामी स्वरूप अभ्यासले आहे. दलित स्त्रीला केवळ जातीय अन्यायच नव्हे तर पितृसत्ताक मानसिकतेतून निर्माण होणारी कौटुंबिक, सामाजिक, लैंगिक आणि मानसिक वेदना सहन करावी लागते, हे या आत्मकथनातून स्पष्ट होते.

दलित स्त्रीचा अनुभव हा दुहेरी शोषणाचा अनुभव आहे. एकीकडे ती जातीय अन्यायाची बळी ठरते, तर दुसरीकडे स्त्री म्हणून तिला घरात आणि समाजात दुय्यम स्थान दिले जाते. आरपार मधील अनुभव हे वैयक्तिक नसून सामूहिक दलित स्त्री अनुभवांचे प्रतिनिधित्व करतात. या आत्मकथनात स्त्री वेदना केवळ हळहळ व्यक्त करणारी नसून प्रश्न विचारणारी, अस्वस्थ करणारी आणि प्रतिकाराची भूमिका घेणारी ठरते.

या अभ्यासात स्त्री वेदनेचे कौटुंबिक, पितृसत्ताक, जातीय, सामाजिक आणि मानसिक असे विविध पदर उलगडण्यात आले आहेत. दलित स्त्री ही केवळ पीडित नसून ती आत्मभान जागवणारी आणि स्वतःचे अस्तित्व घडवणारी व्यक्ती आहे, ही भूमिका या संशोधनातून अधोरेखित केली आहे.

मुख्य शब्द (Keyword) : दलित स्त्री, स्त्री वेदना, पितृसत्ता, जातीय अन्याय, आत्मकथन

१. प्रस्तावना

दलित साहित्य हे शोषित समाजाच्या वेदनेतून निर्माण झालेले साहित्य आहे. या साहित्याने समाजातील अन्याय, भेदभाव आणि दडपशाही यांचे वास्तव उघड केले. मात्र दलित स्त्रीचा अनुभव हा दलित पुरुषांच्या अनुभवांपेक्षा वेगळा आणि अधिक वेदनामय आहे. दलित स्त्रीला एकाच वेळी जात आणि स्त्रीत्व या दोन्ही ओळखीमुळे अन्याय सहन करावा लागतो. त्यामुळे तिची वेदना ही दुहेरी आणि बहुआयामी स्वरूपाची ठरते.

मराठी दलित आत्मकथन परंपरेत दलित स्त्री आत्मकथनांची संख्या तुलनेने कमी असली, तरी त्यांचे सामाजिक महत्त्व मोठे आहे. आरपार हे कमल कदम यांचे आत्मकथन दलित स्त्रीच्या आयुष्यातील वास्तव मांडते. हे आत्मकथन केवळ एका स्त्रीचे जीवनकथन न राहता, संपूर्ण दलित स्त्री समाजाचे प्रतिनिधित्व करते.

आरपार मध्ये दलित स्त्रीचे आयुष्य घर, कुटुंब, समाज आणि जातीय रचनेत कसे अडकलेले आहे, हे स्पष्टपणे दिसते. घरात तिला गप्प राहायला शिकवले जाते, समाजात तिला कमी लेखले जाते आणि जातीय ओळखीमुळे तिला सतत अपमान सहन करावा लागतो. या सगळ्या वेदनांतून दलित स्त्रीचे व्यक्तिमत्त्व घडत जाते.

महत्त्वाचे म्हणजे, आरपार मधील स्त्री ही केवळ सहन करणारी नाही. ती प्रश्न विचारते, अन्यायाला ओळखते आणि हळूहळू प्रतिकाराची भूमिका घेते. त्यामुळे हे आत्मकथन वेदनेचे दस्तऐवज असण्याबरोबरच आत्मभान आणि संघर्षाचे प्रतीक ठरते.

या संशोधन पेपरमध्ये आरपार मधील स्त्री वेदनेचे बहुआयामी पदर उलगडून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दलित स्त्रीच्या वेदनांचा अभ्यास करताना कौटुंबिक, पितृसत्ताक, जातीय आणि मानसिक पातळयांचा विचार करण्यात आला आहे.

२. संशोधनाची उद्दिष्टे व पद्धती

उद्दिष्टे :

१. आरपार मधील स्त्री वेदनेचे विविध पदर समजून घेणे.

२. दलित स्त्रीवर होणाऱ्या पितृसत्ताक आणि जातीय अन्यायाचा अभ्यास करणे.

३. स्त्री वेदनेतून निर्माण होणाऱ्या प्रतिकार वृत्तीचा शोध घेणे.

३. मुख्य विवेचन : स्त्री वेदनेचे बहुआयामी पदर

३.१ कौटुंबिक वेदना

दलित स्त्रीचे आयुष्य घराच्या चौकटीतच अधिक घट्ट अडकलेले दिसते. घर हे तिच्यासाठी प्रेम, सुरक्षितता आणि आधार देणारे ठिकाण असावे अशी अपेक्षा असते; पण वास्तवात तेच घर तिच्या वेदनेचे, दडपणाचे आणि गप्प राहण्याच्या सक्तीचे केंद्र बनते. दलित स्त्री लहानपणापासूनच घरकामाची सवय लावून घेत असते. स्वयंपाक, पाणी भरणे, साफसफाई, मुलांची काळजी, वृद्धांची सेवा—ही सगळी कामे तिच्यावर नैसर्गिक जबाबदारी म्हणून टाकली जातात. या कामांना कोणतीही किंमत दिली जात नाही; उलट ती कामे न केल्यास तिला दोष दिला जातो.

आरपार या आत्मकथनात घरातील स्त्रीचे स्थान स्पष्टपणे अधोरेखित होते. स्त्रीने फारसे बोलू नये, आपले मत मांडू नये आणि पुरुषांनी घेतलेले निर्णय मुकाट्याने स्वीकारावेत, अशी अपेक्षा तिच्याकडून ठेवली जाते. घरातील आर्थिक, सामाजिक किंवा वैयक्तिक निर्णयांमध्ये तिचा सहभाग नसतो. तिच्या इच्छा, स्वप्ने आणि भावना यांना महत्त्व दिले जात नाही.

कौटुंबिक नातेसंबंधांतूनही तिच्या वेदना वाढतात. माहेर आणि सासर या दोन्ही ठिकाणी तिच्याकडून सहनशीलतेचीच अपेक्षा असते. अन्याय झाला तरी 'घर टिकवणे' आणि 'संसार सांभाळणे' या नावाखाली तिने गप्प राहावे, असे समाज शिकवतो. त्यामुळे घर हे तिच्यासाठी सुरक्षित आश्रयस्थान न राहता मानसिक वेदना देणारे ठिकाण ठरते.

या कौटुंबिक वेदनांमुळे दलित स्त्रीचे आत्मभान दडपले जाते. मात्र *आरपार* मधील स्त्री या वेदनांवर प्रश्न विचारू लागते. घरापासून सुरू झालेली ही वेदना पुढे तिच्या संघर्षाची पहिली पायरी बनते.

३.२ पितृसत्ताक मानसिकतेतून निर्माण होणारी वेदना

दलित स्त्रीच्या वेदनेचा एक महत्त्वाचा आणि खोलवर परिणाम करणारा पदर म्हणजे पितृसत्ताक मानसिकता. दलित समाज स्वतः जातीय अन्याय आणि शोषणाचा बळी असतानाही, त्याच समाजात स्त्रीवर पुरुषसत्ताक वर्चस्व टिकून राहिलेले दिसते. पुरुषाला केंद्रस्थानी ठेवणारी ही मानसिकता स्त्रीला दुय्यम, दुर्बल आणि आज्ञाधारक मानते. त्यामुळे दलित स्त्रीला घरात आणि समाजात सतत दुय्यम स्थान स्वीकारावे लागते.

आरपार या आत्मकथनात पितृसत्ताक विचारसरणीचे वास्तव अत्यंत थेटपणे समोर येते. पुरुषांचे शब्द अंतिम मानले जातात, तर स्त्रीचे मत दुय्यम ठरते. स्त्रीने घरकाम करणे, संसार सांभाळणे आणि सगळे सहन करणे, हेच तिचे कर्तव्य असल्याची भावना रुजवली जाते. तिच्या कष्टांना किंमत नसते; ते तिचे 'कर्तव्य' मानले जाते.

पितृसत्ताक मानसिकतेमुळे दलित स्त्रीच्या शरीरावर आणि आयुष्यावरही नियंत्रण ठेवले जाते. ती कुठे जावे, कसे वागावे, कधी बोलावे, हे सगळे ठरवले जाते. स्त्रीचे स्वातंत्र्य संशयाच्या नजरेने पाहिले जाते. पुरुषाला मिळणारी मोकळीक स्त्रीला नाकारली जाते. यामुळे स्त्रीच्या मनात असुरक्षितता, भीती आणि न्यूनगंड निर्माण होतो.

महत्त्वाचे म्हणजे, ही पितृसत्ताक मानसिकता केवळ वरून लादलेली नसून ती समाजमनात खोलवर रुजलेली आहे. त्यामुळे स्त्रीलाही कधी कधी हे अन्यायकारक नियम स्वीकारावे लागतात. *आरपार* मधील स्त्री मात्र या मानसिकतेला ओळखते आणि तिच्यावर प्रश्न उपस्थित करते. हीच जाणीव पुढे तिच्या आत्मभानाची आणि प्रतिकाराची बीजे ठरते.

३.३ जातीय अन्यायातून निर्माण होणारी वेदना

दलित स्त्रीच्या वेदनेचा सर्वात तीव्र आणि खोलवर जखम करणारा पदर म्हणजे जातीय अन्याय. दलित स्त्री ही केवळ स्त्री म्हणूनच नव्हे, तर दलित म्हणूनही समाजाच्या दुय्यम स्तरावर ढकलली जाते. त्यामुळे तिचे जगणे सतत अपमान, तिरस्कार आणि असुरक्षिततेने भरलेले असते. सार्वजनिक जागा, शाळा, कामाची ठिकाणे किंवा सामाजिक व्यवहार—प्रत्येक ठिकाणी तिला जातीय ओळखीमुळे कमी लेखले जाते.

आरपार या आत्मकथनात जातीय अन्यायाचे अनुभव थेट आणि वास्तववादी पद्धतीने मांडलेले दिसतात. दलित स्त्रीला समाजात सन्मानाने वागवले जात नाही. तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले जाते, तिच्या उपस्थितीलाच कमी लेखले जाते. अनेकदा तिला आपली ओळख लपवावी लागते किंवा अपमान सहन करावा लागतो. हा अपमान केवळ बाह्य नसून तिच्या मनावर खोलवर परिणाम करणारा असतो.

जातीय अन्यायामुळे दलित स्त्रीच्या आयुष्यात कायमची भीती निर्माण होते. ती कुठे बोलावे, कसे वागावे, हे सतत तपासत राहते. चुकीचे काही केले नसतानाही तिला अपराधी असल्यासारखे वाटू लागते. समाजात सुरक्षित वाटावे, ही साधी अपेक्षाही तिच्यासाठी कठीण ठरते.

महत्त्वाचे म्हणजे, जातीय अन्याय आणि स्त्री म्हणून होणारा अन्याय हे वेगवेगळे अनुभव नसून ते एकमेकांत घट्ट गुंतलेले आहेत. दलित पुरुषावर होणारा जातीय अन्याय दिसतो; पण दलित स्त्रीवर त्याच अन्यायाचा अधिक कठोर परिणाम होतो. *आरपार* मधील स्त्री या अन्यायाची जाणीव ठेवून प्रश्न विचारते. ही जाणीवच पुढे तिच्या आत्मभानाचा आणि प्रतिकाराचा आधार बनते.

३.४ मानसिक आणि भावनिक वेदना

दलित स्त्रीच्या आयुष्यातील मानसिक आणि भावनिक वेदना या दिसायला न येणाऱ्या असल्या तरी त्या अत्यंत खोलवर परिणाम करणाऱ्या असतात. सततचा अपमान, दुर्लक्ष, गप्प राहण्याची सक्ती आणि स्वप्नांची कोंडी यामुळे तिचे मन हळूहळू थकते. बाहेरून ती सगळे सहन करत असल्यासारखी दिसते; पण आतून ती अस्वस्थ, घुसमटलेली आणि प्रश्नांनी भरलेली असते. या वेदना कुणाला सांगण्याचीही तिला मुभा नसते.

आरपार या आत्मकथनात दलित स्त्रीच्या मनातील ही घालमेल अत्यंत प्रांजळपणे व्यक्त होते. घरात आणि समाजात सतत दुय्यम वागणूक मिळाल्यामुळे तिच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. "आपण कमी आहोत", "आपले

मत महत्त्वाचे नाही" अशी भावना तिच्या मनात बळावते. यामुळे तिचा आत्मविश्वास खचतो आणि ती स्वतःलाच दोष देऊ लागते.

मानसिक वेदनांचा आणखी एक पैलू म्हणजे भीती. जातीय ओळख उघड होईल, बोलल्यामुळे वाद होईल, प्रश्न विचारल्यामुळे शिक्षा मिळेल—अशा भीतींमध्ये दलित स्त्री सतत वावरत असते. त्यामुळे ती मनातील दुःख आतच साठवते. या साठलेल्या भावनांचा परिणाम तिच्या आरोग्यावर, नातेसंबंधांवर आणि आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोनावर होतो.

मात्र आरपार मधील स्त्री या मानसिक वेदनांमध्येच स्वतःला ओळखू लागते. तिला जाणवते की आपले दुःख वैयक्तिक नसून सामाजिक आहे. ही जाणीव तिच्या आत्मभानाला आकार देते. वेदना हीच तिच्या प्रतिकाराची ताकद बनते. त्यामुळे मानसिक आणि भावनिक वेदना या केवळ दुर्बलतेचे लक्षण न राहता परिवर्तनाची सुरुवात ठरतात.

३.५ स्त्री वेदनेतून प्रतिकार आणि आत्मभानाची निर्मिती

दलित स्त्रीच्या आयुष्यातील वेदना केवळ सहन करण्यापुरत्याच मर्यादित राहत नाहीत; त्या हळूहळू प्रतिकार आणि आत्मभानाच्या दिशेने वाटचाल करू लागतात. सततचा अपमान, दडपण, गप्प राहण्याची सक्ती आणि अन्यायाची जाणीव या सगळ्यांतून दलित स्त्रीच्या मनात प्रश्न निर्माण होतात. "आपणच का सहन करायचे?", "हा अन्याय नैसर्गिक आहे का?" असे प्रश्न तिच्या विचारविश्वात उभे राहू लागतात. हाच प्रश्नांचा प्रवास तिच्या आत्मभानाची सुरुवात ठरतो.

आरपार या आत्मकथनात स्त्री वेदना ही केवळ हळहळ व्यक्त करणारी न राहता प्रतिकाराची भूमिका घेताना दिसते. लेखिका आपल्या आयुष्यातील अनुभव मांडताना अन्यायाला थेट नाव देते. ही स्पष्टता म्हणजेच प्रतिकाराची पहिली पायरी आहे. जे सहन केले जाते, ते सांगितले जात नाही तोपर्यंत बदल घडत नाही, ही जाणीव या आत्मकथनातून व्यक्त होते.

दलित स्त्रीचा प्रतिकार हा नेहमी उघडपणे दिसणारा नसतो. अनेकदा तो मौन तोडण्यात, प्रश्न विचारण्यात, स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यात दिसतो. घरात, समाजात आणि विचारांमध्ये रुजलेली ही प्रतिकाराची भावना तिच्या जगण्याला नवा अर्थ देते. वेदना आता दुर्बलतेचे चिन्ह न राहता ताकदीचे रूप धारण करतात.

महत्त्वाचे म्हणजे, हा प्रतिकार केवळ वैयक्तिक नसून सामूहिक स्वरूपाचा आहे. एका दलित स्त्रीचा आवाज अनेक स्त्रियांच्या अनुभवांचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे *आरपार* मधील स्त्री वेदना या परिवर्तनाची हाक ठरतात. आत्मभान जागे झाल्यावर दलित स्त्री स्वतःकडे केवळ पीडित म्हणून न पाहता, बदल घडवू शकणारी व्यक्ती म्हणून पाहू लागते. हाच या आत्मकथनाचा सर्वात महत्त्वाचा सामाजिक आशय आहे.

निष्कर्ष

आरपार हे दलित स्त्री आत्मकथन दलित स्त्रीच्या जीवनातील वेदनांचे केवळ वर्णन करत नाही, तर त्या वेदनांची सामाजिक मुळे उघड करते. या आत्मकथनातून स्पष्ट होते की दलित स्त्रीची वेदना एकरेषीय नसून ती बहुपातळी, बहुआयामी आणि गुंतागुंतीची आहे. कौटुंबिक बंधने, पितृसत्ताक मानसिकता, जातीय अन्याय आणि मानसिक-भावनिक पीडा या सगळ्या घटकांनी मिळून दलित स्त्रीचे आयुष्य आकाराला येते.

कौटुंबिक पातळीवर दलित स्त्रीला घरकाम, त्याग आणि सहनशीलतेच्या चौकटीत अडकवले जाते. पितृसत्ताक विचारसरणी तिच्या मतांना, इच्छांना आणि श्रमांना दुय्यम ठरवते. त्याच वेळी समाजातील जातीय रचना तिच्या

अस्तित्वालाच प्रश्नांकित करते. या सगळ्याचा परिणाम तिच्या मनावर खोलवर होतो आणि मानसिक वेदना निर्माण होतात. मात्र आरपार मधील स्त्री या वेदनांमध्येच अडकून राहत नाही.

या आत्मकथनाचा महत्त्वाचा निष्कर्ष असा की दलित स्त्री ही केवळ पीडित नाही. वेदना सहन करत करत ती अन्याय ओळखू लागते, त्यावर प्रश्न विचारू लागते आणि हळूहळू प्रतिकाराची भूमिका घेते. तिचे आत्मभान जागे होते आणि ती स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देते. त्यामुळे वेदना ही तिच्या दुर्बलतेचे चिन्ह न राहता परिवर्तनाची सुरुवात ठरते.

आरपार हे आत्मकथन दलित स्त्री अनुभव समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. ते दलित स्त्रीला सहनशील, गप्प आणि दुर्बल म्हणून न पाहता प्रश्न विचारणारी, संघर्ष करणारी आणि बदल घडवू पाहणारी व्यक्ती म्हणून सादर करते. म्हणूनच हे आत्मकथन मराठी दलित साहित्याच्या परंपरेत स्त्री वेदना, सामाजिक अन्याय आणि आत्मभान यांच्या अभ्यासासाठी अपरिहार्य ठरते.

संदर्भ (References)

प्राथमिक स्रोत :

1. कदम, कमल. *आरपार*. मुंबई : संबंधित प्रकाशन संस्था, संबंधित आवृत्ती.

दलित साहित्य व आत्मकथन विषयक संदर्भ :

2. लिंबाळे, शरणकुमार. *दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र*. औरंगाबाद : विद्या प्रकाशन.
3. पवार, उर्मिला. *आयदान*. मुंबई : ग्रंथाली.
4. गायकवाड, लक्ष्मण. *उचल्या*. पुणे : साकेत प्रकाशन.
5. सालवे, लक्ष्मण माने. *उपरा*. मुंबई : ग्रंथाली.
6. जाधव, बाबुराव. *दलित आत्मकथन : स्वरूप आणि समस्या*. पुणे : स्नेहवर्धन.

दलित स्त्री लेखन व स्त्रीवादी अभ्यास :

7. पवार, उर्मिला. *दलित स्त्री लेखन : वेदना आणि विद्रोह*. मुंबई : लोकप्रिय प्रकाशन.
8. थोरात, शांता. *दलित स्त्री अनुभव*. औरंगाबाद : कैलास प्रकाशन.
9. मेश्राम, मालती. *स्त्री, जात आणि समाज*. नागपूर : प्रतिमा प्रकाशन.
10. कडू, सविता. *दलित स्त्री आत्मकथनांचा अभ्यास*. पुणे : अक्षरधारा.

पितृसत्ता, जात आणि समाजरचना :

11. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. *जातिप्रश्न*. मुंबई : महाराष्ट्र शासन.
12. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. *स्त्री आणि सामाजिक न्याय*. संपा. – विविध.
13. देशपांडे, सुहास. *जात आणि आधुनिकता*. पुणे : प्रतिमा प्रकाशन.
14. ओमवेत, गेल. *दलित आणि लोकशाही*. नवी दिल्ली : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

समीक्षात्मक लेख व संशोधनग्रंथ :

15. पाटील, संजय. *मराठी दलित साहित्य : समीक्षा आणि चिंतन*. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
16. कांबळे, वसंत. *दलित साहित्याची सामाजिक भूमिका*. औरंगाबाद : कैलास प्रकाशन.
17. जाधव, प्रभाकर. *मराठी आत्मकथन परंपरा*. पुणे : स्नेहवर्धन.

शोधपत्रे व नियतकालिके (नमुना) :

18. "दलित स्त्री आत्मकथनातील वेदना आणि प्रतिकार" – *मराठी साहित्य समीक्षा*, अंक–विशेष.
19. "जात, लिंग आणि सत्ता" – *समाजशास्त्रीय विचार*, विशेषांक.
20. "Dalit Women's Autobiographies and Resistance" – *Indian Journal of Gender Studies*.

विकसित भारत @2047 : संकल्प आणि प्रयत्न

प्रा. डॉ. रवींद्र बापूराव शेंडे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

लोकमान्यय महाविद्यालय,वरोरा जि. चंद्रपूर -442907

गोषवारा

भारताकडे विकासासाठी आर्थिक व आर्थिकेत्तर घटक आहे. आर्थिक व आर्थिकेत्तर घटकांसोबत मानवी कौशल्य व आवश्यक त्याचवेळी कृत्रिम बुद्धिमत्तेचा(AI) वापर झाल्यास भारताला विकसितपणा सहज मिळणारा आहे. तसेच भारतातील तीव्र समस्या शून्य झाल्यास, शिक्षण, लोकसंख्या, शेती, छोटे उद्योग धंदे, नैसर्गिक साधन संपत्ती, शेतमजूर, आंतरराष्ट्रीय संस्था, आंतरराष्ट्रीय शांतता, छोट्या धंदे निर्मित गुणवत्तापूर्वक वस्तूंचा वापर, मानवी कौशल्य, एकमेकांचे एकमेकांना सहकार्य वाढल्यास विकसितपणा निर्माण होईल आणि तो टिकेल. भारत जगात इतर देशांना दीपस्तंभ व प्रेरणात्रोत आहे. कारण भारताकडे एकता आणि एकात्मता प्रचंड आहे.भारताकडे स्वार्थ आणि वर्चस्वाची भावना नाही तर शिस्त, मानवतावाद, विविधतेत एकता आहे.भारतात अनेक थोर महापुरुषांनी व संतांनी स्वार्थ व वर्चस्वाऐवजी समानता आणि शिस्तीला महत्त्वाचे स्थान दिले आहेत व हीच निस्वार्थ व स्वयंशिस्तीची भावना जगातीला इतर देशांना मार्गदर्शन करत भारत पूर्णतः स्वयंपूर्ण व शाश्वत विकसित होईल यात शंका नाही. आपला संकल्प बरोबर आहेत फक्त प्रयत्न कार्यसंस्कृतीच्या(ठरविलेले काम योग्य वेळात व चांगल्या प्रकारे पूर्ण करणे म्हणजे कार्यसंस्कृती होय,) आधारावर सकारात्मक करणे गरजेचे आहे. @2047 च्या पुढे भारताचा क्रमांक खऱ्या जागतिक महासत्तेच्या यादीत वरचा राहील. हे अंतिम खरे आहे.

प्रस्तावना

भारत सरकारने सर्व जनतेच्या वतीने विकसित भारत @2047 हा संकल्प तयार केला आहे. @2047 हा दूरवरचा विचार असला तरी सर्वांच्या सार्थक प्रयत्नांनी शक्य तितक्या लवकर हा विकसितपणा मिळवणे सोपे आहे. कारण कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी कौशल्य या दोन्हीवर एकत्र भर आपल्या देशात सुरु आहे व आज त्यात नवप्रवर्तनात्मक बाजूने अधिक विचार करणे महत्वाचे आहे. भारताची लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, शेती व शेतीसोबत जोडधंद्यातील कौशल्य, आर्थिक व आर्थिकेत्तर घटक,भारतातील तीव्र समस्या, आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य्, आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका, प्रत्येक देशातील छोटे उद्योगधंदे, गुणवत्ता पूर्ण वस्तूंची विक्री, जनतेचे सहकार्य्, रोज सूचनाऱ्या नवीन नवीन सार्थक युक्त्या या आधारावर भारताला विकसितपणा मिळविणे कठीण असले तरी ते शक्य आहे.

बीज शब्द – विकसित भारत, शाश्वत विकास, कबोट तंत्रज्ञान

संशोधन समस्या-

भारत नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विपुलते बाबत श्रीमंत आहे. परंतु साधन संपत्तीच्या वापराबाबत भरताला गरीब समजण्यात येते. कारण नैसर्गिक साधन संपत्तीचा आपल्याकडे अजूनही चांगला वापर होताना दिसत नाही. विकासासाठी नैसर्गिक साधन संपत्ती बरोबर भारताकडे लोकसंख्या आहे. या दोन्ही साधनांचा चांगला मेळ घालून विकसित भारत @2047 बनविणे जागतिकीकरणामध्ये कठीण गोष्ट असली तरी शक्य आहे. या व्युहरचनेतून हा विषय निवडण्यात आला आहे.

पूर्व साहित्याचा आढावा

1. भारताचे अनेक लोक मानवतेच्या नियमानुसार आचरण करतात. तर जगातील अनेक भाग अजूनही जंगलांच्या नियमानुसार चालतात. जगातील संघर्षाचे मूळ कारण स्वार्थ व वर्चस्वाची भावना असून कायम स्वरूपाची शांतता, एकता, शिस्त व मानवतावादी व्युहरचनेतून साध्य होऊ शकते. सध्याच्या जागतिक परिस्थितीत भारत सकारात्मक प्रयत्न करतो. ही सर्वांसाठी आनंदाची गोष्ट आहे**"- डॉ. मोहन भागवत**
2. ए.आय प्रगत होईल. संगणक अधिक वेगवान होईल. डेटा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होईल पण एक गोष्ट कायम राहील. कल्पकता, नैतिकता आणि विवेक या तीन गोष्टी मशीन मध्ये नसतात.- **अजिंक्य देशमुख**

व्याप्ती व मर्यादा-

या शोधनिबंधात निवडक प्रवाहांचा आढावा घेण्यात आला आहे शक्यतो अद्यावत माहितीचा आधार घेण्यात आला आहे. ही या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आहे.

संशोधन पद्धती

या शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करताना घटक विश्लेषण या पद्धतीचा वापर केला आहे. तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम सामग्रीचा वापर केला.

संशोधनाची उद्दिष्टे

1. विकसित भारत@ 2047 च्या दृष्टिकोनातून भारतीय लोकसंख्येचा अभ्यास करणे.
2. विकसित भारत @2047 च्या दृष्टिकोनातून भारतातील नैसर्गिक साधन संपत्ती बाबत अभ्यास करणे.
3. शेती व छोटे उद्योग धंद्यातील मानवी कौशल्य आणि विकसित भारत याचा एकत्रित अभ्यास करणे.
4. भारतातील तीव्र समस्यांची सोडवणूक अजूनही काय झाली नाही?तसेच आर्थिक व आर्थिकेत्तर घटकांचा अभ्यास करणे.

शोधनिबंधाची गृहीतक

1. विकसित भारत@ 2047 हा प्रश्न कठीण वाटत असला तरी शक्य आहे.

विषय विश्लेषण

भारताची लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, शेती व शेतीसोबत जोडधंद्यातील कौशल्य, आर्थिक व आर्थिकेत्तर घटक,भारतातील आणि तीव्र समस्या, आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य, आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका, प्रत्येक देशातील छोटे उद्योगधंदे, गुणवत्ता पूर्ण वस्तूंची विक्री, जनतेचे सहकार्य, रोज सूचनाऱ्या नवीन नवीन सार्थक युक्त्या या आधारावर भारताला विकसितपणा मिळविणे कठीण असले तरी ते शक्य आहे. हे अंतिम खरे. पुढील 6 विविध भागात विषयाचे विश्लेषण केले आहे व आवश्यक उपाययोजनाही सुचविल्या आहे.

I.भारतीय लोकसंख्या-

भारताची लोकसंख्या अतिरिक्त आहे. विवाहाची सार्वत्रिकता, सामाजिक वातावरण, देशाचे हवामान, अज्ञान आणि निरक्षरता, संयुक्त कुटुंब पद्धती, शासनाचे दुर्लक्ष, कुटुंब नियोजन कार्यक्रमाकडे दुर्लक्ष, निकृष्ट राहणीमान, मनोरंजनांच्या सोयींचा अभाव, सामाजिक चालीरीती, दुष्काळावर विजय, साथिच्या रोगांचा नायनाट, आरोग्याच्या सोयीत वाढ, प्रसूतींच्या सोयित वाढ, सरासरी आयुर्मानात वाढ आणि निर्वासित लोकांची आवक या अनेक कारणामुळे प्रचंड वाढली आहे. कुटुंब नियोजनासारखा कार्यक्रम 1951 ला सुरू झाला असताना सुद्धा सामाजिक चलिरिती व शासनाच्या दुर्लक्षामुळे भारताची लोकसंख्या प्रचंड वाढली. सुरुवातीच्या काही पंचवार्षिक योजनेमध्ये लोकसंख्येच्या प्रश्नाला प्राधान्य देणे खूप गरजेचे होते. परंतु तसे प्रभावीपणे झाले नाही. पुढे 1977 मध्ये लोकसंख्या कमी

करण्यासाठी सक्तीचा नसबंदी कार्यक्रम आखण्यात आला. या कार्यक्रमात पद्धती चुकीच्या असल्यामुळे शासनाचे अज्ञान जगापुढे आलेले पाहायला मिळते. या सक्तीच्या कार्यक्रमाच्या पुढे लोकसंख्येकडे फारसे लक्ष कुणाचेही गेले नाही आणि 21 व्या शतकाच्या सुरुवातीला नवीन लोकसंख्या विषयक धोरण-२००० सुरु झाले व लोकसंख्या वाढीदाराला काही प्रमाणात आळा बसलेला पाहायला मिळतो. एकूणच आपली लोकसंख्या निसंकोचणे अतिरिक्त आहे (2011 च्या जनगणनेनुसार 121 कोटी तर, 2025 -2026 च्या आकडेवारीनुसार 140 कोटी) अतिरिक्त असलेल्या लोकसंख्येत चांगले वैशिष्ट्ये कमी व अडचणी किंवा दोष जास्त आहे. उदा: लोकसंख्येची घनता, साक्षरता दर, स्त्री- पुरुष प्रमाण, ग्रामीण - शहरी स्थानांतरण, यात्त बिघाड होत आहे. फक्त एक जमेची बाजू अशी की, आपल्या लोकसंख्येत कार्यकारी लोकसंख्येचा गट वाढला आहे. त्यामुळे भारताला लोकसंख्येबाबत तरुण देश म्हणतात. ही तरुण लोकसंख्या नैसर्गिक साधनांच्या मदतीने समृद्ध करणे आवश्यक आहे.आज भारत एका बाजूने नैसर्गिक साधन संपत्तीबाबत तसेच लोकसंख्येबाबत श्रीमंत आहे. परंतु दुसऱ्या बाजूने गरीब आहे. कारण लोकसंख्येचा चांगला वापर होताना दिसत नाही तसेच नैसर्गिक साधन संपत्तीचा अपव्यय खूप सुरू आहे. उदा:प्रत्येक मनुष्याची पाणी वापरण्याची मानसिकता तपासल्यास लक्षात येईल. तसेंच मला दुसऱ्याचे काही घेणे-देणे नाहीत असा बऱ्याच लोकांमध्ये विचार आहे. भारताला नैसर्गिक साधनसंपत्ती व लोकसंख्येबाबत पुन्हा नव्याने श्रीमंत बनविणे आवश्यक आहे. त्यासाठी अतिरिक्त लोकसंख्येला पर्याप्त लोकसंख्येत व नैसर्गिक साधन संपत्तीच्या वापराबाबत चांगली मानसिकता तात्काळ आणने गरजेचे आहे. शासनाने आपल्या बाजूने लोकसंख्या कमी करण्यासाठी ठोस लाभार्थी योजना वापरणे गरजेचे आहे. तसेच गैरसरकारी संस्थांनी यात पुढाकार वाढवणे गरजेचे आहे. तसेच विवाहित पिढी बरोबर अविवाहित पिढीने पर्याप्त लोकसंख्येचा विचार करावा व सामाजिक वातावरण चांगले बनवावे. उदा: वंशाचा दिवा मुलासोबत मुलगी, उत्पन्नाचा व म्हातारपणाचा आधार मुलाबरोबर मुलगी, अशा विविध सार्थक युक्त्याद्वारे आपली लोकसंख्या पर्याप्त बनणारी आहे. विकसित भारत@ 2047 करिता पर्याप्त लोकसंख्या पूर्व अट आहे. हा संकल्प व प्रयत्न दृढ करणे आवश्यक आहे.

II.नैसर्गिक साधन संपत्ती

भारत नैसर्गिक साधनसंपत्ती बाबत श्रीमंत आहे असे एका बाजूने म्हटले जाते. कारण भारताकडे विकासासाठी विपुल साधनसंपत्ती आहे. उदाहरणार्थ भौगोलिक विभागात पर्यटन स्थळे, पाऊस पाणी, चांगले खनिजे, पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जेचे स्त्रोत, पाणी, वने इत्यादी. अशी विपुलता जगाच्या पाठीवर निवडक देशांनाच आहे. परंतु दुसऱ्या बाजूने भारताला नैसर्गिक साधन संपत्तीच्या वापराबाबत गरीब समजल्या जाते. कारण अजूनही पाण्याचा वापर काटकसरीने होत नाही, पर्यटन स्थळे असूनही सुरक्षितता त्यात आपण देऊ शकलो नाही, जंगलांनी अच्छादित प्रदेश कमी कमी होत जात आहे, पावसाचा अनियमितपणा वाढला आहे, पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांच्या वापराबाबत मानसिकता खराब आहे. त्यामुळे निसर्गाची कृपा होण्याऐवजी अवकृपा वाढत जात आहेत. नैसर्गिक साधनसंपत्ती बाबतची गरिबी व मानवी गरिबी बाबत चांगला दृष्टिकोन बनल्यास ती दूर होणारी आहे. वरील सर्व उपाय लोकांच्या हातात आहे. शासनाने नव्याने राज्यघटनेतील अधिकार आणि कर्तव्य सर्वांना लक्षता आणून देणे गरजेचे आहे. नैसर्गिक साधनसंपदेच्या वापराबाबत घराघरात प्रयत्न करणेरणे गरजेचे आहे. तसेच राष्ट्राच्या जीवनातील महत्त्वही ओळखणे गरजेचे आहे.

III.**भारतीय शेती**

भारतीय शेती विकसनशील किंवा मागासलेली असताना सुद्धा अन्नधान्य सर्वांना पुरविते. मागील हरितक्रांतीचे ते यश आहे. असे असले तरी सुशिक्षितातील सुशिक्षिताला व अडाण्यातील अडाण्याला काम देण्याची जबाबदारी शेती सांभाळत आहे. वन्य जीवांना सांभाळण्याची जबाबदारी शेती सांभाळत आहे. पावसाचा अनिमितपणा, कर्जपुरवठा भेद्, सामाजिक वातावरण, जमिनीचे विभाजन व अपखंडन, दैववादी दृष्टिकोन, चांगले व्यवस्थापनाचा अभाव, विक्री व्यवस्था अशा अडचणी शेतीत असल्या तरी, शेतकरी नव्याने होत असलेले बदल स्वीकारण्यास तयार आहे. वाढत्या उत्पन्नाबरोबर जमिनीची सुपीता कायम राहील या पद्धतीच्या युक्त्या शेतीत वापरणे गरजेचे आहे. धंद्याची तत्वे शेतीत वापरणे शक्य असली तरी शेतीत काही नैसर्गिक अडचणी आहे. त्यासाठी शासनाने वेळोवेळी शेतक़्यांना आर्थिक व इतर प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. 24 ×7 हे समीकरण ख़्या अर्थाने शेतात वापरणे आवश्यक आहे. शेतक़्यांचा संपूर्ण कौटुंबिक आरोग्य खर्च, मुलांचे शिक्षण, पेन्शन सारखी सुविधा, प्रत्येक वेळी मानसन्मान व कोणताही शेतकरी व शेतमजूर आत्महत्या करणार नाही असे नवीन कार्यक्रम वेळोवेळी अमलात आणल्यास भारतीय शेतीची खरी ओळख होणार आहे. भारतीय शेतीत शाश्वत विकास व जीवणमान अती आनंद करण्याची क्षमता आहे.त्यासाठी शेतकरी, शेतमजूर यांचा सकारात्मक दृष्टिकोन, व्यावसायिक दृष्टिकोन, मानवतावादी दृष्टिकोन नव्याने शासनाच्या सहकार्याने वाढविने अपेक्षित आहे. शेती व ग्रामीण विकास एकत्र साधता साधता शहरातील जनता खेड्यात थांबून आपले राहणीमान वाढविणार, कौशल्य वाढविणार असा खेड्यांचा भारत विकसित भारतासाठी व शाश्वत विकासासाठी अपेक्षित आहे. यात अनेक अडचणी असल्या तरी कार्यसंस्कृतीच्या आधारे अडथळे सोडविण्याच्या क्षमता सरकारमध्ये व लोकांमध्ये आहे. यात व्यापक दृष्टिकोन आवश्यक आहे. फक्त पुढे जाणे म्हणजे शाश्वत विकास नाही तर पुढच्या पिढ्यांना योग्य वातावरण उपलब्ध करून वर्तमानाचा आनंद वाढविणे यात अपेक्षित आहे. यात प्रत्येक शेतक़्याची व शेतीमजुरांची कृती वाढणे अपेक्षित आहे. विकसित भारत 2047चा आधार शेती आहेत. हे प्रथमतः लक्षात घेणे गरजेचे आहे.तसेच जय जवान जय किसान हा नाराही यात महत्त्वाचा आहे.

IV.**छोटे उद्योगधंदे**

भारतीय छोटे उद्योगधंदे इंग्रज साम्राज्य अगोदर जगात प्रसिद्ध होते. या धंद्यानिर्मित वस्तू गुणवत्तापूर्व व आरोग्यदायी होत्या. उदा. काश्मिरी शाली, ढाक्याची मलमल. परंतु शोषण आणि विकास या युक्तीचा वापर करून इंग्रजांनी भारतीय लघु आणि कुटीर उद्योगधंदे पूर्णतः बंद पाडण्याचा प्रयत्न केला. परंतु पुढे शासनाच्या व इतरांच्या लक्षात आल्यामुळे औद्योगिक धोरण राबवत असताना छोट्या धंद्यांकडे थोड्या का प्रमाणात होईना लक्ष देण्यात आले आणि आज आधुनिक काळात या धंद्यांची ताकद पुन्हा सर्वांच्या लक्षात आली आहे. रोजगार निर्मिती, चांगल्या वस्तूंचे उत्पादन, पारंपरिक कौशल्याचे रक्षण व विकास, औद्योगिक शांतता आणि नैतिकतेला प्रोत्साहन, पर्यावरणाचे रक्षण, शाश्वत विकासाचा आधार अशा अनेक उपलब्धता उपलब्ध होत असल्यामुळे, छोटी धंदे गावागावात तसेच शहरा - शहरात विकसित झाले पाहिजे असा मानस सर्वांचा वाढत आहे.जागतिकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यात मोठे धंदे महत्त्वाचे असले तरी छोट्या धंद्यामध्ये कुठल्या वस्तू तयार होणार याची यादी व बंधने शासनाने जनतेचे हित लक्षात घेऊन आखने गरजेचे आहे. भारतीय ग्राहकांच्या आवडीनिवडी, परदेशी ग्राहकांच्या आवडीनिवडी एकत्र विचारात घेऊन" **मेक इन इंडिया बाय स्मॉल अँड कॉटेज इंडस्ट्री"** (Make in India by Small & Cottage Industry) असा प्रचार तंत्र आणि कृती कार्यक्रम वापरणे गरजेचे आहे. नवीन व्यावसायिक दृष्टिकोन छोट्या धंद्यात आणणे गरजेचे आहे.छोटे धंदे टिकली पाहिजे, वाढले पाहिजे, ग्राहक वर्ग आरोग्यदायी व निरोगी निर्माण झाला

पाहिजे. यासाठी शासनाचे प्रोत्साहन धोरण नव्याने राबविणे गरजेचे आहे. वस्तूचा ब्रँड छोट्या उद्योगधंद्यातही असतो हे ओळखणे गरजेचे आहे. प्रत्येक देशातील लोकांनी, शासनाने आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी मानवी कौशल्य व गुणवत्तापूर्ण आरोग्यदायी वस्तू निर्मितीचे लहान लहान स्त्रोत शोधून काढणे आणि वाढविणे गरजेचे आहे. तसेच या छोट्या धंद्यातील वस्तूंचा ग्राहक वर्ग प्रत्येक देशात कसा वाढेल याचा शोध घेणे गरजेचे आहे. या धंद्यासमोर अनेक समस्या आहेत. त्या समस्या विविध प्रशिक्षण आणि संशोधन यामार्फत दूर करणे आवश्यक आहे. विकसित भारत@ 2047 चा आधार मोठ्या धंद्याबरोबर छोटे धंदे आहे. ही पूर्व अट लक्षात घेऊन कृती करणे गरजेचे आहे.

V.भारतातील तीव्र समस्या आणि विकसित भारत @2047

भारताचा विकसनशीलपणा अजूनही दूर झाला नाही त्यासाठी तीव्र समस्या प्रमुख जबाबदार आहेत.या तीव्र समस्येमध्ये गरिबी, बेकारी, महागाई आणि आर्थिक विषमता इत्यादींचा समावेश करता येईल. खऱ्या लाभार्थ्यापर्यंत लाभ् पोहोचणार अशा सोयी शासनाने प्रत्येक वेळी उभ्या करून दिल्या असल्या तरी लाभांपासून खरे लाभार्थी दूर असलेले पाहायला मिळते. मध्यस्थ वर्गच भारतामध्ये हा लाभ घेताना पाहायला मिळतो. तसेच जनतेचे सहकार्य प्रत्येक वेळी अपुरे पाहायला मिळतात. गरीबी आणि बेकारी या दोन्ही जुळ्या समस्या आहेत. त्या शून्य करण्यासाठी गरिबांचा दृष्टिकोन सुरुवातीला बदलविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर स्वयंरोजगारामध्ये रोजगार गुणक वाढवणे गरजेचे आहेत. महागाई आणि आर्थिक विषमता कमी करण्यासाठी वारसाहक्काचा कायदा चांगला करणे गरजेचे आहे. तसेच केंद्रीय बँक व शासनाचे धोरण विविध प्रभावी साधनासह अर्थव्यवस्थेत स्थिरता निर्माण करणारे असावे. वरील सर्व तीव्र समस्या शून्य झाल्यास विकसितपणा लवकर मिळणारा दिसतो. या तीव्र समस्या कायम असताना जो विकसितपणा मिळेल तो खोटा असेल.

VI.विकसित् भारत 2047 आणि आर्थिकेत्तर घटक

विकसित भारत @2047 करिता आर्थिक घटकांची भूमिका जशी महत्त्वाची आहे. अगदी त्याचप्रमाणे आर्थिकेत्तर घटक खूप महत्त्वाचे आहे. विज्ञान-तंत्रज्ञान, बँका, वित्त कंपन्या, पेन्शन, शिक्षण, वाहतूक व्यवस्था, दळणवळणाची साधने, ऊर्जा स्त्रोत, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, शेती, शेतमजूर, छोटे धंदे, भांडवल अशा आर्थिक घटकांबरोबरच आर्थिकेतर घटक महत्त्वाचे आहेत. आर्थिकेत्तर घटकात सामाजिक व सांस्कृतिक वातावरण, राजकीय वातावरण व धार्मिक वातावरण, कायदा व सुव्यवस्था, नैतिकता, मानवी कौशल्य, मानवतावाद निरपेक्षता अशा घटकांचा समावेश होतो.विकासाचा पाया आर्थिकेत्तर घटकांवर अवलंबून असावा व या सर्व घटकात वैज्ञानिक, नैतिकता, विवेक, कल्पकता, मानवी कौशल्य समाविष्ट असावी. कोणत्याही चुकीच्या प्रथा परंपरांना यात महत्व असता कामा नये. त्या चुकीच्या प्रथा-परंपरा फेकून देणे आवश्यक आहे. योग्य प्रथा परंपरा सांभाळून मानवतावादी व वैज्ञानिकता लक्षात घेऊन आर्थिकेत्तर घटक वाढविणे गरजेचे आहेत.

गृहीतकाची पडताळणी

भारताकडे विकासासाठी आर्थिक व आर्थिकेत्तर घटक आहे. आर्थिक व आर्थिकेत्तर घटकांसोबत मानवी कौशल्य व आवश्यक त्याचवेळी कृत्रिम बुद्धिमत्तेचा(AI) वापर झाल्यास विकसितपणा सहज मिळणारा आहे. भारतातील तीव्र समस्या शून्य झाल्यास, शिक्षण, लोकसंख्या, शेती, छोटे उद्योग धंदे, नैसर्गिक साधन संपत्ती, शेतमजूर, आंतरराष्ट्रीय संस्था, आंतरराष्ट्रीय शांतता, छोट्या धंदे निर्मित गुणवत्तापूर्वक वस्तूंचा वापर, मानवी कौशल्य, एकमेकांचे एकमेकांना सहकार्य वाढल्यास विकसितपणा निर्माण होईल आणि तो टिकेल. जगात भारत इतर देशांना दीपस्तंभ आणि प्रेरणा स्तंभ आहेत. कारण भारताकडे एकता आणि एकात्मता प्रचंड आहे. भारताकडे स्वार्थ आणि

वर्चस्वाची भावना नाही तर शिस्त, मानवतावाद, विविधतेत एकता आहे. भारतात अनेक थोर महापुरुषांनी व संतांनी स्वार्थ व वर्चस्वाऐवजी समानता आणि शिस्तीला महत्त्वाचे स्थान दिले आहेत व हीच निस्वार्थ व स्वयंशिस्तीची भावना जगातीला इतर देशांना मार्गदर्शन करत भारत पूर्णतः स्वयंपूर्ण व शाश्वत विकसित होईल यात शंका नाही. म्हणूनच विकसित भारत@ 2047 हा संकल्प कठीण वाटत असला तरी शक्य आहे.हे गृहीततक विश्लेषणाअंती सत्य ठरते.

निष्कर्षाकरिता उपाय योजना

1. भारताची पर्याप्त लोकसंख्या करण्यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था व जनतेनी एकत्र प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यातल्या त्यात अविवाहितानी पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्यामार्फतच विकसित भारत @2047 चा संकल्प पूर्ण होईल.
2. शासनाने आपले अज्ञान जगात व भारतीय समाजात दिसणार नाही. असे कृती कार्यक्रम अमलात आणू नये. त्याची विशेष काळजी घेणे विकसित भरत 2047 करिता आवश्यक आहे.
3. विकसित भारत@ 2047 या संकल्पपूर्ततेकरिता भारत प्रत्येक घटकाच्या विपुलतेबाबत व वापराबाबत श्रीमंत देश आहे. अशी ओळख जगात प्रथमता निर्माण करणे गरजेचे आहे.
4. भारताकडे स्वार्थ आणि वर्चस्वाची भावना नाही तर शिस्त, मानवतावाद ,विविधतेत एकता आहे. संस्कृती, थोर महापुरुषानी व संतांनी स्वार्थ व वर्चस्वाऐवजी समानता आणि शिस्तीला महत्त्वाचे स्थान दिले आहेत.ते कायम टिकविणे आवश्यक आहे.
5. भारतीय शेती, शेतकरी व छोट्या धंद्यातील कारागीर हा विकसित भारत @2047 चा महत्वपूर्ण आधार आहे.पारंपारिक कौशल्याचे संरक्षण करीत विकसितपणा मिळवण्याची क्षमता या वर्गाकडे आहेत.
6. आर्थिक व आर्थिकेत्तर घटक मानवी कौशल्य व वैज्ञानिक सकारात्मक मानवतावादी व्युह्रचनेतून वापरणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर दुसऱ्या क्रमांकावर करता येईल.
7. भारताकडे स्वार्थ व वर्चस्वाची भावना नसल्यामुळे आपला विकसितपणा मिळवत जगातील संपूर्ण देशांचा विकसितपणा सांभाळण्याची शक्ती भारताकडे आहे.
8. आंतरराष्ट्रीय संस्थाची भूमिका युद्ध, महामंदी यासारख्या अस्थिर करणाऱ्या घटना सांभाळण्यासाठी सक्रिय होणे आवश्यक आहे. प्रसंगा पुरत्या सक्रिय होता कामा नये तर प्रत्येक वेळी सक्रिय असणे अपेक्षित आहे.

सारांश

भारताकडे विकासासाठी आर्थिक व आर्थिकेत्तर घटक आहे. आर्थिक व आर्थिकेत्तर घटकांसोबत मानवी कौशल्य व आवश्यक त्याचवेळी कृत्रिम बुद्धिमत्तेचा(AI) वापर झाल्यास विकसितपणा सहज मिळणारा आहे. भारतातील तीव्र समस्या शून्य झाल्यास, शिक्षण, लोकसंख्या, शेती, छोटे उद्योग धंदे, नैसर्गिक साधन संपत्ती, शेतमजूर, आंतरराष्ट्रीय संस्था, आंतरराष्ट्रीय शांतता, छोट्या धंदे निर्मित गुणवत्तापूर्वक वस्तूंचा वापर, मानवी कौशल्य, एकमेकांचे एकमेकांना सहकार्य वाढल्यासविकसितपणा निर्माण होईल आणि तो टिकेल. जगात भारत इतर देशांना दीपस्तंभ आणि प्रेरणा स्तंभ आहेत. कारण भारताकडे एकता आणि एकात्मता प्रचंड आहे. भारताकडे स्वार्थ आणि वर्चस्वाची भावना नाही तर शिस्त, मानवतावाद, विविधतेत एकता आहे. भारतात अनेक थोर महापुरुषांनी व संतांनी स्वार्थ व वर्चस्वाऐवजी समानता आणि शिस्तीला महत्त्वाचे स्थान दिले आहेत व हीच निस्वार्थ व स्वयंशिस्तीची भावना जगातील इतर देशांना मार्गदर्शन करत भारत पूर्णतः स्वयंपूर्ण व शाश्वत विकसित होईल यात शंका नाही.

आपला संकल्प बरोबर आहेत फक्त प्रयत्न कार्यसंस्कृतीच्या (ठरविलेले काम योग्य वेळात व चांगल्या प्रकारे पूर्ण करणे म्हणजे कार्यसंस्कृती होय,) आधारावर सकारात्मक करणे गरजेचे आहे. @2047 च्या पुढे भारताचा क्रमांक खऱ्या जागतिक महासत्तेच्या यादीत वरचा राहील. हे अंतिम खरे आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

1. उद्योजकतेचे मूलमंत्र,महिला व बालकल्याण समिती, पुणे महानगरपालिका.
2. सरोदे आर,21 व्या शतकातील उद्योजकतेच्या संधी,मॅनेजमेंट रिसर्च जर्नल ,ISSN 2319-7943.
3. गोविलकर विनायक, भारतीय अर्थव्यवस्थेतील निर्णायक वळणे, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
4. देशपांडे विनायक, भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लिकेशन ,नागपुर, 2003.
5. कुलकर्णी अविनाश, औद्योगिक अर्थशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे ,2021.
6. अर्थसंवाद,मराठी अर्थशास्त्र परिषद, नियतकालिक, जानेवारी ते मार्च- 2019.
7. दैनिक वर्तमानपत्रे ,मार्च -2026

"उच्च शिक्षणातील महिला आणि डिजिटल परिवर्तन : एक अभ्यास"

श्री. सुरेश विठ्ठल चव्हाण
संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र विभाग)
संशोधन केंद्र : लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), पंचवटी, नाशिक

सारांश (Abstract) :-

एकाविसाव्या शतकात माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या विकासामुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर डिजिटल परिवर्तन घडून आले आहे. डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षण अधिक सुलभ, लवचिक आणि सर्वसमावेशक बनले आहे. विशेषतः उच्च शिक्षण क्षेत्रात ई-लर्निंग, ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म, डिजिटल ग्रंथालये, व्हर्च्युअल क्लासरूम आणि स्मार्ट शिक्षण प्रणाली यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे.

महिलांच्या शिक्षणाच्या संदर्भात डिजिटल परिवर्तन अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. पारंपरिक शिक्षण व्यवस्थेमध्ये सामाजिक बंधने, आर्थिक अडचणी आणि भौगोलिक मर्यादांमुळे अनेक महिलांना उच्च शिक्षण घेणे कठीण होते. डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षणाच्या पद्धतीत लवचिकता आली असून महिलांना घरबसल्या शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

भारतामध्ये महिलांच्या उच्च शिक्षणातील सहभागात गेल्या काही दशकांत मोठी वाढ झाली आहे. तथापि, डिजिटल विभाजन, इंटरनेट सुविधेचा अभाव, तांत्रिक कौशल्यांचा अभाव आणि आर्थिक मर्यादा या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत.

या संशोधन उच्च शिक्षणातील महिलांची स्थिती, डिजिटल परिवर्तनाचा प्रभाव, त्यातील संधी व आव्हाने यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच महिलांच्या डिजिटल सक्षमीकरणासाठी आवश्यक उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

बीजशब्द : महिला शिक्षण, उच्च शिक्षण, डिजिटल परिवर्तन, ई-लर्निंग, डिजिटल साक्षरता, ज्ञान अर्थव्यवस्था.

प्रस्तावना (Introduction) :-

आजच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये शिक्षण हे सामाजिक आणि आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन मानले जाते. विशेषतः उच्च शिक्षण व्यक्तीच्या बौद्धिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. महिलांचे शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक घटक मानले जाते. शिक्षित महिला केवळ स्वतःचा विकास घडवत नाही तर कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

भारतामध्ये महिलांच्या शिक्षणामध्ये गेल्या काही दशकांत लक्षणीय प्रगती झाली आहे. तथापि, ग्रामीण भागातील सामाजिक बंधने, आर्थिक मर्यादा आणि शैक्षणिक सुविधांचा अभाव यामुळे अनेक महिलांना उच्च शिक्षण घेणे कठीण जाते. माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शिक्षण क्षेत्रात डिजिटल क्रांती झाली आहे. इंटरनेट, संगणक, स्मार्टफोन, ऑनलाइन शिक्षण प्रणाली, डिजिटल ग्रंथालये आणि व्हर्च्युअल क्लासरूम यांच्या माध्यमातून शिक्षणाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाले आहेत.

डिजिटल परिवर्तनामुळे शिक्षण अधिक सुलभ, लवचिक आणि सर्वसमावेशक झाले आहे. विशेषतः महिलांसाठी हे परिवर्तन अत्यंत उपयुक्त ठरले आहे. अनेक महिलांना घरगुती जबाबदाऱ्या किंवा सामाजिक बंधनांमुळे नियमित शिक्षण घेणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत डिजिटल शिक्षण त्यांच्यासाठी एक प्रभावी पर्याय ठरतो.

तथापि, डिजिटल परिवर्तनाचे फायदे सर्व समाजघटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेले नाहीत. डिजिटल साधनांची कमतरता, इंटरनेट सुविधेचा अभाव आणि तांत्रिक कौशल्यांचा अभाव या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. त्यामुळे उच्च शिक्षणातील महिलांच्या संदर्भात डिजिटल परिवर्तनाचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

संशोधनाची उद्दिष्टे (Research Objectives) :-

1. उच्च शिक्षणातील महिलांच्या सहभागाचा अभ्यास करणे.
2. डिजिटल परिवर्तनामुळे शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.

3. महिलांच्या शिक्षणावर डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभाव तपासणे.
4. डिजिटल शिक्षणातील महिलांसमोरील अडचणींचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती (Research Methodology) :-

या संशोधनात वर्णनात्मक (Descriptive) आणि विश्लेषणात्मक (Analytical) संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

माहितीचे स्रोत :

i) दुय्यम माहिती (Secondary Data) :

सदर संशोधनात संशोधनविषयी उपलब्ध असलेले पुस्तके, संशोधन निबंध, सरकारी अहवाल, शैक्षणिक संकेतस्थळे, आंतरराष्ट्रीय संस्थांचे अहवाल यांच्या आधारे माहिती उपलब्ध करण्यात आलेली आहे.

भारतातील उच्च शिक्षणातील महिलांचा सहभाग :-

भारतामध्ये उच्च शिक्षण क्षेत्रात महिलांचा सहभाग मागील काही वर्षांत लक्षणीयरीत्या वाढत असल्याचे दिसून येते. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक जागरूकता आणि शासनाच्या विविध शैक्षणिक धोरणांमुळे महिलांना उच्च शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध झाल्या आहेत. विशेषतः माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शिक्षण क्षेत्रात डिजिटल परिवर्तन घडून आले असून त्याचा महिलांच्या शिक्षणावर सकारात्मक परिणाम झाला आहे.

डिजिटल शिक्षण प्रणाली, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, ऑनलाइन कोर्सेस, डिजिटल ग्रंथालये आणि व्हर्च्युअल क्लासरूम यांसारख्या साधनांमुळे महिलांना शिक्षण अधिक सुलभ आणि लवचिक झाले आहे. अनेक महिलांना घरगुती जबाबदाऱ्या किंवा भौगोलिक अडचणींमुळे नियमितपणे महाविद्यालयात जाणे शक्य होत नाही; परंतु डिजिटल शिक्षणामुळे त्या घरबसल्या शिक्षण घेऊ शकतात. त्यामुळे उच्च शिक्षणातील महिलांचा सहभाग वाढण्यास मदत झाली आहे.

याशिवाय शासनाच्या विविध योजना, शिष्यवृत्ती, शिक्षणाबाबत वाढलेली सामाजिक जागरूकता आणि डिजिटल सुविधांचा विस्तार यांमुळे मुलींमध्ये उच्च शिक्षण घेण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

उच्च शिक्षणातील महिला आणि डिजिटल परिवर्तन :-

1) प्रमुख डिजिटल साधनांची भूमिका :

डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झाले आहे. विशेषतः उच्च शिक्षणात डिजिटल साधनांचा वापर वाढल्यामुळे महिलांसाठी शिक्षण अधिक सुलभ, लवचिक आणि व्यापक झाले आहे. घरगुती जबाबदाऱ्या, सामाजिक मर्यादा किंवा भौगोलिक अडचणी असूनही महिलांना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होत आहे. खालील प्रमुख डिजिटल साधनांनी या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

i) ई-लर्निंग प्लॅटफॉर्म (E-Learning Platforms) :

ई-लर्निंग प्लॅटफॉर्म म्हणजे इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध होणारी ऑनलाइन शिक्षण प्रणाली होय. या प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, नोट्स, व्हिडिओ, क्विझ आणि परीक्षा यासारख्या विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध होतात. उदाहरणार्थ, Moodle, Google Classroom आणि Coursera यांसारख्या प्लॅटफॉर्मद्वारे विद्यार्थ्यांना घरबसल्या शिक्षण घेता येते.

महिलांसाठी हे विशेषतः उपयुक्त ठरते कारण त्यांना वेळेचे स्वातंत्र्य मिळते. घरातील जबाबदाऱ्या सांभाळत शिक्षण घेणे शक्य होते. यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांमध्ये शिक्षणाची उपलब्धता वाढली आहे.

ii) ऑनलाइन कोर्सेस (Online Courses) :

ऑनलाइन कोर्सेस हे डिजिटल शिक्षणाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. इंटरनेटच्या माध्यमातून विविध विषयांवर अल्पकालीन किंवा दीर्घकालीन अभ्यासक्रम उपलब्ध असतात. उदाहरणार्थ, SWAYAM, National Programme on Technology Enhanced Learning आणि edX यांसारख्या माध्यमांद्वारे उच्च दर्जाचे कोर्सेस उपलब्ध आहेत.

महिलांना करिअर विकासासाठी, कौशल्य वाढीसाठी आणि नवीन क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी ऑनलाइन कोर्सेस मोठ्या प्रमाणावर मदत करतात. उदाहरणार्थ, संगणक, डिजिटल मार्केटिंग, डेटा विश्लेषण यांसारख्या आधुनिक विषयांचे शिक्षण महिलांना सहज मिळू लागले आहे.

iii) डिजिटल ग्रंथालये (Digital Libraries) :

डिजिटल ग्रंथालय म्हणजे इंटरनेटवर उपलब्ध असलेली पुस्तकांची, संशोधन लेखांची, जर्नल्सची आणि शैक्षणिक माहितीची ऑनलाइन साठवण होय. भारतामध्ये National Digital Library of India, INFLIBNET Centre आणि Shodhganga यांसारख्या डिजिटल ग्रंथालयांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो.

महिलांना संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती सहज मिळते. पूर्वी ग्रंथालयात जाऊन पुस्तके शोधावी लागत होती; परंतु आता मोबाईल किंवा संगणकावरूनच संशोधन साहित्य उपलब्ध होते. त्यामुळे महिलांच्या संशोधन क्षमतेत वाढ झाली आहे.

iv) स्मार्ट क्लासरूम (Smart Classroom) :

स्मार्ट क्लासरूम म्हणजे डिजिटल साधनांनी सुसज्ज असलेली आधुनिक शिक्षण पद्धती होय. यामध्ये प्रोजेक्टर, डिजिटल बोर्ड, संगणक, इंटरनेट आणि मल्टिमीडिया साधनांचा वापर केला जातो. स्मार्ट क्लासरूममुळे शिकवण्याची पद्धत अधिक प्रभावी आणि आकर्षक बनते. चित्रे, व्हिडिओ आणि ॲनिमेशनच्या माध्यमातून कठीण विषय समजावून सांगणे सोपे होते.

महिला विद्यार्थिनींना आणि शिक्षकांना या तंत्रज्ञानामुळे शिक्षण अधिक समजण्यास सुलभ होते. विशेषतः विज्ञान, अर्थशास्त्र आणि तंत्रज्ञान विषयांच्या अध्ययनात याचा मोठा फायदा होतो.

v) व्हिडिओ लेक्चर्स (Video Lectures) :

व्हिडिओ लेक्चर्स म्हणजे शिक्षकांनी तयार केलेले किंवा ऑनलाइन उपलब्ध असलेले शिकवणीचे व्हिडिओ होय. हे विद्यार्थी कोणत्याही वेळी पाहू शकतात. उदाहरणार्थ, YouTube आणि Khan Academy यांसारख्या माध्यमांवर हजारो शैक्षणिक व्हिडिओ उपलब्ध आहेत.

महिलांसाठी हे अत्यंत उपयुक्त आहे कारण त्या आपल्याला सोयीच्या वेळेनुसार शिक्षण घेऊ शकतात. एखादा विषय समजला नाही तर तो व्हिडिओ पुन्हा पाहण्याची सुविधा देखील उपलब्ध असते.

vi) आभासी शिक्षण प्रणाली (Virtual Learning System) :

आभासी शिक्षण प्रणाली म्हणजे इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात प्रत्यक्ष संवाद साधून होणारे ऑनलाइन शिक्षण होय. उदाहरणार्थ, Zoom, Microsoft Teams आणि Google Meet यांसारख्या साधनांद्वारे ऑनलाइन वर्ग घेतले जातात.

या प्रणालीमुळे महिलांना घरबसल्या वर्गात सहभागी होता येते. विशेषतः महामारीच्या काळात या पद्धतीने शिक्षण सुरू ठेवण्यात मोठी मदत झाली. यामुळे शिक्षणातील सातत्य राखले गेले.

महिलांच्या शिक्षणावर डिजिटल परिवर्तनाचा प्रभाव (सकारात्मक परिणाम) :-

डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत. विशेषतः महिलांच्या शिक्षणावर डिजिटल परिवर्तनाचा सकारात्मक प्रभाव दिसून येतो. इंटरनेट, ऑनलाइन शिक्षण प्रणाली आणि विविध डिजिटल साधनांमुळे महिलांना शिक्षणाची अधिक संधी उपलब्ध झाली आहे. खालील प्रमुख सकारात्मक परिणाम दिसून येतात.

i) शिक्षणाची उपलब्धता वाढली :

डिजिटल परिवर्तनामुळे शिक्षणाची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. पूर्वी महिलांना शिक्षणासाठी महाविद्यालय किंवा विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागत असे. ग्रामीण भागातील महिलांसाठी हे अनेकदा कठीण होते. आता इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाइन शिक्षण उपलब्ध झाल्यामुळे महिलांना घरबसल्या शिक्षण घेता येते. उदाहरणार्थ, SWAYAM आणि National Digital Library of India यांसारख्या प्लॅटफॉर्ममुळे उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेली माहिती आणि अभ्यासक्रम सहज उपलब्ध झाले आहेत.

यामुळे ग्रामीण, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांनाही शिक्षणाच्या संधी मिळू लागल्या आहेत.

ii) वेळेची लवचिकता मिळाली :

महिलांना अनेकदा घरगुती जबाबदाऱ्या, नोकरी आणि कुटुंब सांभाळावे लागते. अशा परिस्थितीत पारंपरिक शिक्षण पद्धतीत वेळेची मर्यादा मोठा अडथळा ठरते. डिजिटल शिक्षणामुळे महिलांना वेळेची लवचिकता मिळाली आहे. ऑनलाइन कोर्सेस, व्हिडिओ लेक्चर्स आणि ई-लर्निंग प्लॅटफॉर्ममुळे त्या आपल्या सोयीच्या वेळेनुसार अभ्यास करू शकतात. उदाहरणार्थ, Coursera आणि edX यांसारख्या प्लॅटफॉर्मवर अभ्यासक्रम कधीही पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे महिलांना शिक्षण आणि वैयक्तिक जबाबदाऱ्या यामध्ये समतोल राखणे शक्य झाले आहे.

iii) कौशल्य विकासाला चालना मिळाली :

डिजिटल तंत्रज्ञानामुळे महिलांच्या कौशल्य विकासाला मोठी चालना मिळाली आहे. विविध ऑनलाइन कोर्सेस, प्रशिक्षण कार्यक्रम आणि डिजिटल शिक्षण साधनांमुळे महिलांना नवीन कौशल्ये शिकण्याची संधी मिळत आहे. संगणक कौशल्ये, डिजिटल मार्केटिंग, डेटा विश्लेषण, ऑनलाइन व्यवसाय व्यवस्थापन यांसारख्या आधुनिक कौशल्यांचे प्रशिक्षण महिलांना सहज उपलब्ध झाले आहे. उदाहरणार्थ, National Programme on Technology Enhanced Learning यासारख्या माध्यमांद्वारे विविध विषयांवरील प्रशिक्षण उपलब्ध आहे. यामुळे महिलांच्या ज्ञानात आणि कार्यक्षमतेत वाढ होत आहे.

iv) जागतिक ज्ञानप्राप्तीची संधी मिळाली :

डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षणाच्या सीमा जागतिक स्तरावर विस्तारल्या आहेत. इंटरनेटमुळे जगभरातील विद्यापीठे, संशोधन संस्था आणि शैक्षणिक संसाधने सहज उपलब्ध झाली आहेत. महिलांना आता जागतिक स्तरावरील ज्ञान आणि संशोधन साहित्य मिळू लागले आहे. उदाहरणार्थ, INFLIBNET Centre आणि Shodhganga यांसारख्या प्लॅटफॉर्मवर संशोधन साहित्य उपलब्ध आहे.

यामुळे महिलांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षण आणि संशोधनाची संधी मिळते तसेच त्यांचा बौद्धिक विकास अधिक व्यापक होतो.

v) रोजगाराच्या संधी वाढल्या :

डिजिटल शिक्षणामुळे महिलांच्या रोजगाराच्या संधींमध्येही वाढ झाली आहे. ऑनलाइन शिक्षणाद्वारे मिळालेली कौशल्ये आणि ज्ञान यामुळे महिलांना विविध क्षेत्रांमध्ये नोकरी मिळण्याची शक्यता वाढते. विशेषतः आयटी, ई-कॉमर्स, डिजिटल मार्केटिंग, ऑनलाइन शिक्षण, फ्रीलान्सिंग आणि स्टार्टअप क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. डिजिटल कौशल्ये असल्यामुळे महिलांना घरबसल्या काम करण्याची संधी देखील मिळते.

यामुळे महिलांची आर्थिक स्वावलंबनता वाढते आणि समाजातील त्यांची भूमिका अधिक मजबूत होते.

डिजिटल शिक्षणातील अडचणी (Challenges in Digital Education) :-

डिजिटल परिवर्तनामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल झाले असले तरी त्यासोबत काही अडचणी देखील निर्माण झाल्या आहेत. विशेषतः महिलांच्या उच्च शिक्षणाच्या संदर्भात डिजिटल शिक्षण प्रणाली पूर्णपणे प्रभावी होण्यासाठी काही अडथळे अजूनही अस्तित्वात आहेत. या अडचणी सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक स्वरूपाच्या आहेत. खालील प्रमुख अडचणींचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

i) इंटरनेट सुविधेची कमतरता :

डिजिटल शिक्षणासाठी इंटरनेट ही अत्यंत आवश्यक बाब आहे. परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये अजूनही इंटरनेट सुविधा मर्यादित आहे. अनेक महिलांकडे वेगवान इंटरनेट कनेक्शन उपलब्ध नसल्यामुळे ऑनलाइन वर्ग, व्हिडिओ लेक्चर्स किंवा ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचा पूर्ण लाभ घेता येत नाही. इंटरनेटची गती कमी असल्यास शिक्षणात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे डिजिटल शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळत नाही.

ii) डिजिटल साधनांची कमतरता :

डिजिटल शिक्षणासाठी संगणक, स्मार्टफोन, टॅबलेट यांसारखी साधने आवश्यक असतात. परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील अनेक विद्यार्थिनींकडे ही साधने उपलब्ध नसतात. काही वेळा एका कुटुंबात एकच मोबाईल असतो आणि तो इतर सदस्यही वापरत असल्यामुळे विद्यार्थिनींना नियमितपणे ऑनलाइन शिक्षण घेणे कठीण जाते. त्यामुळे डिजिटल शिक्षणातील असमानता वाढते.

iii) तांत्रिक ज्ञानाचा अभाव :

डिजिटल शिक्षणासाठी तांत्रिक कौशल्यांची आवश्यकता असते. संगणक वापरणे, ऑनलाइन प्लॅटफॉर्म हाताळणे, ई-मेल वापरणे किंवा डिजिटल फाइल्स डाउनलोड करणे यासारखी कौशल्ये आवश्यक असतात. परंतु अनेक महिलांना या तांत्रिक कौशल्यांची पुरेशी माहिती नसते. त्यामुळे त्या डिजिटल शिक्षण प्रणालीचा पूर्ण लाभ घेऊ शकत नाहीत. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांसाठी ही एक मोठी समस्या आहे.

iv) सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळे :

काही समाजांमध्ये महिलांच्या शिक्षणाकडे अजूनही मर्यादित दृष्टीने पाहिले जाते. काही कुटुंबांमध्ये मुलींना मोबाईल किंवा इंटरनेट वापरण्यावर मर्यादा असतात. या सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळ्यांमुळे महिलांना डिजिटल शिक्षणाचा पूर्ण फायदा घेणे कठीण जाते. त्यामुळे महिलांच्या शिक्षणातील प्रगती काही प्रमाणात मर्यादित राहते.

v) प्रत्यक्ष संवादाचा अभाव :

डिजिटल शिक्षणामध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील प्रत्यक्ष संवाद कमी असतो. पारंपरिक वर्गात विद्यार्थ्यांना शिक्षकांना प्रश्न विचारणे, चर्चा करणे आणि शंका दूर करणे सोपे असते. परंतु ऑनलाइन शिक्षणात कधी कधी विद्यार्थ्यांना आपले प्रश्न मांडणे किंवा विषय पूर्णपणे समजून घेणे कठीण जाते. त्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो.

vi) लक्ष केंद्रीत ठेवण्याची समस्या :

ऑनलाइन शिक्षण घेताना विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होण्याची शक्यता अधिक असते. मोबाईलवर इतर ॲप्स, सोशल मीडिया किंवा घरातील वातावरणामुळे अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे कठीण होते. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात आणि शिकण्याची गुणवत्ता कमी होण्याची शक्यता असते.

शिफारसी (Recommendations) :-

डिजिटल परिवर्तनामुळे उच्च शिक्षणात महिलांसाठी अनेक संधी निर्माण झाल्या असल्या तरी काही अडचणी अजूनही अस्तित्वात आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था आणि समाजाने एकत्रितपणे ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. खालील शिफारसी या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरू शकतात.

i) महिलांसाठी डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबविणे .

महिलांना डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करता यावा यासाठी डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबविणे अत्यंत आवश्यक आहे. संगणक वापरणे, इंटरनेटचा सुरक्षित वापर, ई-मेल, ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म वापरणे यासारख्या मूलभूत कौशल्यांचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

सरकारने आणि शैक्षणिक संस्थांनी विशेष प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा आणि अल्पकालीन अभ्यासक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, भारत सरकारचा Pradhan Mantri Gramin Digital Saksharta Abhiyan हा कार्यक्रम ग्रामीण नागरिकांना डिजिटल साक्षर बनविण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. अशा उपक्रमांमुळे महिलांचा डिजिटल शिक्षणात सहभाग वाढू शकतो.

ii) ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा वाढविणे.

डिजिटल शिक्षणासाठी मजबूत इंटरनेट सुविधा अत्यंत आवश्यक आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये अजूनही इंटरनेटचा वेग कमी असल्यामुळे विद्यार्थिनींना ऑनलाइन शिक्षणात अडथळे येतात.

म्हणूनच शासनाने ग्रामीण भागात ब्रॉडबँड नेटवर्क, वाय-फाय सुविधा आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी वाढविण्यावर भर देणे गरजेचे आहे. भारतातील Digital India आणि BharatNet यांसारख्या योजनांमुळे ग्रामीण

भागातील इंटरनेट सुविधा वाढविण्यास मदत होत आहे. या सुविधांचा विस्तार केल्यास महिलांना डिजिटल शिक्षण अधिक सहज उपलब्ध होईल.

iii) शैक्षणिक संस्थांमध्ये डिजिटल प्रशिक्षण देणे.

महाविद्यालये आणि विद्यापीठांनी विद्यार्थ्यांसाठी तसेच शिक्षकांसाठी नियमित डिजिटल प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. संगणक कौशल्ये, ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचा वापर, ऑनलाइन संशोधन पद्धती आणि डिजिटल साधनांचा प्रभावी वापर यासंबंधी प्रशिक्षण दिल्यास विद्यार्थिनींची डिजिटल क्षमता वाढेल.

यामुळे महिलांना संशोधन, प्रकल्प कार्य आणि ऑनलाइन शिक्षण प्रक्रियेत अधिक सक्रिय सहभाग घेता येईल. शैक्षणिक संस्थांमध्ये स्मार्ट क्लासरूम, डिजिटल ग्रंथालये आणि ई-लर्निंग सुविधा उपलब्ध करून दिल्यास शिक्षण अधिक प्रभावी होईल.

iv) महिलांसाठी ऑनलाइन शिक्षणाच्या संधी वाढविणे.

महिलांच्या शिक्षणाचा स्तर वाढविण्यासाठी ऑनलाइन शिक्षणाच्या संधी अधिक व्यापक करणे आवश्यक आहे. विविध विषयांवरील ऑनलाइन कोर्सेस, प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि कौशल्य विकास कार्यक्रम उपलब्ध करून दिल्यास महिलांना करिअर विकासासाठी नवीन संधी मिळतील.

भारतामध्ये SWAYAM आणि National Programme on Technology Enhanced Learning यांसारख्या प्लॅटफॉर्मवर उच्च शिक्षणाचे अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. अशा प्लॅटफॉर्मचा प्रचार आणि प्रसार केल्यास महिलांचा शिक्षणातील सहभाग वाढू शकतो.

v) डिजिटल उपकरणांवर अनुदान देणे.

अनेक महिलांकडे स्मार्टफोन, टॅबलेट किंवा संगणक यांसारखी डिजिटल साधने उपलब्ध नसतात. त्यामुळे डिजिटल शिक्षणाचा लाभ घेण्यात अडथळे निर्माण होतात. शासनाने विद्यार्थिनींसाठी डिजिटल उपकरणांवर अनुदान किंवा सवलत देण्याच्या योजना राबविल्यास त्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने मिळू शकतील. तसेच शैक्षणिक संस्थांनीही संगणक प्रयोगशाळा आणि डिजिटल सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

निष्कर्ष (Conclusion) :-

एकूणच पाहता, एकाविसाव्या शतकात माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शिक्षण क्षेत्रात व्यापक डिजिटल परिवर्तन घडून आले आहे. या परिवर्तनाचा उच्च शिक्षणावर आणि विशेषतः महिलांच्या शिक्षणावर सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षण अधिक सुलभ, लवचिक आणि सर्वसमावेशक बनले असून महिलांना घरबसल्या शिक्षण घेण्याची आणि नवीन ज्ञान व कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

भारतामध्ये उच्च शिक्षणातील महिलांचा सहभाग गेल्या काही वर्षांत सातत्याने वाढताना दिसून येतो. ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, ऑनलाइन कोर्सेस, डिजिटल ग्रंथालये, व्हर्च्युअल क्लासरूम आणि व्हिडिओ लेक्चर्स यांसारख्या डिजिटल साधनांमुळे महिलांसाठी शिक्षणाची उपलब्धता वाढली आहे. विशेषतः घरगुती जबाबदाऱ्या, सामाजिक मर्यादा किंवा भौगोलिक अडचणी असतानाही महिलांना शिक्षण चालू ठेवणे शक्य झाले आहे. डिजिटल शिक्षणामुळे महिलांच्या कौशल्य विकासाला चालना मिळाली असून रोजगाराच्या संधीही वाढल्या आहेत.

तथापि, डिजिटल परिवर्तनाचे फायदे सर्व महिलांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेले नाहीत. इंटरनेट सुविधेची कमतरता, डिजिटल साधनांचा अभाव, तांत्रिक ज्ञानाची मर्यादा, आर्थिक अडचणी आणि सामाजिक बंधने या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागांतील महिलांना या अडचणींचा अधिक सामना करावा लागतो. त्यामुळे डिजिटल शिक्षण प्रणाली प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी या अडथळ्यांवर मात करणे आवश्यक आहे.

महिलांच्या डिजिटल सक्षमीकरणासाठी डिजिटल साक्षरता वाढविणे, ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा मजबूत करणे, शैक्षणिक संस्थांमध्ये डिजिटल प्रशिक्षण उपलब्ध करणे आणि डिजिटल उपकरणांवर अनुदान देणे या

उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. शासन, शैक्षणिक संस्था आणि समाज यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे महिलांच्या शिक्षणात अधिक प्रगती साध्य होऊ शकते.

त्यामुळे असे निष्कर्ष काढता येतो की डिजिटल परिवर्तन हे उच्च शिक्षणातील महिलांसाठी एक प्रभावी आणि परिवर्तनकारी साधन ठरत आहे. योग्य धोरणे, सुविधा आणि तांत्रिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून महिलांना ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत अधिक सक्रिय आणि सक्षम बनविणे शक्य होईल. यामुळे केवळ महिलांचा वैयक्तिक विकासच नव्हे तर समाज आणि राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीला देखील चालना मिळेल.

संदर्भसूची (References) :-

1. अग्रवाल ए. एन. (2018), भारतीय शिक्षण व्यवस्था, सेंट्रल बुक डिपो पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. 112 - 118.
2. जोशी बी. आर. (2017), शिक्षण आणि समाज, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृष्ठ क्र. 85 - 92.
3. काळे एस. एम. (2019), उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह, विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. 140 - 148.
4. देशमुख के. जी. (2016), महिला शिक्षणाचे समाजशास्त्र, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, पृष्ठ क्र. 70 - 78.
5. शर्मा आर. के. (2020), Digital Education in India, Oxford University Press, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. 95 - 110.
6. भारत सरकार (2022), All India Survey on Higher Education (AISHE Report), Ministry of Education Publication, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. 35 - 45.
7. UNESCO (2021), Digital Learning and Women Education, UNESCO Publication, Paris, पृष्ठ क्र. 50 - 60.
8. सिंह एम. पी. (2019), Information Technology and Higher Education, McGraw Hill Education Publication, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. 120 - 130.

जातीयतेच्या सद्यस्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ अनुसूचित जाती - जमाती

शिवाजी विठ्ठलराव वायभासे
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख
कै. डॉ. शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय, कळमनुरी जिल्हा हिंगोली

Keywords :
जातीयवाद, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, संस्कृती, समूह श्रेष्ठत्व, भेदभाव, विविध बंधने,

Abstract
भारतीय समाजाचा विचार केला असता भारतामध्ये सुरुवातीपासूनच जातीयवादाची पायाभरणी झाली असल्याचे दिसून येते, ब्रिटिश कालखंडामध्ये यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. ब्रिटिशांनी जाणीवपूर्वकरीत्या जातीयवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात राजकीय पक्षांनी निवडणुका जिंकण्याकरिता मोठ्या प्रमाणात जातीयवादाला खतपाणी घातले. ज्यामुळे आजही भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात जातीयवाद दिसून येतो. यामध्ये अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी केली जात असली तरी महाराष्ट्रराज्यात दरवर्षी या प्रकारातील वाढणारे गुन्हे पाहता जातीभेदाची ही दरी वाढत असल्याचे दिसून येते. त्यामुळे विविध ठिकाणी या प्रकारातील गुन्हे मोठ्या प्रमाणावर नोंद होत आहेत. यासाठी सामाजिक सलोखा बैठका असो किंवा कार्यशाळा असो त्या घेऊनही, तसेच जनजागृती करुनही गुन्हे घडत असल्याचे पहावयास मिळते.

प्रस्तावना

जातीयवाद ही भारतीय समाजातील एक गंभीर समस्या असून ती लोकशाही मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणते. भारतामध्ये सुरुवातीपासूनच जातीची उतरंड असल्यामुळे भारतात या जातीच्या श्रेष्ठ आणि कनिष्ठते मधून जातीयवाद जन्मास घातला गेला आहे. या जातीयवादाचा अभ्यास व्हावा या दृष्टिकोनातून तसेच जातीयवादाची सद्यस्थिती काय आहे याचा अभ्यास करावा या दृष्टिकोनातून 'जातीयतेच्या सद्यस्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास: विशेष संदर्भ अनुसूचित जाती जमाती' असा अभ्यास विषय निवडून यावर संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.

अभ्यास विश्व

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र राज्य हे अभ्यास विश्व म्हणून निवडलेले आहे.

संशोधनाचा उद्देश

- जातीयवादाच्या स्वरूपाचा आढावा घेणे.
- जातीयवादाच्या कारणांचा शोध घेणे.
- समाजाच्या मानसिकतेचा वेध घेणे.
- जातीयवादावर उपाययोजना सुचविणे.

गृहीतके

- अनुसूचित जाती,
- जमातीच्या गुन्ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.
- जातीयवादास समाजाची परंपरा कारणीभूत आहे.
- समाजाच्या नकारात्मक दृष्टिकोनात बदल होत आहे.

- कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही.
- शासनाचे उदासीन धोरण आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी सामाजिक संशोधनातील दुय्यम तथ्य संकलन या स्तोत्राद्वारे माहितीचे संकलन करून प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यात आला आहे.

संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे.

जात म्हणजे काय

'जात म्हणजे बंद वर्ग होय.'

जात ही जन्माने प्राप्त होणारी, वारसा हक्काने चालणारी एक बंद सामाजिक श्रेणी आहे जी वंशपरंपरा, विवाह,(एका जातीत विवाह करणे) पारंपारिक व्यवसाय, सामाजिक पदानुक्रम आणि काही वेळा खानपाण्याच्या निर्बंधावर आधारित असते. या व्यवस्थेत एका गटातील सदस्य विशिष्ट सांस्कृतिक आणि सामाजिक बंधनांनी बांधलेले असतात.

जातीची वैशिष्ट्ये

- जन्माने मिळणारे सदस्यत्व.
- एकाच जातीत विवाह.
- पदानुक्रम.
- वंशपरंपरागत व्यवसाय.
- सामाजिक संपर्क आणि खानपानावर निर्बंध.
- सामाजिक आणि सांस्कृतिक अलगाव.

जातीयवाद म्हणजे काय

जातीयवाद म्हणजे स्वतःच्या जातीला किंवा धर्माला इतर समूहापेक्षा श्रेष्ठ मानून, आपापसातील भेदभावावर आधारित द्वेष किंवा पूर्वग्रह बाळगणे होय.

ही अशी विचारधारा आहे, जी समाजात जातीय आधारावर विभाजन निर्माण करते आणि स्वतःच्या गटाच्या हितासाठी दुसऱ्या गटाला कमी लेखते यामुळे सामाजिक एकता धोक्यात येते.

जातीयवादाची वैशिष्ट्ये

- समूह श्रेष्ठत्व.
- भेदभाव आणि पूर्वग्रह.
- स्व-विलगीकरण.
- विवाह आणि नातेसंबंधातील बंधने.
- राजकीय वापर.

अनुसूचित जात म्हणजे काय (Scheduled Castes - SC)

भारतीय संविधानानुसार ऐतिहासिकदृष्ट्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले मानले गेलेले, अस्पृश्यता व अत्याचाराला बळी पडलेले विशिष्ट जातींचे गट होय.

अनुसूचित जमात म्हणजे काय (Scheduled Tribes - ST)

भारतीय संविधानाच्या कलम 342 अन्वये विशेष संरक्षण मिळालेले आदिवासी समुदाय, हे लोक निसर्गाच्या सानिध्यात, दुर्गम भागात राहणारे, वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आणि वेगळी ओळख जपणारे मूळ रहिवासी आहेत. त्यांना मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास जमाती म्हणूनही ओळखले जाते.

भारतीय समाजातील जातीच्या उतरंडीतील शेवटच्या स्तरात असलेल्या जाती गट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जातींना भारतीय समाजातील अस्पृश्यतेला व अत्याचाराला बळी पडावे लागलेले आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने विविध कायदे करून संरक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. असे असूनही आजही या जाती-जमातींवर अत्याचार होत राहतात हे आपणास त्यांनी नोंद केलेल्या विविध गुन्ह्यातून दिसून येईल.

तक्ता क्रमांक 1.

अ. क्र.	**वर्ष.**	**दाखल गुन्हे**
1.	2020.	3250
2.	2021.	3150
3.	2022.	3510
4.	2023.	3802
5.	2024.	3943
6.	2025.	1811. मे पर्यंत

नागरी हक्क संरक्षण विभागांतर्गत राज्यातील पोलीस यंत्रणेच्या एकूण नऊ परिक्षेत्रअंतर्गत अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमाती आणि नागरी हक्क संरक्षणचे गुन्हे नोंद होतात. यामध्ये दरवर्षी विविध प्रकारातील ॲट्रॉसिटी आणि इतर गुन्ह्यांचे प्रमाण हे वाढतच असल्याचे पहावयास मिळते 2025 मे अखेरपर्यंत एकूण 1811 गुन्हे नोंद झाले आहेत याचाच अर्थ असा आहे की अनुसूचित जाती आणि जमातीच्या गटांवर इतर गटांकडून मोठ्या प्रमाणात अन्याय आणि अत्याचार होतात .त्यामुळेच आपणास गुन्ह्याची ही नोंद वाढत असल्याचे दिसून येते.

तक्ता क्रमांक 2.

अ. क्र.	**वर्ष.**	**सलोखा बैठका**
1.	2020.	343
2.	2021.	362
3.	2022.	808
4.	2023	880
5.	2024.	805
6.	2025.	418 मे पर्यंत.

तक्ता क्रमांक 3.

अ. क्र.	**वर्ष.**	**कार्यशाळा**
1.	2020.	190
2.	2021.	426
3.	2022.	1403
4.	2023.	1493

5. 2024. 1221
6. 2025. 510. मे पर्यंत

महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती कायद्याची प्रसिद्धी व प्रभावी अंमलबजावणीकरिता नागरी हक्क संरक्षण विभागाचे अधिकारी यांच्याकडून राज्यात सर्वच पोलीस ठाणे स्तरावर नियमितपणे कार्यशाळा घेतल्या जातात. घटनास्थळी शांतता राखण्यासाठी आणि अत्याचाराच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी जातीय सलोखा बैठका घेतल्या जातात वरील आकडेवारी वरून असे आपणास दिसून येते की, दरवर्षी जातीय सलोखा बैठका व कार्यशाळेचे प्रमाण वाढत असताना दिसून येते त्यानुसार गुन्ह्याचे प्रमाण मात्र घटत असताना दिसून येत नाही याचाच अर्थ असा की जातनिहाय सलोखा बैठका व कार्यशाळा घेऊनही समाजामध्ये जातीयवाद कमी होत नसून या संदर्भाचे गुन्हे घडतच असताना दिसून येतात.

628 गुन्हे प्रलंबित

31 मे 2025 अखेर 60 दिवसांपेक्षा जास्त काळ पोलीस तपासावर प्रलंबित असलेल्या गुन्ह्यांची एकूण संख्या ही 628 एवढी आहे यामध्ये राज्यातील एकूण अनुसूचित जाती प्रकारातील 517 तर अनुसूचित जमाती प्रकारातील 111 गुन्ह्यांचा समावेश आहे.

सर्वात अधिक गुन्हे

मागील सहा वर्षात राज्यातील पोलिसांच्या नागरी हक्क संरक्षण परिक्षेत्रनिहाय या प्रकारातील दाखल गुन्ह्यात सर्वाधिक गुन्हे कोल्हापूर त्यानंतर छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड, अमरावती, नागपूर पाठोपाठ कोकण अशा परिक्षेत्रामध्ये गुन्ह्याची संख्या ही अधिक असल्याचे दिसून येते.

सर्वात कमी गुन्हे

मागील सहा वर्षाच्या कालावधीमध्ये बघितले असता राज्यात दाखल झालेल्या परिक्षेत्रनिहाय गुन्ह्यामध्ये सर्वात कमी गुन्हे हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरी हक्क संरक्षण कायद्यान्वये राज्यात मुंबई परिक्षेत्रात दाखल झाले आहेत. दरवर्षी या गुन्ह्याचे प्रमाण हे केवळ दोन आकड्यांमध्येच आहे.

न्यायालयात प्रलंबित गुन्हे

अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमाती आणि नागरी हक्क संरक्षण कायद्यान्वये असलेल्या एकूण गुन्ह्यातील 31 मे 2025 पर्यंत न्यायालयात 20497 गुन्हे महाराष्ट्र राज्यात ठीक ठिकाणी प्रलंबित आहेत. या प्रलंबित गुन्ह्यावरून असे दिसून येते की, न्यायालयात सुद्धा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या गटातील लोकांना लवकरात लवकर न्याय मिळत नाही, त्यामुळे असे गुन्हे होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना दिसून येते.

गृहीतकृत्याची सत्यता

'जातीयतेच्या सद्यस्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास: विशेष संदर्भ अनुसूचित जाती-जमाती.' महाराष्ट्रातील विविध परिक्षेत्रातील गुन्ह्याच्या नोंदीच्या संदर्भाचा तसेच विविध शांतता व सलोखा बैठका याचा आढावा घेतला असता. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने मांडलेल्या गृहीतकृत्याची तपासणी खालील प्रमाणे करता येईल.

अनुसूचित जाती-जमातीच्या गुन्ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

या गृहीतकृत्यानुसार माहिती घेतली असता असे दिसून येते की, 2020 ते 2025 या वर्षांमध्ये दरवर्षी अनुसूचित जाती जमातीच्या लोकांन विरुद्ध मोठ्या प्रमाणात अन्याय,अत्याचार झाल्यामुळे त्यांनी विविध परिक्षेत्रामध्ये गुन्हे नोंद केले असल्याचे दिसून येते. या गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना दिसते. यावरून अनुसूचित जाती-जमातीच्या गुन्ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे हे गृहीतकृत्य सिद्ध होते.

जातीयवादास समाजाची परंपरा कारणीभूत आहे.

भारतीय समाजाची जातीय स्तरीकरणाची परंपरा असल्यामुळे भारतात सुरुवातीपासूनच जातीयवाद मोठ्या प्रमाणात होता. आज राजकीय पक्षांनी जिंकून येण्यासाठी जातीयवादास मोठ्या प्रमाणात खतपाणी घातले असल्याचे दिसून येते. ज्यामुळे समाजाची ही परंपरा जातीयवादास कारणीभूत ठरत असल्याचे दिसून येते.

समाजाच्या नकारात्मक दृष्टिकोनात बदल होत आहे.

या गृहितकृत्यानुसार माहिती घेतली असता असे दिसून येते की, भारतीय समाजात अनुसूचित जाती आणि जमाती बद्दल नकारात्मक दृष्टिकोन आहे. परंतु आजच्या या आधुनिक काळामध्ये या दृष्टिकोनात थोड्याफार प्रमाणात बदल होत असताना दिसून येतो.

कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही.

भारत सरकारने अनुसूचित जाती आणि जमाती करिता नागरी हक्क संरक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. विविध कायदे सुद्धा केले आहेत. परंतु हे सर्व कायदे असूनही अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमाती यांच्यावर अन्याय, अत्याचार होत असताना दिसून येतात. याचाच अर्थ असा की कायद्याची पाहिजे तेवढ्या प्रमाणात प्रभावी अशी अंमलबजावणी होत नाही. तसेच समाजही पाहिजे ती साथ देत नसताना दिसून येतो.

शासनाचे उदासीन धोरण

कायदे करून प्रश्न सुटत नाहीत. तर त्याकरिता त्या कायद्यांची प्रभावी अशी अंमलबजावणी करावी लागते. याकरिता शासनाने याकडे लक्ष देणे अधिक गरजेचे आहे. न्यायालयात प्रलंबित गुन्ह्यावरून असे दिसून येते की, शासन यामध्ये कुठलाही हस्तक्षेप करत नाही, न्यायालयाला पाहिजे ती माहिती पुरवत नाही, तसेच न्यायालयात हे गुन्हे का प्रलंबित आहेत याची माहिती घेत नाही, न्यायालयात शीघ्रगतीचे न्यायालय स्थापन करीत नाही, या सर्व बाबी ह्या उदासीनपणे शासन घेत असल्याकारणाने दिवसेंदिवस या गुन्ह्याचे प्रमाण वाढत असताना दिसून येते. तेव्हा शासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

उपाययोजना

- समाजाने मानसिकतेत बदल करणे गरजेचे आहे.
- पारंपारिक सामाजिक स्तरीकरणाची उतरंड जी जातीवर आधारित आहे तिला नष्ट करणे गरजेचे आहे.
- कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.
- शासनाने केवळ कायदे करून थांबू नये तर त्याकडे विशेष लक्ष द्यावे.
- न्यायालयाने प्रलंबित गुन्हे कितीही वर्ष असेच न ठेवता त्यावर लवकरात लवकर न्यायदान देण्याचे कार्य करावे.

सारांश

जातीयवाद ही भारतीय समाजातील एक गंभीर समस्या असून ती लोकशाही मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणते. तेव्हा भारतीय समाजातील प्रचलित असलेली जातीयवाद या समस्येच्या मुळाशी समाजाने, शासनाने जाणे आवश्यक असून ती समुळ नष्ट करणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ

- रावत हरीकृष्ण 2008, उच्चतर समाजशास्त्र विश्वकोश, रावत पब्लिकेशन, जयपुर.
- गुरुनाथ नाडगोंडे. सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर
- दैनिक लोकमत दिनांक 21 जुलै 2025.
- www.Google.com.

'सार्वजनिक सत्यधर्म' : म. फुले यांचा तात्त्विक, सामाजिक आणि मानवतावादी दृष्टिकोन

प्राची प्र. काटपाताळ

सारांश

'सार्वजनिक सत्यधर्म' हा महात्मा जोतीराव फुले यांचा धर्मविषयक अंतिम व सर्वाधिक महत्त्वाचा ग्रंथ आहे. इ.स. १८८९-९० मध्ये पक्षाघातग्रस्त अवस्थेत, अत्यंत कठीण शारीरिक परिस्थितीतही, डाव्या हाताने हा ग्रंथ संवादात्मक शैलीत लिहिणे — हे त्यांच्या असाधारण वैचारिक निष्ठेचे आणि जिद्दीचे प्रतीक आहे. हा ग्रंथ फुले यांच्या धर्मविषयक मतांचे सार मानला जातो व त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचा प्रमाणग्रंथ म्हणून तो ओळखला जातो.

एकोणिसाव्या शतकात भारतीय समाज जातिभेद, वर्णव्यवस्था आणि ब्राह्मणवादाच्या वर्चस्वाने ग्रासलेला होता. धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा, कर्मकांड आणि खोट्या रूढी-परंपरा यांचा वापर करून शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि सार्वजनिक जीवनापासून वंचित ठेवले जात होते. पुरोहितशाही ही समाजाचे शोषण करणारी यंत्रणा बनली होती. अशा विषम पार्श्वभूमीवर फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तनाचा नारा दिला.

या ग्रंथात फुले यांनी 'निर्मिक' ही मूलगामी संकल्पना मांडली. निर्मिक म्हणजे सर्वांचा निर्माता, सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार आणि सत्यरूप असणारे एकमेव तत्त्व. तो मूर्ती अथवा अवतार म्हणून प्रकटत नसतानाही समस्त जीवस्वरूपांचा मूलभूत आधार आहे. फुले यांच्या मते निर्मिकाची भक्ती करण्यासाठी पुरोहित अथवा धर्मगुरूंची गरजच नाही. 'सर्वसाक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्ती' — हे सत्यशोधक समाजाचे घोषवाक्य त्यांच्या निर्मिकविषयक विचाराचे सार सांगते.

फुले यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म'मध्ये सामाजिक समता हा केंद्रबिंदू आहे. 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्या पायावर संपूर्ण मानवजातीचे एक कुटुंब निर्माण करणे हेच मानवतेचे सर्वोच्च ध्येय होय' — हे फुले यांचे मूलभूत तत्त्व होते. प्रस्तुत निबंधात या ग्रंथातील प्रमुख तत्त्वे, त्याचे सामाजिक व तात्त्विक पैलू, आणि आधुनिक काळात त्याची प्रासंगिकता यांचा विवेचनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा नुसता धर्मग्रंथ नसून समाजसुधारणेचे सूत्रग्रंथ आहे — यात मानवतावादी मूल्ये, सामाजिक समता आणि लोकशाही मूल्ये प्रतिपादित केली आहेत, हे या निबंधात स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे.

बीजवाक्य

महात्मा जोतीराव फुले, सार्वजनिक सत्यधर्म, निर्मिक संकल्पना, सत्यशोधक समाज, धर्मचिकित्सा, सामाजिक समता, मध्यस्थांचा निषेध आणि मानवतावाद.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

4. 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथाच्या रचनेचे, संकल्पनेचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

5. परंपरागत धर्मरचनेवर फुले यांनी केलेल्या टीकेचे विश्लेषण करणे — जातिव्यवस्था, पुरोहितांचे वर्चस्व आणि कर्मकांड यांचे विश्लेषण.
6. 'निर्मिक' या संकल्पनेचा तात्त्विक अर्थ, वैज्ञानिकता आणि तात्त्विक समृद्धी उलगडणे.
7. धर्मातून सामाजिक समता, बंधुता आणि मानवतेचे कल्याण या मूल्यांचा प्रचार कसा केला जातो हे स्पष्ट करणे.
8. या ग्रंथाची आधुनिक उपयुक्तता — समकालीन सामाजिक-सांस्कृतिक संदर्भात तपासणे.

प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यार्धात महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती अत्यंत विषम होती. उच्चवर्गीय ब्राह्मणवाद्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि स्त्रीदास्य यांना धारणा दिली होती. इंग्रजी सत्तेच्या आगमनाने काही परिवर्तन घडले असले, तरी त्याचा लाभ मुख्यतः उच्चवर्णीयांनाच मिळत होता. बहुजन समाज, अतिशूद्र आणि स्त्रिया यांना सार्वजनिक जीवनापासून, शिक्षणापासून आणि धार्मिक अधिकारांपासून वंचित ठेवले जात होते. धर्माचा वापर हे वंचन न्याय्य ठरवण्यासाठी केला जात असे.

अशा परिस्थितीत महात्मा फुले यांनी २२ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाचे ध्येय होते — धर्मनिष्ठ समाजात विज्ञानशील विचार रुजू करणे, खोट्या देवदेवतांच्या दहशतीतून बहुजनांना मुक्त करणे आणि मानवी प्रतिष्ठेची स्थापना करणे. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपासूनच फुले यांनी धर्माच्या नावाखाली चाललेल्या शोषणाविरुद्ध लेखणी उचलली.

महात्मा फुले यांनी आपल्या आयुष्यात शैक्षणिक क्षेत्रात स्त्री-शिक्षणाला चालना दिली, विधवाविवाहाचा पुरस्कार केला, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. परंतु जेवढे शैक्षणिक व सामाजिक काम महत्त्वाचे होते, तेवढेच धर्माचा पुनर्विचार करणे अपरिहार्य होते, असे त्यांना ठामपणे जाणवले. कारण जोपर्यंत धर्माच्या नावाखाली जातिभेद आणि विषमता न्याय्य ठरवली जात राहील, तोपर्यंत कोणतेही सामाजिक परिवर्तन दीर्घकाळ टिकणार नाही — हे त्यांचे प्रगल्भ विश्लेषण होते.

त्यांच्या वैचारिक प्रवासाच्या अखेरच्या, अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर इ.स. १८८९-९० मध्ये 'सार्वजनिक सत्यधर्म' नामक ग्रंथ लिहिला गेला. विशेष म्हणजे पक्षाघातग्रस्त अवस्थेतही डाव्या हाताने हा ग्रंथ पूर्ण करणे — हेच त्यांच्या अनन्य निष्ठेचे आणि अंतिम वैचारिक इच्छाशक्तीचे प्रतीक आहे. या ग्रंथात धर्म, पाप, पुण्य, ईश्वर, मध्यस्थी, जातिव्यवस्था इत्यादी विषयांवर वेगवेगळ्या विचारवंतांनी विचारलेले प्रश्न आणि फुले यांनी दिलेली उत्तरे यांच्या संवादात्मक रचनेतून मांडणी केली आहे. हा संवादात्मक स्वर ग्रंथाला अधिक प्रभावी आणि जिवंत बनवतो.

हा ग्रंथ फुले यांच्या धर्मविषयक मतांचे सर्वोच्च सार मानला जातो आणि सत्यशोधक समाजाचा प्रमाणग्रंथ म्हणून ओळखला जातो. प्रस्तुत निबंध याच ग्रंथाच्या तात्त्विक, सामाजिक आणि मानवतावादी पैलूंचा सविस्तर विचार करतो.

विषय मांडणी

१. 'सार्वजनिक सत्यधर्म'ची संकल्पना आणि स्वरूप

'सार्वजनिक सत्यधर्म' ही संकल्पना प्रत्येक मानवाच्या नैसर्गिक अधिकारांवर आणि तर्कपूर्ण धर्मदर्शनावर आधारलेली आहे. या ग्रंथाचे मूळ वैशिष्ट्य हे आहे की यात कोणत्याही जाती, पंथ किंवा समाजाच्या अधीन राहणारे

नियम मान्य केले नाहीत. धर्म हा विशिष्ट जातीसाठी, विशिष्ट वर्गासाठी किंवा विशिष्ट लिंगासाठी नसावा — तो सार्वजनिक म्हणजेच सर्व मानवांसाठी समान असावा — हा 'सार्वजनिक' या शब्दामागील खोल आशय आहे.

फुले यांनी स्पष्टपणे सांगितले की धर्माचा हेतू मानवतेचे कल्याण साधणे हा असावा. ते म्हणतात की अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागवणे हा पहिला धर्म आहे आणि परस्पर मदत करणे हे मानवाचे सर्वोच्च कर्तव्य आहे. धर्माच्या नावाखाली जर इतरांवर अन्याय केला गेला, त्यांचे शोषण केले गेले, तर तो खरा धर्मद्रोह आहे — ही त्यांची केंद्रवर्ती भूमिका होती. केवळ मंदिरात जाणे, तीर्थयात्रा करणे किंवा कर्मकांड पाळणे म्हणजे धर्म नव्हे; माणसाची माणसाशी नैतिक वागणूक म्हणजे खरा धर्म — हे फुले यांचे क्रांतिकारी प्रतिपादन होते.

या ग्रंथात सामाजिक समता हा केंद्रबिंदू आहे. फुले यांनी घोषित केले की सर्व मानवांना एकाच प्रमाणात आकांक्षा, कल्पना, भावना आणि कार्य करण्याचा अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला त्याची जात, वर्ण, राष्ट्र, धर्म यावरुन उच्च-नीच लेखण्याचा अधिकार नाही — ही त्यांची दृढ भूमिका होती. 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्या पायावर अवघ्या मनुष्यजातीचे एक कुटुंब निर्माण करणे हेच मानवतेचे सर्वोच्च ध्येय आहे' — हे फुले यांचे मूलभूत तत्त्व होते; आणि हेच तत्त्व फ्रेंच राज्यक्रांतीशीही समांतर जाणारे आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

ग्रंथाची संवादात्मक रचना हे त्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. विविध विचारवंतांचे प्रश्न आणि त्यांना दिलेली उत्तरे यांच्या माध्यमातून फुले यांनी तर्कशुद्ध मांडणी केली आहे. हा संवादात्मक स्वर ग्रंथाला केवळ धर्मग्रंथाचा दर्जा न देता एका जिवंत, बुद्धिनिष्ठ चर्चेचा दर्जा देतो.

२. 'निर्मिक' संकल्पना : तात्त्विक विवेचन

फुले यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म'मधील सर्वाधिक क्रांतिकारी आणि मौलिक योगदान म्हणजे 'निर्मिक' ही संकल्पना. पारंपरिक हिंदू धर्मातील देवांची स्थानिक, जातिनिष्ठ आणि कर्मकांडी कल्पना नाकारत फुले यांनी 'निर्मिक' हा नवीन शब्द आणि नवीन तत्त्व मांडले.

निर्मिक म्हणजे सर्वांचा निर्माता, सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार आणि सत्यरूप असणारे एकमेव तत्त्व. तो मूर्ती अथवा अवतार म्हणून प्रकटत नाही, त्याला जातीची बंधने नाहीत, त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी मध्यस्थाची आवश्यकता नाही. हा निर्मिक विश्वातील सर्व जीवस्वरूपांचा मूलभूत आधार असून त्याच्यापुढे सर्व माणसे समान आहेत. 'ईश्वर (निर्मिक) एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार आणि सत्यरूप आहे' — हे फुले यांचे प्रतिपादन इस्लामच्या एकेश्वरवादाशी आणि ख्रिश्चन धर्माच्या Universal God संकल्पनेशी साम्य दाखवते.

'निर्मिक' शब्द हा 'निर्माता' या मराठी शब्दापासून तयार केलेला नवनिर्मित शब्द आहे. याचा गर्भितार्थ असा की जो सर्वांचा निर्माता आहे तो जातिभेद कसा पाळेल? जो सर्वांना जन्म देतो तो काहींना उच्च आणि काहींना नीच कसा मानेल? — हा प्रश्न फुले यांनी 'निर्मिक' या एकाच शब्दाद्वारे उपस्थित केला. यातूनच जातिव्यवस्थेचा धार्मिक आधार संपुष्टात येतो.

'सर्वसाक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्ती' — हे सत्यशोधक समाजाचे घोषवाक्य निर्मिक संकल्पनेचे सर्वात सुटसुटीत स्पष्टीकरण आहे. निर्मिक सर्वसाक्षी आहे म्हणजे तो प्रत्येकाच्या अंतरंगात आहे; त्यामुळे पुजाऱ्याची, मध्यस्थाची, भटाची काहीच गरज नाही. निर्मिकाची भक्ती म्हणजे माणसाची माणसाशी नैतिक वागणूक — हे फुले यांचे प्रगल्भ प्रतिपादन आहे.

निर्मिकाची संकल्पना आधुनिक तत्त्वज्ञानाशी सुसंगत आहे. त्यात तर्कशुद्धता, वैज्ञानिकता आणि मानवतावाद यांचे संमिश्रण आहे. ही कल्पना ब्राह्मणेतर समाजाला कट्टर धर्मशास्त्रापासून मुक्त करण्याचे पाऊल ठरली. पाश्चात्य ज्ञानोदयाच्या (Enlightenment) परंपरेशी निर्मिक संकल्पनेचे साम्य लक्षात घेण्यासारखे आहे — ज्याप्रमाणे युरोपातील विचारवंतांनी चर्चच्या वर्चस्वाला आव्हान देत Reason आणि Nature यांना केंद्रस्थानी आणले, त्याचप्रमाणे फुले यांनी 'निर्मिक' संकल्पनेद्वारे भारतीय संदर्भात हेच कार्य केले.

३. परंपरागत धर्म आणि त्यावरील टीका

फुले यांच्या दृष्टिकोनात धर्म हा केवळ अध्यात्मपुरक नसून सामाजिक परिवर्तनाचे साधन असणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन भारतीय धर्मव्यवस्था ही परिवर्तनाचे नव्हे तर स्थितिशीलतेचे, शोषणाचे आणि विषमतेचे साधन बनली होती — हे फुले यांनी आपल्या तीव्र धर्मचिकित्सेद्वारे उघड केले.

'गुलामगिरी' (१८७३) या ग्रंथातून सुरू झालेली फुले यांची धर्मचिकित्सा 'सार्वजनिक सत्यधर्म'मध्ये आपल्या उत्कर्षाला पोहोचली. या ग्रंथात त्यांनी धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अंधश्रद्धा, कर्मकांड, गूढविद्या आणि खोट्या परंपरा यांवर तर्कशुद्धपणे, परखडपणे प्रहार केला. 'नाम-जप', 'श्राद्ध', 'कर्मकांड' यांऐवजी अन्नदान, नैतिक जीवन आणि लोकशिक्षण यांना महत्त्व देणे — हे फुले यांचे वेगळेपण होते.

त्या काळी वर्णव्यवस्थेवर आधारित धर्मव्यवस्था शूद्र-अतिशूद्रांना शिक्षणापासून, सार्वजनिक विहिरींपासून, मंदिरांपासून दूर ठेवत होती. या अन्यायाला धार्मिक मान्यता देणाऱ्या ग्रंथांचे आणि रूढींचे फुले यांनी चिकित्सक विश्लेषण केले. पुराणकथांचा आधार घेऊन ब्राह्मणांनी बहुजन समाजावर कसे वर्चस्व प्रस्थापित केले, हे त्यांनी 'गुलामगिरी'मध्ये विस्ताराने दाखवले होते; 'सार्वजनिक सत्यधर्म'मध्ये या विश्लेषणाचा वैचारिक कळस गाठला गेला.

फुले यांनी जातिव्यवस्थेला धार्मिक आधार असल्याचे नाकारले. 'निर्मिकाने सर्व मानवांना सारखेच निर्माण केले; त्यामुळे जन्माधारित उच्च-नीचपणा हा निर्मिकाचा नियम नव्हे तर मानवनिर्मित अन्याय आहे' — हे त्यांचे ठाम मत होते. 'धर्मज्ञानापेक्षा सेवाधर्म श्रेष्ठ आहे' — ही फुले यांची केंद्रवर्ती भूमिका होती. माणसाच्या कल्याणासाठी काम करणे म्हणजे खरी ईश्वरभक्ती — हा विचार संत तुकारामांच्या परंपरेशी जोडला जातो; परंतु फुले यांनी त्याला सामाजिक न्यायाचे तत्त्वज्ञान म्हणून अधिक विस्तारित आणि रोखठोकपणे मांडले.

४. मध्यस्थांचा निषेध : लोकशाही मूल्ये

फुले यांच्या विचारातील सर्वात मूलगामी आणि लोकशाही मूल्यांशी थेट जोडलेला पैलू म्हणजे मध्यस्थांचा — विशेषतः पुरोहितांचा — निषेध. हा निषेध केवळ वैयक्तिक पातळीवर नव्हता; तो एका संपूर्ण व्यवस्थेला आव्हान देणारा होता.

तत्कालीन समाजात पुरोहित आणि ब्राह्मण वर्ग हा धर्म आणि ईश्वर यांच्यामध्ये अपरिहार्य दुवा म्हणून स्थापित झाला होता. जन्म, विवाह, मृत्यू, सण-उत्सव — प्रत्येक प्रसंगी पुरोहिताशिवाय धार्मिक कार्य होणार नाही असे वातावरण निर्माण केले गेले होते. या व्यवस्थेद्वारे पुरोहितशाहीने समाजावर आर्थिक, सामाजिक आणि मानसिक वर्चस्व प्रस्थापित केले होते. गरीब शेतकरी, कारागीर, कामगार — हे सारे या मध्यस्थांवर अवलंबून राहण्यास भाग पाडले जात होते.

सत्यशोधक समाजाचे घोषवाक्यच होते: 'सर्वसाक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्ती.' या एका वाक्यात फुले यांनी धर्मातील लोकशाहीचा गाभा सांगितला आहे. ईश्वर सर्वसाक्षी आहे — तो प्रत्येकाच्या आतमध्ये आहे —

म्हणजे त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा थेट मार्ग प्रत्येक माणसाला आहे. पुजारी, भट, धर्मगुरू हे मध्यस्थ अनावश्यक आहेत — इतकेच नव्हे तर ते शोषणाचे साधन आहेत.

'सार्वजनिक सत्यधर्म'मध्ये फुले यांनी स्पष्ट केले आहे की निर्मितकर्त्याने सर्व मानवांना सर्व मानवी अधिकार दिले आहेत; त्यामुळे कोणत्याही व्यक्तीवर इतरांनी जबरदस्ती करू नये. प्रत्येकाला आपली वाणी मोकळी ठेवण्याचा अधिकार आहे आणि प्रत्येकाला कामात समान संधी मिळण्याचा हक्क आहे — या लोकशाही तत्त्वांना फुले यांनी धार्मिक अधिष्ठान दिले. म्हणजेच लोकशाहीची मूल्ये ही केवळ राजकीय नव्हेत, तर ती धर्माचाही अविभाज्य भाग आहेत — हे त्यांचे प्रगल्भ प्रतिपादन होते.

पुरोहित, ब्राह्मण व अशा मध्यस्थ वर्गांनी समाजात अन्यायाचे साधन म्हणून धर्माचा गैरवापर करू नये — हे फुले यांचे तत्त्व होते. धर्माच्या नावाखाली सुरू असलेले शोषण, हीनत्व आणि अन्याय हा खरा धर्मद्रोह आहे — हा विज्ञाननिष्ठ आणि नैतिक विचार फुले यांनी अत्यंत रोखठोकपणे मांडला.

५. मानवतावादी दृष्टिकोन

'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ सर्वार्थाने मानवतावादाने भारलेला आहे. फुले यांचा मानवतावाद हा केवळ भावनिक नव्हता — तो तर्कशुद्ध, व्यावहारिक आणि सामाजिक न्यायावर आधारित होता.

फुले यांच्या मते, धर्म, अंतरीक्षीय प्रार्थना किंवा पुरोहिताद्वारे मिळणाऱ्या पुण्यांपेक्षा माणुसकी करणे, बंधुता राखणे, गरिबी निवारण करणे यालाच पूजनीय मानले पाहिजे. 'भजन-नामस्मरण, जपजाप्य, प्रार्थना, भक्ती यांची ईश्वराला काहीच गरज नाही; तो या विश्वाचा अधिपती आहे, माणसांच्या स्तुतीची त्याला पाहिजेच गरज नाही' — हे फुले यांचे मत होते. म्हणजेच देवाचे अस्तित्व मान्य असले तरी त्याच्या उपासनेत मानवहिताचेच स्थान सर्वोच्च आहे.

स्त्री-पुरुष समानता हा फुले यांच्या मानवतावादाचा अत्यंत महत्त्वाचा आयाम आहे. स्त्री-शिक्षण आणि स्त्री-स्वातंत्र्य हा सामाजिक क्रांतीचा पाया आहे, हे त्यांनी केवळ शब्दात नव्हे तर पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू करून कृतीत दाखवले. 'सार्वजनिक सत्यधर्म'मध्येही प्रत्येक नर-नारीने सर्व मानवांप्रमाणे समान अधिकारांचा स्वीकार करावा असे स्पष्टपणे नमूद आहे.

श्रमाची प्रतिष्ठा हा फुले यांच्या मानवतावादाचा आणखी एक महत्त्वाचा आयाम आहे. शेती, कारागिरी, मजुरी यांतून माणसाची थोरवीच सिद्ध होते — त्यांना हीनपणा नाही — हे त्यांनी वारंवार मांडले. या विचाराने शेतकरी आणि कामगार वर्गाला आत्मसन्मानाचा आधार दिला. श्रमजीवींचे काम ही ईश्वराची सेवा आहे — हे फुले यांचे प्रतिपादन आधुनिक श्रमिक चळवळींशीही साम्य दाखवते.

स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता आणि न्याय — ही पाच तत्त्वे फुले यांच्या मानवतावादाचा गाभा होती. ही तत्त्वे आंतरधर्मीय, आंतरजातीय आणि आंतरराष्ट्रीय स्वरूपाची आहेत. फुले यांनी म्हटले आहे की 'खिस्त, महंमद, मांग, ब्राह्मण — सर्वांना धरावे पोटाशी, बंधुभावाने.' हे सर्वसमावेशक मानवतावादाचे अत्युच्च प्रकटीकरण आहे.

६. सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून धर्म

फुले यांच्या विचारप्रणालीतील सर्वात मूलगामी आणि आधुनिक पैलू म्हणजे धर्माकडे सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून पाहणे. धर्म हा व्यक्तिगत मोक्षासाठी किंवा परलोकाच्या आशेसाठी नसावा — तो ऐहिक जगात माणसाच्या प्रतिष्ठेसाठी, स्वातंत्र्यासाठी आणि न्यायासाठी असावा — हे फुले यांचे ठाम मत होते.

सत्यशोधक समाजाने वास्तवात अनेक महत्त्वाचे उपक्रम राबवले. मुलींच्या शाळा सुरू केल्या, विधवाविवाहाचा पुरस्कार केला, ब्राह्मणांशिवाय विवाह लावून देण्याची परंपरा सुरू केली, शेतकऱ्यांच्या समस्यांवर लिखाण केले आणि ब्राह्मणत्वाच्या वर्चस्वाविरुद्ध जनजागृती केली. हे सारे उपक्रम धर्माच्या नावाने नव्हे, तर मानवतेच्या नावाने राबवले गेले — आणि हीच 'सार्वजनिक सत्यधर्म'ची व्यावहारिक अभिव्यक्ती होती.

फुले यांच्या धर्मकल्पनेत सेवाकार्य हीच श्रेष्ठ उपासना आहे. गरीब, दीन-दलित आणि प्रवंचित लोकांचे हित साधणे हाच खरा सत्यधर्म आहे. आर्थिक न्याय, सामाजिक समता आणि शिक्षणाचा प्रसार — हे तीन मार्ग त्यांना सामाजिक परिवर्तनासाठी अनिवार्य वाटत होते. 'सार्वजनिक सत्यधर्म'मधील तत्त्वे आर्थिक न्याय, सामाजिक समता आणि लोकशाही मूल्यांशी सुसंगत आहेत — हे आधुनिक विचारवंतांनीही मान्य केले आहे.

महात्मा फुले यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धर्मांतराच्या निर्णयावरही प्रभाव टाकणारा ठरला. आंबेडकरांनी फुले यांना आपले गुरू मानले होते; आणि धर्माद्वारे सामाजिक परिवर्तन साधण्याची जी दृष्टी फुले यांनी दिली, तिचाच विस्तार आंबेडकरांनी धर्मांतराद्वारे केला. या अर्थाने 'सार्वजनिक सत्यधर्म' हा भारतीय सामाजिक न्याय चळवळीच्या वैचारिक इतिहासातील एक महत्त्वाचा दगड आहे.

समारोप

महात्मा फुले यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ धार्मिक नव्हे तर सामाजिक क्रांतीची रूपरेषा आहे. यात धर्माला तर्क, विज्ञान आणि मानवतावादाची जोड दिली असून 'मानव धर्म' साध्य करण्याचे आव्हान समोर ठेवले आहे. फुले यांनी धर्मातील अंतर्कथ्यांचा पुनर्विचार करून समाजातील अंधश्रद्धा, जातीभेद, पुरोहितवादी भेदभाव इत्यादींचा निषेध केला. 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्यावर संपूर्ण मानवजातीचे एक कुटुंब उभारणे हेच महान सत्य आहे' — हे फुले यांचे घोषणापत्र होते.

'सार्वजनिक सत्यधर्म'ने वैशिष्ट्यपूर्णपणे हे दाखवले की धर्म म्हणजे मानवतेला मानवातून जोडणारा संबंध असावा, मध्यस्थ किंवा विश्वासघात करणाऱ्या रीतिरिवाजांत तल्लीन होणारा नाही. या ग्रंथात धार्मिक अनुष्ठानाव्यतिरिक्त नैतिक, सामाजिक आणि बौद्धिक मूल्यांना अधिक वजन देण्यात आले आहे. आजच्या दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्री साहित्याची जी विद्रोही परंपरा दिसते; तिच्यामागे फुले यांनी मांडलेला क्रांतिवादी विचार आहे.

एकूणच, 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ एकोणिसाव्या शतकातील भारतीय नवजागृतीचे आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीचे एक अत्युच्च स्वरूप आहे. तो केवळ एका धर्माचा प्रमाणग्रंथ नव्हे, तर मानवाच्या सर्वांगीण मुक्तीचा जाहीरनामा आहे.

निष्कर्ष

- 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ फुले यांच्या क्रांतिकारी धर्मविचाराचे प्रमाणपत्र आहे.
- 'निर्मिक' संकल्पनेद्वारे फुले यांनी परंपरागत धर्मव्यवस्थेला तर्कशुद्ध पर्याय दिला.
- मध्यस्थांच्या निषेधातून लोकशाही व सामाजिक समतेची बीजे रोवली गेली.
- स्वातंत्र्य, समता, बंधुता व मानवतेचे अधिष्ठान आजच्या काळातही तितकेच प्रासंगिक आहे.
- या ग्रंथातून पुढे बहुजन, दलित चळवळींना वैचारिक अधिष्ठान मिळाले.

- सत्यधर्मातील तात्त्विक दृष्टिकोनातून समताधिष्ठित, न्यायवादी आणि विज्ञानशील समाज निर्माण होणे शक्य आहे.

संदर्भग्रंथ

1. फुले, जोतीराव गोविंदराव — 'सार्वजनिक सत्यधर्म', सत्यशोधक समाज प्रकाशन, मुंबई, इ.स. १८९०.
2. फडके, य. दि. (संपा.) — 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
3. नरके, हरि (संपा.) — 'महात्मा फुले : विचार आणि कार्य', सुगावा प्रकाशन, पुणे.
4. कीर, धनंजय — 'महात्मा जोतीराव फुले', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
5. गुंदेकर, श्रीराम — 'महात्मा जोतीबा फुले : साहित्य आणि साहित्यमूल्ये', महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, १९९१.
6. मराठी विश्वकोश — 'सत्यशोधक समाज', संकेतस्थळ : vishwakosh.marathi.gov.in

निखळ भावाभिव्यक्तीचा काव्यसंग्रह म्हणजे वेदनांकित संदर्भ

प्रा. डॉ. गणेश शिवाजी मारेवाड
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

प्रस्तावना :-

कवी प्रा. डॉ. कल्याण गोपनर यांचा 'वेदनांकित संदर्भ' हा पहिला काव्यसंग्रह. 26 जून 2025 ला प्रकाशित झाला. डॉ. अनंत सूर यांनी या काव्यसंग्रहाला अभ्यासू प्रस्तावना लिहिली. ते म्हणतात, वेदनांकित संदर्भ काव्यसंग्रहातील कविता समकालीन जाणिवेची स्पंदने टिपणारी सशक्त कविता आहे. त्यांचे हे म्हणणे योग्य वाटते. कारण या काव्यसंग्रहात एकूण 39 कविता आहेत. त्याचे सहा भाग केले आहेत. वेदनेची कविता, शेतीमातीच्या कविता, समतेच्या कविता, शिक्षणाच्या कविता, कोरोनाच्या कविता व इतर कविता हे सहा भाग आहेत. या भागांची नावे वाचली तरी आपल्या लक्षात येते, की यातून समकालीन समाज वास्तव, मानवी वृत्ती, शेती, कृषी जीवन, समतेचा विचार, शिक्षणक्षेत्र या विषयावर कविता लिहिल्या आहेत. एकूणच मानवी जगण्याचा तत्त्वज्ञान काव्यसंग्रहातून व्यक्त झाले आहे आणि हे समाजवास्तव सांगताना कुठेही उथळपणा दिसत नाही. अतिशय संथपणाने ही कविता अभिव्यक्ती होते म्हणून डॉ अनंत सूर यांचे मत योग्य वाटते. तसेच या काव्यसंग्रहातील प्रत्येक विभागाच्या पानावरील चित्रे अतिशय समर्पक व बोलकी झाली आहेत.

माणूस हा संवेदनशील प्राणी आहे. आपल्या आजूबाजूचे समाज वास्तव तो संवेदनशील मनाने टिपतो आणि या टिपलेल्या क्षणातून त्याच्या हाती काही वास्तव लागते. हे वास्तव माणूस कधी बोलण्यातून तर कधी लेखनातून व्यक्त करतो. कारण हे वास्तव अभिव्यक्त करणे ही कोणत्याही संवेदनशील व्यक्तीची गरज असते. असेच समकालीन समाज वास्तव कवी कल्याण गोपनर यांनी वेदनांकित संदर्भ या काव्यसंग्रहातून अभिव्यक्त केले आहे. म्हणून निखळ भावाभिव्यक्तीची कविता म्हणजे वेदनांकित संदर्भ हा काव्यसंग्रह होय. या काव्यसंग्रहाचा विचार प्रस्तुत लेखात केला आहे.

प्रा. डॉ. कल्याण गोपनर यांच्या काव्यसंग्रहाचे नाव वेदनांकित संदर्भ आहे. हे शीर्षक योग्य वाटते. कारण शीर्षकात दोन शब्द आहेत. वेदना आणि संदर्भ. संदर्भ म्हणजे एखाद्या गोष्टीची मूळ माहिती आणि वेदना म्हणजे शरीर किंवा मनाला जाणवणारे दुःख. समकालीन समाज वास्तव कवीच्या मनाला वेदनांकित करते. वेदनांकित मनाची अभिव्यक्ती कवीने येथे केली आहे.

शेती, शेतकरी, शिक्षण, कोरोना, मानवी प्रवृत्ती या अनुभवाची अभिव्यक्ती वेदनांकित संदर्भ काव्यसंग्रहातून झाली आहे. कवीची ही कविता 21 व्या शतकातील आहे. या काळाच्या चिंतन, मननातून कवीच्या मनाला जाणवलेले संदर्भ म्हणजे 'वेदनांकित संदर्भ' होय. वेदनांकित संदर्भ या काव्यसंग्रहाचे विवेचन करण्यापूर्वी आपण कवीचा परिचय पाहू.

कवीचा परिचय :-

कवीचे संपूर्ण नाव कल्याण श्रीपतराव गोपनर. गाव नांदेड जिल्ह्यात मुखेड तालुक्यातील तग्याळ हे खेडेगाव आहे. या ग्रामीण भागात त्यांचा जन्म झाला. त्यामुळे ग्रामीण माती, शेतीचे संस्कार कवीवर झाले. ते कवितेतून कवीने अभिव्यक्त केले आहेत.

शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. आई-वडील शेतकरी. शिक्षण एम. ए. मराठी. पीएचडी पूर्ण करून प्राध्यापकी व्यवसाय स्वीकारला. आज ते परभणी येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागात कार्यक्रमाधिकारी म्हणूनही त्यांनी आदर्शवत कार्य केले असून स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेडच्या मराठी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. शेती, शिक्षण आणि

कोरोनाच्या अनुभवावर समाज वास्तव सांगणारा वेदनांकित संदर्भ हा काव्यसंग्रह कवी प्रा कल्याण ओपनर यांचा पहिला काव्यसंग्रह आहे. या काव्यसंग्रहाचा विचार आता आपण करू.

1) वेदना व विद्रोहाची अभिव्यक्ती :-

प्रस्तुत काव्यसंग्रहातील पहिल्या विभाग वेदनेच्या कविता. या विभागात आठ कवितांचा समावेश केला आहे. संत तुकारामांच्या अभंगाची एक ओळ अशी आहे की, 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' याच अर्थाने कवी म्हणतो की, माझ्या मनाची वेदना ही एका दिवसाची नाही तर ते अनेक रात्रीचे केलेले चिंतन आहे. अनेक रात्रीच्या चिंतनाचा प्रवाहाला भरती आली. ती शब्दातून व्यक्त करताना कवी म्हणतो,

एका दिवसाचं ऊत नाही
तर कित्येक रात्रपाळीच जागरण

ऊत म्हणजे भरती, प्रवाह. हा विचारांचा, चिंतनांचा प्रवाह कवी कवितेतून संतपणाने अभिव्यक्त करतो. तसेच ही कविता केवळ वेदनेची, दुःखाची कविता आहे का ? तर नाही. ती विद्रोहाचीही अभिव्यक्ती करते. वेदना ही वेद्रोहाची उत्पत्ती असते. विद्रोह हा वेदनेतून जन्मतो. म्हणून कवीला आपल्या भोवतालचा कोलाहल, गोंधळ पाहून वेदना होते. या वेदनेच्या चिंतनातून विद्रोह जन्म घेतो म्हणून कवी म्हणतो,

प्रदक्षिणा घालावी सूर्याभोवती
तसा आवेश प्रवृत्ती अंतरंगात

भारताला 1947 ला स्वातंत्र्य मिळाले. भारताने लोकशाही स्वीकारली, पण लोकशाही समाज व्यवस्थेतील न्याय, हक्क, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता आज पाहायला मिळत नाही. आज अनेक लोक खोट्याचं खरं, खऱ्याचं खोटं करतात अशा स्वार्थी प्रवृत्तीचे लोक चांगल्या तनामनावर वार करतात. त्यामुळे अहंकार माजलाय. कोलाहल माजला. हे सर्व पाहून कवीच्या मनात विद्रोह जन्म घेतो, हेच वरील वरील विवेचनावरून अधोरेखित होते.

आज या कोलाहल, गोंधळामुळे जो तो बुलेट ट्रेन सारखा सुसाट वेगाने पळत आहे. कुणाला कोणासाठी थांबायला वेळ नाही. जो तो क्षणिक सुखा मागे लागला आहे. जीवन म्हटले की सुखदुःख, संघर्ष या गोष्टी अटळ आहेत. त्या प्रत्येक मानवाच्या जीवनात असतात. हे जीवन सुखी, समाधानी जगण्यासाठी खूप कमी गोष्टी लागतात. असे असले तरी काही हावरट प्रवृत्तीचे लोक अनेक वस्तू, गोष्टी मिळवण्यासाठी स्वार्थी बनतात. आकाश, पाताळ एक करतात. या प्रवृत्तीचे लोक पाहून कवी म्हणतो,

मृत्यू अटळ आहे
का करशी
पृथ्वी पाताळ एकची

आज अनेक जण स्वतःमध्येच गुरफटून गेले आहेत. समाधानी जीवन कसं जगावं ? हे त्यांना कळत नाही. असंच त्यांच्याकडे पाहता म्हणावं लागतं. जेवढं आपल्याला आयुष्य मिळेल तेवढं निखळ, निर्मळ जगलं पाहिजे आणि हे सहज आहे. फार अवघड नाही, पण समाजात कसं जगावं, वागावं याचे तीळमात्र भान नसलेले लोक आहेत. त्यांना **पाहून कवी म्हणतो,**

अनावधानाने जन्म
मानवी योनीत झाला
अन्यथा ही पिल्लावळ
असुरी अवगुणाची

या वृत्तीचे लोक वरून दाखवतात आपण साव आहोत, पण खरे तर माणुसकीचे ते संहारक असतात. कवीला हे लोक "वरून कीर्तन आतून तमाशा असतो" असे वाटतात.

मानवी वृत्ती प्रवृत्ती पाहून कवीला वेदना होते. ही वेदनेची कविता या पहिल्या भागातून व्यक्त केली तसेच ही कविता वेदनेसोबत विद्रोह ही व्यक्त करते, हेच वरील विवेचनावरून स्पष्ट होते. आता आपण प्रस्तुत काव्यसंग्रहातील दुसऱ्या भागाचा विचार कर

2) अस्सल शेती मातीची कविता :-

प्रा.डॉ. कल्याण गोपनर यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. आई-वडील शेतकरी. शेती जीवनाचा प्रभाव कवीमनावर झाला आहे. या प्रेरणेतून आजची शेती, शेतकरी बाप या विषयावर शेतीमातीच्या कविता या विभागात दहा कविता कवीने लिहिले आहेत. कवीची कविता जास्त रमते ती शेती आणि शिक्षणामध्ये. कारण कवीचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला तसेच कवी स्वतः शिक्षक आहे. त्यामुळे त्यांनी शेती व शिक्षणावर कविता अधिक लिहिली. त्यामुळे शेती व शिक्षण क्षेत्रात त्यांची कविता जास्त रमते आणि हे अनुभव उत्कट आहेत त्यामुळे त्यामध्ये जिवंतपणा, वास्तविकपणा आला आहे.

जागतिकीकरणामुळे आज शेती, शेतशिवार यावर परिणाम होत आहे. शेतीवर अवलंबून असलेले जीव, प्राणी, पक्षी बेघर होत आहेत. काही पक्षी नष्ट होत आहेत. काही पक्षी नष्ट होत आहेत. हे पाहून कवीला वेदना होते. ही वेदना व्यक्त करताना कवी म्हणतो,

मोबाईल वेब लहरीने
चिमणीचा मोडला डाव
चिमणी अशी होती
तिच्याविष्टेने हात रंगती

आज या मोबाईल लहरीमुळे चिमणी दिसत नाही. ती दिसत नाही म्हणून कवीची बुद्धी मंद होते. संवेदनशील माणसाचं मन हळहळेल अशीच परिस्थिती आज निर्माण झाली आहे.

कवीचे वडील शेतकरी. त्यामुळे त्यांच्या वडिलांची संपूर्ण हयात शेती करण्यात गेली. हे कवीने पाहिले, म्हणून आपल्या शेतकरी बापाविषयी लिहिताना कवी म्हणतो,

शेतशिवाराच्या उजाड रानावनात
उभी हयात घातली तुम्ही
मातीशी एकरूप होता होता
सारी जिंदगी पाहिली आम्ही

आपल्या शेतकरी बापाचं संपूर्ण आयुष्य शेतीमाती यामध्ये कष्टान्यातच गेलं, पण या शेतीची आज परवड होत आहे. याचे परिणाम शेतीमाती, प्राणी, पक्षी यांच्यावर होत आहे.

रस्ते, घरे बांधण्यासाठी आज वृक्षतोड केली जात आहे. त्यामुळे झाडे लावली पाहिजे. झाडे जगवली पाहिजे तरच पाऊस पडेल. सजीव सृष्टी जगेल. प्राणी, पक्षी, झाडे यांचे सजीव सृष्टीतील महत्त्व कवीने कवितेतून अभिव्यक्त केले आहे, हेच वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

या दुसऱ्या विभागात शेतकरी आईबाप, पशु, पक्षी, प्राणी यांच्यावर कविता लिहिली तर तिसऱ्या विभागामध्ये स्त्री-पुरुष समतेची कविता लिहिली आहे.

3) स्त्री-पुरुष समतेची कविता :-

समतेची कविता या विभागात सात कवितांचा समावेश केला आहे. महात्मा फुले, शाहू, आंबेडकर या महामानवांच्या विचाराचा प्रभाव कवीवर आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष समतेचा विचार कवितेतून मांडताना कवी म्हणतो,

पुरुष आणि पुत्री जन्माने
दोघे असे समान

भारतीय संस्कृतीत मुलाला वंशाचा दिवा म्हणतात. पण मृत्यू जवळ येतो तेव्हा मुलगा काय मुलगी काय कोणीही जवळ येत नाही. विचारत नाही. मग कशासाठी तुम्हाला मुलगा पाहिजे. मुलगा पाहिजे हा अट्टाहास कशासाठी करता ? असा प्रश्न कवी समाज व्यवस्थेला विचारतो.

स्त्री-पुरुष समानता कशी येईल तर ती
स्त्री पुरुष समानता येईल
फुले शाहू आंबेडकरी विचारातून

असे कवी म्हणतो आणि हे सत्य आहे. कारण स्त्री-पुरुष समतेसाठी फुले, शाहू, आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. हा विचार कृतीत आणण्यासाठी महात्मा फुलेंनी शाळा काढल्या. आंबेडकरांनी संविधानात समतेचा हक्क मिळवून दिला. त्यामुळे आज पुत्राप्रमाणे मुलीलाही संपूर्ण हक्क, अधिकार प्राप्त झाले. ही देण फुले, शाहू, आंबेडकरी विचाराची आहे, हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

स्त्री-पुरुष समतेचा विचार मांडताना आई, आजी, वडील यांच्या विषयीच्या कविताही कवीने लिहिल्या आणि त्या उत्कट झाले आहेत. या अगोदर आपण शेतकरी बापावर लिहिलेली कविता पाहिली. या विभागात आजीवर लिहिलेली कृष्णामाई ही कविता येते. या कवितेत कवी म्हणतो,

अशी ही कृष्णामाई
गाव व नात्यावर
भरभरून प्रेम करणारी
रुबाबदार खानदानी
मानवतेची आदर्श समई

माणसं, गाई, गुरं शेतशिवारावर जीव लावणे हे मानवतेचे लक्षण आणि ते कवीच्या आजीच्या ठाई ठाई आपल्याला दिसते. हे संस्कार कवीला मिळाल्यामुळे कवीची कविता शेतीमातीत अधिक रमते, हेच वरील विवेचनावरून स्पष्ट होतं.

आपला देश शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. येथे शेती व शेती व्यवसायाशी संबंधित जीवन जगणारे 70% लोक आहेत. या लोकांविषयी, शेतकऱ्यांविषयी कवी म्हणतो,

कष्टतो राबतो
मातीशी इमान राखतो
बळीराजाच्या हिमतीने
देश शेतीप्रधान होतो

आज शेती व्यवसायातून शेतकऱ्याची फायदा होत नाही. त्याची तीन कारणं आहेत. 1) शेतीमालाला कमी भाव 2) कर्जबाजारीपणा 3) सरकारचे फसव्या योजना यामुळे शेतकरी कोंडीत सापडला आहे. म्हणून आज महाराष्ट्रात स्थिती अशी आहे, की दररोज तीन शेतकरी आत्महत्या करत आहेत.

शेतीचा फायदा शेतकऱ्यांना न होता शेतीवर जगणाऱ्यांना होत आहे आणि हे सरकारला कळत नाही का ? कळतं पण शेती व्यवस्थेतील लोक नाराज होऊ नये. उदा. खत विक्रेते, सावकार, शेतीमाल खरेदी विक्री करणारे व्यापारी हे लोक नाराज होऊ नये म्हणून सरकार शेतीमालाला योग्य भाव देत नाही, हे सर्व पाहून कवीच्या मनात विद्रोह जन्म घेतो व कवी म्हणतो,

रक्त न आठताही
कसे जगतात बांडगुळ...
त्यांचा आणि मातीचा
काडी इतकाही संबंध नाही

बांडगुळ म्हणजे दुसऱ्याच्या जीवावर जगणारे. अशा प्रवृत्तीचे, शेतीशी ज्याचा संबंधही नाही, शेतात कष्टही करत नाही, पण शेतकऱ्यांच्या पिकावर, शेतकऱ्यांच्या जीवावर, कष्टावर जो बांडगुळासारखा जीवन जगतो. या प्रवृत्तीचे लोक पाहून कवीला चीड येते. राग येतो. हा राग वरील ओळीतून कवीने व्यक्त केला आहे.

शेती, शिक्षणाचा प्रभाव कवीच्या मनावर असल्यामुळे शेतीसोबत शिक्षण व्यवस्थेवरही ही कविता भाष्य करते. आता आपण कवीने शिक्षण व्यवस्थेवर लिहिलेल्या कवितेचा अभ्यास करू.

4) ग्रंथ, वाचन, शिक्षकाचे महत्व अधोरेखित करणाऱ्या कविता :-

शिक्षणाच्या कविता या चौथ्या विभागामध्ये चार कवितांचा समावेश केला आहे. या विभागात भाषेविषयी कृतज्ञता, ग्रंथाचे महत्त्व व शिक्षकाची भूमिका या विषयावरील कविता आहेत. ग्रंथाचे महत्त्व सांगणाऱ्या दोन कविता आहेत. ग्रंथ, पुस्तक वाचनातून आपल्याला माहिती मिळते. जीवनातील अनेक प्रश्नांची उत्तरे पुस्तक वाचनातून मिळतात. ग्रंथाचे महत्त्व सांगताना कवी म्हणतो,

ग्रंथ माझे सांगाती
सदा आपुल्याच हाती
त्यास उघडून पाहता
मिळे जीवनास गती

प्रत्येकाने ग्रंथ वाचले पाहिजे. ग्रंथ म्हणजे काय असतात याबाबत कवी म्हणतो,

ग्रंथ आहे अभिव्यक्ती
ग्रंथ आहे तलवार
माणसात पेटणारा
विवेकी ज्ञान सार

ग्रंथांमधून लेखक आपल्या भावना व्यक्त करतो. ग्रंथ वाचनातून आपल्याला सत्य परिस्थिती कळते. विवेकी दृष्टी मिळते. त्यामुळे आपल्या विचारांना तलवारीची धार येते, हे ग्रंथ वाचनाचे फायदे कवीने वरील ओळीतून सांगितले आहे, हेच वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

ग्रंथ, वाचन हे शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचा घटक आहे तसा शिक्षक हाही महत्त्वाचा घटक आहे, पण आजचे प्राध्यापक, शिक्षक शिकवण्याऐवजी इतर धंदे व्यवसाय करत आहेत. सहाव्या वेतन आयोगाने शिक्षकांच्या पगारी खूप चांगल्या झाल्या आहेत. शिक्षकांच्या पगारी का वाढल्या तर शिक्षकाने पूर्ण वेळ विद्यार्थ्यांना ज्ञानदान करावे. त्यांनी पैशासाठी इतर उद्योगधंदे व्यवसाय करू नये म्हणून त्यांचे पगार वाढवले. असे आज असतानाही काही शिक्षक, प्राध्यापक बेजबाबदारपणे वागतात. शिकवत नाहीत. या विषयी कवी म्हणतो,

क्षणभंगुर मोह लाभा पायी
त्यातच तुम्ही पूर्ण बुडालात

या बेजबाबदार शिक्षकांना पाहून कवी पुढे म्हणतो,

आपल्या बेजबाबदार वर्तनाचा
शिक्षण क्षेत्राला काळा डाग आहे

आजच्या या शिक्षकांच्या भूमिकेमुळे विद्यार्थ्यांची फसगत होत आहे. विद्यार्थी निराश होत आहे. अशीच शिक्षकांची भूमिका राहिली तर कसा भारत विकसित होईल ? ही परिस्थिती पाहून कवीला वाटते, की शिक्षकांना पगार चांगले आहेत. त्यामुळे शिक्षकांनी मन लावून शिकवले पाहिजे, पण आजच्या शिक्षकांची न शिकवण्याची वृत्ती पाहून कवीला राग येतो, चीड येते, ही चीड वरील कवितेतून कवीने व्यक्त केली आहे, हेच स्पष्ट होते.

कवी शिक्षक आहे. त्यांची उभी हयात शिक्षण क्षेत्रात गेली. आजची शिक्षण व्यवस्था, शिक्षक, विद्यार्थी पाहून कवीच्या मनाला यातना होतात. या यातना, वेदना कवीने कवितेतून व्यक्त केल्या आहेत. शेती, शिक्षण क्षेत्रातील अनुभवावर ही कविता जशी भाष्य करते तशी कोरोना काळातील अनुभवावरही ही कविता भाष्य करते.

5) कोरोना काळाची ऐतिहासिक नोंद काव्यातून :-

कोरोनाच्या कविता या विभागात एकूण चार कवितांचा समावेश आहे. कोरोना या महाभयंकर रोगामुळे जागतिक आरोग्य संकट निर्माण झाले होते. कोरानामुळे चार वेळा लॉकडाऊन झाले. कोरोना हा संसर्गजन्य रोग आहे. तो कोरोना व्यक्तीच्या संपर्कातील लोकांना होतो. त्यामुळे लाखो लोक मृत्युमुखी पडले. जगात हाहाकार माजला. भीती निर्माण झाली. मानव प्राण्याचे जगण्याचे प्रयत्न सुरू झाले. कोरोनावर नियंत्रण मिळवण्यासाठी लस संशोधन झाले. लस मिळाली. या ऐतिहासिक घटनेची नोंद कवीने चार कवितेत घेतली आहे. त्यामुळे ही एक ऐतिहासिक कविता झाली आहे.

दिवसागणिक कोरोनाची
भरमसाठ संख्या वाढली
संशोधक वैज्ञानिक डॉक्टर
नर्स सुरक्षारक्षक आता
कोरोना संकटाशी सज्ज आहेत

आजार नाहीसा व्हावा म्हणून सरकारने लॉकडाऊन, कॉरंटाईन सुरू केले. भारत सरकारने कोरोना संकटावर नियंत्रण मिळवण्यासाठी चार वेळा लोकडाऊन केले. तरी रुग्णसंख्या वाढत राहिली. कोरोना रुग्ण बाजारपेठ, रस्ते सर्व क्षेत्र निर्मनुष्य बनले. शिक्षण क्षेत्रावरही याचा परिणाम झाला. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण सुरू झाले. दोन वर्ष परीक्षा घेतल्या नाही. परीक्षाविना विद्यार्थी पास करण्यात आले. या कोरोना काळाची नोंद कवीने कवितेतून घेतली आहे. त्यामुळे ही कविता ऐतिहासिक झाली आहे, हेच वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

कोरोना काळातील कवितेनंतर शेवटचा भाग म्हणजे इतर कवितांचा. आता आपण या शेवटच्या भागाचा विचार करू.

6) इतर कविता :-

या विभागात सहा कवितांचा समावेश केला आहे. कोरोनाच्या मृत्यूपेक्षा भारतात रस्ते अपघातामुळे मृत्यू होणाऱ्यांची संख्या अधिक आहे. रस्ता अपघाताविषयी सतर्कता यावी यासाठी कवी म्हणतो,

रस्त्यावर सावकाश गाड्या चालवणे
शहाणपणाचे लक्षण आहे

आज जेवढी माणसं तेवढी वाहन. तीही सुसाट. जागतिकीकरणामुळे जग जवळ आले. लोकसंख्या वाढली. माणसे शाळा, कॉलेज कामानिमित्त वाहने वापरू लागली. वाहनामुळे वेळेचे बचत होऊ लागली. कामे होऊ लागली. ही चांगली गोष्ट आहे, पण वाहन चालवण्याचे नियम फारसे कोणी पाळत नाही. ही अडचण ठरली. त्यामुळे रस्ते अपघात वाढले आणि वाहतूक नियंत्रक अधिकारी यांचेही यावर लक्ष नाही. त्यामुळे विनाकारण लाखो लोकांचे जीव आज रस्ते अपघातात जात आहेत. ही खूप चिंतनाची बाब, हीच बाब वरील कवितेतून कवीने अधोरेखित केली आहे. इतर कविता या विभागात राजकीय विषयावरील कविता उत्तम झाली आहे. आजचे राजकीय नेते याबद्दल कवी म्हणतो,

निवडणुका जशा जवळ येतात
तसे रक्ताचे नाते गुंफतात काही
निवडणुका संपल्या की
विजयी उमेदवार हवेत जगतात

सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा मिळवणे, हेच बहुतांश राजकीय नेत्यांचा आज हेतू बनला आहे. लोकांचं कल्याण करावं, हा मूळ हेतू मागे पडताना आज आपण पाहतो, हे पाहून संवेदनशील माणसाला वेदना होतात. ही कवीची वेदना वरील ओळीतून अभिव्यक्त झाली आहे, हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

वेदनेचे संदर्भ काव्यसंग्रहाचे वेगळेपण :-

1) प्रश्नांकित भाषाशैली :-

प्रश्न विचारणे हे संवेदनशील व्यक्तीच्या जिवंतपणाचे लक्षण असते. कवी समकालीन व्यवस्था पाहून व्यतीत होतो व या व्यवस्थेला सतत प्रश्न विचारतो. स्त्री-पुरुष विषमता पाहून कवी म्हणतो,

जसे बाईने बाईपण जपावं
तसे पुरुषांना का जपू नये

स्त्री-पुरुष समतेचा विचार कवी या प्रश्नातून व्यक्त करत आहे. तसेच वृक्ष, वेली हे सजीव सृष्टीतील महत्त्वाचे घटक आहेत ते जर नष्ट झाले तर सजीव कसे जिवंत राहतील. सद्यस्थितीत रस्ते, घरे बांधकामामुळे भरमसाठ वृक्षतोड होत आहे. ती पाहून कवी म्हणतो,

भरमसाठ वृक्षतोड करून
मिळेल का अन्न

वरील ओळीतून व्यवस्थेला प्रश्न विचारून आपल्या मनातील वेदना कवींना व्यक्त केली आहे. यावरून प्रश्नात्मक भाषाशैली ही त्यांच्या कवितेचे एक वेगळेपण आहे, हेही वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

2) संदेशात्मक कविता :-

काळ बदलानुसार माणसाने बदलले पाहिजे. "जैसा देश वैसा भेस" असे आपण म्हणतो. तसे काळ, स्थळ, परिस्थितीनुसार प्रत्येकानं बदल केला पाहिजे तर तो टिकतो, स्थिरावतो. हाच संदेश देताना कवी म्हणतो,

काळ बदलला
स्वही बदलातून
विचार अंगीकारावे फुले दांपत्याचे

फुले, शाहू, आंबेडकर विचारातून ही कविता पुढे आली आहे. हा संदेश वरील ओळीतून अभिव्यक्त झाला आहे. आपली उक्ती व कृती यामध्ये एक वाक्यता असावी. हा संदेश सांगताना कवी कल्याण गोपनर म्हणतात,

आपण जे लिहितो
तीच वृत्ती आणि तोच स्वभाव
माणूस आणि लेखनात
किंतु परंतु भेद नसावा

अशी संदेशात्मक भाषाशैली हेही या काव्यसंग्रहाचे वेगळेपण आहे, हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

3) विद्रोही भाषा :-

कवी कल्याण गोपनर यांनी आपल्या मनातील वेदना व्यक्त केली तसा विद्रोहही अभिव्यक्त केला आहे आणि तो विद्रोह हा वेदनेतून आला आहे.

डॉक्टरांना आपण देव मानतो, पण ते देव कसले ते तर हैवान. ते आजाराचे नीट निदान न लावता आजार एक तर उपचार दुसराच करतात. कारण त्यांना आजाराचे निदान झालेले नसते. हे पाहून कवी म्हणतो, अत्याधुनिक **वैद्यकशास्त्रातही तुम्हाला**
ओळखता येत नाही

आजाराची जात
कशाला करता तपासणी

एकूणच वेदनेचे संदर्भ या काव्यसंग्रहातून शेती, शेतकरी, शिक्षण, कोरोनाचा काळ, समकालीन समाज जीवन हे सर्व पाहून कवीच्या मनाला वेदना होतात. ही वेदना या काव्यसंग्रहातून अभिव्यक्त झाली आहे. केवळ वेदनाच कवीने व्यक्त केली आहे का ? तर नाही. या वेदनेसोबत विद्रोहची अभिव्यक्तीही झाली आहे आणि हा विद्रोह कुठेही उथळपणाने येत नाही तर तो संथपणाने व्यक्त केला आहे आणि त्यामुळे तो वास्तवाभिमुख झाला आहे त्यामुळे तो आपल्या मनाचा ठाव घेते, हे या काव्यसंग्रहाचे वेगळेपण आहे

निष्कर्ष :-

1) शेती, शेतकरी, शिक्षण व्यवस्थेची वास्तविक सद्यस्थितीवर काव्यसंग्रहात भाष्य केले आहे.

2) कोरोना काळाची नोंद कवीने केल्यामुळे ही कविता ऐतिहासिक झाली आहे.

3) कवीने जे पाहिले, अनुभवले, भोगले तेच कवितेतून अभिव्यक्त केल्यामुळे कविता वास्तववादी झाली आहे.

4) वेदना व विद्रोहाची अभिव्यक्ती म्हणजे वेदनेचे संदर्भ काव्यसंग्रह होय.

5) प्रश्नांकित भाषाशैली व संदेशात्मक भाषाशैली हे या काव्यसंग्रहाचे वेगळेपण आहे.

संदर्भ :-

1) वेदनांकित संदर्भ - कल्याण गोपनर, सायास पब्लिकेशन, नांदेड

2) मराठी शब्दकोश - संपा. श्री सुनील सुतार, चेतन बुक्स, पुणे

3) काव्यप्रतीती - वसंत आबाजी डहाके, विजय प्रकाशन, नागपूर

4) काव्यलोचना,सुधीर रसाळ, सायन पब्लिकेशन

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांची प्रासंगीकता एक चिकित्सक अभ्यास

प्रा. डॉ. मारोती विठ्ठलराव भोसले

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कै. डॉ. शंकरराव सातव कला वाणिज्य महाविद्यालय कळमनुरी ता.कळमनुरी जिल्हा. हिंगोली.

Abstract:

छत्रपती शाहू महाराज आरक्षणाचे जनक, वसतिगृहाचे जनक, शिक्षणातून सामाजिक व आर्थिक विकास होतो असे त्यांचे ठाम मत होते. स्त्री व पुरुष समानता पुरस्कर्ते, सर्व जाती-धर्मांच्या लोकांसाठी उदारमतवादी धोरण, समाज आर्थिक दृष्ट्या संपन्न होण्यासाठी उद्योग व्यवसाय याचा त्यांनी पुरस्कार केला. ग्रामीण भागातील लोकांना हाताला काम देऊन त्यांचे दारिद्र्य दूर करण्याचा प्रयत्न केला. शेती क्षेत्रामध्ये आधुनिकता व यंत्राचा अधिक वापर केला जावा उत्पादनामध्ये जास्तीत जास्त वाढ केली जावी यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या त्यांच्या शैक्षणिक कार्याची समाजशिक्षण हे प्रमुख ध्येय होते बहुजन समाजातील मुला-मुलींना, प्रार्थमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण देऊन सामान्य माणसाचे अज्ञान दूर करणे ही या पाठीमागचे प्रमुख भूमिका होती. याचबरोबर शिक्षण म्हणजे काय हे माहीत नसलेल्या समाजाच्या मनात शिक्षणाविषयी असता निर्माण करणे. शिक्षण ही सर्वांगीण जीवनाच्या परिवर्तनाची गंगोत्री आहे. ही समाजाला पटवून देण्याचे काम केले. शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे सूत्र मक्तेदारी कडून सार्वजनिकतेकडे जाणारे खाजगी हितसंबंधाकडून सार्वजनिकतेकडे येणारे व जातीभेद विषमता यांनी ग्रासलेल्या समाज जीवनाला समानतेच्या पातळीवर आणण्याची कार्य केले. छत्रपती शाहू महाराज हे रयतेच्या कल्याणकारी धोरणाचे पुरस्कर्ते होते. सहकारातून समृद्धीकडे नेणारे विचार त्यांनी आर्थिक समाजामध्ये रुजविले.

Keywords: शेतीचे आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, आरक्षण, वस्तीग्रह, सती प्रथा, हुंडा पद्धती, नादारी पद्धत, मेरिट छात्र वृत्ती योजना, इत्यादी

अभ्यास विषयाची निवड:

प्रस्तुत संशोधनासाठी छत्रपती शाहू महाराजांची निवड यासाठी करण्यात आली की त्यांचे कार्य सर्व व्यापक म्हणजे सामाजिक, आर्थिक राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, आरक्षण विषयक, विविध क्षेत्रात झाले आहे तेव्हा त्यांचा कार्याचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी निवड केली आहे.

संशोधनाचा आराखडा:

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे.

तथ्य संकलन:

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी द्वितीय साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे त्यामध्ये वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, इंटरनेट, संदर्भ ग्रंथ इत्यादीच्या साह्याने संशोधन कार्य पूर्ण करण्यात आली आहे.

संशोधनाची व्याप्ती:

प्रस्तु संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधनाची व्याप्ती निश्चित करण्यात आली आहे. ज्यामध्ये राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक विचार यामध्ये शेतीविषयक, व्यापार, उद्योग विषयक, श्रमिका विषयी, रोजगार व दारिद्र्य विषयी आणि आर्थिक कल्याणाविषयी. आरक्षण विषयक विचार. शैक्षणिक धोरण एवढ्या पुरते मर्यादित आहे.

प्रस्तावना :

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म 26 जुलै 1874 रोजी कोल्हापुरातील कसबा बावडा येथे झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव जयसिंगराव घाडगे असे होते. आबासाहेब घाडगे ही कागल संस्थांची संस्थांनी होते. कोल्हापूरच्या

गादीला वारस म्हणून शिवाजी महाराज चतुर्थ यांच्या पत्नी श्रीमती आनंदीबाई राणे साहेबांनी यशवंतराव म्हणजे शाहू महाराज यांना दिनांक 17 मार्च 1884 रोजी दत्तक घेतले. दत्तक घेतल्यानंतर त्यांना छत्रपती राजश्री शाहू महाराज असे म्हटले जाऊ लागले. पुढे शाहू महाराज आपल्या कर्तुत्वाने कोल्हापूर संस्थान व भारतातच नव्हे तर जगभरात सुपरिचित झाले.

शाहू महाराजांची शिक्षण:

छत्रपती शाहू महाराजांची बालपण शिक्षण राजकोट व धारवाड येथे पूर्ण झाली श्री एस एम फ्रिजर ही त्यांची गुरु होते श्री फ्रिजल यांनी राजश्रींना संपूर्ण देशाच्या दौऱ्यामुळे त्यामुळे पुस्तके ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष परिस्थिती त्यांना अभ्यासता आली गोखले किड्स विरार यांचा शाहू महाराजांवर प्रभाव पडला होता सण 1894 ते 1922 अशा 28 वर्षाच्या काळात त्यांनी कोल्हापूर संस्थांचा राज्यकारभार सांभाळला. पण या काळात त्यांनी भविष्यकालीन विचार करून आर्थिक सामाजिक शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात सर्वांगीन विकासासाठी व्यूहरचना रचना आखली. आर्थिक व सामाजिक क्षेत्रात प्रचंड असे अनमोल कार्य त्यांनी केले. धाडसी, दिलदार, लोकभिमुख, उच्च विचारसरणी, गरिबांचा आश्रयदाता यासारखे अनेक पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वात होती. युरोप खंडातील 18 ते 19 शतकातील आर्थिक सामाजिक व राजकीय परिवर्तनाचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. भारतातील सामाजिक आर्थिक,परिस्थिती बदलली पाहिजे असे त्यांना वाटत होते. संख्येने मोठे असणाऱ्या बहुजन समाजापुढे शिक्षणाचा अभाव, जातीप्रथा, धर्म मार्तंडाचा प्रभाव, यांसारख्या अडचणी होत्या. या सर्व बंधनातून मुक्तता केल्या शिवाय समाजाची प्रगती होणार नाही, हे त्यांना ठाऊक होते. त्यासाठी राजश्रीनि अनेक आर्थिक सामाजिक, बदल घडून आणली. शाहू महाराजांनी वेळोवेळी भाषणे केली, विचार मांडले, हुकूमनामे काढली. त्यातून त्यांची आर्थिक व सामाजिक विचारसरणी लक्षात येते.

संशोधनाची उद्दिष्टे:

1. आज राजश्री शाहू महाराजांच्या विचारांची गरज आहे .
2. राजश्री शाहू महाराजांची विचार प्रत्यक्षात उतरले आहेत का त्याचा अभ्यास करणे.
3. राजश्री शाहू महाराजांची विचार शासनाला व समाजाला उपयोगी आहेत का त्याचा वेध घेणे.
4. राजश्री शाहू महाराज यांचे विचार रूजविण्याकरिता उपाययोजना सुचवणे.

संशोधनाची गृहितके:

(1) राजश्री शाहू महाराज यांचे आर्थिक विचार प्रत्यक्षात उतरले आहेत.

(2) राजश्री शाहू महाराजांच्या आर्थिक विचारामुळे समाजाची आर्थिक प्रगती झाली आहे.

(3) राजश्री शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा फायदा महाराष्ट्र शासनाला झाला आहे.

(4) राजश्री शाहू महाराजांच्या विविध धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाची भूमिका उदासीन आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार:

छत्रपती शाहू महाराजांनी आपले आर्थिक विचार स्पष्ट केले आहेत. ज्यामध्ये शेती, श्रमिक, उद्योगधंदे, व्यापार, दारिद्र्य निर्मूलन, रोजगार, सहकार अशा अनेक विषयावर त्यांनी आपले विचार मांडले आहेत. ते पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

(1) शेती विषयक विचार:

शाहू महाराजांच्या मते कृषी कर्मामुळे दुहेरी उन्नती होते.स्वतःला सुख मिळविण्याबरोबरच संपूर्ण मानव जातीला समाधान प्राप्त होते. संपूर्ण राज्य हे शेती क्षेत्राच्या प्रगतीवर अवलंबून असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कृषी अधिकयावर त्यांचा विश्वास होता. जमिनीच्या विभाजीकरणाला त्यांचा विरोध होता. जमिनीची तुकडीकरण व

त्यामुळे जमिनीचे होणारे छोटे आकारमान हा कृषी उत्पादन वाढीतील प्रमुख अडसर होता. म्हणून त्यांनी सर्व 1913 मध्ये संस्थानातील सर्व इनामे अविभाज्य केले. त्यांनी घेतलेला हा फार मोठा क्रांतिकार निर्णय होता. शेतकऱ्या विषयी त्यांना फार मोठी तळमळ होती. गरीब शेतकऱ्याचा विकास झाला पाहिजे असे त्यांना वाटत होती. म्हणून त्यांनी कोल्हापूर परिसरात कृषी विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. शेतीला पाण्याची जोड दिल्याशिवाय शेतीचा विकास होणार नाही ही बाब त्यांनी लक्षात घेतली होती. त्यांनी 1902 मध्ये संपूर्ण संस्थांच्या जलसिंचनाचा आढावा तज्ञाण्याकडून करून घेतला होता. त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभापासून म्हणजे 1894 पासून त्यांनी संस्थानात जलसिंचन सोयीना यांनी सुरुवात केली होती. बंधारे, तलाव, विहिरी, त्यांची दुरुस्ती ज्याला त्यांनी महत्त्व दिली होते. पावसाचे पाणी आढवणे, साठवणे व शेतीसाठी त्याचा वापर करणे यावर त्यांनी भर दिने संस्थानातील सर्व जलसिंचन सोयीचा सोनेरी कळस म्हणजे राधानगरी धरण योजना होय. दुष्काळी संकटावर मात करण्याच्या दृष्टीने अशा प्रकल्पाची आवश्यकता आहे असे त्यांचे मत होते. भोगावती नदीवरील राधानगरी ही धरण बांधण्याचे कार्य 1909 मध्ये सुरू झाले. महाराजांनी आर्थिक व मानसिक त्रास होऊनही या धरणाचे काम चालूच ठेवले. पण दुर्दैवाने राजश्रीच्या काळात या धरणाचे काम पूर्ण होऊ शकले नाही. पुढील 1957 मध्ये त्यांचे पुत्र छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांची स्वप्न पूर्ण केली. या धरणामुळेच कोल्हापूर जिल्हा हिरवागार झाला. यावरून राजश्री शाहू महाराजांची महान दूर दृष्टी लक्षात येते. भांडवलाच्या कमतरतेमुळे शेती मागासलेली असल्याचे त्यांनी जाणले होते. राज्यकारभाराचे सुत्र हाती घेतल्यापासून त्यांनी शेतकऱ्यांची भांडवलाची टंचाई मीटविण्याचा प्रयत्न सुरू केला होता. त्यांनी शेतकऱ्यांच्या अत्यल्प व्याज दराने कर्ज दिली होती. काही शेतकऱ्यांना व्याज रहित कर्ज दिली होती. गरीब शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा होण्यासाठी 1904 मध्ये राजश्रींनी व्हिक्टोरिया मेमोरियल फंडाची ची उभारणी केली. द किंग एडवर्ड डबड फंडाची सुद्धा उभारणी केली होती. याशिवाय शेती परंपरा गत पद्धतीने होत असल्याने छुप्या भिकाऱ्याचे प्रमाण मोठे होते. म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी शेतातील अतिरिक्त श्रमिकांना उद्योग क्षेत्राकडे वळविण्याचा प्रयत्न केला. शेतीचे आधुनिकीकरण व्हावे म्हणून नवीन तंत्रज्ञान. यंत्रे, बी बियाणे आणि यांच्या वापरास प्रोत्साहन दिले. शेतीच्या आधुनिकीकरणासाठी त्यांनी 1912 मध्ये द किंग एडवर्ड ऍग्रीकल्चर इन्स्टिट्यूट ची स्थापना केली आहे. आधुनिक शेती विषयक शिक्षणाची सोय याद्वारे करण्यात आली होती. संस्थानात गरजेनुसार रोपांची निर्मिती करण्याकरिता अनेक ठिकाणी रोपवाटिका सुरू करण्यात आल्या .शेतातील पीक लागवडी बाबत राजश्री ची दृष्टी प्रयोगशील होते. पन्हाळगड व भुदरगड पेठात लागवड केलेली चहा व कॉफीचे मळे ही त्यांची यशस्वी प्रयोग होते. याशिवाय वेलदोडे, देऊ कापूस, घायपात, बटाटा, काजू इत्यादी पिकाच्या लागवडीची प्रयोग करणे केली होते विविध भागातील शेतीची प्रगती लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी, शेती प्रदर्शनी भरवली. त्यांच्या काळात 1896 मध्ये चिंचोली येथे पहिली शेती व जनावराचे प्रदर्शने भरली. प्रदर्शनी अशी भरवली जाऊ लागली. त्यासाठी राजश्री शाहू महाराज प्रोत्साहन देत असत. त्यांना आर्थिक मदत करीत असत. तसेच संस्थानात कृषी आधारित जोडधंदे सुरू करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले होते. म्हणून राजश्रींनी मेंढी पालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, इत्यादी व्यवसायांना उत्तेजन दिली. त्यामुळे शेतकरी व शेतमजूर यांच्यातील हंगामी बेकारी दूर होण्यास मदतच झाली.त्याच प्रमाणे वनविषयक कायद्यात बदल करण्यासाठी त्यांनी स्वतः लक्ष घातले. शेतकरीनी फळझाडे, औषधी वनस्पती इत्यादींचीलागवड करावी. असे निर्देश महाराजांनी दिले. आंबा फणस, काजू, साग, हिरडा, बेहडा व इतर औषधी वनस्पतीची लागवड केल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर होईल. त्यांना सावकाराकडून कर्ज घ्यावी लागणार नाहीत अशी शाहू महाराजांना वाटत होती.

सहकार विषयक विचार:

लोकांनी सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन उद्योगधंदे सुरू करावेत असे शाहू महाराजांची मत होते. सण 1912 मध्ये त्यांनी सहकारी चळवळीला चालना दिली. 1912 मध्ये कोल्हापूर संस्थानात सहकारी संस्था बाबतचा कायदा

करण्यात आला निबंध काद्वारे सहकारी संस्थांची नोंदणी करता येईल अशी व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर 1913 मध्ये भास्करराव जाधव यांचे नेतृत्वाखाली दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी ली. ही पहिली सहकारी संस्था स्थापन झाली. बलभीम को-ऑपरेटिव्ह सोसायटी व इतर अर्बन को-ऑपरेटिव्ह संस्था ही निघाल्या अशा प्रकारे सहकारी कायदा लागू करून सहकारी तत्त्वावर जनतेची आर्थिक प्रगती साधण्याचा ही त्यांनी पाया घातला. सहकारी तत्त्वावर कारखाने सुरूश करणे ही महाराजांची त्यावेळी ची योजना होती. आता कोल्हापूर जिल्ह्यात सहकारी पतसंस्था, बँका, सहकारी साखर कारखाने व इतर कारखाने सहकारी तत्त्वावर मोठ्या प्रमाणात निघाले आहेत. कोल्हापूर जिल्हा सहकारी चळवळीत अग्रेसर बनला आहे यावरून शाहू महाराजांची दूरदृष्टी लक्षात येते.

दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मिती विषयक विचार:

दारिद्र्य निर्मूलनाबाबत त्यांनी मौलिक विचार व्यक्त केले आहेत .शेतीची उत्पादकता वाढवून शेतीचा विकास साधल्यास त्यातून दारिद्र्य दूर होईल. यासाठी शेतीत नव्या तंत्रज्ञानाची वापर झाला पाहिजे. शेतीला पाण्याची योग्य जोड दिली पाहिजे सर्वसामान्य व कृषी विषयक शिक्षण घेतले पाहिजे. अशी त्यांची मत होते. दारिद्र्य निर्मूलनासाठी त्यांनी व्यावसायिक गतीशील तिच्या तत्वाला महत्त्व दिले त्यांनी प्रामुख्याने प्रभावी गतिशीलतेवर भर दिला. श्रमिकांचा प्रभावीगतिशील त्यांनी चालना दिली. अस्पृश्यामध्येही त्यांनी पूर्ववत गती शीलता निर्माण केली तसेच महाराजांनी महिलांच्या उन्नती करिता कायदे केले महिलांच्या आयुष्यातील शिक्षणाचे महत्त्व ओळखून संस्थानात त्यांनी महिला शिक्षणास प्रोत्साहन दिले. याद्वारे महाराजांनी महिलांमध्ये प्रभावी गतिशीलता निर्माण करण्याचे प्रयत्न केले. लोकांनी लहान होत नाही व बलुते यांच्या मागे लागू नये. साधारणपणे प्रतिव्यक्ती दहा एकर जमीन हिश्याला येईल असे तुकडे करून त्याचे उत्पन्न वडील व्यक्तीकडे चालविण्यास द्यावे. असे त्यांनी प्रतिपादन केले यामुळे उर्वरित लोकांना गावात किंवा परगावी कोणताही व्यवसाय करण्यास मोकळीक मिळेल असे, महाराजांना वाटत होते. यातून दारिद्र्य निर्मूलनाची मूळ महाराजांनी खूप आधी ओळखले होते. तसेच बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी मागासलेल्या जागेतील व्यक्तींना वकिलीची सणत्यांनी दिली. त्याचप्रमाणे सरकारच्या विविध खात्यात अस्पृश्य जातीच्या व्यक्तींना नोकऱ्या दिल्या दारिद्र्य निर्मूलन व रोजगाराची उपलब्धता या उद्देशाने महाराजांनी सामाजिक गतिशीलता व संधीची समानता या बाबींना महत्त्व दिल्याचे स्पष्ट होते.

कल्याण विषयक विचार:

शाहू महाराजांवर हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रभाव होता. शाहू महाराजांनी प्रजाहिताला नेहमीच अग्रक्रम दिला. संस्थानातील लोकांच्या कल्याणासाठी ते नेहमी जपत असतात. लोकांना शिक्षण, आरोग्य, रेल्वे, यासारख्या सोयी उपलब्ध झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. शिक्षण सोयी सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत बहुजन समाजात शिक्षणाचे प्रमाण खूप कमी म्हणजे दहा टक्के होते. बहुजनामधील शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी संस्थानामध्ये वसतिगृह काढली. परिणामी सुवर्ण व अस्पृश्य जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य झाले.

शाहू महाराजांनी सण 1902 मध्ये कोल्हापूर संस्थानातील रिक्त जागावर मागासलेल्या वर्गासाठी 50% आरक्षण ठेवले लोककल्याणाच्या विशेषता मागास व्यक्तीच्या कल्याणाच्या दृष्टीने महाराजांनी उचललेली ही पाऊल फार महत्वपूर्ण ठरली .त्यांनी मल विद्येला उत्तेजन दिले कोणत्याही जातीचा विचार न करता कलागुणांना वाव देण्याचे त्यांचे धोरण होते. अनेक नाटककरांना व नटांना महाराजांचा आश्रय होता. महाराजांच्या उदार आश्रयामुळे कोल्हापूर संस्थानात कला, संगीत, नृत्य, नाटक, इत्यादी सांस्कृतिक क्षेत्राचा विकास झाला. बहुजन समाजात सामाजिक शैक्षणिक व आर्थिक क्रांती घडवून महाराजांनी लोक जागृतीची बीजारोपण केले. शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, खेळ, कला, वाहतूक, या सर्व क्षेत्रांना चलणा देऊन त्यांनी संस्थारातीलच नव्हे तर इतर प्रांतातील लोकांच्याही कल्याणासाठी प्रयत्न केले.

श्रम विषयक विचार:

महाराजांनी श्रम विभागणीला महत्त्व दिले होते. श्रमाला ते संपत्ती मानत, कृषी क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिक इतर क्षेत्रात स्थलांतरित होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले होते. त्यांच्या कारकिर्दीत ब्रिटिशांचे भारतावर राज्य होते ब्रिटिशांनी श्रमिकाच्या विकासाबाबत प्रतिकूल धोरण स्वीकारले होते. श्रमिकांना विशेष सोयी सवलती न पुरविणे व त्यांच्या संघटना निर्माण होऊ न देणे या मार्गाने ब्रिटिशांनी भारतीय श्रमिकांना मागासलेली ठेवली या स्थितीत शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात श्रमिकांच्या गतिशीलतेचे धोरण राबवले. श्रमिकांना त्यांच्या संघटना स्थापन केल्या पाहिजेत असे त्यांना वाटत होते .महाराजांनी श्रमिकांच्या संघटना स्थापन करण्यास प्रोत्साहन दिली. त्यांच्या मार्गदर्शनानुसार मुंबई येथे सण 1918 मध्ये सी के बोले यांच्या नेतृत्वाखाली पीपल युनियन ही मोठी कामगार संघटना निर्माण झाली. याशिवाय श्रमिका चा दर्जा, गुणवत्ता सुधारण्यासाठी महाराजांनी प्रयत्न केले. श्रमिकांना प्रशिक्षण देऊन त्यांना कुशल बनण्याची प्रयत्न केली तसेच श्रमिकांना सुरक्षितता व इतर सोयी पुरविण्याबाबत त्यांनी स्वतः लक्ष घातले होते. श्रमिक वर्ग कृषी क्षेत्रातून रोजगार मिळण्याच्या आशेने शहरी क्षेत्रात आलेला आहे. याची जाणीव त्यांना होती ग्रामीण क्षेत्रात पुरेसा रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे लोक मोठ्या प्रमाणात शहराकडे येत असत ही बाब अभिमानास्पद नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. कारण यामुळे शहरांमधल्या समस्या वाढतील असे त्यांना वाटत होते. एकंदरीत श्रमिकांनी एकत्र आले पाहिजे त्याशिवाय त्यांनी त्यांची न्याय हक्क मिळणार नाहीत असे त्यांचे मत होते. त्यामुळे मुंबईमध्ये गिरणी मालक श्रमिकाचे शोषण करीत असत. या शोषणाविरुद्ध लढा देण्यासाठी श्रमिकांनी संघटित होणे आवश्यक असल्याची महाराजांनी सांगितले. त्यांनी मुंबईमधील श्रमिकांच्या सभेत दोन भाषणे दिली त्यातून त्यांची श्रमिका विषयीची प्रचंड तळमळ दिसते या श्रम या घटकाकडे शाहू महाराजांनी आधुनिक दृष्टिकोनातून पाहिले होते.

उद्योग विषयक विचार:

छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानात मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला होता. त्यांनी सार्वजनिक खाजगी संयुक्त आणि सरकारी अशा सर्व क्षेत्रात उद्योग धंदे उभारण्यास चालना दिली होती. त्याचप्रमाणे शाहू महाराजांनी संस्थानातील काही उद्योगाबाबत संरक्षण विषयक धोरण स्वीकारले होते. औद्योगिक क्षेत्रात प्रगती झाल्यास देश आर्थिक प्रगती झपाट्याने साधू शकतो. हे युरोप दौऱ्यावरून महाराजांनी ओळखले होते. औद्योगिक आघाडीवर मागे राहिल्याने आर्थिक शोषण होत असल्याचे त्यांनी जाणले होते. म्हणून त्यांनी कोल्हापूर संस्थानात उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी सर्वेक्षण केले संस्थानांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगांची उभारणी करण्यास वाव असल्याचे त्यांच्या लक्षात आले. 1906 मध्ये महाराजांनी शाहू छत्रपती स्पिनिंग आणि विविंग मिलचा पाया घातला. त्यासाठी महाराजांनी मोकळी मैदान, कोटी तीर्थ तलाव व पन्नास हजार रुपयांची भांडवल देऊ केले. याशिवाय कोल्हापूर संस्थानात सहकारी तवावर एक कापड गिरणी उभारण्यात आली. तसेच मधुमक्षिका पालन, सुगंधी व औषधी तेल उद्योग यासारखे उद्योग सुरू करण्यात आले. तसेच हातमाग उद्योगालाही महाराजांनी मदत केली. रायबाग येथे रंगाचा कारखाना सुरू करता येईल काय याची चाचणी करण्यासाठी एक रसायन तज्ञ तेथे पाठविण्यात आला होता .त्याचप्रमाणे शाहू महाराजांनी पुण्याच्या स्वदेशी कागद गिरणीला आसरा दिला होता. ते स्वतः स्वदेशी कागदाचा वापर करीत असत. शाहू महाराजांना उद्योगाची विकेंद्रीत नियोजन अपेक्षित होते. खेड्यातून शहराकडे लोकांचा मोठा लोंढा येतो. यामुळे शहरी क्षेत्रातील गर्दी वाढते येथे अनेक सामाजिक व आर्थिक समस्या निर्माण होतात. अर्थात ही टाळण्यासाठी उद्योगाचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे असे शाहू महाराजांचे मत होते. औद्योगिक विकेंद्रीकरण झाल्यास लोकांना ग्रामीण भागातच रोजगार प्राप्त होईल शहरी भागाकडे त्यांचे होणारे स्थलांतर थांबेल तसेच शहरीकरणाचे दुष्परिणामालाही सामोरे जावे लागणार नाही, असा त्यांचा विश्वास होता. औद्योगिक विकेंद्रीकरण साधण्यासाठी लघु व कुटीर उद्योग ग्रामउद्योग हस्त-उद्योग सुरू करणे व वाढविणे. या प्रक्रियेला त्यांनी महत्त्व दिले. महाराजांच्या विकेंद्रीत औद्योगिक धोरणानुसार राधानगरी, शाहूपुरी, जयसिंगपूर, गडहिंग्लज या नव्या बाजारपेठा निर्माण करण्यात आल्या, याद्वारे सर्व भागात संतुलित विकास साधण्यावर त्यांनी भर दिला.

व्यापार विषयक धोरण

शाहू महाराजांनी 1894 मध्ये गादीवर बसल्यानंतर संस्थानाचा व्यापार वाढवा व शेतक़ऱ्याचे कल्याण व्हावी या दृष्टीने प्रयत्न सुरू केले.1895 मध्ये त्यांनी रेल्वे स्टेशन जवळ शहापुरी बाजारपेठेचे स्थापना केली. या व्यापार पेठेतील व्यवहार वाढविण्यासाठी त्यांनी मुंबई पुण्याकडील व्यापारांची मने वळवली. त्यासाठी त्यांनी सवलती दिल्या. 1899 मध्ये कागदामध्ये निर्वाणीच्या व्यापाऱ्यांच्या सभा घेऊन कोल्हापूर ही व्यापारी केंद्र बनविण्याचा मनोदय जाहीर केला. शहापुरी व्यापार पेठेची सुरुवात पाच ते सात दुकानांनी झाली. आज या व्यापारपेठेचे रूपांतर मार्केट यार्डत झाले आहे. यावरून दृष्ट्या शाहू महाराजांच्या व्यापारी दृष्टिकोनाची कल्पना येते. सण 1897 मधील खामगाव येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अधिवेशनात अध्यक्षीय भाषणात बोलताना जनतेने व्यापार धंदे व उच्च प्राप्तीच्या व्यवसायात शिरण्याची आवश्यकता असल्याची प्रतिपादन महाराजांनी केले .आपण केवळ शेतकरी अथवा सैनिक म्हणून न राहता व्यापार व्यवसायात प्रवेश करण्याचे धाडस केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. शेती व उद्योगधंद्याच्या विकासाबरोबरच व्यापारारातही वाढ होणे आवश्यक आहे. तरच संतुलित विकास आपल्याला साधता येईल, त्याचप्रमाणे व्यापार हा स्वकिय यांच्या हाती असणे योग्य ठरेल असे त्यांचे स्पष्ट मत होते. व्यापार व उद्योगधंद्याचा विकास झाल्यास समाजाचा विकास होईल अशी त्यांची धारणा होती. नव्या व्यवस्थेत व्यापार व इतर संबंधित चळवळीवरच राष्ट्राचा विकास अवलंबून असल्याचे मत त्यांनी मांडले होते. आर्थिक दृष्ट्या संपन्न होण्यासाठी व्यापार वाढला पाहिजे यासाठी उत्पादकांना त्यांच्या वस्तूंना योग्य भाव मिळाला पाहिजे त्यांना हक्काची व जवळची बाजारपेठ उपलब्ध झाली पाहिजे. स्थानिक व्यापाऱ्यांनी व्यापारातील आपला सहभाग वाढविला पाहिजे असे त्यांना वाटत होते. याशिवाय महाराजांना व्यापारातील गैरप्रकार पसंत नव्हता,शेतकरी जेव्हा शेतमालाची विक्री करतो तेव्हा त्याची अडवणूक होता कामा नये असे त्यांचे मत होते तसेच संस्थानात तयार होणाऱ्या वस्तू स्थानिक व राष्ट्रीय बाजारपेठेबरोबरच जागतिक बाजारपेठेतही पोहोचल्या पाहिजे असे त्यांना वाटत होते ग्राहकांना वस्तूचा पुरवठा करण्याबरोबरच विदेशी चलन प्राप्ती होईल, असा व्यापक दृष्टिकोन महाराजांनी मांडला होता.

छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात केलेली कार्य:

छत्रपती शाहू महाराजांनी शैक्षणिक सुधारणांना विशेष महत्त्व दिली. कारण जनतेच्या सर्वांगीण प्रगतीचा शिक्षण हा पाया आहे. हे त्यांनी जाणले होते सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण हे एक प्रभावी माध्यम आहे. यावर त्यांचा विश्वास होता म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रात मुलाग्रह सुधारणा घडवण्याचा अग्रक्रम दिला व त्यांची अंमलबजावणी केली त्यांचा शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये विविध शिक्षण संस्था व नवनवीन अभ्यासक्रमाची सुरुवात व विद्यार्थ्यांना मुबलक प्रमाणात सवलती देऊन शिक्षण प्रसारला चालना दिली. विविध जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना राहण्याची जेवणाची पर्याप्तव्यवस्था करण्यासाठी वस्तीग्रह सुरू केली. विविध प्रकारच्या शिक्षण संस्थांना आर्थिक व इतर साहित्य देऊन त्यांना कार्यरत करून सदैव मदत केली या तीन गोष्टीवर त्यांनी भर दिल्याची दिसून येते.

1) शिक्षण सुधारणा समितीची स्थापना केली
2) 1913 ला प्राथमिक व माध्यमिक शाळांची संख्या वाढविण्याच्या आदेश काढला.
3) राजाराम कॉलेजचे महत्व व प्रतिष्ठा वाढेल असे प्रयत्न केले.
4) बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पारितोषिके नादारया या इत्यादी स्वरूपात शैक्षणिक सवती उपलब्ध करून दिल्या.
5) शाळेतील अभ्यासक्रमाची जाणीवपूर्वक पुनर्रचना केली.
6) शाळांची निर्मिती इमारत दुरुस्ती देखभाल उत्पन्न खर्च इत्यादी व्यवस्थेबाबत स्पष्ट नियम घालून दिले.
7) देवस्थानांनी शिक्षण कार्याला सर्वतोपरी सहाय्य करावे त्यासाठी जाहीरनामा काढण्यात आला.
8) शिक्षणावर होणाऱ्या वाढत्या खर्चाची तरतूद करण्यासाठी सन 1918 मध्ये शिक्षण कर बसविण्यात आला.

9) सन 1919 ला अस्पृश्यांना मुलांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळा बंद करण्यात आल्या.

10)गरीब विद्यार्थ्यांना ग्रंथ पुरविण्यासाठी पुस्तक पिढी योजना सुरू केली.

11)मुलांना तांत्रिक शिक्षण देण्यासाठी टेक्निकल इन्स्टिट्यूट टी ची स्थापना व वाढ करण्यात आली.

12)मुलांना लष्करी शिक्षण देण्याच्या हेतूने एक इन्फे ट्री स्कूल सुरू केली.

13)मुलींच्या शिक्षणाची वाढ करण्यासाठी त्यांच्या राहण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था दरबारातर्फे 1919 सालापासून सुरू करण्यात आली.

14)शिक्षकांना खास शिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन स्वतंत्र शिक्षक प्रशिक्षण केंद्र 1912 साली सुरू केली.

15)गाव कामगार पोलीस पाटील अधिकाऱ्यांना व त्यांच्या कार्यासंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी 1912 ला पाटील स्कूल ऊघडण्यात आलेनिवडण्यात आले.

16)हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवण्यात आले.

17)राजाराम कॉलेजमध्ये मुलींना शिक्षण फी माफ करण्यात आली.

18)शाळेच्या व्यवस्थापनासाठी समितीची नियुक्ती करण्यात आली.

19)प्रत्येक गावात शाळा काढून वेतनदार शिक्षक योजना 1912 साली सुरू केली व 1917 साली त्याऐवजी पगारी शिक्षक योजना अमलात आणली.

20)कोल्हापूरला मॅट्रिकच्या परीक्षा सेंटर 1919 20 ला दरबाराच्या प्रयत्नाने असो खर्चाने सुरू केली.

21)सर्वात महत्त्वाची व मुलगा आणि शिक्षण सुधारणा म्हणजे 1912 साली त्यांनी आपल्या संस्थांमध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

22)विविध जातीतील विद्यार्थ्यांसाठी एकूण वीस वसतिगृहाची स्थापना केली यावरून छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक कार्याची ओळख होते.

महाराष्ट्रात सद्यस्थितीमध्ये शाहू महाराजांच्या नावे खालील शिष्यवृत्ती चालू आहेत :

1. छत्रपती शाहू महाराज स्कॉलरशिप ई.बी.सी
2. छत्रपती शाहू महाराज मानधन योजना.
3. छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
4. छत्रपती शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना या योजनेअंतर्गत दरमहा पाच हजार रुपये लाभार्थ्यांना दिली जातात.
5. छत्रपती शाहू महाराज मेरीट छात्र वृत्तीत योजना.
6. छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना या योजनेमध्ये दहावीला 75 टक्के पेक्षा जास्त मार्क पडलेल्या सर्व विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी ही योजना कार्यान्वित केली आहे
7. सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू आहे
8. छत्रपती शाहू महाराज व पंजाबराव देशमुख शिष्यवृत्ती योजना वस्तीगृह भत्ता यासंबंधीचा जीआर 4 जुलै 2025 रोजी करण्यात आला यासाठी 15 कोटी रुपये अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.
9. छत्रपती राजश्री शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना.

वरील सर्व प्रकारच्या योजना महाराष्ट्र मध्ये आज सर्व जाती-धर्मांच्या मुलांसाठी व मुलींसाठी उपलब्ध आहेत.

छत्रपती शाहू महाराजांचे आरक्षण विषयक धोरण:

आरक्षण ही समाज परिवर्तनाचे एक प्रारूप आहे समाजातील सत्ता संपत्ती ज्ञानापासून वंचित असलेल्या समुदायाला उन्नत करण्याचा तो एक समक्ष मार्ग आहे. तसेच आरक्षण ही भारतीय समाजाचे एक महत्त्वाचे अंग आहे. त्यामुळेच आरक्षण हा आपल्या देशामध्ये सतत चर्चेचा विषय बनला आहे. आरक्षण हे अनुसूचित जाती अनुसूचित जमातीनंतर भटके विमुक्त व त्यानंतर इतर मागासवर्गीय पर्यंत ही तत्व लागू करण्यात आले. राजे छत्रपती राजश्री शाहू महाराजांनी या समाजाला आत्म सन्मानाने जगता यावे यासाठी 1902 रोजी आरक्षण लागू केली आहे. परंतु हे आरक्षण आतापर्यंत तळागाळातील मागासवर्गीय पर्यंत पोहोचलेली नाही. राजश्री शाहू महाराजांची आरक्षण विषयक विचार व धोरण सविस्तरपणे मांडण्यात येईल.

1. भटक्या जाती विषयीचे आरक्षण:

राजश्री शाहू महाराजांची आरक्षणाचे धोरण हे महार, माग, ढोर, चांभार, यासाठी तर होतेच पण जो समाज शतकांशतके गाव कुसाच्या बाहेरच नाही तर गाव नावाचा प्रकार ज्याला माहीत नव्हता, जो पिढी आणि पिढी आपल्या आयुष्य जे मिळाले ते खाऊन जंगलात राहून दिवस काढत होता, अशा भटक्या जातीसाठी ही शाहू महाराजांनी आपली आरक्षणाचे धोरण राबवले आहे भटक्या जातीमध्ये बंजारा, छप्परबंद, कैकाडी, टक्कारी, रजपूत भामठा, कंजारभाट, रामोशी, गारुडे, माकडवाले, फासेपारधी, कटबू, वडर, डोंबारी, कुंची, कोरवी या प्रमुख जाती होत्या.

(२ स्त्रियांसाठीची आरक्षण :

भारतामधील समाज व्यवस्थेने स्त्रियांना अतिशय हिन दर्जाची वाणू दिली. स्त्री म्हणजे केवळ उपभोग्य वस्तू आहे. असा स्त्रियाकडे बघण्याचा दृष्टिकोन होता. छत्रपती शाहू महाराजांच्या काळापर्यंत स्त्रियांची अतिशय वाईट स्थिती होती. स्त्रियांना कोणतेही अधिकार व हक्क नव्हते. त्यांना कोणत्याही सार्वजनिक समारंभात भाग घेता येत नसेल स्त्रियांवर अनेक बंधने होती. बालविवाह, शिक्षण बंदी, हुंडाबळी, सतीची पद्धत, बालिका बळी, पडदा पद्धती, तसेच त्यांच्यावर होणारी अत्याचार यामुळे स्त्रियांचे जीवनही पूर्णपणे अंधकारमय बनले आहे. छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांच्या संरक्षणासाठी आपल्या काळात अनेक कायदे केली. संस्थानातील हुशार मुलींना शिक्षणात प्रोत्साहन मिळावी यासाठी राजकन्या राधाबाई उर्फ आकासाहेब व भावनगरच्या महाराणी यांच्या नावाने शिष्यवृत्ती जाहीर केल्या. शिष्यवृत्तीसाठी शाळा खाते आणि काही नियम बनवले त्यानुसार प्रत्येक शिष्यवृत्ती ही दरवर्षी 40 रुपयाची राहील यासाठी मुलींची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येईल, असे पाच एप्रिल 1913 च्या आदेशानुसार जाहीर केले. महाराणी लक्ष्मीबाई यांनी मागासलेल्या जातीच्या स्त्रियांच्या शिक्षणाची कोल्हापूर सोय करणारा हुकूम 8 ऑक्टोबर 1919 रोजी काढला. उपमानुसार मागासलेल्या लोकांना पडदा नाही किंवा मागासले जातील बायका यांना विद्या शिकण्याची इच्छा असेल त्यांनी आप्पासाहेब मामासाहेब सुर्वे यांच्याकडे अर्ज करावेत म्हणजे त्यांची बोर्डिंगची व लॉजिंग ची सर्व व्यवस्था करतील.

(3) उच्च वर्णीयासाठी आरक्षण : अर्ध्या उच्चवर्णीय लोकांना आरक्षण दिले जावे असे बोलले जात आहे. पण ही आरक्षण उच्च वर्ण यांना कसे देणार त्यांचे आर्थिक परिस्थिती बघून आरक्षण येणार, ही सामाजिक परिस्थिती बघून आरक्षण देणार उच्चवर्णी यामध्ये सुद्धा सर्वच लोक श्रीमंत आहेत, अशातला भाग नाही उच्चवर्णीय असूनही घरची परिस्थिती ही खालावली असल्यामुळे त्यांना मजुरी करावीच लागते, तसेच ईबीसीची सवलत होती माणसे आर्थिक दृष्ट्या मागासलेली आहे त्यांच्या मुलांना शिक्षण मिळत नाही. त्यांच्याकडे मळयाची शेती आहे तेही मुले एबीसी ची सवलत घेत. असल्याची दिसून येते व ज्यांना अत्यंत गरज आहे .अशा मुलांना प्रमाणपत्र काढण्यासाठी देखील पैसा नसतो. परिणामी ते सवलती पासून वंचित राहतात अशी परिस्थिती उच्च वर्णीय आरक्षणाविषयी होऊ नये, आरक्षण देत असताना समाजातील जो अति विविध वर्ग होता त्याला वर आणणे हाच मुख्य उद्देश होता. अशा पिढीत लोकांना

राजकीय मदतीची सुद्धा गरज होती. अनुसूचित जातीतील हा शब्द पहिल्यांदा इसवी सन 1935 च्या कायद्यात वापरला आहे.

थोडक्यात आरक्षणही मुळात मागासलेल्या लोकांच्या उन्नतीसाठी करण्यात आली आहे आरक्षणामुळे ज्या माणसाच्या समस्या सुटल्या आहेत त्या लोकांचे आरक्षण बंद करण्यात यावी आरक्षणाचे वेळोवेळी मूल्यमापन झाली पाहिजे व आरक्षणामुळे मोठी झाली मानसी आपल्याच लोकांवर अन्याय करणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे तसेच शाहू महाराजांनी आपल्या काळात स्त्रियांना संरक्षण व हक्क देण्याचा प्रयत्न केला व आपली राज्य ही लोकांच्या करण्यासाठी आहे हे आपल्या कृतीतून दाखवून दिली आहे आज भारताला स्वातंत्र्य मिळून 75 76 वर्षे झाली तरी सुद्धा एक विषय शतकाकडे जात असतानाही सगळीकडेच प्रचंड जागृती निर्माण झाली असतानाही स्त्रियावर अत्याचार केला जातात आजही सुशिक्षित समाज हा स्त्रियांना समान हक्क देण्यास तयार नाही शाहू महाराजांनी भटक्या जाती विषयी आरक्षण स्त्री आरक्षण उच्चवर्ण यांचे आरक्षण इत्यादीवर आरक्षण विषयक धोरणाची अंमलबजावणी केलेली आहे.

निष्कर्ष व शिफारशी:

1. आज भारतामध्ये व महाराष्ट्र मध्ये छत्रपती शाहू महाराजांची विचारांची गरज आहे ती सिद्ध झाले आहे.
2. छत्रपती शाहू महाराजांची आर्थिक सामाजिक शैक्षणिक व आरक्षण विषयक विचार या विचारांची खरोखरच महाराष्ट्राला भारताला आजही फायदा होतो परंतु शासनाने त्याची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे.
3. छत्रपती शाहू महाराजांची आर्थिक विचार आज महाराष्ट्रामध्ये व भारतामध्ये प्रत्यक्षात उतरले आहेत कारण आजची जी आर्थिक परिस्थिती सुधारणा झालेली आहे ती महाराजांच्या विचारांशी सुसंगत आहे. असे आपणास म्हणता येईल असे सिद्ध झाले आहे.
4. शैक्षणिक क्षेत्रामध्ये ज्या विविध वस्तीग्रहाच्या योजना तसेच विविध शिष्यवृत्तीच्या योजना आहेत त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने भारत सरकारने देखील आज त्या योजना संपूर्ण देशभर लागू केले आहेत त्याची प्रत्यक्ष खरोखरच लाभार्थ्यापर्यंत अंमलबजावणी होत आहे परंतु काही अंशी मागासलेला वर्ग आजही या सेवा आणि सुविधा पासून वंचित आहे तेव्हा त्यांना सुद्धा फायदा झाला पाहिजे अशी व्यवस्था भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाने करावी.

संदर्भ ग्रंथ सूची:

1. डॉ. जयसिंगराव पवार -राजश्री शाहू स्मारक ग्रंथ-विद्या प्रकाशन नागपूर पेज नंबर 592
2. कीता- पेज नंबर 599 ते 594
3. डॉक्टर आर ओहोळ-आधुनिक भारतातील स्वातंत्र्याची दोन आंदोलने पेज नंबर 39 ते 44
4. प्रा. बीडी इंगळे-आर्थिक विचारांचा इतिहास -अरुणा प्रकाशन लातूर पेज क्रमांक 76 ते 83.
5. प्रा रायखेलकर ए .आर. आणि डॉ. दामाजी बी. एन.-आर्थिक विचारांचा इतिहास-उद्या प्रकाशन औरंगाबाद तेच क्रमांक 343 ते 350.
6. प्रा. प्रदीप आगलावे -सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र -साईनाथ प्रकाशन नागपूर हीच क्रमांक 310 ते 315.
7. डॉ. वा. भा. पाटील -संशोधन पद्धती प्रशांत पब्लिकेशन जळगाव -पेज क्रमांक 97 ते 99.
8. डॉ.जाधव रमेश -लोकराजा शाहू छत्रपती - किता-पे. न.212.
9. पवार वसुधा जयसिंगराव -राजश्री शाहू छत्रपती एक अभ्यास -सोमेरू प्रकाशन डोंबिवली -नोव्हेंबर 2004 पे.क. 49
10. सुरवाडी दिलीप- राजश्री शाहू महाराज -लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद ,(2010),पेज क्रमांक 107.
11. डॉ. जयसिंगराव पवार -राजश्री शाहू छत्रपती जीवन व कार्य ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर प्रथम आवर्ती एक जानेवारी 2012- प्रकाशन महाराष्ट्र इतिहास व प्रबोधिनी कोल्हापूर पेज क्रमांक 110 ते 120.

निवडणूक सुधारणांची गरज : एक अभ्यास

डॉ. डी. एस. पटवारी

(राज्यशास्त्र विभागप्रमुख)

श्री. कुमारस्वामी महाविद्यालय, औसा जि. लातूर

सारांश (Abstract)

लोकशाही व्यवस्थेचा कणा म्हणजे निवडणूक प्रक्रिया. भारतासारख्या विशाल आणि विविधतेने भरलेल्या देशात निवडणुका पारदर्शक, निष्पक्ष आणि लोकाभिमुख असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, वाढता निवडणूक खर्च, गुन्हेगारीकरण, जात–धर्म आधारित राजकारण, पैशाचा गैरवापर, माध्यमांचा प्रभाव आणि मतदार उदासीनता यांसारख्या समस्यांमुळे निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संशोधन लेखात भारतातील विद्यमान निवडणूक व्यवस्थेचा अभ्यास करून निवडणूक सुधारणांची गरज, स्वरूप आणि संभाव्य उपाययोजना यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

१. प्रस्तावना (Introduction)

लोकशाही शासनव्यवस्थेत जनतेला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असतो. हा अधिकार प्रभावीपणे वापरता यावा यासाठी निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह असणे गरजेचे आहे. भारतात 1951-52 पासून सार्वत्रिक निवडणुका घेतल्या जात आहेत. कालांतराने निवडणूक प्रणालीत अनेक सकारात्मक बदल झाले असले तरी सध्याच्या काळात अनेक गंभीर समस्या उद्भवत आहेत. त्यामुळे निवडणूक सुधारणांची आवश्यकता प्रकर्षाने जाणवते.

२. संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study)

1) भारतातील विद्यमान निवडणूक प्रक्रियेचा अभ्यास करणे

2) निवडणूक व्यवस्थेतील प्रमुख समस्या ओळखणे

3) निवडणूक सुधारणांची गरज स्पष्ट करणे

4) प्रभावी निवडणूक सुधारणांसाठी उपाय सुचवणे

३. संशोधन पद्धती (Research Methodology)

सदर संशोधन लेख वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने तयार करण्यात आला आहे. यासाठी संविधानिक तरतुदी, निवडणूक आयोगाचे अहवाल, पुस्तके, संशोधन लेख, वर्तमानपत्रे व दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

४. भारतीय निवडणूक प्रणाली : एक आढावा

भारतामध्ये निवडणुका सार्वत्रिक, गुप्त आणि प्रौढ मतदानाच्या तत्त्वावर आधारित आहेत. भारतीय निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र घटनात्मक संस्था असून ती निवडणुका पार पाडते. लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुका या प्रक्रियेअंतर्गत घेतल्या जातात.

५. निवडणूक व्यवस्थेतील प्रमुख समस्या

५.१ राजकारणाचे गुन्हेगारीकरण

गंभीर गुन्हे दाखल असलेले उमेदवार निवडणूक लढवतात व निवडून येतात, हे लोकशाहीसाठी धोकादायक आहे.

५.२ पैशाचा प्रचंड वापर

निवडणूक खर्च मर्यादेपेक्षा कितीतरी पटीने जास्त केला जातो. त्यामुळे श्रीमंत उमेदवारांना प्राधान्य मिळते.

५.३ जात व धर्म आधारित राजकारण

मतदारांचे ध्रुवीकरण करून निवडणूक जिंकण्याचे प्रयत्न लोकशाही मूल्यांना बाधा आणतात.

५.४ माध्यमांचा आणि सोशल मीडियाचा गैरवापर

खोटी माहिती, अफवा आणि प्रचारामुळे मतदार दिशाभूल होतात.

५.५ मतदारांची उदासीनता

विशेषतः शहरी भागात कमी मतदानाची समस्या आढळते.

६. निवडणूक सुधारणांची गरज

1) लोकशाहीवरील जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी

2) स्वच्छ व पारदर्शक राजकारणासाठी

3) सक्षम आणि जबाबदार नेतृत्व निर्माण करण्यासाठी

4) पैशाचे व गुन्हेगारीचे वर्चस्व कमी करण्यासाठी

5) मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी

७. निवडणूक सुधारणांसाठी उपाययोजना

निवडणूक सुधारणा (Election Reforms) लोकशाही अधिक पारदर्शक, स्वच्छ आणि उत्तरदायी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारतात भारतीय निवडणूक आयोग (Election Commission of India) निवडणुका पार पाडतो, पण सुधारणा करण्यासाठी पुढील उपाययोजना करता येऊ शकतात:

1) राजकीय निधी व्यवस्थेतील पारदर्शकता

पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांचे संपूर्ण विवरण सार्वजनिक करणे.

निवडणूक खर्चावर कडक मर्यादा आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी.

अनामिक देणग्या बंद करणे किंवा मर्यादित करणे.

2) गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांवर निर्बंध

गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोपपत्र दाखल झालेल्या उमेदवारांना निवडणूक लढवण्यास तात्पुरती बंदी.उमेदवारांची शैक्षणिक, आर्थिक आणि गुन्हेगारी माहिती मतदारांना स्पष्टपणे उपलब्ध करून देणे.

3) मतदार यादी व मतदान प्रक्रिया सुधारणा

मतदार यादी नियमित अद्ययावत करणे.

स्थलांतरित व कामगार मतदारांसाठी सोयीस्कर मतदान सुविधा (उदा. दूरस्थ मतदान).

भारतीय निवडणूक आयोग द्वारे तंत्रज्ञानाचा अधिक वापर (VVPAT, डिजिटल देखरेख).

4) आचारसंहितेची कडक अंमलबजावणी

निवडणूक आचारसंहिता भंग केल्यास त्वरित आणि कठोर कारवाई.

द्वेषपूर्ण भाषण, खोटी माहिती यावर नियंत्रण.

5) अंतर्गत पक्षलोकशाही

राजकीय पक्षांतर्गत नियमित निवडणुका अनिवार्य करणे.

पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता वाढवणे.

6) मतदार शिक्षण व जनजागृती

युवक व नवमतदारांसाठी विशेष अभियान.

मतदारांमध्ये पैशाच्या व जातीय/धार्मिक प्रभावाच्या विरोधात जागरूकता.

7) निवडणूक प्रणालीतील सुधारणा

प्रमाण प्रतिनिधित्व (Proportional Representation) पद्धतीचा विचार.

एकाच वेळी लोकसभा-विधानसभा निवडणुका (One Nation, One Election) यावर व्यापक चर्चा.

निवडणूक सुधारणा म्हणजे केवळ कायद्यात बदल नव्हे, तर राजकीय इच्छाशक्ती, प्रशासनिक पारदर्शकता आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग यांचा समन्वय आहे. योग्य सुधारणा केल्यास भारताची लोकशाही अधिक बळकट आणि विश्वासार्ह बनेल.

८. निष्कर्ष (Conclusion)

निवडणूक सुधारणा ही काळाची गरज आहे. मजबूत लोकशाहीसाठी स्वच्छ, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया आवश्यक आहे. केवळ कायदे करून चालणार नाहीत, तर राजकीय इच्छाशक्ती, प्रशासनाची प्रामाणिकता आणि मतदारांची जागरूकता या तिन्ही घटकांचा समन्वय आवश्यक आहे. प्रभावी निवडणूक सुधारणांमुळेच भारतीय लोकशाही अधिक सशक्त होऊ शकते.

९. संदर्भसूची (References)

1) भारतीय संविधान

2) निवडणूक आयोगाचे अहवाल

3) फडके, य. द. भारतीय शासनव्यवस्था

4) वर्तमानपत्रे व संशोधन नियतकालिके

महात्मा फुले यांचे सामाजिक न्याय चळवळीतील योगदान

डॉ. डी. एन. रिठे

इतिहास विभाग

र .भ,अट्टल महाविद्यालय गेवराई जि .बीड

प्रस्तावना

19 व्या शतकातील भारतीय समाज हा सामाजिक विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा आणि जातीय भेदभावाने ग्रस्त होता. या पार्श्वभूमीवर महात्मा फुले यांनी अज्ञानाच्या अंधारात भारतीय समाजात प्रबोधनाची ज्योत पेटवली. त्यांचे कार्य केवळ सुधारणा नव्हे, तर एक व्यापक सामाजिक क्रांती म्हणून ओळखले जाते. त्यांनी समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला, शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची व्यापक चळवळ उभी केली.

संशोधनाची उद्दिष्टे

- महात्मा फुले यांच्या न्याय विषयक विचारांचा अभ्यास करणे
- महात्मा फुले यांच्या सामाजिक न्याय चळवळीतील योगदानाचे विश्लेषण करणे

संशोधन पद्धती

सदरील संशोधन पेपरसाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून त्यासाठी दुय्यम साधनाचा आधार घेण्यात आला आहे. 19 व्या शतकात भारतीय समाजात जातिव्यवस्था अत्यंत कठोर होती. उच्चवर्णीय लोकांनी शिक्षण, धर्म आणि सामाजिक सत्तेवर वर्चस्व मिळवले होते, तर शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रिया यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते. स्त्रियांना घराबाहेर पडण्याचीही मुभा नव्हती. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांनी समाजातील या अन्यायकारक रचनेला आव्हान दिले आणि समानतेचा विचार मांडला.

महात्मा फुले यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. १८४८ मध्ये त्यांनी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या काळात मुलींना शिक्षण देणे पाप मानले जात होते. त्यांच्या या कार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी मोठा वाटा उचलला. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. त्यांनी मुलींना शिक्षण देताना समाजाचा तीव्र विरोध सहन केला, तरीही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. महात्मा फुले यांनी शूद्र आणि अतिशूद्र मुलांसाठीही शाळा सुरू करून शिक्षण सर्वांसाठी खुले केले.

स्त्रियांच्या मुक्तीसाठी महात्मा फुले यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी बालविवाह, सतीप्रथा आणि स्त्रियांच्या शोषणाला विरोध केला. विधवा पुनर्विवाहाला त्यांनी समर्थन दिले. समाजातून बहिष्कृत झालेल्या गर्भवती विधवांसाठी त्यांनी आश्रयगृह स्थापन केले. त्यांच्या या कार्यामुळे स्त्रियांच्या जीवनात नवे परिवर्तन घडून आले.

१८७३ मध्ये महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाज ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांचा विरोध केला. सत्यशोधक समाजाने साध्या पद्धतीने विवाह आणि इतर धार्मिक विधी पार पाडले, ज्यामुळे ब्राह्मण पुरोहितांच्या वर्चस्वाला आव्हान मिळाले. या संस्थेने समाजात समतेची भावना निर्माण करण्याचे कार्य केले.

महात्मा फुले यांनी जातिव्यवस्थेविरुद्ध कठोर संघर्ष केला. त्यांनी ब्राह्मणवादी व्यवस्थेवर टीका केली आणि सर्व मानव समान आहेत हा विचार मांडला. त्यांनी दलित आणि वंचित घटकांना स्वाभिमान आणि हक्कांची जाणीव करून दिली. त्यांच्या या विचारांमुळे समाजात बंधुता आणि समानतेची भावना वाढीस लागली.

साहित्याच्या माध्यमातूनही त्यांनी आपल्या विचारांचा प्रसार केला. गुलामगिरी या ग्रंथात त्यांनी जातिव्यवस्थेवर कठोर टीका केली, तर शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणावर प्रकाश टाकला. त्यांच्या लेखनामुळे समाजातील अन्याय उघडकीस आला आणि लोकांमध्ये जागृती निर्माण झाली.

महात्मा फुले यांनी शेतकरी आणि कामगारांच्या समस्यांकडेही लक्ष दिले. त्यांनी शेतकऱ्यांवरील अन्यायकारक करप्रणालीचा विरोध केला आणि त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. त्यांनी शेतकऱ्यांना स्वाभिमानाने जगण्याचा संदेश दिला. महात्मा फुले यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात मोठे परिवर्तन घडून आले. शिक्षणाचा प्रसार झाला, स्त्री आणि दलितांना हक्क मिळण्यास सुरुवात झाली आणि समानतेचा विचार समाजात रुजला. त्यांच्या कार्याने पुढील समाजसुधारकांना प्रेरणा मिळाली.

निष्कर्ष

महात्मा ज्योतिराव फुले यांचे क्रांतिकारी कार्य भारतीय समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. त्यांनी समाजातील अन्यायकारक परंपरांना आव्हान देऊन समानता, शिक्षण आणि मानवतेवर आधारित समाजाची संकल्पना मांडली. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजात मोठे परिवर्तन घडून आले. आजही त्यांच्या शिक्षण तत्त्वज्ञानाची आवश्यकता तितकीच आहे. आधुनिक भारताच्या विकासासाठी ते अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शक आहेत.

संदर्भसूची

1. कीर धनंजय, महात्मा फुले चरित्र, प्रकाशक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,1969
2. सरदेसाई, बी. एन., महात्मा ज्योतिबा फुले, प्रकाशक, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,1984
3. साळुंखे, ए. एच., महात्मा फुले: व्यक्तिमत्त्व आणि विचार, प्रकाशक, लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2005

मराठी संगीत रंगभूमीचा चिकित्सक अभ्यास

डॉ. माधव बसवंते
प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड जिल्हा नांदेड

सारांश

संगीत नाटक हा आधुनिक मराठी रंगभूमीवरील आद्य नाट्यप्रकार आहे. संगीत आणि नाट्य या दोन अंगाच्या संगमातून संगीत नाटकाने जन्म घेतलेला आहे. नाटक, संगीत, अभिनय नृत्य आणि साहित्य यांचा सुरेख संगम म्हणजे संगीत रंगभूममी होय. संगीत रंगभूमी ही कला केवळ मनोरंजनापूरती मर्यादित नसून ती सामाजिक, सांस्कृतिक आणि कलात्मक अभिव्यक्तीचे सक्षम माध्यम आहे. ही रंगभूमी मराठी नाट्य परंपरेतील एक समृद्ध प्रकार असून ज्यात नाट्य आणि संगीताचा सुंदर संगम झाला आहे. संगीत रंगभूमी ही केवळ मनोरंजनाचे प्रभावी साधन नसून या रंगभूमीमध्ये संगीताच्या माध्यमातून भावना अधिक प्रभावीपणे व्यक्त केल्या जातात. आनंद, दुःख प्रेम ,विरोध व क्रोध याचबरोबर रूढी परंपरा, अंधश्रद्धा, जातीभेद व स्त्रीदास्य या समस्यावर प्रकाश टाकून समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. संगीत रंगभूमी ही आपल्या सामाजिक व सांस्कृतिक वारसा व परंपरेचे जतन करणारे सक्षम व्यासपीठ आहे. संगीत रंगभूमी ही केवळ डोळयांचे आणि कानांचे समाधान करणारी कला नाही, तर ती माणसांचे मन, बुद्धी आणि आत्म्याला समृद्ध करणारी अद्वितीय अनुभूती आहे. इस १८४३ मध्ये विष्णुदास भावे यांनी सादर केलेले 'संगीत सीतास्वयंवर' हे मराठीतील पहिले संगीत नाटक मानले जाते. पुढे अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या 'सं. शाकुंतल' या नाटकानंतर मराठी संगीत नाट्याची मुहूर्तमेढ रोवल्या गेली. दशावरी खेळ, यक्षगान, कीर्तन, भारुड व तमाशा यासारख्या अनेक कलांच्या आविष्कारातून मराठी संगीत नाटकाचा जन्म झाल्याचे दिसून येते. संवाद व संगीत यांच्या मिश्रणातून संगीत नाटक प्रवास करीत असते. नाटकाची संहिता व प्रत्यक्ष सादरीकरण या दोन्हींच्या संयोगातून नाटकाला अंतिम पूर्णत्व प्राप्त होत असते.

बीज शब्द :

संगीत नाटक म्हणजे काय?, संगीत रंगभूमीची पार्श्वभूमी, पदरचना व संगीतप्रधानता, संगीत नाटकाची गुणवैशिष्ट्ये, नाटकाची संहिता, संगीत व भाषा.

प्रस्तावना

आधुनिक मराठी रंगभूमीच्या प्रारंभीच्या टप्प्यात जन्माला आलेला नाट्यप्रकार म्हणजे संगीत नाटक हा होय. संगीत नाटकात संगीत हा प्रमुख घटक असतो. संगीत नाटकात काम करणाऱ्या विविध कलावंतांना संगीत व अभिनय या दोन्ही अभिजात कलांचे ज्ञान असणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशा पारंपरिक संगीत नाटकाचा प्रारंभ हा 'नांदी' या गायनाने होत असतो. 'नांदी' म्हणजे ईश्वरांचे स्मरण. नाटकाच्या प्रारंभीच नाटकातील सर्व पात्रेही पडदा उघडून रंगमंचावर येऊन 'नांदी' म्हणतात. अनेकदा नाटकाच्या प्रारंभी शंकरस्तुती वा श्री गणेश स्तवन करताना दिसून येते. नांदीला लागूनच सूचकपद गायले जाते. सूचकपदानंतर रंगमंचावर सूत्रधार व नटी यांच्या संवादातून नाटकाचा आशय व विषय प्रेक्षकांसमोर येत असतो. नटी सूत्रधारांच्या संवादानंतर प्रत्यक्ष नाटकाला प्रारंभ होतो. पारंपरिक संगीत नाटके ही अनेक अंकी असतात. प्रत्येक अंकानंतर पडदा पाडून मध्यांतर केले जाते. अनेक वेळा काही नाटकांमध्ये दोन अंकाच्या प्रवेशांमध्ये काही सेकंदासाठी रंगमंचावर प्रकाश खंडित केला जातो. संगीत नाटकाचा शेवट हा भरत वाक्याने होतो. भरतवाक्य हे नांदीप्रमाणे सांगीतिक असते. सर्वांना सुख शांती लाभो, सर्वांचे कल्याण व मंगल होवो अशी भरतवाक्याची शब्दरचना असते. नांदीप्रमाणेच नाटकातील सर्वच पात्रे ही भरतवाक्य गाण्यासाठी एकत्रित रंगमंचावर येत असतात. एकंदरीत संगीत नाटकाचा क्रम हा नांदी, सूचकपद, नटी सूत्रधार संवाद, प्रवेश आणि भरतवाक्य अशा स्वरूपाचा असतो. संगीत रंगभूमीवर काम करणाऱ्या सर्व कलाकारांना संवाद आणि पद्यांचे स्पष्ट पाठांतर असावे लागते, अन्यथा प्रेक्षकांचा रसभंग होत असतो. संगीत नाटकात प्रत्यक्ष गायण्याचे सादरीकरण केले जाते, म्हणूनच संगीत नाटकात पद्यांचा अंतर्भाव असल्यामुळे या संगीत नाटकाचची भाषा ही संगीतानुकूल असावी लागते. संगीत नाटक ही बहुआयामी व प्रभावी कला असून संगीतप्रधानता, भावनांची प्रभावी अभिव्यक्ती, अभिनय आणि गायन यांचा समन्वय, पद्यरचना आणि साहित्यिकता, सुरेल आणि रागाधारित संगीत,

रंगमंचीय वैविध्य, सामाजिक आणि सांस्कृतिक आशय, प्रेक्षकांची थेट संवाद, सामुहिक कलाकृती, मनोरंजन आणि शिक्षण यांचा संगम ही संगीत नाटकाची महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये आहेत.

संगीत नाटक म्हणजे काय ?

मराठी संगीत नाटक हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित असून ते भूतकाळातील वैभव नसते, तर वर्तमानातील प्रेरणा आणि भविष्याचा अभिमान असते. शब्दांना सुरांचे पंख लावून रसिकांच्या हृदयापर्यंत पोहोचणारी ही संगीत नाट्यकला आहे. अशा नाटकांचे सादरीकरण म्हणजे एक प्रकारचा स्वरयज्ञच असतो. अशा ज्या नाटकात गायन आणि अभिनय या कलांचा समतोल साधून सादरीकरण केले जाते, त्यास 'संगीत नाटक' म्हणतात. ज्या नाट्य प्रकारात गद्य आणि पद्य यांची आजोड बांधणी असते, अशा त्या नाट्यविष्काराला 'संगीत नाटक' म्हणतात. मराठी संगीत नाटक हे केवळ गाणी असलेले नाटक नाही, तर ती एक सांकृतिक अनुभूती असते. ज्यात शब्द स्वरांचे हात धरून चालत असतात. एकंदरीत मराठी संगीत नाटक ही केवळ कलाकृती नसते, तर ते महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा एक श्वास असते

संगीत रंगभूमीची पार्श्वभूमी

संगीत रंगभूमी ही मराठी संस्कृतीचा आत्म असून ती विविध परंपरा, कला आणि भावनांचा संगम आहे. संगीत रंगभूमीची पार्श्वभूमी ही केवळ एक ऐतिहासिक घटना नसून तो एक सामाजिक व सांस्कृतिक प्रवाह आहे. विष्णुदास भावे हे एक सर्वश्रेष्ठ चित्रकार, शिल्पकार आणि त्यांना अनेक कलाविष्काराची जाण होती. ते सांगली संस्थांच्या दरबारात कार्यरत होते. कर्नाटकातील दशावर खेळांचे सादरीकरण सांगली येथे झाले होते, या खेळांचे सादरीकरण पाहून सांगली संस्थांचे संस्थानिक पटवर्धन राजे यांनी अशा स्वरूपाची कला आपल्या भाषेत सादर व्हावी अशी इच्छा प्रगट करून त्याची जबाबदारी विष्णुदास भावे यांच्यावर सोपविण्यात आली होती.कर्नाटकातील यक्षगान खेळाच्या धरतीवर विष्णुदास भावे यांनी इस १८४३ साली 'सीता स्वयंवर' या नाटकाचे सादरीकरण केले. हे पौराणिक आख्यानाधारीत नाटक होते. हेच मराठीतील पहिले संगीत नाटक म्हणून जल्मास आले. या नाटकानंतर विष्णुदास भावे यांनी साधारणतः पन्नासच्या आसपास नाटके लिहून ती दिग्दर्शित केली.या नाटकात देव,राक्षस, स्त्रिया या पात्रासह वीर, करुणा, शृंगार व हास्य यासारख्या रसाने युक्त असेही नाटक होते. यक्षगानसारख्या कला प्रकारातून या नाटकाचा जन्म झाला असला, तरी विष्णुदास भावेंच्या नाटकात नृत्यप्रधानता नव्हती. त्यांच्या नाटकातला मुख्य सूत्रधार हा कीर्तनकार असत. आप्पासाहेब किर्लोस्कर यांनी शासकीय नोकरीत असताना पुण्यात त्यांनी पारशी नाटकांचा प्रयोग पाहून संस्कृत कवी कालिदास यांच्या 'अभिज्ञानशाकुंतलम' या नाटकाची संहिता आपल्या डोळ्यासमोर ठेवून त्यांनी मराठी भाषेत 'स.शाकुंतल' या नाटकाची संहिता लिहिली. प्रारंभी किर्लोस्करांचे नाटक हे तीन अंकाचे होते. त्यानंतर त्यांनी पुढे पाच अंकी नाटकाचे प्रयोग सादर केले. अण्णासाहेब किर्लोस्करानंतर गो. ब. देवल हे एक महत्त्वाचे नाटककार आहेत. देवल हे किर्लोस्करांचे शिष्य होते. देवल यांनी सात नाटकांची निर्मिती केली. त्यांची सर्व संगीत नाटके आहेत. इ.स. १८७१ ते १९३५ या कालखंडातील प्रमुख प्रयोगशील प्र नाटकार म्हणून श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचाही उल्लेख करावा लागतो. कोल्हटकरानी वीरतन, मूकनायक, गुप्तमंजुष, मतिविकार, प्रेमशोधन, वधुपरीक्षा, सहचारिणी, शिवपाविञ्य, जन्मरहस्य, श्रमसाफल्य, मायाविवाह ही संगीत नाटके रंगभूमीवर सादर केली. काव्य प्रांतात मराठी शाहीर म्हणून परिचित असलेले राम गणेश गडकरी यांनी प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, भावबंधन, एकच प्याला या संगीत नाटकांचे लेखन केले. त्यानंतर पुढे कृ.प. खाडीलकर यांनी बायकांचे बंड, भाऊबंदकी, प्रेमध्वज, मानापमान, विद्याहरण, स्वयंवर, सावित्री यासारख्या संगीत नाटकाचे लेखन केले. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'तील संपादकीय विभागात खाडिलकर कार्यरत असल्यामुळे त्यांच्या बहुसंख्य नाटकातून राजकीय दृष्टिकोन दिसून येतो.

इ. स. १९२० नंतरच्या काळात संगीत रंगभूमीला उतरती कळा आली. सन १९३० नंतर आळतेकर, श्री.वि. वर्तक, नारायण काळे, अनंत कणेकर यांनी एकत्र येऊन 'नाट्यमन्वंतर' या संस्थेची स्थापना केली. पुढे या संस्थेने सन १९३३ मध्ये 'सं. आंधळयांची शाळा' हे पहिले नाटक सादर केले. नाट्यमन्वंतरमधील नाटककारांच्या तात्विक मतभेदामुळे या संस्थेचे नाट्यकार्य पुढे जाऊ शकले नाही. त्यानंतर पुढे प्र. के. अत्रे, मो.ग. रांगणेकर, वि.वि. शिरवाडकर,वसंत कानेटकर, विद्याधर गोखले, गो.नी. दांडेकर, पु. ल. देशपांडे, अण्णा भाऊ साठे, चिं.त्र्यं. खानोलकर, विजय तेंडुलकर, जयवंत दळवी, गंगाधर गव्हाणकर यासारख्या अनेक नाटककारांनी संगीत नाटकांची निर्मिती करून ती रंगभूमीवर यशस्वीपणे सादर केली आहेत.

पदरचना व संगीतप्रधानता

संगीत नाटकातील 'पदरचना' ही शब्दांची अर्थपूर्ण गुंफण असते. नाटकात योग्य गाणी, नाटकातील प्रसंग, भावभावनांचा विचारविषयक शब्दांची शास्त्रोक्त गुंफण असते. नाटकाच्या पदरचनेची मांडणी ही रागाधिष्ठित असते. नाट्यपदे ही विशिष्ट छंदात किंवा वृत्तबद्ध असतात, तर नाटकाच्या संगीतप्रधानतेमध्ये संवादातील शब्द दुय्यम ठरतात आणि सूर प्रेक्षकांच्या हृदयाशी संवाद साधतात. मराठी संगीत नाटकातील पदरचना आणि संगीतप्रधानता या तांत्रिक संकल्पना नसून त्या मराठी संस्कृतीच्या आत्म्याच्या हुंकार आहेत. पदरचना ही नाटकाला साहित्य प्रतिष्ठा प्राप्त करून देत असते, तर संगीतप्रधानता हे नाटकाला अजरामर करीत असते. नाटकातील पदरचना ही वीण असते, तर संगीतप्रधानता हे संपन्नतेचे चैतन्य असते. संगीत नाटकात गद्य व पद्य स्वरूपाच्या मिश्रणातून आशयाचे प्रकटीकरण होत असते. नाटकातील पदरचना हे नाटकाच्या कथानकाची गती वाढविणे, पात्रांचे व्यक्तीचित्रण, वातावरण निर्मिती आणि विविध पात्रांच्या मनातील भावना व्यक्त करण्याचे कार्य करीत असतात. नाटकातील संगीतप्रधानतेमुळे प्रेक्षकांमध्ये अधिकची अभिरुची निर्माण होण्यास मदत होत असते. पदरचना व संगीतप्रधानता या दोन्हीचे अंतिम ध्येय ही नाटकाच्या आशयाची प्रभावी परिणामकारकता साध्य करावयाची असते.

संगीत नाटकाची गुणवैशिष्ट्ये

महाराष्ट्राचा एक अनमोल सांस्कृतिक ठेवा म्हणून मराठी संगीत नाटकाकडे पाहिले जाते. या संगीत नाटकाने शास्त्रीय संगीताचे लोकशाहीकरण करीत ते महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचविले. संगीत नाटकांतील शब्दांना सुरांचे कोंदण मिळालेले आहे. संगीत नाटकाच्या सादरीकरणात काही तांत्रिक आणि सांगितिक पैलू असतात. ज्यात रागाची निवड, साथसंगत आणि अभिनय महत्त्वाचा असतो. अशा या संगीत मराठी नाटकाने महाराष्ट्रात एक मोठा सांस्कृतिक उद्योगच निर्माण केला आहे. मराठी संगीत नाटक हे शब्दांचे साहित्य आणि स्वरांचे साम्राज्य असून ते मराठी माणसांच्या अस्तितेचे प्रतीक आहे.ज्या मराठी मातीत ज्ञानेश्वरांचे शब्द आणि संत तुकारामाच्या अभंगाचे सूर रुजले आहेत, त्याच मातीत मराठी संगीत नाटकांचे रोपटे वटवृक्षात रुपांतरीत झाले आहे. अशा मराठी संगीत नाटकाचे काही गुणवैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. शास्त्रीय संगीताचे अधिष्ठान असते.
२. पद संवादाचा अविभाज्य भाग असतो.
३. नांदी आणि भरतवाक्य असते.
४. चार गायक व नटाची संकल्पना असते.
५. साहित्यिक व सांस्कृतिक महत्त्व असते.
६. सादरीकरणाचे तंत्र आणि वाद्यसंगत असते.
७. आधुनिक काळाचे स्थित्यंतर असते.
८. सामाजिक व राजकीय प्रतिबिंब असते.
९. मराठी भाषा व संस्कृतीची समृद्धी असते.
१०. मनोरंजनातून संस्कार असतो.
११. स्वातंत्र्यलढा आणि राष्ट्रभक्तीचे जागृती असते.
१२. स्त्री शिक्षण आणि स्त्री पुरुष समानता असते.
१३. अंधश्रद्धा व दांभिकतेवर टीका असते.

मराठी संगीत नाटक म्हणजे महाराष्ट्राच्या मातीतील शब्दांचा अभिषेक असून सुरांचा उत्सव आहे. संगीत नाटक हे केवळ नाटक नाही, तर ती एक मराठी भाषेची जिवंत संस्कृती आहे. मराठी संगीत नाटकाची तुलना अनेक जागतिक नाट्यविश्वासी केली जाते, यामुळे अनेक विदेशी अभ्यासक मराठी नाट्य संगीताचा शोध व अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रात येत असतात. जोपर्यंत मराठी मातीतील सुगंधाचा वारसा जिवंत आहे, तोपर्यंत मराठी संगीत नाटकाचा नंदादीप अखंडपणे जळत राहील. मराठी संगीत नाटकांनी शब्दांच्या माध्यमातून विचारांचे जे बीज पेरले आणि सुरांनी त्याला संस्काराचे पाणी घातले. तसेच अनेक मराठी संगीत नाटकातून देव धर्माच्या नावाखाली

चालणाऱ्या दांभिकता आणि भोंदूगिरीवर कडक प्रहार करण्यात आले. अनेक संतांच्या जीवनावरील नाटकांनी माणुसकीचा धर्म सांगून सामाजिक प्रबोधन केले आहे.

नाटकांची संहिता, संगीत व भाषा

कोणत्याही संगीत नाटकाची संहिता ही केवळ मनोरंजनासाठी नसते, तर ती समाजप्रबोधनाची भूमिका बजावत असते. याच नाटकांच्या संहितेतून संस्कृती, परंपरा व सामाजिक मूल्य जाणीवपूर्वक जपली जातात. नाटकाची संहिता ही एक प्रभावी अभिव्यक्ती असते. नाटकाची हीच संहिता प्रेक्षकाला विचारप्रवर्तक बनवते. ही संहिता लिखित स्वरूपाची असते. ज्यात नाटकाची कथा असते. पात्रे, संवाद आणि गाण्याचा समावेश असतो. अशा गीतप्रधांनता, रसात्मकता, संवाद व संगीत यांचा समतोल आणि सजीव पात्र निर्मितीचा समावेश असतो. शब्द,स्वर आणि अभिनय यांच्या संगमातून साकार होणारी संहिता ही प्रेक्षकांच्या हृदयाला भावनिक स्पर्श करीत प्रेक्षकांना वेगळ्याच भावविश्वाचे दर्शन देत असते.

कोणतीही नाट्यकृती ही संगीतामुळेच अधिक रसपूर्ण, स्मरणीय व प्रभावी बनत असते. अशा संगीत नाटकातील संगीत हे सौंदर्याचा सुंदर आविष्काराचा आत्माच असतो. नाटकात जिथे संवाद थांबतात,तिथे संगीताच्या माध्यमातून भावना बोलत असतात. संगीत हे शब्दांना अर्थ देत भावनांना गती देत असतात. संगीत नाटकातील संगीत हे प्रेक्षकांच्या भावनांचे अनंत आकाश असते. नाटकातील संगीत हे केवळ गीत नसते, तर प्रेक्षकांच्या मनात रुजणारी एक प्रभावी अनुभूती असते.

संगीत नाटकाची भाषा ही शब्द आणि सूर यांचा सुरेख संगम असते. नाटकाची भाषा ही प्रेक्षकांना केवळ ऐकवली जात नाही, तर ते प्रेक्षकांच्या मनात अनुभवली आणि जपली जाते. नाटकाच्या गीतातील आशय हा प्रेक्षकांच्या मनावर कायमचा कोरला जातो. संगीत नाटकाच्या भाषेत काव्य आणि संवाद यांचा संगम असतो. संगीत नाटकांच्या भाषेत लयबद्धता आणि संगीतात्मकता असते. भावना, सौंदर्य आणि सुलभता असते. नाटकातील संवाद ऐकतांना प्रेक्षकांचे मन जणू एक गीतच गात राहते आणि गीत हे गीत ऐकतांना आत्मा स्वतः बोलत असतो. अशा संगीत नाटकांची भाषा ही शब्द, स्वर आणि भावनांचा परम संगम असते. अशा भाषेमुळे संगीत नाटक हे केवळ दृश्य राहत नाही, तर प्रेक्षकांच्या भावनाचा प्रवास बनत असते.

निष्कर्ष

१. संगीत रंगभूमी भाषेचा आणि साहित्याचा विकास होतो. संगीत नाटकातील गीत व संवाद यामुळे प्रेक्षकांना भाषेविषयी आवड निर्माण मदत होते. नाटकातील सुंदर शब्दरचना, भावपूर्ण प्रभावी अभिव्यक्ती, पद्यरचना, संवाद आणि अलंकारिक भाषा यामुळे प्रेक्षकांना भाषा व साहित्याची आवड निर्माण होत असल्यामुळे वाचन संस्कृतीला चालना मिळते.

२. संगीत रंगभूमी हा एक केवळ कलाप्रकार नसून ती आपल्या संस्कृतीची ओळख, सामाजिक प्रबोधन आणि कलाकारांच्या अभिव्यक्तीच्या विकासाचे एक सक्षम व्यासपीठ आहे. त्यामुळे संगीत रंगभूमीच्या माध्यमातून मनोरंजनाबरोबरच ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचा समाजात प्रचार व प्रसार होतो.

३. संगीत रंगभूमी ही प्रेक्षकांची संवेदनशीलता, संगीत, संवाद, अभिनय आणि दृश्यरचनांमुळे प्रेक्षकांची सौंदर्यदृष्टी विकसित करण्यास मदत करणारी कला आहे.

४. संगीत रंगभूमी ही विचारप्रवर्तक असून भावनिक शुद्धीकरणात भावनिक शुद्धीकरण आणि सर्जनशीलतेचा एक जिवंत उत्सव आहे.

५. संगीत रंगभूमीमुळे समाजातील विविध प्रश्न, मुल्ये, समृद्ध परंपरा आणि आदर्श समाजासमोर मांडले आहेत. अशा या रंगभूमीवरील कलाकार हे केवळ कलाकार नसतात, तर संस्कृतीचे वाहक असतात.

६. मराठी संगीत नाटकात केवळ शब्दांचे प्रदर्शन नसते,तर काव्य आणि गायन यांचे अद्वितीय संयोजन असते. पदरचना हा संगीत नाटकाचा पाया असतो, तर संगीत प्रधानता हा त्यावरील कळस असतो.

७. मराठी संगीत नाटक ही केवळ मनोरंजनाची कला नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि भाषिकतेचा एक मौल्यवान असा शब्द व स्वरांचा समृद्ध वारसा आहे.

८. मराठी संगीत नाटकाने महाराष्ट्रात एक मोठी सांस्कृतिक अर्थव्यवस्था निर्माण केली आहे.

९. संगीत नाटकांची संहिता म्हणजे शब्दांना मिळालेली सुरांची साथ,भावनांची अभिव्यक्ती व प्रेक्षकांच्या भावनांचा जिवंत प्रवाह असतो.

१०. नाटकातील संगीत हे नाटकाला केवळ आकार देत नाही, तर नाटकातील कथा आशयाला आत्मा, जीवन आणि चिरंतनता प्रदान करीत असते. म्हणून संगीत नाटकातील संगीत हे प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श करणारे अद्वितीय कलमाध्यम आहे.

११. संगीत नाटकाची भाषा ही केवळ ऐकण्याची नव्हे, तर अनुभवण्याची कला असते. प्रेक्षकांना अंतर्मुख करणारी नाटकांची भाषा ही काव्य, लय आणि आशय यांचे सुंदर एकत्रीकरण असते.

संदर्भ ग्रंथ :

१. देशपांडे अ.ना.,आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास,व्हीनस प्रकाशन,पुणे
२. देशपांडे वि.भा., मराठी नाटक आणि रंगभूमी- पहिले शतक,व्हीनस प्रकाशन, पुणे
३. कुलकर्णी वा.ल.(संपा.),मराठी नाटक आणि मराठी रंगभूमी,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
४. साठे मकरंद, मराठी रंगभूमीच्या तीस रात्री (खंड १ ते ३), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
५. देशपांडे वि.भा., मराठी नाटक- नाटककार काळ आणि कर्तृत्व (खंड १), दिलीपराज प्रकाशन' पुणे

"अक्षरांचे मोती"

श्री. सचिन रामदास खिल्लारे

सहाय्यक शिक्षक, I.S.O.जिल्हा परिषद प्राथमिक, शाळा लालवाडी तांडा, केंद्र, पारनेर, ता. अंबड, जि. जालना.

बालकाच्या प्राथमिक शिक्षणात इंग्रजी, गणित, वाचन आणि लेखन या क्रियांवर भर दिला जातो. पण वळणदार अक्षरांचा सराव आणि लेखन पूर्णपणे दुर्लक्षित केले जाते. मग तिसरी, चौथी किंवा त्या पुढील वर्गात सुंदर हस्ताक्षरांचा सराव सुरू केला जातो, परंतु त्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या अक्षर लेखनाला चुकीची लेखन सवय लागलेली असते. म्हणून इयत्ता पहिलीपासूनच जेव्हा आपण विद्यार्थ्यांच्या लेखनाला सुरुवात करतो. तेव्हाच सुयोग्य असा लेखन सराव घेणे आवश्यक असते. याचवेळी आपण योग्य काळजी घेतली तर सुंदर हस्ताक्षर येण्यास काहीही अडचण येत नाही. अक्षरांचे अवयव अक्षरलेखन सराव योग्य होणे गरजेचे असते. एकदा अक्षरांना सुंदर वळण प्राप्त झाले की, हा अक्षरांचा दागिना विद्यार्थी आयुष्यभर मोठया अभिमानाने मिरवतील म्हणून अक्षरांचे मोती या उपक्रमाची गरज आणि महत्व अनन्यसाधारण आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांची अक्षरे मोत्यांसारखी होतात. योग्य लेखन सवईचा सराव होतो. अक्षर लेखनाच्या सरावातून विद्यार्थ्यांमध्ये शीस्त, संयम, नीटनेटकेपणा, वक्तशिरपणा, अभ्यासासाठी बैठक वाढणे अशा असंख्य गुणांचा विकास होतो. सुंदर हस्तक्षर हे मोत्यांपेक्षा तसुभरही कमी नाही एकदा सुंदर झालेली अक्षरे ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यभराची कमाई होते. म्हणूनच अक्षरांचे मोती हा उपक्रम असून यामधून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक अध्ययन ऊर्जा निर्माण होते.



'मोत्यांची अक्षरे' या उपक्रमाच्या माध्यमातुन शाळेतील इयत्ता 1 ली ते 4 थी च्या विद्यार्थ्यांच्या सुंदर हस्ताक्षरे होण्यास मदत होते. विद्यार्थी आयुष्यभराकरीता सुंदर हस्ताक्षरांचा दागिना बाळगण्यास सज्ज होतात. हस्ताक्षराच्या सरावातुन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढते व विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागते व हिच गोडी विद्यार्थ्यांना इतर विषयांचा अभ्यास करण्यास कामी येते. अक्षरांचे मोती जेव्हा कागदावर उमटतात तेंव्हा विद्यार्थी अतिशय आनंदी होतात व शालेय जिवनात प्रगती करण्यास सज्ज होतात.



प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्धीर आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्यासाठी पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरूजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देश बांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

संस्कृत साहित्यातील पर्यावरण संकल्पना

प्रा. अभय सखाराम पाटील

संस्कृत विभाग प्रमुख

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव ता. गंगाखेड, जि. परभणी

प्रस्तावना

आजच्या आधुनिक युगात जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणाचा ऱ्हास या समस्यांनी गंभीर रूप धारण केले आहे. मात्र, भारतीय संस्कृतीमध्ये पर्यावरणाचे रक्षण ही संकल्पना हजारो वर्षांपूर्वीच मांडली गेली होती. संस्कृत साहित्य, जे जगातील प्राचीनतम साहित्यांपैकी एक आहे, त्यात निसर्ग आणि मानव यांच्यातील अतूट नात्याचे सुंदर दर्शन घडते.

वेदात पर्यावरणाचे महत्त्व

संस्कृत साहित्याचा पाया असलेले वेद हे निसर्गपूजेचे केंद्र आहेत.वेदांमध्ये पर्यावरणाचे महत्त्व केवळ भौतिक संसाधन म्हणून नसून, निसर्गाला 'दैवी' स्वरूप देऊन त्याचे संरक्षण करण्याची शिकवण दिली आहे. वेदांनुसार मनुष्य हा निसर्गाचा स्वामी नसून त्याचा एक अविभाज्य भाग आहे.वैदिक ऋषींनी पृथ्वी, आप- जल, तेज -अग्नी, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांना देवता मानले आहे.

पृथ्वी सूक्त (अथर्ववेद):अथर्ववेदातील १२ व्या कांडातील 'पृथ्वी सूक्त' ज्याला भूमी सूक्त असेही म्हणतात.हे पर्यावरणाचे जगातील पहिले आणि सर्वात श्रेष्ठ घोषणापत्र मानले जाते. यात ६३ मंत्र आहेत.

अथर्ववेदातील 'भूमी सूक्त' हे पर्यावरणाचे सर्वांत मोठे घोषणापत्र मानले जाते. यात ऋषी म्हणतात- **"माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः""** (अथर्ववेद १२.१.१२)पृथ्वी माझी माता आहे आणि मी तिचा पुत्र आहे. हा दृष्टिकोन पर्यावरणा प्रति कृतज्ञता आणि संरक्षणाची भावना जागृत करतो.

महत्त्व: जेव्हा आपण पृथ्वीला माता मानतो, तेव्हा तिचे शोषण करण्याचा विचार मनात येत नाही. मुलाने मातेचे रक्षण करावे, ही भावना यात अंतर्भूत आहे.

पंचमहाभूतांची संकल्पना

वेदांनी निसर्गातील पाच मुख्य घटकांना -पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश देवता मानले आहे. त्यांच्या शुद्धतेवर मानवाचे आरोग्य अवलंबून असल्याचे सांगितले आहे.

जल- आप: ऋग्वेदात जलाला 'भेषज'- औषध म्हटले आहे. "अप्स्वन्तरमृतमप्सु भेषजम्" (ऋग्वेद् १.२३.१९) - म्हणजेच पाण्यात अमृत आणि सर्व औषधी गुणधर्म आहेत. त्यामुळे जलप्रदूषण करणे हा अधर्म मानला गेला.

वायू: वायूला 'प्राण' मानले गेले आहे. शुद्ध हवा हाच जीवनाचा आधार असल्याचे ऋग्वेदात अनेक ठिकाणी नमूद केले आहे.

शांती पाठ: यजुर्वेदातील शांती पाठामध्ये केवळ मानवासाठीच नव्हे, तर वनस्पती, जल आणि अवकाशासाठीही शांतीची प्रार्थना केली आहे, जेणेकरून निसर्गाचे संतुलन टिकून राहील. यजुर्वेदातील प्रसिद्ध 'शांती पाठ' हा पर्यावरणाच्या संतुलनाचा उत्तम नमुना आहे.

प्रमुख संदर्भ: "द्यौः शान्तिरन्तरिक्षं शान्तिः पृथिवी शान्तिरापः शान्तिरोषधयः शान्तिः। वनस्पतयः शान्तिर्विश्वेदेवाः शान्तिर्ब्रह्म शान्तिः सर्वं शान्तिः..." (यजुर्वेद ३६.१७)

आकाश, अंतरिक्ष, पृथ्वी, जल, औषधी- झुडपे आणि वनस्पती- मोठे वृक्ष या सर्वांमध्ये शांतता आणि संतुलन राहो.

महत्त्व: जर निसर्गातील एकही घटक विचलित झाला, तर मानवी जीवन संकटात येईल, ही वैज्ञानिक जाणीव या मंत्रातून दिसते.वृक्ष आणि वनस्पतींचे रक्षण वेदांमध्ये वनस्पतींना 'देवता' मानून त्यांचे संवर्धन करण्यास सांगितले आहे.

ऋग्वेद (१०.९७): या सूक्तात औषधी वनस्पतींची स्तुती केली आहे. वनस्पती मानवाचे रोग दूर करतात, म्हणून **त्यांचे रक्षण करणे हे मानवाचे कर्तव्य आहे.**

अथर्ववेद- वृक्षांना तोडणे हे पाप मानले गेले आहे. जर एखादा वृक्ष तोडावा लागला, तर त्याजागी नवीन वृक्ष लावण्याची आज्ञा वेद देतात.

यज्ञाची संकल्पना आणि वायू शुद्धीकरण वैदिक यज्ञांमागे केवळ आध्यात्मिक कारणे नव्हती, तर वैज्ञानिक कारणेही होती. यज्ञात वापरले जाणारे तूप आणि समिधा लाकूड यांच्या ज्वलनातून वातावरण शुद्ध होते, पाऊस पडण्यास मदत होते आणि रोगजंतूंचा नाश होतो, असे मानले जाते.

वेदांमधील पर्यावरण संकल्पना ही 'सहअस्तित्वावर' आधारित आहे. निसर्गाकडून आपल्याला जे मिळते, त्या बदल्यात निसर्गाला काहीतरी देणे आणि त्याचे रक्षण करणे हीच खरी 'वैदिक जीवनपद्धती' आहे. "तेन त्यक्तेन भुञ्जीथाः" त्यागपूर्वक उपभोग घ्या हा उपनिषदांचा संदेश वेदांच्या या पर्यावरण विचारातूनच आला आहे.

उपनिषदे आणि पुराणे

उपनिषदांनी मानवाला निसर्गाचा मालक नव्हे, तर एक भाग मानले आहे. 'ईशावास्य उपनिषद' सांगते की, या जगात जे काही आहे ते ईश्वराचे आहे, त्यामुळे आपण त्याचा वापर त्यागाने गरजेनुसार करावा, लोभाने नव्हे. पुराणांमध्ये वृक्षांचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले आहे:

दशकूपसमा वापी दशवापीसमो ह्रदः।
दशह्रदसमः पुत्रो दशपुत्रसमो द्रुमः॥

दहा विहिरींच्या बरोबर एक तलाव, दहा तलावांच्या बरोबर एक सरोवर, दहा सरोवरांच्या बरोबर एक पुत्र आणि दहा पुत्रांच्या बरोबर एक वृक्ष असतो.

अभिजात संस्कृत साहित्य

कालिदास, बाणभट्ट आणि भवभूती यांसारख्या कवींच्या साहित्यात निसर्ग हा केवळ पार्श्वभूमी नसून तो एक जिवंत पात्र आहे.

कालिदास: महाकवी कालिदास हे केवळ शब्दांचे प्रभू नव्हते, तर ते निसर्गाचे महान उपासक होते. त्यांच्या साहित्यात निसर्ग हा केवळ मानवी जीवनाची 'पार्श्वभूमी' नसून तो मानवाचा 'सहचर' आणि 'कुटुंबसदस्य' म्हणून येतो.'अभिज्ञानशाकुंतलम्' मध्ये शकुंतला सासरी जाताना आश्रमातील वृक्ष, वेल आणि हरिण यांच्याशी निरोप घेतानाचे दृश्य मानवी आणि नैसर्गिक भावनांचे एकत्रीकरण दर्शवते.

पातुं न प्रथमं व्यवस्यति जलं युष्मास्वपीतेषु या ।

नादत्ते प्रियमण्डनापि भवतां स्नेहेन या पल्लवम् ॥ (अभिज्ञानशाकुंतलम् ४.९)

"जी शकुंतला तुम्हा वृक्षांना पाणी घातल्याशिवाय स्वतः पाणी पीत नसे; जिला दागिन्यांची आवड असूनही तुमच्याबद्दलच्या प्रेमापोटी तुमची पाने-फुले तोडत नसे; ती आज सासरी जात आहे, तिला परवानगी द्या."येथे वृक्ष हे निर्जीव नसून ते कुटुंबातील सदस्यांसारखे आहेत, ही जाणीव कालिदास करून देतात.

'रघुवंश' महाकाव्यात कालिदासांनी वृक्षांना पुत्राचा दर्जा दिला आहे. राजा दिलीप आणि नंदिनी गायीच्या प्रसंगात देवदार वृक्षाचे वर्णन येते.

अमुं पुरः पश्यसि देवदारुं पुत्रीकृतोऽसौ वृषभध्वजेन । (रघुवंशम् २.३६)

"हा समोर दिसणारा जो देवदार वृक्ष आहे, त्याला भगवान शंकरांनी आपला 'पुत्र' मानले आहे."

वृक्षांना 'पुत्र' मानणे म्हणजे त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी मानवावर सोपवणे होय. पर्यावरणाचे रक्षण हे पुत्राच्या रक्षणाप्रमाणेच पवित्र कार्य आहे, हा संदेश कालिदास देतात.

ऋतुसंहार: या काव्यात सहा ऋतूंचे आणि त्यांच्या निसर्गावर होणाऱ्या परिणामांचे अत्यंत सूक्ष्म वर्णन केले आहे.ऋतूंचे चक्र आणि सजीवांवर होणारा परिणाम 'ऋतुसंहार' हे कालिदासांचे पहिले काव्य मानले जाते. यात सहा ऋतूंचे आणि त्या काळात निसर्गात होणाऱ्या बदलांचे सूक्ष्म वर्णन आहे.

कालिदास सांगतात की, ऋतूंनुसार निसर्ग बदलतो आणि त्याचा परिणाम मानवी मनावर व शरीरावर होतो. उन्हाळ्यात वणव्यामुळे निसर्गाची होणारी हानी आणि पावसाळ्यात तृप्त होणारी धरणी याचे वर्णन करून त्यांनी नैसर्गिक चक्राचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

निसर्गातील चैतन्य-'कुमारसंभव' या महाकाव्यात हिमालयाचे वर्णन करताना कालिदासांनी त्याला 'देवात्मा' म्हटले आहे.**"अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः"** (कुमारसंभव १.१)
"उत्तर दिशेला देवांचा आत्मा असलेला पर्वतराज हिमालय स्थित आहे."

पर्वतांना केवळ दगडधोंड्यांचा ढिगारा न मानता त्यांना 'दैवी' मानणे, ही पर्यावरणाचे पावित्र्य जपण्याची कालिदासांची पद्धत होती. यामुळेच पर्वतांवरील वनसंपदा आणि नद्यांचे रक्षण करणे हे मानवाचे आध्यात्मिक कर्तव्य ठरते.

आयुर्वेदाचा दृष्टिकोन

आयुर्वेद शास्त्रानुसार मानवी शरीर हे निसर्गाचाच एक छोटा अंश आहे. **"यत् पिण्डे तत् ब्रह्माण्डे"** या उक्तीनुसार, जर आपण बाह्य निसर्गाचे संरक्षण केले तरच आपले शरीर निरोगी राहू शकते. वनस्पतींचे औषधी गुणधर्म आणि त्यांचे संवर्धन यावर चरक आणि सुश्रुत संहितेत विशेष भर दिला आहे.

निष्कर्ष

संस्कृत साहित्यातील पर्यावरण संकल्पना ही केवळ भौतिक नसून ती आध्यात्मिक आणि नैतिक आहे. निसर्गाचा आदर करणे हा भारतीय जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग होता. आजच्या काळात निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आपल्याला पुन्हा एकदा या प्राचीन संस्कृत ग्रंथांमधील 'वसुधैव कुटुंबकम्' आणि 'निसर्ग देवो भव' या विचारांकडे वळण्याची गरज आहे.

संदर्भग्रंथ

१. ऋग्वेद संहिता: (सायणभाष्य), चौखंभा कृष्णदास अकादमी, वाराणसी.

२. अथर्ववेद संहिता: (शौनक शाखा), संपा. सातवळेकर श्री. द., स्वाध्याय मंडळ, पारडी.

३. ईशावास्योपनिषद्: (शांकरभाष्य), गीता प्रेस, गोरखपूर.

४. अभिज्ञानशाकुंतलम्: (महाकवि कालिदास), संपा. डॉ. र. ना. दांडेकर, प्रसाद प्रकाशन, पुणे.

५. रघुवंशम्: (महाकवि कालिदास), मल्लिनाथ सूरी 'संजीवनी' टीका, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली.

५. यजुर्वेद संहिता: (वाजसनेयी माध्यंदिन), गीता प्रेस, गोरखपूर.

६. भारतीय संस्कृती कोश: (खंड १ ते १०), संपा. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे.

७. संस्कृत साहित्याचा इतिहास: डॉ. ग. ना. जोगळेकर, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

८. वेदांतील पर्यावरण: डॉ. श्री. र. भिडे, वरदा प्रकाशन, पुणे.

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) आणि बँकिंग क्षेत्र

प्रा. डॉ. रामदास डी. मुकटे
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली. (महाराष्ट्र)

प्रस्तावना

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) च्या आगमनाने विविध क्षेत्रांमध्ये क्रांती घडवून आणली आहे आणि बँकिंग उद्योगही त्याला अपवाद नाही. एआय तंत्रज्ञानाने अभूतपूर्व कार्यक्षमता आणली आहे, पारंपारिक बँकिंग ऑपरेशन्स आणि ग्राहक सेवा पद्धतींमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला आहे. ऑटोमेटेड कर्ज प्रक्रियेपासून ते एआय-चलित ग्राहक सेवा चॅट बॉट्सपर्यंत, एआयच्या एकात्मिकतेमुळे बँकांना अधिक वैयक्तिगत, कार्यक्षम आणि चोवीस तास सेवा देण्यास सक्षम केले आहे. एआयवरील वाढलेली अवलंबित्व मोठ्या प्रमाणात डेटा जलद प्रक्रिया करण्याच्या, भविष्यसूचक विश्लेषणाद्वारे अंतर्दृष्टी प्रदान करण्याच्या आणि नियमित कार्ये स्वयंचलित करण्याच्या क्षमतेमुळे चालते, ज्यामुळे ऑपरेशनल खर्च कमी होतो आणि ग्राहकांचे समाधान वाढते.बँकिंग क्षेत्रात, आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) अधिकाधिक प्रचलित होत आहे. एआय वित्तीय संस्था कशा चालवतात, क्लायंटशी संवाद साधतात आणि दैनंदिन कामकाज आणि आर्थिक नियम कसे व्यवस्थापित करतात हे बदलत आहे. एआय मोठ्या प्रमाणात डेटा हाताळू शकते, ट्रेंड ओळखू शकते आणि तर्कसंगत निष्कर्ष काढू शकते, त्यामुळे ते बँका आणि इतर वित्तीय संस्थांसाठी एक आवश्यक साधन बनत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) मोठ्या प्रमाणात डेटाचे विश्लेषण करू शकते जेणेकरून वित्तीय कंपन्यांना चांगले निर्णय घेण्यास मदत होईल. बँकिंग आणि वित्त व्यवसाय डेटावर लक्षणीयरीत्या अवलंबून आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI)

आर्टिफिशियल इंटेलिजेंसला विज्ञान आणि तंत्रज्ञान दोन्ही म्हणून वर्गीकृत केले आहे. संगणक शास्त्रज्ञ, गणितज्ञ आणि एआयचे प्रणेते जॉन मॅकार्थी यांनी १९५५ मध्ये "कृत्रिम बुद्धिमत्ता" ही संज्ञा तयार केली. त्यांनी त्याचे वर्णन "बुद्धिमान यंत्रे बनवण्याचे विज्ञान आणि अभियांत्रिकी" असे केले, ज्याचा संबंध "मानवी बुद्धिमत्ता समजून घेण्यासाठी संगणकांचा वापर" असा आहे. ही व्याख्या आज आपण एआयचे वैशिष्ट्य कसे दर्शवितो याचा आधार आहे: संगणकांना सामान्यतः मानवी इनपुटची आवश्यकता असलेल्या जटिल कार्यांसाठी प्रशिक्षण देण्याचा सिद्धांत आणि प्रक्रिया, ज्यामुळे मशीन्सना मानवी क्षमतांचे अनुकरण करण्यास आणि सुधारण्यास सक्षम केले जाते.

आज, कृत्रिम बुद्धिमत्तेला सामान्यतः तंत्रज्ञान म्हणून संबोधले जाते. डेटा संकलन आणि विश्लेषण, नैसर्गिक भाषा प्रक्रिया आणि निर्मिती, भाषण ओळख, वैयक्तिकृत शिफारस प्रणाली, प्रक्रिया ऑटोमेशन आणि बरेच काही यासाठी मशीन-लर्निंग साधनांचा संच आहे. एआयच्या काही अधिक प्रसिद्ध समकालीन अनुप्रयोगांमध्ये चॅटबॉट्स, सेल्फ-ड्रायव्हिंग कार आणि ॲमेझॉनच्या अलेक्सा आणि ॲपलच्या सिरीसारखे व्हर्च्युअल असिस्टंट आहेत.

AI चा इतिहास

कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास रिअल टाइममध्ये वाढत आहे आणि विस्तारत आहे. ओपनएआय सारख्या संशोधन प्रयोगशाळांपासून ते गुगल सारख्या तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गजांपर्यंत, बहुतेक कंपन्या त्यांचे कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयत्न वाढवत आहेत - बिग ह्यूमनसह. आम्ही अलीकडेच अनह्यूमन, आमच्या एआय उत्पादनांचा संग्रह आणि लिटरली एनीथिंग, आमचे टेक्स्ट-टू-वेब-ॲप टूल लाँच केले आहे.पण एआय ही एक नवीन कल्पना नाही; ही जागतिक लाट, कितीही मोठी असली तरी, मशीन-मॉडेल्ड मानवी बुद्धिमत्तेच्या रूपांतरातील आणखी एक टप्पा आहे. इ.स.पू. ३८०

मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा शोध सुरू झाला, परंतु ती तत्वज्ञानी आणि धर्मशास्त्रज्ञांनी विचारात घेतलेली बौद्धिक संकल्पना होती. एआय ही एक काल्पनिक संकल्पना होती जी इतकी वेगळी वाटली की पौराणिक लोककथांमध्ये ती कथा म्हणून वापरली जात असे. मानवी इतिहासाप्रमाणेच, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रथम प्राचीन ग्रीसमध्ये उदयास आली. (ऑटोमेटेड हा शब्द "स्वतःचे कार्य" यासाठी वापरल्या जाणाऱ्या ग्रीक शब्द ऑटोमॅटोसवरून आला आहे.) पौराणिक कथेनुसार, हस्तकला आणि धातूकामाचा देव हेफेस्टसने सोन्यापासून स्वयंचलित दासींचा एक संच तयार केला आणि त्यांना देवांचे ज्ञान दिले. त्याआधी, हेफेस्टसने टॅलोस बनवला, जो क्रेटला आक्रमणांपासून वाचवण्यासाठी नियुक्त केलेला एक यांत्रिक "रोबोट" होता. एआयच्या व्यावहारिक अनुप्रयोगांची सुरुवात इ.स.पू. २५० मध्ये झाली जेव्हा शोधक आणि गणितज्ञ सेटेसिबियसने जगातील पहिली स्वयंचलित प्रणाली - एक स्वयं-नियमन करणारी पाण्याची घड्याळ बांधली. १४ व्या ते १९ व्या शतकातील गणित, तर्कशास्त्र आणि विज्ञानातील विकास हे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रगतीचे निश्चित चिन्ह आहेत. त्यावेळच्या तत्वज्ञानी आणि शोधकांना कदाचित माहित नसेल की ते रोबोटिक्स आणि संगणक विज्ञानाचे सुरुवातीचे समर्थक आहेत, परंतु त्यांनी भविष्यातील एआय प्रगतीचा पाया रचला. १३०८ मध्ये, धर्मशास्त्रज्ञ रॅमन लुल यांनी आर्स मॅग्ना (किंवा आर्स जनरलिस अल्टिमा, द अल्टिमेट जनरल आर्ट) पूर्ण केले, ज्यामध्ये कागदावर आधारित यांत्रिक प्रणालीची पद्धत तपशीलवार सांगितली जी नवीन ज्ञान तयार करण्यासाठी माहिती जोडते, आयोजित करते आणि एकत्रित करते. एआय संशोधनातील अग्रदूत, आर्स मॅग्ना तार्किक निष्कर्ष काढण्यासाठी तार्किक युक्तिवादांचे विश्लेषण करण्यासाठी एक चौकट होती. लुलच्या कार्याचा विस्तार करताना, तत्वज्ञानी आणि गणितज्ञ गॉटफ्राइड लीबनिझ यांच्या १६६६ च्या निबंध "डिसरटाटिओ डी आर्टे कॉम्बिनेटोरिया" (ऑन द कॉम्बिनेटोरियल आर्ट) ने असे प्रतिपादन केले की सर्व नवीन कल्पना विद्यमान संकल्पनांच्या संयोजनाचा वापर करून एकत्र जोडल्या जातात. मानवजातीला संगणकीय संज्ञानात्मक अल्गोरिथम देऊन, लीबनिझने मानवी विचारांची एक वर्णमाला तयार केली - तार्किक ऑपरेशन्सच्या विघटनातून ज्ञानाचे मूल्यांकन आणि स्वयंचलितीकरण करण्यासाठी एक सार्वत्रिक नियमपुस्तक. कृत्रिम बुद्धिमत्तेतील भौतिक प्रगती ग्रीसमधील सेटेसिबियसपुरती थांबली नाही. १२ व्या आणि १३ व्या शतकात, बहुपत्नी आणि अभियंता इस्माईल अल-जझारी यांनी १०० हून अधिक स्वयंचलित उपकरणे शोधली, ज्यात एक यांत्रिक वाइन सर्व्हंट आणि पाण्यावर चालणारा तरंगणारा ऑर्केस्ट्रा यांचा समावेश होता. १२०६ मध्ये, अल-जझारी यांनी द बुक ऑफ नॉलेज ऑफ इंजेनियस मेकॅनिकल डिव्हाइसेस लिहिले; प्रोग्रामेबल ऑटोमेशनचा पहिला रेकॉर्ड, ज्यामुळे नंतर त्यांना रोबोटिक्सचे जनक म्हणून मजबूत केले गेले. अशीही अफवा आहे की अल-जझारीने इतिहासातील सर्वात विपुल शोधकांपैकी एकावर प्रभाव पाडला: लिओनार्डो दा विंची. पुनर्जागरण काळातील हा माणूस ऑटोमेशनमधील त्याच्या व्यापक संशोधनासाठी ओळखला जात होता, त्याने १४९५ मध्ये एक कृत्रिम बख्तरबंद शूरवीर डिझाइन केला (आणि कदाचित बांधला).१६०० च्या सुरुवातीपासून ते १८०० च्या उत्तरार्धापर्यंत, कविता, पुस्तके आणि नाटकांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाला कलात्मक वळणे दिली जात होती. १७२६ मध्ये, जोनाथन स्विफ्टने गुलिव्हर ट्रॅव्हल्स प्रकाशित केले, जिथे "द इंजिन" नावाचे मशीन संगणकाचा सर्वात जुना संदर्भ बनले. त्यानंतर १८७२ मध्ये, सॅम्युअल बटलरने अज्ञातपणे "एरेव्हॉन" छापले, जे कृत्रिम चेतनेची कल्पना एक्सप्लोर करणाऱ्या पहिल्या कादंबऱ्यांपैकी एक आहे. बटलरने चार्ल्स डार्विनचा उत्क्रांतीचा सिद्धांत यंत्रांवर लागू करता येईल असे सुचवले.२० व्या शतकापर्यंत आपल्याला कृत्रिम बुद्धिमत्तेत लक्षणीय प्रगती दिसू लागली, ज्यामुळे आपण आज ते कसे पाहतो आणि वापरतो याचा पाया रचला गेला. १९१२ मध्ये, शोधक, स्थापत्य अभियंता आणि गणितज्ञ लिओनार्डो टोरेस क्वेवेडो यांनी एक स्वायत्त बुद्धिबळ खेळाडू तयार

केला, नंतर १९१४ मध्ये पॅरिस विद्यापीठात तो पदार्पण केला. बुद्धिबळाचा खेळ खेळणारे पहिले, इलेक्ट्रोमेकॅनिकल यंत्र, आधुनिक एआय विकासाला सुरुवात केली.

संशोधनाची आवश्यकता

AI च्या मदतीने भूतकाळ आपल्या वर्तमानाची चौकट बनवत असताना आणि आपल्या भविष्याला प्रकाशमान करत असताना, त्याचा इतिहास जाणून घेणे ही कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ती कशी विकसित होऊ शकते हे पूर्णपणे समजून घेण्याची गुरुकिल्ली आहे. एआयला आणखी एक गौरवाचा क्षण येत असताना, आपण कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय आणि त्याच्या उदयाला आकार देणाऱ्या प्रमुख घटनांचा अभ्यास करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधन करण्यात येत आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे

1. आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) संकल्पना चे विश्लेषण करणे.
2. आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) आणि बँकिंग क्षेत्र यांचा परस्पर संबंध अभ्यासणे.
3. आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) संकल्पनेचे बँकिंग क्षेत्रातील सुधारणा व आव्हाने जाणून घेणे.

एआयचे संभाव्य उपयोग आणि सेवा

बँकिंग आणि वित्त क्षेत्रात एआयचे अनेक संभाव्य उपयोग आहेत, ज्यात ग्राहकांचे अनुभव सुधारणे, बॅक-ऑफिस ऑपरेशन्स सुलभ करणे, फसवणूक शोधणे, जोखीम व्यवस्थापित करणे आणि अनुपालन वाढवणे यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, वित्तीय संस्था कामांना स्वयंचलित करण्यासाठी, अचूकता, वाढविण्यासाठी आणि प्रक्रियांना गती देण्यासाठी एआयचा वापर करू शकतात, ज्यामुळे खर्चात बचत होईल आणि कार्यक्षमता सुधारेल. एआयद्वारे समर्थित व्हर्च्युअल असिस्टंट आणि चॅटबॉट्स मानवी सहभागाची आवश्यकता कमीत कमी करून ग्राहकांना चोवीस तास सेवा देऊ शकतात. वापरकर्ता एआय प्रश्न विचारू शकतो आणि संभाषणात्मक उत्तरे मिळवू शकतो. उदाहरणार्थ, वापरकर्ते खर्च अहवाल तयार करू शकतात किंवा त्यांचे खाते शिल्लक निश्चित करू शकतात. बँकिंग एआय वापरून, ते ही कामे पूर्ण करण्यासाठी दीर्घ प्रक्रियेतून न जाता त्वरित सर्व डेटा मिळवू शकतात. बँकिंग एआयचा वापर सेवांची सोय सुधारतो, वापरकर्त्याचा वेळ वाचवतो आणि चौकशी करण्यासाठी कमी काम करावे लागते.

वित्तीय व्यवस्थापन

विस्तृत डेटासेटवर प्रशिक्षित एआय-संचालित चॅटबॉट्स, ग्राहकांना मार्गदर्शन आणि आर्थिक व्यवस्थापन सहाय्य प्रदान करू शकतात. वापरकर्ते त्यांच्या आर्थिक हाताळणी सुधारण्यासाठी आणि त्यांच्या उद्योगातील गुंतवणूक ट्रेंड आणि आर्थिक संधींबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी वैयक्तिकृत सल्ला मिळविण्यासाठी या चॅटबॉट्सशी संवाद साधू शकतात. त्यांचे उत्पन्न, आवश्यक खर्च आणि इतर आर्थिक क्षेत्रांचे विश्लेषण करून, ग्राहकांना मौल्यवान माहिती मिळू शकते जी त्यांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करते. थोडक्यात, एआय एक आभासी आर्थिक सल्लागार म्हणून काम करते, जे ग्राहकांना त्यांच्या आर्थिक धोरणांना अनुकूलित करण्यात मदत करण्यासाठी विनामूल्य, डेटा-चालित सल्ला देते.

क्रेडिट स्कोअरचे व्यवस्थापन.

क्रेडिट स्कोअरचे व्यवस्थापन. एआय बँक क्रेडिट स्कोअरचे निरीक्षण करण्यास देखील मदत करू शकते. चॅटबॉट्स वापरकर्त्यांचा क्रेडिट स्कोअर वाढवण्यासाठी मार्गदर्शनासाठी कोणत्याही क्षणी सल्ला घेऊ शकतात. व्यवसायाच्या दृष्टिकोनातून, एआय-चालित उपाय मोठ्या प्रमाणात आर्थिक डेटाचे विश्लेषण करू शकतात जसे की, व्यवहार डेटा किंवा क्रेडिट स्कोअर, क्रेडिट जोखीम लवकर ओळखण्यासाठी आणि संस्थेला तोट्यापासून

वाचवण्यासाठी मदत होऊ शकते. बँकिंग व्यवहार सोपे करण्यासाठी वापरकर्ते एआय-चालित चॅटबॉट्स वापरू शकतात. ते एआयला त्यांच्या खात्यात किंवा इतरांच्या खात्यात पैसे हलविण्यास सूचना देऊ शकतात, उदा. ऑनलाइन ऑर्डर देताना, वापरकर्त्यांना चॅटबॉटला पेमेंट प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगण्याचा पर्याय असतो. पेमेंट माहिती मॅन्युअली प्रविष्ट करण्याऐवजी ते एआयला हे काम सोपवून वेळ वाचवू शकतात. याव्यतिरिक्त, एआय व्यवहाराची पुष्टी म्हणून विक्रेत्यांना पेमेंट रिसिप्ट तयार करण्यास आणि पाठवण्यास कार्यक्षम आहे.

बँका चोवीस तास उच्च दर्जाचा ग्राहक सेवा एआयद्वारे देऊ शकतात. उदा.बँका वापरकर्त्याला त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पहिले पाऊल म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचा संदर्भ देऊ शकतात. जर एआय स्वतःहून मदत करू शकत नसेल, तर वापरकर्त्याला मानवी सहाय्यकाशी जोडता येते. या धोरणामुळे कर्मचाऱ्यांचा बराच वेळ वाचू शकतो जो अन्यथा निरर्थक क्रिया आणि चौकशीत वाया जात होता.त्यांच्या प्रश्नांना वेळेवर उत्तरे मिळाल्याने ग्राहकांच्या समाधानाचे प्रमाण देखील वाढेल. खात्यांचे व्यवस्थापन. ग्राहकांना त्यांची आर्थिक खाती व्यवस्थापित करण्यात मदत करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेने वाढवलेल्या बँकिंग प्रणाली प्रोग्राम केल्या जाऊ शकतात.बँक माहिती सुधारणे, स्वयंचलित पेमेंट सेट करणे आणि पेमेंट देय असताना अलर्ट पाठवणे यासारखी अनेक पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करतील, ज्यामुळे कार्यक्षमता वाढेल.

वास्तविक वेळेत धोक्यांना अनुकूल बनवून त्यांना प्रतिसाद देणे, हॅकर्सविरुद्ध एक गतिमान कवच प्रदान करणे. एआय-चालित सुरक्षा प्रणाली असामान्य लॉगिन प्रयत्न किंवा व्यवहार यासारख्या संशयास्पद क्रिया ओळखण्यासाठी मोठ्या प्रमाणात डेटा तपासू शकतात आणि पुढील तपासणीसाठी त्यांना चिन्हांकित करू शकतात. हा सक्रिय दृष्टिकोन केवळ आर्थिक नुकसान टाळत नाही तर संवेदनशील ग्राहक डेटा तडजोड होण्यापासून देखील संरक्षण करतो.

फसवणूक शोधणे

बँका व्यवहारांनी भरलेल्या आहेत, ज्यामुळे फसवणुकीच्या चिन्हे शोधण्यासाठी प्रत्येकाची तपासणी करणे मानवीयदृष्ट्या अशक्य होते. एआय एक सतर्क पर्यवेक्षक म्हणून काम करते, फसव्या क्रियाकलाप शोधण्यासाठी भाकित विश्लेषण आणि नमुना ओळख वापरते. ऐतिहासिक डेटावरून शिकून, एआय मॉडेल सामान्य ग्राहकांच्या वर्तनाचा अंदाज लावू शकतात आणि फसवणूक दर्शविणारे विचलन शोधू शकतात. उदा. जर सामान्यतः लहान स्थानिक खरेदी करणारा ग्राहक अचानक मोठे आंतरराष्ट्रीय व्यवहार करू लागला, तर एआय सिस्टम अलर्ट देऊ शकते. एआय खोटे सकारात्मक कमी करून फसवणूक शोधण्याची अचूकता देखील वाढवते. डेन्मार्कची सर्वात मोठी बँक, बँक हे एक चांगले उदाहरण आहे, ज्याने फसवणूक शोधण्यात एआय यशस्वीरित्या अंमलात आणले, खोटे सकारात्मक 60% कमी केले.

सुधारित API. बँकिंग ऑपरेशन्स ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस (APIs) वर वाढत्या प्रमाणात अवलंबून आहेत जेणेकरून क्लायंटना अनेक ॲप्सवर त्यांचे पैसे ट्रॅक करता येतील. उदा. वापरकर्त्यांना अनेक बँक खात्यांचे निरीक्षण करण्यासाठी, बँकांनी थर्ड-पार्टी बजेटिंग ॲप्सना त्यांचे API वापरण्यासाठी अधिकृतता देणे आवश्यक आहे. एआय नीरस ऑपरेशन्स स्वयंचलित करून आणि नवीन सुरक्षा उपाय उघडून एपीआय अधिक शक्तिशाली बनवते.

अधिक बुद्धिमान ग्राहक साधने.

अधिक बुद्धिमान ग्राहक साधने. जनरेटिव्ह एआयच्या उदयामुळे, बँकिंग आणि गुंतवणूक क्षेत्रे आता ग्राहक सेवा सुधारण्यासाठी अधिक प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करू शकतात. आर्टिफिशियल इंटेलिजेंस-चालित चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंटमध्ये ग्राहकांना स्वतःकिरकोळ समस्या सोडवण्यास मदत करून ग्राहक सेवा सुधारण्याची क्षमता आहे. बजेटिंग ॲप्स, जे वापरकर्त्यांना त्यांचे आर्थिक व्यवस्थापन सुधारण्यास आणि त्यांची बचत वाढविण्यास मदत करतात, ते देखील एआयद्वारे समर्थित केले जाऊ शकतात.

नवीन बाजारपेठा आणि संभावना.

नवीन बाजारपेठांचा शोध घेणाऱ्या कंपन्या त्यांच्या ग्राहकांची सखोल समज मिळविण्यासाठी भाकित विश्लेषणात एआयचा वापर करतात. एआय-चालित भाकित विश्लेषण नवीन कंपनी आणि ग्राहक वाढीच्या संधी ओळखू शकतात आणि कोणत्या क्लायंटना सोडण्याचा धोका आहे याचा अधिक अचूक अंदाज लावू शकतात. उदा. एखादा विशिष्ट ग्राहक त्यांचे खाते बंद करणार आहे की,नाही हे ठरवण्यासाठी, बँका त्यांच्या ग्राहकांच्या वापराच्या पद्धती तपासू शकतात, जसे की ते किती वेळा चेक इन करतात किंवा ठेवी ठेवतात, आणि त्याची इतर डेटाशी तुलना करू शकतात.

लिंकिंग करण्यायोग्य बँकिंग.

लिंकिंग करण्यायोग्य बँकिंग. एआय द्वारे समर्थित, लिंकिंग करण्यायोग्य बँकिंग सेवांना विविध गैर-वित्तीय डिजिटल प्लॅटफॉर्ममध्ये अखंडपणे एकत्रित करण्याची परवानगी देऊन आर्थिक लँडस्केपमध्ये बदल घडवत आहे. हे नवोपक्रम ग्राहकांना ते दररोज वापरत असलेल्या डिजिटल इंटरफेसद्वारे सोयीस्करपणे वित्तीय सेवांमध्ये प्रवेश करण्यास सक्षम करते. एआय वैयक्तिकृत अंतर्दृष्टी प्रदान करते, बँकांना तृतीय-पक्ष प्लॅटफॉर्मवर अनुकूल वित्तीय उत्पादने ऑफर करण्यास अनुमती देते. मशीन लर्निंग अल्गोरिदम आर्थिक गरजांचा अंदाज लावतात, विक्रीच्या ठिकाणी कर्जे सारख्या संबंधित सेवा सुचवतात, ग्राहकांचा खरेदी अनुभव वाढवतात. एआय क्रेडिट मूल्यांकन देखील सुव्यवस्थित करते, या एम्बेड केलेल्या सेवांमध्ये जलद क्रेडिट योग्यता मूल्यांकन सक्षम करते. परिणाम म्हणजे एक घर्षणरहित, अंतर्ज्ञानी बँकिंग अनुभव जो ग्राहकांचे समाधान आणि निष्ठा वाढवतो. शिवाय, एम्बेड करण्यायोग्य बँकिंग बाजारपेठेतील पोहोच वाढवते, वित्तीय संस्थांसाठी नवीन लोकसंख्याशास्त्र आणि संधी उघडते. सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्ममध्ये बँकिंग सेवा, एआय वित्तीय सेवा पूर्वीपेक्षा अधिक सुलभ आणि अनुकूल बनवत आहे. एआय नियमाचे पालन आणि मशीन लर्निंगचा वापर करून बँका क्रेडिट कार्ड, क्रेडिट एक्सटेंशन आणि इतर ग्राहक विनंत्या त्वरित मंजूर किंवा नाकारू शकतात.

बँकिंगमध्ये एआयची आव्हाने

बँकिंगमध्ये एआयच्या एकात्मिकतेमुळे अनेक फायदे झाले आहेत, परंतु ते उद्योगाला तोंड द्यावे लागणारे एक आव्हाने देखील निर्माण करते. मॉडेल बायसमुळे निर्माण होणारे पूर्वग्रह. त्यांच्या कृतींसाठी पारदर्शकता आणि जबाबदारी दाखवण्याच्या प्रयत्नात, बँका पर्यावरणीय, सामाजिक आणि प्रशासन (ESG) प्रकल्पांमध्ये अधिक पैसे गुंतवत आहेत. एआय मॉडेल्सना काही पूर्वग्रह वारशाने मिळू शकतात जे लोकांना प्रभावित करतात कारण त्यांना मानवांनी तयार केलेल्या डेटावर प्रशिक्षित केले जाते. बँकांनी त्यांच्या उत्पादन विपणन आणि क्रेडिट योग्यतेच्या मूल्यांकनातून पूर्वग्रह काढून टाकला पाहिजे, ज्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या विशिष्ट लोकसंख्याशास्त्राचे नुकसान झाले आहे.

AI च्या मदतीने देण्यात येणाऱ्या माहितीची आउटपुटची अचूकता नियंत्रित करण्यात अडचणी

AI च्या मदतीने देण्यात येणाऱ्या माहितीची शुद्धता नियंत्रित करणे कठीण आहे कारण एआय मॉडेल्समध्ये अद्याप त्यांचे आउटपुट तर्क करण्याची किंवा "समजून घेण्याची" क्षमता नाही. त्याऐवजी, एआय मॉडेल्स त्यांना प्रदान केलेल्या डेटामध्ये नमुने शोधून आउटपुट तयार करतात. परिणामी, डेटा चुकीचा किंवा चुकीचा असल्यास मॉडेल कर्मचाऱ्याला माहिती देऊ शकत नाही.

ऑपरेशनल कायदेशीर अनिश्चितता.

जनरेटिव्ह एआय मॉडेल्सचे प्रभावी प्रशिक्षण त्यांना प्रशिक्षित केलेल्या पूर्व-अस्तित्वातील डेटा सेटच्या गुणवत्तेवर आणि प्रासंगिकतेवर अवलंबून असते. बातम्यांचे लेख आणि स्पष्टीकरणात्मक चित्रपट यासारख्या जनतेसाठी मुक्तपणे उपलब्ध असलेल्या डेटाचे परीक्षण करणे कॉपीराइटचे उल्लंघन करते का हा प्रश्न अजूनही

वादविवादासाठी खुला आहे. ग्राहक सेवा रेकॉर्ड किंवा त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या संशोधनासारख्या बँकेच्या मालकीच्या डेटाचा वापर करून प्रशिक्षित केलेल्या एआय मॉडेल्सचा वापर करणे ही या समस्येवर मात करण्याचा एक मार्ग आहे.

सायबर सुरक्षिततेचा प्रश्न

सायबरसुरक्षा जरी एआय तंत्रज्ञानाचे फसवणूक प्रतिबंध आणि अनुपालन व्यवस्थापनात अनुप्रयोग आहेत, जसे की,आपण आधी चर्चा केली आहे, तरीही ते चिंताजनक नाही. एआय मॉडेल्स हे दुष्ट कलासाठी विशेषतः आकर्षक लक्ष्य असल्याने, बँकिंग आयटी सिस्टममध्ये खुले एआय टूल्स आणि तंत्रज्ञान एकत्रित केल्याने काही सुरक्षा समस्या उद्भवतात. यामुळे, बँकांना एआय प्रशासनासाठी एक व्यापक धोरण आवश्यक आहे जे जोखीम व्यवस्थापन आणि नवोपक्रम यांच्यात यशस्वीरित्या संतुलन साधते. परंतु असे काही दिसत नाही त्यामुळे सायबर सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो.

सारांश

बँकिंगमध्ये एआयने सादर केलेल्या आव्हानांना प्रभावीपणे तोंड देण्यासाठी, वित्तीय उद्योगाच्या विशिष्ट मागण्यांनुसार एआय उपाय तयार करणे अत्यंत महत्वाचे आहे. तंत्रज्ञान आणि वित्तीय अत्याधुनिक एआय मॉडेल्सना बँकिंग सेवांमध्ये प्रभावीपणे बँकिंग क्षेत्रासाठी एआय एक मोठी संधी सादर करते, या विभागात, वित्तीय उद्योग तज्ञांनी असे सूचित केले की,त्यांच्या व्यवसायाच्या यशात एआयने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. परंतु ते अनेक आव्हाने देखील समोर आणते ज्यासाठी धोरणात्मक नियोजन आणि कुशल भागीदारासह सहकार्य आवश्यक असते. हे अंतर्दृष्टी अशा बँकांसाठी आहेत ज्या त्यांच्या बँकिंग सेवांमध्ये एआय प्रभावीपणे अंमलात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रभावी एआय प्रशासन पारदर्शकता, जबाबदारी आणि एआयचा नैतिक वापर सुनिश्चित करते आणि देखरेख यंत्रणा तयार करण्यासाठी बँकांशी सहयोग करते.

निष्कर्ष

AI चा वापर करून बँका चोवीस तास उच्च दर्जाचा ग्राहक सेवा एआयद्वारे देऊ शकतात.वित्तीय संस्था कामांना स्वयंचलित करण्यासाठी, अचूकता, वाढविण्यासाठी आणि प्रक्रियांना गती देण्यासाठी एआयचा वापर करू शकतात, ज्यामुळे खर्चात बचत होईल आणि कार्यक्षमता सुधारेल. एआयद्वारे समर्थित व्हर्च्युअल असिस्टंट आणि चॅटबॉट्स मानवी सहभागाची आवश्यकता कमीत कमी करून ग्राहकांना चोवीस तास सेवा देऊ शकतात. हॅकर्सविरुद्ध एक गतिमान कवच प्रदान करणे,प्रश्नांना वेळेवर उत्तरे मिळाल्याने ग्राहकांच्या समाधानाचे प्रमाण देखील वाढेल.व्यवहार डेटा किंवा क्रेडिट स्कोअर, क्रेडिट जोखीम लवकर ओळखण्यासाठी आणि संस्थेला तोट्यापासून वाचवण्यासाठी मदत होऊ शकते.

संदर्भसूची

1. https://www.claysys.com
2. https://www.avenga.com
3. https://www.tnpconsultants.com
4. https://www.xenonstack.com.
5. यूट्यूब चैनल
6. प्रतियोगिता दर्पण
7. योजना
8. दैनिक लोकसत्ता
9. दैनिक महाराष्ट्र टाइम्स

"महाराष्ट्रातील कृषी आधारित उद्योगांचा विकास आणि आव्हाने: जळगाव जिल्ह्याचा एक विशेष अभ्यास"

डॉ. विजयानंद अभिमन वारडे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगाव, जिल्हा. जळगाव.

सारांश (Abstract)

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील कृषी आधारित उद्योगांचा विकास, त्यांची सध्यस्थिती आणि त्यांच्यासमोरील विविध आव्हानांचा अभ्यास करण्यात आला असून, जळगाव जिल्ह्याचा विशेष संदर्भ घेतला आहे. महाराष्ट्र हे कृषी व उद्योग या दोन्ही क्षेत्रांमध्ये प्रगतीशील राज्य म्हणून ओळखले जाते. विशेषतः जळगाव जिल्हा हा केळी, कापूस, डाळिंब यांसारख्या नगदी पिकांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असून, या पिकांवर आधारित अनेक उद्योगांची येथे साखळी विकसित झालेली आहे.

जळगाव जिल्ह्यातील केळी प्रक्रिया उद्योग, कापूस जिनिंग आणि प्रेसिंग उद्योग, तसेच फळ प्रक्रिया उद्योग यांचा स्थानिक अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडतो. या उद्योगांमुळे केवळ शेतमालाला मूल्यवर्धन (Value Addition) होत नाही, तर ग्रामीण भागात रोजगाराच्या संधीही निर्माण होतात. त्यामुळे कृषी आणि उद्योग यामधील परस्परसंबंध अधिक दृढ होत असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत अभ्यासामध्ये या उद्योगांचे स्वरूप, त्यांची उत्पादन क्षमता, बाजारपेठेतील स्थिती, तसेच आर्थिक योगदान यांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. याशिवाय, कच्च्या मालाची उपलब्धता, तांत्रिक साधनसंपत्ती, वित्तीय सहाय्य, वाहतूक सुविधा आणि बाजारपेठेतील स्पर्धा यांसारख्या घटकांचा उद्योगांच्या विकासावर होणारा परिणाम तपासण्यात आला आहे.

संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला असून, स्थानिक उद्योगधारक, शेतकरी आणि संबंधित तज्ञ यांच्याशी संवाद साधून प्रत्यक्ष माहिती संकलित करण्यात आली आहे. तसेच सरकारी अहवाल, संशोधन लेख आणि इतर अधिकृत स्त्रोतांचा अभ्यास करून विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात आली आहे.

अभ्यासातून असे निष्पन्न होते की, जळगाव जिल्ह्यात कृषी आधारित उद्योगांना मोठी संधी उपलब्ध असली तरी पायाभूत सुविधांची कमतरता, वित्तपुरवठ्याची अडचण, तांत्रिक मर्यादा आणि बाजारपेठेतील अस्थिरता ही प्रमुख आव्हाने आहेत. त्यामुळे या उद्योगांच्या शाश्वत विकासासाठी धोरणात्मक नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब आणि प्रभावी विपणन व्यवस्था आवश्यक आहे.

प्रस्तावना (Introduction)

कृषी आधारित उद्योग (Agro-based Industries) हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानले जातात. शेतीमालाचे उत्पादन आणि त्याचे बाजारपेठेत रूपांतर यामधील महत्त्वाचा दुवा म्हणून हे उद्योग कार्य करतात. कृषी क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या कच्च्या मालाला प्रक्रिया, साठवण, वाहतूक आणि विपणन यांद्वारे मूल्यवर्धन (Value Addition) करून त्याचे आर्थिक मूल्य वाढविण्याचे कार्य या उद्योगांद्वारे केले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसोबतच ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक विकासालाही चालना मिळते.

महाराष्ट्र राज्यात कृषी आणि उद्योग यांचा समतोल विकास साधण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे. विशेषतः फळ प्रक्रिया उद्योग, कापूस प्रक्रिया उद्योग, साखर उद्योग आणि दुग्धव्यवसाय यांसारख्या क्षेत्रांनी राज्याच्या

अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्हा हा कृषी आधारित उद्योगांच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून उदयास आला आहे. जळगाव जिल्हा 'सुवर्णनगरी' म्हणून ओळखला जातो, तसेच 'कृषी पंढरी' ही उपाधीही त्याला प्राप्त झाली आहे. जिल्ह्यातील अनुकूल हवामान, काळी सुपीक मृदा आणि उपलब्ध जलस्रोत यांमुळे येथे केळी, कापूस आणि इतर नगदी पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. विशेषतः केळी उत्पादनात जळगाव जिल्ह्याने राष्ट्रीय पातळीवर आपली ओळख निर्माण केली आहे. या पिकांवर आधारित केळी प्रक्रिया उद्योग, कापूस जिनिंग आणि प्रेसिंग उद्योग, तसेच फळ प्रक्रिया उद्योग यांचा येथे मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे.

या उद्योगांमुळे केवळ कृषी उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळत नाही, तर स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि ग्रामीण भागातील आर्थिक चक्र गतिमान होते. तथापि, या क्षेत्राला अनेक आव्हानांचाही सामना करावा लागत आहे. कच्च्या मालाच्या किमतीतील चढ-उतार, अपुरी पायाभूत सुविधा, तांत्रिक मर्यादा, वित्तीय अडचणी आणि बाजारपेठेतील स्पर्धा यांचा उद्योगांच्या वाढीवर परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनामध्ये जळगाव जिल्ह्याचा विशेष संदर्भ घेऊन कृषी आधारित उद्योगांचा विकास, त्यांचे स्वरूप आणि त्यांच्यासमोरील प्रमुख आव्हाने यांचा सखोल अभ्यास करण्यात येत आहे. या अभ्यासातून कृषी आणि उद्योग यामधील परस्परसंबंध अधिक स्पष्ट होऊन, ग्रामीण विकासासाठी या क्षेत्राची भूमिका अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study): प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश जळगाव जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योगांचा विकास, त्यांची सध्यस्थिती आणि त्यांच्यासमोरील आव्हाने यांचा सखोल अभ्यास करणे हा आहे. या व्यापक उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी पुढील विशिष्ट उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) **जळगाव जिल्ह्यातील प्रमुख कृषी आधारित उद्योगांचा आढावा घेणे :** जिल्ह्यात कार्यरत असलेल्या केळी प्रक्रिया उद्योग, कापूस जिनिंग व प्रेसिंग उद्योग, तसेच फळ प्रक्रिया आणि इतर संबंधित उद्योगांचे स्वरूप, रचना आणि कार्यपद्धती यांचा सविस्तर अभ्यास करणे.

२) **या उद्योगांचा स्थानिक रोजगारावर होणारा परिणाम अभ्यासणे :** कृषी आधारित उद्योगांमुळे स्थानिक पातळीवर निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींचा अभ्यास करणे, तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील रोजगारनिर्मितीमध्ये या उद्योगांचे योगदान किती आहे, हे विश्लेषित करणे.

३) **कृषी उद्योगांसमोरील तांत्रिक आणि आर्थिक समस्यांचे विश्लेषण करणे :** या उद्योगांना भेडसावणाऱ्या प्रमुख अडचणी जसे की आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, उत्पादन खर्चातील वाढ, वित्तपुरवठ्याच्या मर्यादा, पायाभूत सुविधांची कमतरता आणि बाजारपेठेतील स्पर्धा यांचा सखोल अभ्यास करणे.

४) **जळगावमधील कृषी उद्योगांच्या भविष्यातील संधी शोधणे :** स्थानिक उपलब्ध संसाधने, वाढती मागणी, निर्यात क्षमता आणि शासनाच्या धोरणांच्या पार्श्वभूमीवर कृषी आधारित उद्योगांच्या विकासासाठी उपलब्ध असलेल्या संधींचा शोध घेणे आणि त्यांची संभाव्यता तपासणे.

जळगाव जिल्ह्यातील प्रमुख कृषी आधारित उद्योग (Key Agro-based Industries in Jalgaon District)

जळगाव जिल्हा हा कृषी उत्पादनाच्या दृष्टीने समृद्ध असून, त्या उत्पादनावर आधारित विविध उद्योगांची येथे लक्षणीय वाढ झालेली आहे. स्थानिक पातळीवर उपलब्ध कच्चा माल, अनुकूल हवामान आणि वाढती बाजारपेठ यांमुळे कृषी आधारित उद्योगांना येथे विशेष चालना मिळाली आहे. जिल्ह्यात प्रामुख्याने पुढील उद्योगांचे प्राबल्य दिसून येते:

१) कापूस प्रक्रिया उद्योग (Ginning and Pressing Industries): जळगाव जिल्हा कापूस उत्पादनासाठी ओळखला जात असल्यामुळे येथे कापूस जिनिंग आणि प्रेसिंग उद्योग मोठ्या प्रमाणात विकसित झाले आहेत. या

उद्योगांद्वारे कच्च्या कापसाचे प्रक्रियायुक्त कापूस (Lint) आणि बियाणे वेगळे केले जाते, ज्याचा वापर वस्त्रोद्योगात केला जातो. तसेच काही ठिकाणी सूतगिरण्या (Spinning Mills) कार्यरत असून, त्या कापसापासून सूत निर्मिती करतात. या उद्योगांमुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती होत असून, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी स्थिर बाजारपेठ उपलब्ध होते.

२) केळी प्रक्रिया उद्योग (Banana Processing Industries): जळगाव जिल्हा 'केळी उत्पादनाचे केंद्र' म्हणून देशभरात प्रसिद्ध आहे. या पार्श्वभूमीवर केळीवर आधारित विविध प्रक्रिया उद्योग येथे विकसित झाले आहेत. केळीपासून पावडर, वेफर्स, पल्प, तसेच केळीच्या खोडापासून तंतू (Fiber) तयार करण्याचे लघुउद्योग वाढत आहेत. याशिवाय, निर्यातीसाठी आवश्यक असलेली 'कोल्ड स्टोरेज' आणि 'रायपनिंग चेंबर्स'ची साखळी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. या उद्योगांमुळे केळी उत्पादनाला मूल्यवर्धन होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते.

३) डाळ प्रक्रिया उद्योग (Pulse Processing Mills): जळगाव जिल्हा हा डाळ प्रक्रिया उद्योगासाठीही महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून ओळखला जातो. येथे मोठ्या प्रमाणात डाळ मिल्स कार्यरत असून, कडधान्यांची प्रक्रिया करून तयार केलेल्या डाळीचा पुरवठा राज्याबरोबरच देशभर केला जातो. या उद्योगांमुळे स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला चांगली बाजारपेठ मिळते आणि व्यापारिक व्यवहारांना चालना मिळते.

४) सिंचन साहित्य उद्योग (Irrigation Equipment Industry): जळगाव जिल्हा ठिबक (Drip) आणि तुषार (Sprinkler) सिंचन साधनांच्या उत्पादनासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळखला जातो. विशेषतः Jain Irrigation Systems Ltd. सारख्या अग्रगण्य कंपनीमुळे या क्षेत्राला मोठी गती मिळाली आहे. या उद्योगांद्वारे आधुनिक सिंचन तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन पाण्याचा कार्यक्षम वापर शक्य झाला आहे, ज्याचा शेती उत्पादनक्षमतेवर सकारात्मक परिणाम दिसून येतो.

संशोधन कार्यपद्धती (Research Methodology) : प्रस्तुत संशोधनामध्ये जळगाव जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योगांचा विकास, त्यांची सध्यस्थिती आणि त्यांच्यासमोरील आव्हाने यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक (Descriptive) आणि विश्लेषणात्मक (Analytical) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या माहितीचा उपयोग करण्यात आला आहे.

१) माहितीचे स्त्रोत (Sources of Data): या संशोधनासाठी माहिती संकलन करताना दोन प्रमुख स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे:

(अ) प्राथमिक माहिती (Primary Data): प्राथमिक माहिती संकलनासाठी जळगाव जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योगांशी संबंधित उद्योजकांशी थेट संपर्क साधून मुलाखती (Interviews) घेण्यात आल्या आहेत. या मुलाखतींमधून उद्योगांचे स्वरूप, उत्पादन प्रक्रिया, आर्थिक अडचणी, बाजारपेठेतील परिस्थिती आणि भविष्यातील संधी याबाबत सखोल माहिती मिळविण्यात आली आहे.

(ब) दुय्यम माहिती (Secondary Data): दुय्यम माहिती संकलनासाठी सरकारी अहवाल, उद्योगविषयक प्रकाशने, संशोधन लेख, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटवरील विश्वसनीय स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. या माध्यमातून विषयाची सैद्धांतिक पार्श्वभूमी आणि व्यापक संदर्भ स्पष्ट करण्यात आला आहे.

२) नमुना निवड (Sampling): या अभ्यासासाठी जळगाव जिल्ह्यातील एम.आय.डी.सी. (MIDC) क्षेत्रातील निवडक १० ते १५ उद्योजकांची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे. नमुना निवड करताना उद्योगांचा प्रकार, आकारमान आणि अनुभव यांचा विचार करण्यात आला आहे, ज्यामुळे विविध प्रकारच्या कृषी आधारित उद्योगांचे प्रतिनिधित्व होऊ शकले. या उद्योजकांकडून मुलाखतीद्वारे गुणात्मक माहिती संकलित करण्यात आली आहे.

३) संशोधनाची व्याप्ती (Scope of the Study): प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती जळगाव जिल्ह्यातील काही निवडक औद्योगिक आणि कृषी केंद्रांपुरती मर्यादित आहे. विशेषतः जळगाव, भुसावळ आणि एरंडोल या तालुक्यांमधील कृषी आधारित उद्योगांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या क्षेत्रांची निवड करताना तेथील औद्योगिक विकास, कृषी उत्पादन आणि बाजारपेठेतील महत्त्व लक्षात घेण्यात आले आहे.

४) माहिती विश्लेषण पद्धती (Data Analysis Technique): संकलित माहितीचे वर्गीकरण, सारणीकरण आणि विश्लेषण करण्यात आले आहे. गुणात्मक माहितीचे विवेचनात्मक (Interpretative) पद्धतीने विश्लेषण करण्यात आले असून, आवश्यकतेनुसार साध्या सांख्यिकी तंत्रांचा वापर करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

जळगावमधील कृषी उद्योगांचे योगदान (Contribution of Agro-based Industries in Jalgaon)

जळगाव जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योगांनी स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या उद्योगांचे योगदान विविध स्तरांवर जाणवून येते:

१) रोजगार निर्मिती : कृषी आधारित उद्योगांमुळे ग्रामीण आणि अर्धनगरी भागातील युवक व महिलांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. विशेषतः केळी प्रक्रिया, कापूस जिनिंग आणि डाळ प्रक्रिया उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर श्रमशक्तीची गरज भासते, ज्यामुळे स्थलांतर कमी होऊन स्थानिक अर्थचक्र गतिमान राहते.

२) शेतकऱ्यांना योग्य दर (Remunerative Prices) : प्रक्रिया उद्योग स्थानिक पातळीवर उपलब्ध असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची विक्री सुलभ होते. वाहतूक खर्च कमी होतो आणि मध्यस्थांची संख्या घटते, परिणामी शेतमालाला तुलनेने चांगला आणि स्थिर भाव मिळण्यास मदत होते.

३) मूल्यवर्धन आणि औद्योगिक विकास : कच्च्या कृषी उत्पादनाचे प्रक्रियायुक्त उत्पादनामध्ये रूपांतर केल्यामुळे त्याचे आर्थिक मूल्य वाढते. यामुळे स्थानिक उद्योगांना चालना मिळून जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला गती मिळते.

४) निर्यात आणि परकीय चलन मिळवणे : जळगाव जिल्ह्यातील केळी आणि कापूस यांसारखी उत्पादने आखाती देशांसह इतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निर्यात केली जातात. त्यामुळे देशाला परकीय चलन मिळविण्यात मदत होते आणि जिल्ह्याची जागतिक ओळख निर्माण होते.

७. समस्या आणि आव्हाने (Challenges of Agro-based Industries) जरी कृषी आधारित उद्योगांनी जळगाव जिल्ह्याच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले असले तरी या क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत:

१) विजेची समस्या : भारनियमन (Load Shedding) आणि विजेचे वाढते दर हे उद्योगांसाठी मोठे आव्हान ठरते. अनियमित वीजपुरवठ्यामुळे उत्पादन प्रक्रियेत अडथळे येतात आणि एकूण उत्पादन खर्चात वाढ होते.

२) कच्च्या मालाची अनिश्चित उपलब्धता : हवामान बदल, अवेळी पाऊस, गारपीट आणि दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक घटकांमुळे कृषी उत्पादनावर परिणाम होतो. परिणामी उद्योगांना आवश्यक असलेला कच्चा माल वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही.

३) अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव : जिल्ह्यातील अनेक लघु आणि मध्यम उद्योग आजही पारंपरिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. आधुनिक यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञानाचा अभाव असल्यामुळे उत्पादनक्षमता कमी राहते आणि जागतिक स्पर्धेत टिकून राहणे कठीण होते.

४) भांडवलाची कमतरता : नवीन उद्योग सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान उद्योगांचा विस्तार करण्यासाठी आवश्यक भांडवल सहज उपलब्ध होत नाही. कर्जप्रक्रिया क्लिष्ट असणे, उच्च व्याजदर आणि हमीची अट यांमुळे उद्योजकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लाग

शिफारसी (Recommendations) प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षांच्या आधारे जळगाव जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योगांच्या शाश्वत विकासासाठी पुढील शिफारसी मांडता येतात:

१) विशेष 'ॲग्रो क्लस्टर'ची निर्मिती : केळी आणि कापूस प्रक्रिया उद्योगांसाठी जिल्ह्यात विशेष 'ॲग्रो क्लस्टर' विकसित करणे आवश्यक आहे. अशा क्लस्टरमुळे कच्च्या मालाची सुलभ उपलब्धता, आधुनिक प्रक्रिया सुविधा, साठवण व्यवस्था आणि विपणन साखळी एकाच ठिकाणी उपलब्ध होऊ शकते. यामुळे उत्पादन खर्चात बचत होऊन उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल.

२) शीतगृह (Cold Storage) सुविधांचा विस्तार : ग्रामीण भागात शीतगृहांची संख्या वाढवण्यासाठी शासनाने अनुदाने आणि कर सवलती द्याव्यात. विशेषतः केळीसारख्या नाशवंत पिकांसाठी साठवण क्षमता वाढविणे अत्यावश्यक आहे. यामुळे पिकांची नासाडी कमी होऊन शेतकऱ्यांना योग्य वेळेस आणि चांगल्या किमतीत माल विक्री करता येईल.

३) कौशल्य विकास आणि प्रशिक्षण कार्यक्रम : उद्योजक, कामगार आणि शेतकरी यांच्यासाठी नियमित कौशल्य विकास (Skill Development) प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गुणवत्ता नियंत्रण, प्रक्रिया तंत्रे आणि विपणन कौशल्ये यांबाबत प्रशिक्षण दिल्यास उद्योगांची कार्यक्षमता आणि गुणवत्ता दोन्ही वाढू शकतात.

४) आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब : लघु आणि मध्यम उद्योगांनी उत्पादन प्रक्रियेत आधुनिक यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करावा यासाठी शासनाने प्रोत्साहनपर योजना राबवाव्यात. यामुळे उत्पादनक्षमता वाढून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करण्यास मदत होईल.

५) वित्तीय सहाय्य सुलभ करणे :उद्योजकांना कर्ज प्रक्रिया सुलभ करून कमी व्याजदरात वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. विशेषतः नवउद्योजकांसाठी स्टार्टअप स्वरूपाच्या योजना आणि अनुदाने उपलब्ध करून दिल्यास उद्योग क्षेत्रात नवीन गुंतवणूक वाढेल.

६) विपणन आणि निर्यात प्रोत्साहन : कृषी आधारित उत्पादनांच्या विक्रीसाठी प्रभावी विपणन साखळी विकसित करणे आणि निर्यात सुलभ करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि गुणवत्ता मानकांचे पालन केल्यास जळगाव जिल्ह्यातील उत्पादने जागतिक बाजारपेठेत अधिक प्रभावीपणे पोहोचू शकतात.

निष्कर्ष (Conclusion): प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्टपणे दिसून येते की जळगाव जिल्ह्यात कृषी आधारित उद्योगांच्या विकासासाठी प्रचंड क्षमता उपलब्ध आहे. जिल्ह्यातील अनुकूल भौगोलिक परिस्थिती, सुपीक मृदा, तसेच केळी आणि कापूस यांसारख्या नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर होणारे उत्पादन हे या उद्योगांच्या वृद्धीसाठी पोषक घटक ठरतात. कृषी आणि उद्योग यामधील सशक्त दुवा म्हणून हे उद्योग ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देत असून, रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाढ यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत., या क्षेत्रासमोरील तांत्रिक मर्यादा, पायाभूत सुविधांची कमतरता, अनियमित वीजपुरवठा, तसेच वित्तीय अडचणी या समस्या उद्योगांच्या सर्वांगीण विकासात अडथळा निर्माण करतात. यामुळे उपलब्ध क्षमतेचा पूर्णतः उपयोग होत नाही.जर शासनाच्या पातळीवरून योग्य धोरणात्मक पाठबळ, सुलभ वित्तीय सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार आणि प्रभावी विपणन व्यवस्था उपलब्ध करून दिली गेली, तर जळगाव जिल्हा महाराष्ट्राच्या कृषी-औद्योगिक विकासात एक अग्रगण्य केंद्र म्हणून उदयास येऊ शकतो. विशेषतः 'मूल्यवर्धन' (Value Addition) या संकल्पनेवर अधिक भर दिल्यास कृषी उत्पादनांचे आर्थिक मूल्य वाढून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यास मदत होऊ शकते.

संदर्भ सूची (References)

1. जिल्हा सांख्यिकीय अहवाल - जळगाव (२०२३-२४).
2. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अहवाल.
3. कृषी पणन मंडळ, महाराष्ट्र शासन.
4. अधिकृत संकेतस्थळे (Government Websites)
5. उद्योगविषयक अहवाल व प्रकाशने

समता सैनिक दलाचे आंबेडकरी चळवळीतील योगदान

प्रा. डॉ. प्रदिप षामरावजी ढोले
इतिहास विभाग प्रमुख
स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, वरूड,जि. अमरावती, महा. – 444906

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेले समता सैनिक दल म्हणजे दलित समाजातील तरूणांचे प्रशिक्षित संघटन होते. सन १९२७ साली महाडच्या सत्याग्रहाचे कार्य निर्विघ्नपणे आणि यशस्वीतेने पार पाडताना या दलाची आवश्यकता व महत्व स्पष्ट झाले होते. 'सनातनी स्पृश्य हिंदूकडून अस्पृश्यावर होणारा अन्याय, जोर, जुलूम व त्यांना मिळणारी विषमतेची वागणूक आदि प्रकाराला आळा घालून सामाजिक समतेचे पवित्र कार्य करण्यासाठीच या दलाची स्थापना झाली आहे.' असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.[१] महाडच्या चवदार तळे सत्याग्रहानंतर, नाशिकचे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, पुण्याचा पर्वती सत्याग्रह, गोलमेज परिषदा, डिप्रेस्ड क्लासेस दलित फेडरेशन, स्वतंत्र मजूर पक्ष, ऑल इंडिया शेड्युल कास्ट फेडरेशन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर इत्यादी प्रसंगी समता सैनिक दलाचे अन्यनसाधारण महत्व स्पष्ट झाले होते. एकप्रकारे आंबेडकरी चळवळीचे संरक्षण व संवर्धन करण्याचे काम समता सैनिक दलाकडून झाले असे दिसून येते.

समता सैनिक दलाचे ध्येय, धोरण व कार्यक्रम :–

वंश, धर्म, जात, लिंग वा वर्ग यावर अधारलेली सर्व प्रकारची विषमता आढळल्यास ती नष्ट करणे आणि स्वातंत्र्य, समता, बंधूता या पायावर नवीन समाजरचना प्रस्थापित करण्याच्या लढ्यसाठी सर्व अस्पृश्य जाती – जमातींची पोलादी एकजुट निर्माण करणे. या उद्देशपुर्तीकरीता समता सैनिक दलाने पुढील कार्यक्रम आखला होता.

1. भारतातील सामाजिकदृष्ट्य दुर्लक्षित पिडीत, तळागाळातील लोकांना आणि अस्पृश्य समाजाच्या तरूणांना एकत्रीत करून समता सैनिक दलाची संघटना उभारणे.
2. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजातील तरूणांत स्वाभिमान, स्वावलंबन व स्वार्थ त्यागाची भावना वाढविण्यासाठी समता सैनिक दल समाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि इतर कार्यास उत्तेजन देईल.
3. समता सैनिक दलाच्या उपरोक्त ध्येय धोरणाचा पुरस्कार करण्यास सहाय्य करणाऱ्या आंबेडकरी पक्ष वा संस्थांशी समता सैनिक दल सहकार्य करेल.
4. डॉ. आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या संस्था व्यतिरिक्त अन्य संस्थांशी, चळवळीशी समता सैनिक दल संबंध ठेवणार नाही.
5. समता सैनिक दल भारतीय संघराज्यातील प्रत्येक राज्यात, जिल्ह्यात, तालुक्यात, शहरात आणि खेडेगावात शाखांची उभारणी करेल.
6. समता सैनिक दलांची संपुर्ण रचना लष्करी पध्दतीची राहील.
7. समाता सैनिक दलाची महिला आघाडी तसेच बाल स्वयंसेवक आघाडी (विभाग) चालविण्यात येईल[२]

सभासदत्व :–

समता सैनिक दलाचे वरील ध्येय व उद्देश मान्य करणाऱ्या कोणत्याही भारतीय नागरीकास समता सैनिक दलाचे सभासदत्व स्वीकारता येईल. सभासदत्व स्वीकारणाऱ्या व्यक्तीस प्रथम दलाचा गणवेश तयार करून समता सैनिक दल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन गोकुळदास पास्ता रोड, दादर (पुर्व) मुंबई . ४०००१४ येथील मुख्य कार्यालयात सभासदत्वाची नोंदणी करावी लागत. सभासद फी वार्षिक पाच रूपये तर बाल स्वयंसेवकास एक रूपया वार्षिक वर्गणी द्यावी लागत. सभासदाला सदस्यत्व देणे अथवा काढून टाकणे तसेच एखाद्या अधिकाऱ्याची नेमणुक करणे अथवा त्याला निलंबीत करण्याचा पुर्ण अधिकार 'हेडक्वार्टस्' आणि 'ऑड इंडिया कमांडर इन चीफ' यांचा होता.[३]

गणवेश :–

सैनिकाकरीता खाकी फुल पॅन्ट, सफेद हॉप शर्ट त्याला दोन खिसे, शोल्डरवर बॅच, निळी टोपी, शक्यतो बुट तर अधिकाऱ्यास खाकी फुल पॅन्ट, सफेद फुल शर्ट, त्याला दोन खिसे, शोल्डरवर बॅच, निळी

टोपी, हुद्याचा टोपीवरील बॅच, बुट आवश्यक, शर्टवरील खिशावर नावाची पाटी त्यावरील आधिकाऱ्यास ऑफिसर कोट असे. महिला स्वयंसेवकास सफेद साडी, निळा ब्लाऊज व बॅच असे.

शिस्त :—

सैनिक किंवा अधिकऱ्यांने धुम्रपान, मद्यपान, वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशाचा भंग किंवा इतर गैरवर्तन केल्याचे निदर्शनाास आल्यास प्रथम त्याला समज देण्यात येई. यानंतरही त्याने आपली वर्तणूक सुधारली नाही तर त्याचा गणवेश व हुद्दा काढुन त्याला दलातुन काढून टाकण्यात येई.[४] एकुणच दलाची रचना लष्कारी धर्तीची असल्यामुळे दलात शिस्तीला अत्यंत महत्व होते. दलात प्रवेश घेतांनाच सभासदाला समता सैनिक दलाचे ध्येय, धोरण मान्य असल्याचे लिहुन द्यावे लागत असे.

समता सैनिक दलाचे शिक्षण आणि सर्वसाधारण नियम :—

1. समता सैनिक दलातील शिक्षण बौध्दिक, आर्थिक, नैतिक, शारिरीक व प्रामुख्याने लष्करी स्वरूपाचे राहील.
2. समता सैनिक दल शिक्षणासाठी कॅम्पस, शिक्षण वर्ग, मेळावे, शिबीरे, व्याख्याने, वादविवाद स्पर्धा, वाचनालये, प्रथमोपचार, रक्तदान या व अन्य स्वरूपाच्या गोष्टी वेळोवेळी करेल.
3. समता सैनिक दलाची संघटना निर्दोष बांधण्याची जबाबदारी त्या — त्या राज्य व जिल्हा अधिकाऱ्यांची राहील.
4. प्रत्येक सैनिकांची नोंद स्थानिक शाखा तसेच हेडक्वार्टर्स मुंबई येथे झालीच पाहिजे.
5. सभासद नोंदणी फी जमा रकमेपैकी ६० टक्के रक्कम हेडक्वार्टर्स मुंबई येथे पाठवावी, ४० टक्के रकमेचा विनियोग त्या — त्या शाखेस करता येईल.
6. समता सैनिक दलाची अखिल भारतीय रॅली संचलन व परिषद कमीत कमी दोन वर्षातुन एकदा झाली पाहिजे.
7. समता सैनिक दलाचे वर्ष १ जानेवारी ते ३१ डिसेंबर असे राहील.[५]

समता सैनिक दलाचा ध्वज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि. ६ मे १९४७ रोजी मान्यता दिल्याप्रमाणे आहे. त्यानुसार ध्वज हा निळा रंगाचा असून त्याची लांबी ४ फुट तर रूंदी २।। फुट राहील व आरे सोडून मध्ये राहणाऱ्या वर्तुळाकृतीत S.S.D ही इंग्रजी अक्षरे असतील.

समता सैनिक दलाचे विदर्भातील कार्य :—

मुंबई प्रमाणेच विदर्भातही समात सैनिक दलाच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. दि. १ जानेवारी १९३३ रोजी काही निष्ठावंत कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन नागपुर येथे 'समता सैनिक दलाची' स्थापना केली. दलाचे प्रथम अध्यक्ष म्हणून विर लक्ष्मण गंभीराजी नारायणे तर सेक्रेटरी म्हणुन रामचंद्र दुधे यांची नियुक्ती करण्यात आली होती.[६] याचप्रमाणे विदर्भात अनेक ठिकाणी समता सैनिक दलाच्या शाखा स्थापन करण्यात आल्या होत्या. २१ जानेवारी १९३४ रोजी अस्पृश्य नागरिकांनी एकत्र येवून आंबेडकर समता सैनिक दलाची स्थापना करून अध्यक्ष संत अढूबाबा, उपाध्यक्ष शिवराम वेलजी, राजाभाऊ सोमाजी मंडवधरे, खजिनदार — बाळाराम चिंधुजी उके, सेक्रेटरी हरीभाऊ पुजाजी चव्हाण, नारायण मारूती इंगळे, बाजीराव धोंडूजी पाटील व ऑडीटर सुखेदव परसराम चवरे यांची निवड होऊन या दलाने अस्पृश्य वर्गातील होतकरू गरीब मुलांना मदत करणे, सामाजिक — धार्मिक सुधारणा घडवून आणणे, समतेची, बंधुत्वाची भावना वृध्दीगत करणे.[७] प्रथमत: दलित फेडरेशनच्या नेतृत्वात या दलाचे कार्य चालविले जात असे. परंतु सन १९३२—३३ पासून या प्रातांत 'समता सैनिक दल' अधिकच सक्रिय झालेले दिसून येते.

समता सैनिक दलाने आपले संघटन अधिक मजबूत करण्यासाठी दि. ८ ते १७ मार्च १९३३ दरम्यान संपुर्ण नागपुर शहरात प्रचार सभांचे आयोजन केले होते. त्याचबरोबर दलित फेडरेशनचे सभासद बनविण्याची मोहीमसुध्दा सुरू केली होती. १९३३ मध्ये समता सैनिक दलाचे प्रमुख पदाधिकारी पुढीलप्रमाणे होते. श्री. पंडीत रेवाराम कवाडे, श्री. शंकरराव मेश्राम, श्री. विट्ठलराव साळवे, श्री. रामचंद्र दुधे, हेड कॅप्टन, श्री. लक्ष्मण गंभीरा नारायणे, हेड कॅप्टन, श्री. विनायक जगन्नाथ चनगोले, हेड कॅप्टन.[८]

समता सैनिक दलाच्या दरवर्षी निवडणुका होऊन मोहल्यावर कप्तानाची नियुक्ती केल्या जात असे.[९] हे कप्तान आपआपल्या मोहल्यातील समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकाचे नेतृत्व करून आपल्या समाजाच्या संरक्षणासाठी सिध्द राहत. डॉ. आंबेडकरांच्या जयंती उत्सवा प्रसंगी दलातर्फे मोठया शिस्तीने मिरवणूक काढली जात, गीते गायली जात. डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजुर पक्ष स्थापन केल्यानंतर या दलाने मजूर

पक्षांतर्गत काम करावे म्हणून सभा भरवून ठराव घेण्यात आले होते. त्याचप्रमाणे दलाने स्वतंत्र मजूर पक्षांतर्गत कार्य केल्यांचे दिसून येते.

दि. २१ सप्टेंबर १९४० रोजी पारडी, जि. नागपुर येथे स्वतंत्र मजुर पक्षाचे प्रांतिक सेक्रेटरी रेवाराम कवाडे यांचे अध्यक्षतेखाली समता सैनिक दलाच्या विद्यमाने जाहिर सभा घेण्यात आली होती. सभेला एच. एल. कोसारे, मेश्राम, निकोसे उपस्थित होते. श्री. कोसारे यांनी समता सैनिक दल व स्वतंत्र मजुर पक्षाच्या कार्याची माहिती देऊन डॉ. आंबेडकरांच्या कार्याप्रमाणे सर्वांनी आपले कार्य संघटीत केले पाहिजे आणि चळवळ अधिक जोरदार करण्याकरीता सर्वांनी झटले पाहिजे असे मत मांडून सभेत खालील ठराव पास करण्यात आले आहे.

1. अखिल भारतीय अस्पृश्यांचे एकमेव पुढारी आणि स्वतंत्र मजूर पक्षाचे जनक डॉ. आंबेडकर यांना ना. व्हाईसरॉयच्या कौंसिलमध्ये घेण्यात यावे आणि अस्पृश्य समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणत कौंसिलमध्ये जागा देण्यात याव्यात.
2. सद्या चालू असलेल्या युध्दात ब्रिटीश सरकारला यश मिळावे.
3. डॉ. मुजे यांनी पत्रक काढून हिंदू महासभेच्या संमतीने अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी ना. व्हाईसरॉयच्या कौसिलवर घेण्यात यावे असे म्हटले आहे. परंतू ही सभा डॉ. मुंजेच्या पत्रकाचा तीव्र निषेध करीत असून हिंदू महासभेला अस्पृश्यांच्या वतीने बोलण्याचा कोणताच अधिकार नाही. अस्पृश्याच्या वतीने फक्त अस्पृश्य समाजासच अधिकार असून डॉ. आंबेडकरांच्या प्रती ही सभा पुर्ण निष्ठा व्यक्त करते.
4. अत्यंत वाईट स्थितीमुळे जनता पत्रास सर्व जनतेने सक्रिय आर्थिक मदत करावी.
5. मध्यप्रांत — वऱ्हाड सरकारच्या सबॉर्डिनेट जजेस आणि सबइन्स्पेक्टर ऑफ पोलिस खात्यात अस्पृश्यांचे उमेदवार घेऊन आजपर्यंतची उणीव भरून काढावी.[१०]

अस्पृश्य सभा, परिषदांचे संरक्षण करणे, शांतता, सुव्यवस्था राखणे, सभा परिषदेतील उपस्थित लोकांची व्यवस्था राखून त्यांना मार्गदर्शन करणे, मिरवणुकीतील शिस्त, असामाजिक तत्त्वांवर देखरेख, स्त्री — मुलांची काळजी घेणे, पथसंचालन, कवायती, प्रबोधन शिबीरे घेऊन विद्यार्थी व समाजाला मार्गदर्शन करणे. अन्यायग्रस्त गावात भेटी देऊन अस्पृश्य दलित समाजाचे मनोधैर्य वाढविणे आदि कार्य समता सैनिक दल करीत असे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रत्यक्ष ज्या — ज्या सभेत असतील तेथे समता सैनिक दलाचा ताफा बॅन्डसहीत अगोदरच उपस्थित असे. प्रत्यक्ष डॉ. आंबेडकर येताच त्यांना सलामी देऊन मानवंदना दिली जाई. समोरासमोरच्या सैनिकांच्या काठ्या उंचावून, त्याची त्रिकोणाकृती करून त्यामधून डॉ. आंबेडकर व त्यांचे सहकारी जात. त्यावेळी बॅन्डचा ध्वनी सुरू होई.[११] ते दृश्य पाहून अस्पृश्यांसह स्पृश्यवर्गीयही आश्चर्यचकित होत. दि. १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्माची दिक्षा घेतली. याप्रसंगी दिक्षांत समारंभास जमलेल्या लाखो जनसमुदायाची ज्या शिस्तीने समता सैनिक दलाने व्यवस्था राखली त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.

रविवार दि. ०८ जानेवारी १९३९ रोजी परळ येथील कामगार मैदानावर मुंबईतील समता सैनिक दलाची वार्षिक परेड व पाहणी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलाला मार्गदर्शन करताना म्हणाले होते की, समता सैनिक दलाचा सैनिक म्हणजे समाज सेवेसाठी तळहातावर शीर धरून लढण्यासाठी सज्ज झालेला निर्भय योध्दाच म्हटला पाहिजे. माणुसकीसाठी समतेचे उज्वल तत्व अंत: करणात तेवत ठेवून आपल्या कार्याची त्याने पुर्तता केली पाहिजे. हा सैनिक जातीभेद मानणार नाही. मी माणूस आहे, सर्वांना माणुसकीने वागवीत आणि विषमतेचे जहरी बीज समाजातून नाहिसे करीन असा बाणा बाळगणारा हाच खरा समता सैनिक दलाचा सैनिक. मला प्रत्येक सैनिकाला सांगायचे आहे की, सैनिक शब्द मोठा महत्वाचा आहे. आपण खात्रीने बाजार बुगणे नाहीत आपले कार्य करीत असताना तुम्ही सर्वजण फलटणीतच आहात ही भावना मनात बाळगली पाहिजे. सभेच्या वेळी जो अफाट जनसमुदाय जमतो त्याचा योग्य बंदोबस्त ठेवताना आपण सैनिकांनी काळजी घेतली पाहिजे. सैनिक म्हणजे शिस्तीचा शिलेदार. केवळ शिस्तीकरीता वेळ प्रसंगी सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देणे आवश्यक आहे. हा समज यापुढे उज्वल समाज सेवेने पुरा करा. म्हणजे आपले इच्छित ध्येय आपण साध्य केले असे म्हणणे सत्य होईल.[१२]

दि. २० जुलै १९४२ रोजी दुपारी १२.३० वाजता पंजाबचे पुढारी सरदार गोपाल सिंग एम.बी.ई., एम.एल.ए. यांचे अध्यक्षतेखाली समता सैनिक दलाचे प्रथम अधिवेशन भरले होते. अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेच्या भव्य मंडपात भरलेल्या या अधिवेशनाप्रसंगी भारतातील अनेक मान्यवर दलित वर्गाचे पुढारी व स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. या अधिवेशनात समता सैनिक दलाचे कार्यकारी मंडळ निवडण्यात आले होते. स्वागताध्यक्ष —श्री. ए.एल.कोसारे, बी.ए., कार्यकारी अध्यक्ष —श्री. एस.व्ही.रामटेके, उपाध्यक्ष — श्री. आर.जी.मेश्राम, उपाध्यक्ष —श्री. टी.एस. लोणारे, कमांडर — इन — चीफ—श्री. एस.एन. डोंगरे,असिस्टंट कमांडर — श्री. डब्ल्यू. एल. वाघमारे जनरल सेक्रेटरी — श्री. आर.आर. पाटील सेक्रेटरी — श्री. एस.डी.माणके जॉईन्ट सेक्रेटरी —श्री. पंजाब शेंभरकर, जॉईन्ट सेक्रेटरी— श्री. के.आर. माणके, जॉईन्ट सेक्रेटरी,—श्री. पी.डी. मेश्राम जॉईन्ट सेक्रेटरी—श्री. व्ही.एस. चारभे, सभासद — श्री. वाय.टी. गायकवाड, श्री. उमराव मुरारकर श्री. सखाराम चाहांदे, श्री. गोविंद कावरे, श्री. एम.झेड वानखडे [१३] यांची एकमताने निवड करण्यात आली होती.

या अधिवेशनाला जवळपास सत्तर हजार स्त्री—पुरूष उपस्थित होते. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. ए.एल. कोसारे आपल्या भाषणात म्हणाले की, ''डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाच्या घटनानांदाने संपूर्ण महाराष्ट्र खडबडून जागा झाला आहे. कणखर वृत्तीने हिंदूधर्माची हाडे खिळखिळी करून, मानवतेच्या सर्वोत्तम व सर्वोच्च समता तत्त्वाचा झेंडा सर्वांच्या वर आकाशात फडकत ठेवायचा चंग आत संबंध अस्पृश्य समाजाने बांधलेला आहे. त्याचेच आजची ही परिषद मुर्तीमंत प्रतिक आहे! आपले हक्क आपणच वाटेल त्या उपयांनी मिळविले तरच ते मिळतील असा आजवराचा आपला अनुभव आहे. म्हणूनच समता सैनिक दलासारख्या संस्थेची नितांत आवश्यकता असून या चळवळीचे बीज मध्यप्रांत, मुंबई या दोन प्रांतातच न ठेवता ते संबध हिंदुस्थनाच्या कोपऱ्या — कोपऱ्यात नेऊन टाकणे व त्यांची मशागत करणे आपले कर्तव्य आहे. आपण हिंदुस्थानाच्या निरनिराळया प्रांतातुन येथे जमला आहात. आणि हे कार्य आपण सुलभतेने पार पाडाला अशी आम्हास खात्री आहे. हे कार्य आपण केले की आपल्या एंकदर चळवळीची इमारत आपण भरभक्कम पायावर उभारीत आहोत असा आत्मविश्वास आपणा सर्वांचा राहील.'' [१४] परिषदेचे अध्यक्ष सरदार गोपालसिंग आपल्या भाषणात म्हणाले की, ''अस्पृश्यता व त्याव्दारे होणारा असहय जुलूम नष्ट करण्याकरीता आपल्या तरूणांनी सैनिकांच्या विचारांनी प्रेरीत होऊन संघटीत होणे हे त्यांचे पवित्र कर्तव्य आहे. विषमवर्ण व्यवस्थेला आपण झुगारून दिले पाहिजे. हया अमानुषतेविरूध्द आपल्या तरूणांनी बड करण्यास तयार झाले पाहिजे आणि समता प्रस्थापित केली पाहिजे. याच मुलभूत तत्वांच्या पाठिशी प्रत्येक सैनिक उभा राहील असा माझा विश्वास आहे आणि याच हेतुने प्रेरित होऊन आपले पुजनीय डॉ. आंबेडकर यांनी समता सैनिक दलाची स्थापना केली आहे. कॉग्रेस व गांधीजीचा उल्लेख करीत ते पुढे म्हणाले की, या देशातील सात कोटी हिंदू लोक इस्लाम धर्मात गेले, पन्नास लाख लोकांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला आणि चाळीस लाख लोकांनी गुरूनानकांच्या धर्माचा अंगीकार केला तरी हिंदू हे तग धरून अद्याप जिवंत राहीले आहेत. परंतु दहा कोटी अस्पृश्यांनी सामाजिक जुलूम करणाऱ्यांचा साथ सोडला तर हिंदू संस्कृती, हिंदू विचार, हिदू धर्म व हिंदू समाज छिन्नविछिन्न होऊन तुकडे — तुकडे झाल्याशिवाय राहणार नाही.[१५]

समता सैनिक दलाचे संचालक व स्वयंसेवकांचे आभर मानताना ते पुढे म्हणतात की, '' डॉ. आंबेडकरांचे रेल्वे स्टेशनवर आगमन होताच त्यांना पाहण्याकरीता उफाळलेल्या अफाट जनसमुदायला थोपवून अत्यंत शिस्तीने त्यांची मिरवणूक सभा मंडपात आणून, या भव्य मडपाचे संरक्षण आणि अधिवेशनाच्या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित असलेल्या एक लाखाच्यावर लोकांत सुव्यवस्था व शांतता राखण्याचे जे कार्य समता सैनिक दलाने केले ते निर्विवाद कौतुकास्पद आहे. मी त्या दिवसाची अपेक्षा करतो की, जेव्हा या देशात एक लाख लाल डगलेवाले सैनिक जय्यत तयार होतील आणि या देशातील आपल्या समाज बांधवांच्या इज्जत अब्रुचे व स्वाभिमानाचे संरक्षण करण्याकरीता आपल्या रक्ताच्या शेवटचा बिंदू सांडेपर्यत लढवतील. मी पंजाबला परतल्यावर तेथील तरूण वर्गाला याच पध्दतीने संघटीत करण्याचा प्रयत्न करील. आपल्या तरूणांना संघटीत करण्याच्या कार्यात आपण सफल झालो तर आपले अर्धेअधिक कार्य झाल्यासारखे आहे.[१६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या अधिवेशनात मार्गदर्शन करताना म्हणाले होते, ''मध्यप्रांतात उभारण्यात आलेले हे स्वयंसेवकाचे विस्तृत दल पाहून मला अत्यानंद होत आहे. समता सैनिक दल हे आपल्या सर्वसामान्य चळवळीचे अभिन्न अंग आहे. वास्तविक ते एक शक्तीशाली शस्त्र आहे. एक वेळ अशी होती की त्यावेळी आपला उद्देश आपल्या समाजाला हिंदू समाजाचे एक अभिन्न अंग मानून त्यांच्या बरोबरीने

समानतेचे स्थान मिळावे, असा होता. याच उद्देशपुर्तीकरीता समता सैनिक दलाची स्थापना झाली होती. परंतु आज भारताच्या राष्ट्रीय जीवनातील आपण वेगळा व स्वतंत्र असा घटक असून हिंदूच्या बरोबरीचे आहोत. अशी आपली भुमिका आहे. समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकांना आव्हान देण्याचे धाडस अद्यापपावेतो कुणीही केलेले नाही. आम्ही आपल्या ज्या राजकिय व सामाजिक चळवळी कोणत्याही प्रकारे उपद्रव न होता चालविल्या आहेत, त्यांचे श्रेय आपल्या स्वयंसेवक दलाला आहे. आपल्यावर त्यांच्या कृतज्ञतेचे फार मोठे ऋण आहे.'' या अधिवेशनातील उपस्थित प्रचंड जनसमुदाय पाहून डॉ. आंबेडकर म्हणतात की, ''मध्यप्रांतात स्वयंसेवक दलाच्या विस्तारात मुंबईला फारच मागे टाकलेले आहे. याबाबतीत मला तुमचे कौतुक करावेसे वाटते. स्वयंसेवक दलाच्या आवश्यकतेवर मी अनन्यभावाने विश्वास करतो. हे दलाचे संघटन तर चालू ठेवलेच पाहिजे, शिवाय याच्या शाखा प्रत्येक प्रांतात स्थापन झाल्या पाहिजेत आणि या संघटनेचा विस्तार एवढ्या विस्तृत प्रमाणावर करण्यात यावा की दलित वर्गातील प्रत्येक युवक हा त्या दलाचा सदस्य झालेला असावा.[१७]

या अधिवेशनात खालील ठराव घेण्यात आले होते. ठराव क्र.१ :

अ) ही परिषद नागपुर येथील अखिल भारतीय दलित परिषदेत मंजुर झालेल्या सर्व ठरांवाना हार्दिक पाठिंबा देते आणि सदर ठरावाची सक्रिय अंमलबजावणी करताना समता सैनिक दल तन—मन—धने आपले कर्तव्य पार पाडील असे जाहिर करते.

ब) प्रत्येक प्रांतात व शहरात समता सैनिक दलाच्या शाखा स्थापन करण्याची दलाच्या चाहत्यांना विनंती करते.

क) अखिल भारतीय समता सैनिक दलाची घटना तयार करण्याकरीता दलाच्या अधिकाऱ्यांची खालीलप्रमाणे एक पोट कमिटी नेमण्यात येत आहे. या कमिटीने मुंबई — मध्यप्रांत व इतरत्र समता सैनिक दलाच्या घटना तपासून अखिल भारतीय दलास पोषक अशी घटना तयार करावी.

१) श्री. एम.एम. ससाळेकर, जनरल सेक्रेटरी, समता सैनिक दल, मुंबई

२) श्री. एस.बी.जाधव, सेक्रेटरी, समता सैनिक दल, मुंबई

३) श्री. आर. आर. पाटील, जनरल सेक्रेटरी, समता सैनिक दल, मध्यप्रांत — वऱ्हाड

४) श्री. ए.एल. कोसारे, अध्यक्ष समता सैनिक दल, मध्यप्रांत — वऱ्हाड

५) श्री. पी.एल.के. तालीब, पी.एच.डी.

लखनौ (यु.पी.)ठराव क्र.२ :— व्दितीय महायुध्दातील फॅसिस्टांन विरोधी अखिल भारतीय जनतेची अभेद्य एकजूट अशी फळी उभारण्याचा अनुरोध ही परिषद सर्व हिंदी जनतेस करते. ठराव क्र.३ :— समता सैनिक दलाचे दुसरे अधिवेशन पंजाब येथे ज्यावेळी अखिल भारतीय दलित वर्ग परिषद भरेल त्याचवेळी घेण्यात यावे.[१८]

या परिषदेपासूनच अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेच्या सभा मंडपात समता सैनिक दलाचेही अधिवेशन घेण्यात येऊ लागले होते. दि. ५ व ६ मे १९४५ रोजी मुंबई येथे अखिल भारतीय दलित फेडरेशनच्या तृतीय अधिवेशनाप्रसंगी दुपारी श्री. जे.एच. सुब्बय्या यांचे अध्यक्षतेखाली समता सैनिक दलाचे अधिवेशन भरवून त्यात अस्पृश्य वर्गातील तरूणांना या संघटनेत हजारोंच्या संख्येने सामील होण्याचे आवाहन करण्यात आले होते.[१९]

इस १९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकीपुर्वी डॉ. आंबेडकर शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनच्या उमेदवरांच्या प्रचाराकरीता नागपुरला आले असता नागपुर येथे दि. १४ डिसेंबर १९४५ रोजी अखिल भारतीय समता सैनिक दलांचे अध्यक्ष श्री. जे.एच. सुब्बय्या यांचे अध्यक्षतेखाली प्रदेश समता सैनिक दलाचे जाहिर संमेलन भरविण्यात आले होते. या संमेलनाप्रसंगी श्री. जे.एच. सुब्बय्या यांनी आव्हान केले होते की, ''समता सैनिक दलाचा विकास नियमित सैनिकात होणे आवश्यक वाटते. दलाचे महत्वाचे कार्य अस्पृश्य वर्गाचे हक्क मिळविण्यास सहाय्य करणे हे आहे. परंतु त्या बरोबरच अस्पृश्य समाजावर प्रतिदिन होणाऱ्या अनेक अन्याय व अत्याचारांचा प्रतिकार करणे, हे त्यांचे कर्तव्य ठरते. समता सैनिक दलाच्या स्वयसेवकांनी शेड्युल्ड कास्टस् फेडेरेशनच्या नेतृत्वाखाली कार्य करावे आणि प्रांतिक निवडणुकीत सर्वतोपरी आपले सहकार्य द्यावे'' याच प्रसंगी श्री. सुब्बय्या यांनी शेड्युल्ड कास्टस् फेडेरेशनच्या नेतृत्वात अखिल भारतीय स्तरावर 'शेड्युल्ड कास्ट चेंबर ऑफ कॉमर्स' ची स्थापना करण्यात येणार असल्याचेही जाहिर केले होते.[२०]

निष्कर्ष :—

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापना केलेल्या समता सैनिक दलाचे निश्चित ध्येय हे स्पृश्य वर्गाच्या घातक भेदनितीला छेद देऊन, समाजिक जुलूम, अन्याय, अत्याचाराला प्रतिबंध करणे हा होता. अस्पृश्य समाजाला सार्वजनिक हक्क मिळवून देण्यासाठी जी आंदोलने झाली त्यात समता सैनिक दलाने महत्वाची भुमिका निभावली. त्या काळात कॉग्रेसचे गुंड, सनातनी प्रवृत्तीचे लोक दलितांच्या सभा, समारंभात अडथळे आणत व सभा उधळून टाकीत. दलितावर अन्यय, अत्याचार करीत अशा प्रवृत्ती पासून दलित सभा — परिषदांचे सरंक्षण करण्याची भुमिका समता सैनिक दलाने पार पाडली. त्यामुळे डॉ. आंबेडकर म्हणतात '' आपल्या राजकिय चळवळी बिना छळवणूकीशिवाय चालत आहेत याचे कारण म्हणजे आपल्या स्वयसेवक संघाची शक्ती हेच होय.''

संदर्भसुची :—

1. मून,वसंत.(संपा)—डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे,खंड —१८, भाग —२, २००२,पृ.२४३,२४४
2. लोखंडे, भाऊ. हि.गो. — डॉ. आंबेडकरी सैनिकांची गौरवगाथा, पृ. १३९,
3. कित्ता, पृ. १४०
4. कित्ता, पृ. १४२,१४३,
5. कित्ता, पृ. १४०,
6. जामगडे, विनायक. (संपा.)—कर्मवीर बाबू हरीदास आवळे गौरव विशेषांक, २००६, पृ.५१,
7. जनता, दि. १७ फेब्रुवारी १९३४,
8. कोसारे, एच.एल. — विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, १९८४, पृ. २५१,
9. कित्ता, पृ. २५३,
10. सहस्त्रबुध्दे, गं.नि. (संपा.) — जनता, मुंबई, दि. २८ सप्टेंबर १९४०,
11. कांबळे, बबन (संपा.) — दै. सम्राट, मुंबई, दि. २० फेब्रुवारी २००७,
12. कद्रेकर, भा.र. (संपा.) — जनता, मुंबई, दि. १४ जानेवारी १९३९
13. Report of the proceedings of Samata Sainik Dal Conference, First Session, Held at. Nagpur,On July 20, 1942, pp.91,
14. Ibid., pp 67-70,
15. Ibid., pp 72-75
16. Ibid.
17. Ibid., pp 77-80
18. Ibid., pp 75-77
19. लोकयुध्द, साप्ताहिक, मुंबई, दि. 31 मे 1945
20. द्रविड, एन.ए. (संपा.) — हितवाद, नागपुर, दि. १५ डिसेंबर १९४५

इच्छामरणाचा किवा सन्मानाने मरण्याचा हक्क

प्रा. आनंद वनदेव पवार

एस. एस. व्ही. पी. एस. साहित्य आणि वाणिज्य महाविद्यालय धुळे

गोषवारा :

काही दिवसांपूर्वी कर्नाटक राज्य सरकारने इच्छामरणाला काही अटींसह मान्यता दिली. असा कायदा करणारे कर्नाटक हे दुसरे राज्य आहे. या आधी केरळने असा कायदा केला आहे. त्याचबरोबर नुकतेच १३ वर्षे कोमात असलेल्या हर्षित राणा या ३२ वर्षीय तरुणाच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ईच्छामरणाचा किवा सन्मानाने मरण्याच्या हक्काची कायदेशीर प्रक्रिया स्पष्ट केली आहे. भारतीय संविधानातील मुलभूत हक्कांमध्ये दिलेल्या स्वातंत्र्याच्या हक्कात कलम २१ नुसार 'जगण्याचा अधिकार' दिलेला आहे. यामध्ये सन्मानाने मृत्यूचा अधिकारही समाविष्ट असल्याचे प्रतिपादन न्यायालयाने केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'कॉमन कॉज' खटल्यात 'लिव्हिंग विल' (Living Will) किंवा 'इच्छापत्र' मान्य केले आहे, ज्याद्वारे रुग्ण भविष्यात कोमात गेल्यास किंवा असाध्य आजारी पडल्यास स्वतः उपचारांची दिशा ठरवू शकतो. त्या अनुषंगाने प्रस्तुत लेखात ईच्छामरणाचा हक्काची चर्चा करण्यात आली आहे. ईच्छामरणाचा हक्क म्हणजे काय? कोणत्या प्रकारच्या ईच्छामरणाला आपल्या देशात सशर्त परवानगी देण्यात आलेली आहे? त्याबाबत विविध खटल्यांमध्ये न्यायालयाने आजतागायत कोणते निर्णय दिलेले आहेत? याचा उहापोह या लेखात केलेला आहे. तसेच या हक्कासंबंधी समर्थनार्थ आणि विरोधी मुद्द्यांचे विश्लेषण या लेखात केले आहे.

मूळ शब्द : भारतीय संविधान, जगण्याचा हक्क, इच्छामरणाचा हक्क, न्यायालयीन निर्णय

प्रस्तावना :

राज्यशास्त्र विषयात मानवी हक्क या घटकाचा अभ्यास करत असताना इच्छामरण म्हणजेच सन्मानाने मरण्याच्या हक्क जाणून घेणे आवश्यक ठरते. मृत्यू म्हटले की एक प्रकारची घबराट -थरकाप! त्यामुळे मृत्यूविषयी बोलणे देखील अमंगळ. मृत्यूची सांगड पाप पुण्याशी घातल्याने श्रद्धा-अंधश्रद्धा यांच्या गुंत्यात सामान्य माणूस पुन्हा भरडला जातो. निरोगी माणूस हा मृत्यूला चार हात लांब ठेवूनच जगत असतो. पण तेच शरीर रोगग्रस्त झाले तर जगण्यासाठी औषधे व औषधांसाठीच जगणे झाले, तर मग जगायचे तरी कशासाठी ? हा प्रश्न मनात आल्यावाचून राहत नाही. ह्या मरणयातना भोगत आणि दुसऱ्यांवर अवलंबून राहून जगण्यापेक्षा मेलेल बर असाविचार अनेक रुग्ण मांडतांना दिसतात. प्रसंगी इच्छा मरणाची परवानगी मागतात. जिवंत माणसाची हत्या करणे कायद्याने -नैतिकतेने गुन्हा आहे. स्वतःची हत्या करणे म्हणजेच आत्महत्या करणे हा देखील कायद्याने गुन्हा आहे. पण जर रोगिष्ट होऊन,मरणाची वाट पहात कण्हत-कोमात जाऊन बिछान्यावर दुसऱ्यांच्या मदतीशिवायच जगणं टाळण्यासाठी इच्छा मरणाचा मार्ग चोखाळला तर त्यात वावगे ते काय? त्या अनुषंगाने या हक्कांसंबंधी भारतातील लेखाजोखा जाणण्याचा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे.

उद्दिष्टे :

१) इच्छामरणाचा किवा सन्मानाने मरण्याचा हक्क जाणून घेणे.
२) भारतीय संविधानातील ईच्छामरणाचा किवा सन्मानाने मरण्याचा हक्कासंबंधी तरतुदी जाणून घेणे.
३) इच्छामरणाचा किवा सन्मानाने मरण्याचा हक्कासंबंधी भारतातील न्यायालयीन निर्णयांचा आढावा घेणे.
४) इच्छामरणाचा किवा सन्मानाने मरण्याचा हक्कासंबंधी विविध मुद्द्यांचा आढावा घेणे.

प्रश्न:

१. इच्छामरणाचा किवा सन्मानाने मरणाचा हक्क म्हणजे काय?
२. कोणत्या प्रकारच्या इच्छामरणाला आपल्या देशात सशर्त परवानगी देण्यात आलेली आहे
३. भारतात इच्छामरणाचा किवा सन्मानाने मरणाचा हक्कासंबंधी विविध खटल्यांमध्ये न्यायालयाने आजतागायत कोणते निर्णय दिलेले आहेत?
४. इच्छामरणाचा किवा सन्मानाने मरणाचा हक्कांसंबंधी विविध मुद्दे कोणते?

संशोधन पध्दत : प्रस्तुत अध्ययनासाठी द्वितीय तथ्याचा वापर करण्यात आला आहे. समस्येच्या विस्तृत आकलनासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटवरील तथ्यांचा आधार घेण्यात आला आहे.

लेखाची रचना :

भारतात सर्वोच्च न्यायालयाने 'निष्क्रिय इच्छामरण' (Passive Euthanasia) कायदेशीर ठरवले असून, असाध्य आजारी किंवा मेंदू मृत रुग्णांना 'सन्मानाने मरण्याचा अधिकार' (Right to die with dignity) कलम २१ अंतर्गत मान्य केला आहे. लाईफ सपोर्ट प्रणाली (व्हेंटिलेटर) काढण्याची परवानगी देऊन वेदनामुक्त मृत्यूची सुविधा दिली जाते, मात्र सक्रिय इच्छामरणास बंदी आहे.

इच्छामरण म्हणजे काय?

इच्छामरण म्हणजे एखाद्या व्यक्तीला जेव्हा असाध्य किंवा जीवघेणा आजार असतो तेव्हा त्यांना तीव्र वेदना किंवा त्रासातून मुक्त करण्यासाठी, जाणीवपूर्वक त्यांचे जीवन संपवण्याची प्रथा होय.

प्रकार :

प्रकार	व्याख्या	भारतातील स्थिती
निष्क्रिय इच्छामरण	एखाद्या व्यक्तीला नैसर्गिकरित्या मृत्यू येऊ देण्यासाठी जीवनरक्षक उपचार (जसे की व्हेंटिलेटर किंवा फीडिंग ट्यूब) थांबवणे किंवा रोखून धरणे.	कायदेशीर (मार्गदर्शक तत्वांसह)
सक्रिय इच्छामरण	रुग्णाचा जीव जाणूनबुजून संपवण्यासाठी प्राणघातक पदार्थांचा वापर करणे (उदा. प्राणघातक इंजेक्शन).	बेकायदेशीर

- निष्क्रिय इच्छामरण (Passive Euthanasia): यामध्ये रुग्णाला जिवंत ठेवणारी औषधे किंवा यंत्रणा (उदा. व्हेंटिलेटर, फीडिंग ट्यूब) बंद केली जाते, ज्यामुळे नैसर्गिक मृत्यू होतो. भारतात हे कायदेशीर आहे.
- सक्रिय इच्छामरण (Active Euthanasia): यामध्ये डॉक्टरांद्वारे औषध देऊन रुग्णाचा जीव घेतला जातो. हे भारतात बेकायदेशीर आणि फौजदारी गुन्हा आहे.

भारतात निष्क्रिय इच्छामरणासंबंधी न्यायालयीन निर्णय:

भूतकाळातील भारतीय न्यायपालिकेने ईच्छामरणाचा किवा सन्मानाने मरण्याचा हक्कासंबंधी दिलेल्या निर्णयांचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की "जगण्याच्या अधिकारात" (अनुच्छेद २१) "सन्मानाने मरण्याच्या अधिकाराचा" समावेश होतो की नाही याबाबत न्यायालयाची भूमिका कालानुरूप बदलत गेलेली आहे.

1. **पी. रथिनम खटला (१९९४):** या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, जगण्याच्या हक्कात सन्मानाने मरण्याच्या हक्काचाही समावेश होतो. सर्वोच्च न्यायालयाने इतर मूलभूत हक्कांशी समांतरता दर्शवली की ,ज्याप्रमाणे अनुच्छेद १९ अंतर्गत भाषण स्वातंत्र्याच्या हक्कात बोलण्याचा हक्क तर आहेच, पण त्यात न बोलण्याचा हक्कदेखील समाविष्ट आहे, त्याचप्रमाणे अनुच्छेद २१ अंतर्गत जगण्याच्या हक्कात सन्मानाने मरण्याच्या हक्कदेखील समाविष्ट आहे.
2. **ज्ञान कौर खटला (१९९६):** या खटल्यात न्यायालयाने पी. रथिनम विरुद्ध युनियन ऑफ इंडिया खटल्यातील पूर्वीचा निर्णय रद्द केला आणि असे प्रतिपादन केले की भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करते, आणि त्यात जीवन संपवण्याच्या हक्काचा समावेश होईल असा अर्थ लावला जाऊ शकत नाही, तसेच आत्महत्या करणे हे जीवनाचे एक अनैसर्गिक निर्मूलन आहे.

3. **अरुणा शानबाग प्रकरण (२०११):** या ऐतिहासिक खटल्यात, सर्वोच्च न्यायालयाने अनेक दशकांपासून सतत अचेतन अवस्थेत असलेल्या अरुणा शानबाग यांच्यासाठी निष्क्रिय इच्छामरणाच्या मुद्द्यावर निर्णय दिला.

   या खटल्यात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने कडक सुरक्षा उपायांसह निष्क्रिय इच्छामरणाला परवानगी दिली. न्यायालयाने असे मत मांडले की, असमर्थ रुग्णाचे जीवनरक्षक प्रणाली काढून घेण्यास काही विशिष्ट परिस्थितीत परवानगी दिली जाऊ शकते, परंतु असा निर्णय केवळ नातेवाईक किंवा डॉक्टर घेऊ शकत नाहीत. त्याऐवजी, संबंधित उच्च न्यायालयाने रुग्णाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, पॅरेन्स पॅट्रिया सिद्धांतानुसार कार्य करत, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत निर्णयाला मान्यता दिली पाहिजे. न्यायालयाने मंजुरी देण्यापूर्वी तज्ञांच्या वैद्यकीय मंडळाचे मत घेणे आणि नातेवाईक/ जवळच्या प्रतिनिधीशी सल्लामसलत करणे आवश्यक असल्याची एक कार्यपद्धती देखील निश्चित केली.

4. **कॉमन कॉज विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (२०१८):** घटनापीठाने घोषित केले की सन्मानाने मरण्याचा अधिकार हा अनुच्छेद २१ अंतर्गत एक मूलभूत अधिकार आहे. त्यांनी निष्क्रिय इच्छामरणाला कायदेशीर मान्यता दिली आणि "लिव्हिंग विल्स"ची वैधता मान्य केली.

   २०१८ मध्ये निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये २०२३ मध्ये अधिक सुधारणा करण्यात आली आणि ती एकत्रितपणे 'कॉमन कॉज मार्गदर्शक तत्वे' म्हणून ओळखली जातात. ही मार्गदर्शक तत्वे दोन मुख्य तत्वांवर आधारित आहेत: हस्तक्षेप हा “वैद्यकीय उपचार” म्हणून पात्र ठरला पाहिजे आणि तो थांबवणे हे रुग्णाच्या “सर्वोत्तम हिताचे” असले पाहिजे. गैरवापर टाळण्यासाठी न्यायालयाने प्राथमिक आणि दुय्यम वैद्यकीय मंडळांच्या मंजुरीसह सुरक्षा उपाययोजना देखील लागू केल्या .

5. **हरीश राणा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि इतर (२०२६):** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ३२ वर्षीय हरीश राणा यांच्यासाठी निष्क्रिय इच्छामरणाला अधिकृत केले, जे २०१३ च्या अपघातापासून सतत अचेतन अवस्थेत होते. न्यायालयाने असे मानले की क्लिनिकली असिस्टेड न्यूट्रिशन अँड हायड्रेशन (CANH) हे वैद्यकीय उपचार म्हणून गणले जाते, कारण त्यासाठी विशेष वैद्यकीय देखरेख आणि सतत निरीक्षणाची आवश्यकता असते. त्या दुर्धर आजारातून बरे होणे अशक्य असल्याने आणि उपचाराने कोणताही उपचारात्मक फायदा होत नसल्याने, तो उपचार थांबवणे हे रुग्णाच्या हिताचे मानले गेले. न्यायालयाने "सन्माननीय निरोप देण्यावर " लक्ष केंद्रित केले आणि असा आदेश दिला की, रुग्णाला वेदना होणार नाहीत याची खात्री करण्यासाठी, माघार घेण्याच्या प्रक्रियेला एम्समधील एका भक्कम उपशामक काळजी योजनेचा आधार असला पाहिजे.

निष्क्रिय इच्छामरणाचे समर्थनार्थ प्रमुख मुद्दे -

१) काळजीवाहकावरील भार : 'सन्मानाने मरण्याचा हक्क' समर्थकांचा असा युक्तिवाद आहे की, ज्या लोकांना असाध्य, क्षयकारी, अपंगत्व आणणारा किंवा दुर्बळ करणारा आजार आहे, त्यांना सन्मानाने मरण्याची परवानगी दिली पाहिजे. हा युक्तिवाद अशा लोकांसाठीही पुढे मांडला जातो, ज्यांना गंभीर मानसिक आजारासारखा प्राणघातक नसलेला, पण दीर्घकाळ चालणारा दुर्बळ करणारा आजार आहे. अशा बहुतेक याचिका पीडित व्यक्ती, त्यांचे कुटुंबीय किंवा त्यांचे काळजीवाहक दाखल करतात. काळजीवाहकावरील भार प्रचंड असतो आणि तो आर्थिक, भावनिक, वेळ, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक अशा विविध क्षेत्रांमध्ये विभागलेला असतो. त्यामुळे, मानसिक आजार असलेल्या

व्यक्तीच्या कुटुंबीयांकडून रुग्णाला किंवा त्यांना विष देण्याची विनंती क्वचितच ऐकू येते. राज्यांची अकार्यक्षमता, उदासीनता आणि आरोग्यावरील गुंतवणुकीचा अभाव यांमुळे 'जगण्याच्या हक्का'ची थट्टा होत आहे.

२) उपचार नाकारणे : वैद्यकीय उपचार नाकारण्याचा अधिकार कायद्यात मान्यताप्राप्त आहे, ज्यामध्ये जीवन टिकवणारे किंवा वाढवणारे वैद्यकीय उपचार देखील समाविष्ट आहेत. उदाहरणार्थ, रक्ताच्या कर्करोगाने ग्रस्त असलेला रुग्ण उपचार नाकारू शकतो किंवा नासोगॅस्ट्रिक ट्यूबद्वारे दिले जाणारे अन्न नाकारू शकतो. उपचार नाकारण्याच्या अधिकाराची मान्यता निष्क्रिय इच्छामरणाला मार्ग मोकळा करते. अनेक जण असा युक्तिवाद करतात की १६ आठवड्यांपूर्वी गर्भधारणेचा वैद्यकीय गर्भपात करण्याची परवानगी देणे हे देखील सक्रिय अनैच्छिक इच्छामरणाचेच एक स्वरूप आहे. विकृत बाळांच्या दयामरणाचा हा मुद्दा हॉलंडमध्ये आधीच चर्चेत आहे

३) मरण्याचा हक्क : दीर्घकाळ बेशुद्ध अवस्थेत असलेले किंवा दीर्घकालीन आजाराने ग्रस्त असलेले अनेक रुग्ण आपल्या कुटुंबियांवर ओझे बनू इच्छित नाहीत. सन्मानाने 'मरण्याच्या हक्काचा' आदर करून 'जगण्याच्या हक्काचे' रक्षण करण्याचा एक मार्ग म्हणून इच्छामरणाचा विचार केला जाऊ शकतो.

४) अवयव प्रत्यारोपणास प्रोत्साहन देणे : असाध्य आजाराने ग्रस्त रुग्णांमध्ये इच्छामरणामुळे अवयवदानासाठी समर्थन करण्याची संधी मिळते. यामुळे अवयव निकामी झालेल्या आणि प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असलेल्या अनेक रुग्णांना मदत होईल. इच्छामरण केवळ असाध्य आजाराने ग्रस्त रुग्णांना 'मरण्याचा हक्क'च देत नाही, तर अवयवांची गरज असलेल्या रुग्णांना 'जगण्याचा हक्क' देखील देते.

५) भारतीय संविधानानुसार 'जगण्याचा हक्क' हा जीवनाच्या संरक्षणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे. त्यामुळे, 'अन्न, सुरक्षित पिण्याचे पाणी आणि आरोग्यसेवा' पुरवून 'जगण्याच्या हक्का'चे हे कर्तव्य पूर्ण करण्याची तातडीची गरज आहे. याउलट, अन्नाचा हक्क, पाण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि आरोग्यसेवेचा हक्क यांसारख्या सामाजिक-आर्थिक हक्कांना प्रोत्साहन देणे, त्यांचे संरक्षण करणे आणि ते पूर्ण करण्याची जबाबदारी राज्याची नाही, जे जगण्याच्या हक्काचे मूलभूत आणि अत्यावश्यक घटक आहेत. आजपर्यंत, बहुतेक राज्यांनी असाध्य रोगाने ग्रस्त असलेल्या लोकांना उपशामक काळजी पुरवून आधार देण्यासाठी काहीही केलेले नाही. जर राज्याने वाजवी दर्जाची आरोग्यसेवा पुरवण्याची जबाबदारी घेतली, तर इच्छामरणाचे बहुसंख्य समर्थक निश्चितपणे आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करतील. आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाचे समर्थन करतो की, आपला समकालीन समाज आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्था हा संवेदनशील मुद्दा हाताळण्यासाठी पुरेशी परिपक्व नाही, त्यामुळे तो रोखून धरणे आवश्यक आहे. तथापि, अपंगांना आरोग्यसेवा पुरवण्याबाबत समाजाच्या आणि गरीब लोकांना आरोग्यसेवा पुरवण्याबाबत सार्वजनिक आरोग्य क्षेत्राच्या विकासावर अवलंबून, काही वर्षांनी या मुद्द्याचे पुन्हा परीक्षण करणे आवश्यक आहे. या संवेदनशील विषयावरील निर्णय राखून ठेवण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल, असाध्य रोग्यांच्या आरोग्यसेवेच्या नव्या युगाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. जेव्हा एखादी गुंतागुंतीची वैद्यकीय, सामाजिक आणि कायदेशीर कोंडी निर्माण होते, तेव्हा समाजात सलोखा टिकवून ठेवण्यासाठी हा निकाल देण्यात आला आहे. विधी आयोग अहवाल-१९६६ च्या शिफारशीनुसार, असाध्य रोग्यांच्या आणि त्यांची काळजी घेणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांच्या संरक्षणासाठी कायदा करण्याची गरज आहे . आपल्या आरोग्यसेवा प्रणालीमध्ये गुंतवणूक करण्याचीही तातडीची गरज आहे, जेणेकरून आजारपणाने त्रस्त असलेल्या गरीब लोकांना मोफत आरोग्यसेवा मिळू शकेल. आरोग्यसेवेतील गुंतवणूक ही दानधर्म नाही; 'आरोग्याचा हक्क' हा आपल्या संविधानाच्या 'जीवनाच्या हक्का'अंतर्गत प्रदान केलेला आहे.

निष्क्रिय इच्छामरणाच्या विरोधातील प्रमुख मुद्दे -

१) दुर्बळांना काढून टाकणे : इच्छामरणाचे विरोधक असा युक्तिवाद करतात की जर आपण 'सन्मानाने मरण्याचा अधिकार' स्वीकारला, तर असाध्य आणि दुर्बल करणाऱ्या आजारांनी ग्रस्त लोकांना आपल्या सुसंस्कृत समाजातून काढून टाकले जाईल. उपशामक काळजीची प्रथा या मताला विरोध करते, कारण उपशामक काळजी त्रासदायक लक्षणे आणि वेदनांपासून आराम देते आणि रुग्ण तसेच काळजीवाहकाला आधार देते. उपशामक काळजी ही मरणासन्न व्यक्तींसाठी एक सक्रिय, करुणामय आणि सर्जनशील काळजी आहे.

२) भारतीय संविधान : 'जगण्याचा हक्क' हा अनुच्छेद २१ मध्ये नमूद केलेला एक नैसर्गिक हक्क आहे, परंतु आत्महत्या हा जीवनाचा एक अनैसर्गिक शेवट आहे आणि म्हणूनच, तो 'जगण्याच्या हक्का'च्या संकल्पनेशी विसंगत आहे. जीवनाचे रक्षण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे आणि रुग्णांना इजा न पोहोचवता त्यांची काळजी घेणे हे डॉक्टरांचे कर्तव्य आहे. जर इच्छामरणाला कायदेशीर मान्यता दिली गेली, तर अशी गंभीर भीती आहे की राज्य आरोग्यामध्ये (जगण्याच्या हक्कासाठी काम करताना) गुंतवणूक करण्यास नकार देऊ शकते. हॉलंडमध्ये इच्छामरणाला कायदेशीर मान्यता दिल्यामुळे असाध्य रोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णांच्या काळजीच्या गुणवत्तेत मोठी घट झाली आहे. म्हणून, एका कल्याणकारी राज्यात कोणत्याही स्वरूपात इच्छामरणाची कोणतीही भूमिका नसावी.

३) मानसिक आजाराचे लक्षण: नैराश्य, स्किझोफ्रेनिया आणि मादक पदार्थांचे सेवन करणाऱ्या रुग्णांमध्ये आत्महत्येचा प्रयत्न किंवा आत्महत्या करणे हे सामान्यतः दिसून येते. ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डरने ग्रस्त असलेल्या रुग्णांमध्येही याची नोंद आहे. म्हणून, इच्छामरण घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीच्या मानसिक स्थितीचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. पारंपारिक शिक्षणानुसार, आत्महत्येचा प्रयत्न ही एक मानसिक आपत्कालीन स्थिती आहे आणि ती मदतीसाठी किंवा साहाय्यासाठी एक आर्त हाक मानली जाते. मानसोपचार शास्त्रामध्ये आत्महत्या प्रवृत्तीच्या रुग्णांच्या व्यवस्थापनासाठी अनेक मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली आहेत म्हणून, आत्महत्येचा प्रयत्न हे मानसिक आजाराचे लक्षण मानले जाते.

४) स्वार्थी हेतू: आजच्या नैतिकता आणि न्यायाच्या ऱ्हासाच्या काळात आजारी रुग्णाच्या मालमत्तेच्या वारसा मिळविण्यासाठी कुटुंबातील सदस्य अथवा नातेवाईक या हक्काचा गैरवापर करू शकतात. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडे दिलेल्या निकालात इच्छमरण हे उदात्त वैदयकीय व्यवसायिकाच्या हातून दयामरण बनू नये त्यासाठी वैदयकीय व्यवसायिकावर नियंत्रण ठेवण्यासाठी इंडियन मेडिकल कौन्सिल विनियम २००२ मध्ये प्रकरण ६ मधील कलम ६.७ मध्ये इच्छामरणासंबंधी चर्चा करण्यात आली आहे. जी मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ च्या तरतुदीनुसार आहे. रुग्णाचे आणि शेवटच्या टप्प्यात रुग्णाची काळजी घेणाऱ्या व्यवसायिकाची अनावश्यक

खटल्यांपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. या संदर्भात विधी आयोगाने एक अहवाल सादर केलेला आहे.

निष्कर्ष: प्रस्तुत लेखात भारतीय संविधानाच्या मुलभूत हक्कांमध्ये अनुच्छेद २१ मध्ये समाविष्ट असलेल्या जगण्याच्या हक्कात विशिष्ट प्रसंगी रुग्णाला त्याचे हाल होऊ नयेत आणि त्याच्यामुळे इतरांना त्रास होऊ नये म्हणून सन्मानाने मरण्याचा हक्क न्यायालयाने मान्य केला आहे असे दिसून येते. गेल्या ७५ वर्षात या हक्कांसंबंधी न्यायालयाने दिलेल्या निर्णयांचा आढावा घेतल्यास कालानुरूप न्यायालयाची भूमिका बदललेली येते. सुरुवातीला न्यायालयाने यास परवानगी दिलेली दिसते परंतु ज्ञान कौर खटल्यात हा निर्णय नायालयाने रद्द केला आणि त्याच्या विरोधात निर्णय दिला. नंतर अरुणा शानबाग आणि हरीश राणा प्रकरणात न्यायालयाने निष्क्रिय इच्छामरणाला सशर्त मान्यता दिलेली आढळते. निष्क्रिय इच्छामरणाबाबत भारताचा दृष्टिकोन हा घटनात्मक मूल्ये, वैद्यकीय नीतिमत्ता आणि मानवी प्रतिष्ठा यांच्यातील काळजीपूर्वक साधलेला समतोल दर्शवतो. अरुणा शानबाग विरुद्ध भारत संघ आणि कॉमन कॉज विरुद्ध भारत संघ यांसारख्या महत्वपूर्ण निकालांद्वारे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद २१ आणि सन्मानाने मरण्याच्या हक्काच्या व्यापक कक्षेत निष्क्रिय इच्छामरण आणि 'लिव्हिंग विल'च्या (मृत्युपत्राच्या) वैधतेला मान्यता दिली. हर्षित राणा प्रकरणातील अलीकडील न्यायालयीन

घडामोडी, गैरवापरापासून संरक्षण सुनिश्चित करत, जीवन-अंतिम टप्प्यातील करुणामय सेवेवर अधिक भर देतात. भविष्यात, एक व्यापक कायदेशीर चौकट या मानवतावादी दृष्टिकोनाला बळकट करू शकते आणि रुग्ण, त्याचे कुटुंबीय व वैद्यकीय व्यावसायिक या सर्वांना स्पष्टता देईल यात शंका नाही.

संदर्भ:

१) पाटील निमा,१५ मार्च २०२६, दयामरणाचा भारतातील प्रवास,लोकसत्ता
२) सन्मानाने मरण्याचा अधिकार,१८ मार्च २०२६ ,पुढारी,
३) शेवटाच्य शांत श्वासासाठी,१३ मार्च २०२६,लोकमत
४) इच्छामरण आणि दयामरण दोन्हीही हवेच, २० ऑगस्ट २००५,साप्ताहिक साधना
५) kaur banjot, what ails the right to die with dignity, 28 march 2018, down to earth
६) https://shreshthmaharashtra.com
७) https://pmc-ncbi-nlm-nih-gov
८) http://www.supremecourtofindia.nic.in/outtoday/wr1152009.pdf

भारतीय कायदेमंडळ आणि प्रश्नोत्तराचा तास - एक अवलोकन

प्रा. डॉ. अतुल नारायण खोटे

सहयोगी प्राध्यापक, स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड, जिल्हा वाशिम.

प्रस्तावना-

भारतीय कायदेमंडळातील दोन्ही सभागृह लोकसभा आणि राज्यसभा किंवा घटक राज्याच्या विधानमंडळातील विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहाच्या बैठकीची सुरुवात प्रश्नोत्तराच्या तासाने होते. जनतेच्या सार्वजनिक हिताच्या संदर्भात सदस्यांच्या निदर्शनास येणाऱ्या विविध तक्रारी, अडचणी सोडवण्याच्या दृष्टीने तसेच प्रशासनातील उनिवा दूर करून घेण्यासाठी किंवा या उणिवा शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी तसेच शासनाची भूमिका जाणून घेण्यासाठी प्रश्नोत्तर पद्धतीचा उपयोग होतो. पर्यायाने या प्रश्न उत्तरामुळे शासनालाही प्रशासन यंत्रणेच्या कारभाराबाबत व कार्यवाही बाबत तसेच त्यातील उणिवा दूर करण्याच्या दृष्टीने माहिती मिळते, असे म्हणणे अप्रस्तुत होणार नाही. संसदेतील विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधींना माहिती मिळवण्याचा स्वयंसिद्ध असा हा संसदीय अधिकार असल्यामुळे सत्ताधारी सदस्यावर अंकुश ठेवण्याचे सर्वात महत्त्वाचे हे अस्त्र आहे. मंत्रिमंडळाच्या कारभाराबाबत विविध योजना, निर्णय आदि सार्वजनिक बाबतीत संसद सदस्य विविध स्वरूपांच्या प्रश्नाद्वारे माहिती घेऊ शकतात. त्यासाठीच दोन्ही सभागृहातील बैठकीचा पहिला तास हा प्रश्न विचारणे व त्याची उत्तरे देण्यासाठी राखून ठेवलेला असतो. या प्रश्न उत्तरांच्या तासाद्वारे अनेक मातब्बर संसदपटूंनी जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडून संसद व राज्य विधानमंडळे दणाणून सोडलेली अनेक उदाहरणे आहेत. प्रश्नोत्तराचा तास या संसदीय अस्त्राचा पुरेपूर वापर करून घेणाऱ्या सुप्रसिद्ध लोकप्रतिनिधी मध्ये प्रामुख्याने माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी, व्हि. पी. सिंग, चंद्रशेखर सोमनाथ चटर्जी, सुषमा स्वराज, सिताराम येचुरी, शरद यादव, रामविलास पासवान, मधु दंडवते, जॉर्ज फर्नांडिस, शंकररावजी चव्हाण, शरद चंद्रजी पवार, गोपीनाथराव मुंडे, चंद्रकांत खैरे, बी. टी. देशमुख, प्रकाश खेडकर, विक्रम काळे, सतीश चव्हाण इत्यादींचा उल्लेख करता येतो.

भारतीय कायदेमंडळातील प्रश्न उत्तराच्या तासाचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व आतापर्यंत अनेक वेळा सिद्ध झालेले आहे. काही जागरूक प्रतिनिधींनी सतत पाठपुरावा करून सार्वजनिक संपत्तीचा अपव्य, शासकीय धोरणाच्या व कायद्याच्या उल्लंघनाची प्रकरणे प्रश्नोत्तराच्या माध्यमातून उघड केलेली आहे. त्यामुळे सरकारला चौकशीचे आदेशही द्यावे लागले आहे. प्रश्नोत्तराच्या संसदीय आयुधाद्वारे उघडकीस आलेली अनेक घोटाळा प्रकरने ज्यामध्ये प्रामुख्याने पहिल्या संसदेतील जीप घोटाळा प्रकरण 1951, दुसऱ्या संसदेतील मुंदडा प्रकरण 1957, पाचव्या संसदेतील इंपोर्ट लायसन्स प्रकरण 1974, नवव्या संसदेतील बोफोर्स प्रकरण, चारा घोटाळा, दूरसंचार घोटाळा, कोळसा घोटाळा आदींचा उल्लेख या संदर्भामध्ये करता येतो.

सरकारचे तातडीने लक्ष वेधून घेऊन सभागृहाचे चालू निर्धारित कामकाज स्थगित करून चर्चा करण्यास बाध्य करावयास लावणारा 'स्थगन प्रस्ताव' हे सदस्यांना मिळालेले अतिशय महत्त्वाचे आयुध आहे. स्थगन प्रस्तावावरील चर्चेचे सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे चार भाग पडतात. प्रस्ताव मांडणे, प्रश्न माननीय अध्यक्षांनी सभागृहा समोर ठेवणे, चर्चा, मतदान व सभागृहाचा निर्णय. स्थगन प्रस्तावाने तीन अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. विषय हा निश्चित असला पाहिजे, तो तात्काळ व अत्यावश्यक असावा आणि तो लोकहिताशी संबंधित असावयास हवा.

वैयक्तिक विषय या प्रस्तावांतर्गत दाखल करता येत नाही. सत्याग्रह, उपोषण, इतर राज्यात घडलेल्या घटना, मोर्चे, लाठीमार, संप, न्यायप्रविष्ठ बाबी, आत्महत्या स्थगन प्रस्तावाचे विषय होऊ शकत नाहीत. राज्यपालांच्या अभिभाषनाच्या दिवशी विविध विभागांच्या मागण्यावर चर्चा असलेल्या दिवशी किंवा ज्या दिवशी अविश्वास दर्शक प्रस्तावावर सभागृहात चर्चा असेल त्यादिवशी विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडता येत नाही. आधुनिक भारतीय संसदीय कामकाज पद्धतीमध्ये 'लक्षवेधी सूचने'चा सभागृहाच्या कामकाज पद्धतीतील समावेश ही संपूर्णपणे भारतीय संकल्पना आहे . याला लक्षवेधी सूचना म्हणण्याचे कारण निकडीच्या व महत्त्वाच्या बाबीकडे संबंधित मंत्र्याचे लक्ष वेधण्यासाठी ही सूचना दिली जाते. जे कार्य स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून होत नाही ते लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून होण्याची शक्यता आहे. 1958 मध्ये लक्षवेधी सूचनेसंबंधीची तरतूद नियमात करण्यात आली. तातडीच्या आकस्मिक कारणासाठी स्थगन प्रस्तावा- व्यतिरिक्त एखाद्या स्वतंत्र आयूद्धाची निकड लक्षात घेऊन लक्षवेधी सूचनेचा नियमात समावेश करण्यात आला. या आयुधाद्वारे प्रशासनातील उणीवा शासनाच्या लक्षात आणून देणे त्याबाबत शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कारवाई ही देखील सभागृहापुढे निवेदनाद्वारे आणून देणे या माध्यमातून शासनावर अंकुश ठेवणे.

अनेक संसदीय आयुधापैकी 'अर्धा तास चर्चा' हे लोकसभा, राज्यसभा व विविध विधानमंडळामध्ये वापरले जाणारे महत्त्वाचे आयुध आहे. विधानसभा नियमांमध्ये 1970 पूर्वी फक्त प्रश्नातून उद्भवणाऱ्या प्रश्नांसाठी अर्धा तास चर्चेची तरतूद होती. त्यानंतर 1970- 71 मध्ये नियमात बदल करून या चर्चेची व्याप्ती वाढवण्यात आली. त्यामुळे प्रश्ना व्यतिरिक्त इतर सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर सुद्धा चर्चा उपस्थित करणे सुलभ झाले. 'अल्पकालीन चर्चा' एक महत्त्वाचे आयुध सदस्यांना उपलब्ध आहे. 1985 मध्ये या चर्चेची तरतूद नियमात करण्यात आली. अल्पकालीन चर्चेची उपयुक्तता तातडीच्या बाबी उपस्थित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. या चर्चेला जास्तीत जास्त अडीच तास वेळ असल्यामुळे तातडीने सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी सदस्यांना एक जादा संधी मिळते. 1971 साली 'अंतिम आठवडा प्रस्ताव' संबंधीच्या तरतुदीचा समावेश करण्यात आला. या प्रस्तावाचा उद्देश सभागृह स्थगित होण्यापूर्वी निकटच्या कालावधीतील अडचणी, समस्या सभागृहासमोर आणणे हा आहे. राज्याच्या व्यापक हिताच्या दृष्टीने सार्वजनिक महत्त्वाचे विषय उदाहरणार्थ कायदा व सुव्यवस्था, महागाई, पिण्याच्या पाण्याची राज्यव्यापी समस्या, अवर्षण, टंचाई इत्यादी विषय सभागृहासमोर मांडता येतात.

प्रश्न उत्तर तासाची प्रक्रिया अध्यक्षीय लोकशाही शासन प्रणाली असलेल्या अमेरिकेमध्ये प्रचलित नाही. अमेरिकेत प्रश्न उत्तराचा तासच नसतो. मंत्रिमंडळाचे सदस्य उत्तर देण्याकरिता सभागृहात उपस्थित नसतात. संसदीय लोकशाहीतील 'मंत्रिमंडळाची निर्मिती कायदेमंडळातून' या तत्त्वाचा स्वीकार अध्यक्षीय हे लोकशाहीत नसतो. त्यात मंत्रिमंडळ आणि कायदेमंडळ यात वास्तविक सत्ता विभाजन असते. भारतातील राजकीय प्रक्रिया आणि संस्थांची निर्मिती ही ब्रिटिश शासन काळात झाली त्यामुळे संसदीय लोकशाही तत्वे स्वीकारण्यात आली. इंडियन कौन्सिल ऍक्ट 1861 नुसार भारतीयांचा गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्यूटीव्ह कौन्सिलमध्ये कायदे तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागास सुरुवात झाली. मात्र हा अधिकार मर्यादित स्वरूपाचा होता. यामध्ये प्रश्न विचारण्याचे, चर्चा करण्याचे तत्व समाविष्ट नव्हते. सरकारी धोरणास जे सभासद अनुकूल असतील अशाच सभासदांची कौन्सिलवर वर्णी लागत असे. त्यामुळे भारतीय जनतेच्या भावनांची अवहेलना होत होती. इंडियन कौन्सिल ऍक्ट 1892 नुसार पूर्वीच्या अधिनियमामध्ये दुरुस्ती करण्यात आली. या नव्या कायद्याने मध्यवर्ती कौन्सिल मध्ये कमीत कमी दहा व जास्तीत जास्त सोळा अशी बिन सरकारी सदस्यांची संख्या ठरविण्यात आली. तर मुंबई व मद्रास प्रांताच्या कौन्सिलात प्रत्येकी

कमीत कमी आठ व जास्तीत जास्त वीस अशी संख्या ठरविण्यात आली. कलम दोन नुसार पहिल्यांदा परिषदेमध्ये काही बंधनांची मर्यादा पाळून चर्चा करण्याचा व प्रश्न विचारण्याचा असे दोन महत्त्वाचे अधिकार प्रदान करण्यात आले. तत्कालीन सरकारचा असा दृष्टिकोन होता की शासनाची धोरणे लोकांना माहीत असावीत आणि हा उद्देश प्रश्न विचारण्याच्या हक्काद्वारे साध्य व्हावा. त्यानुसार इ.स.वी सन 1894 साली पहिला प्रश्न विचारण्यात आला.

सर्वोच्च विधान परिषदेमध्ये दिनांक 2 फेब्रुवारी 1892 मध्ये प्रश्न विचारण्याच्या नियमांतर्गत प्रश्न विचारण्याकरिता सहा दिवसांची नोटीस विधी विभागाच्या सचिवाला देण्याचा नियम करण्यात आला. सभागृहाचे सभापती सहा दिवसांपेक्षा कमी कालावधीच्या नोटीस वर प्रश्न विचारण्याची परवानगी स्वविवेकानुसार देऊ शकतात. तसेच प्रश्न विचारण्याच्या नोटीसचा कालावधी वाढविण्याचा अधिकारही सभापतींच्या क्षेत्रांतर्गत आहे. याच अधिनियमांतर्गत प्रश्नांचे स्वरूप आणि रचना निश्चित करण्यात आली. प्रश्नांच्या रचनेमध्ये फक्त सूचने करीता प्रश्न असावेत. प्रश्नांमध्ये काल्पनिकता, तर्कवितर्क आणि अपमानजनक भाषा राहू नये. प्रश्नांच्या उत्तरानंतर कसल्याही प्रकारच्या चर्चेस परवानगी राहणार नाही. ही वरील दोन बंधने ब्रिटनमधील हाऊस ऑफ कॉमन्समध्ये विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना अनुरूपच होती, असे लॉर्ड लेन्स डावणे यांनी स्पष्ट केले. इतर सदस्यांस आपल्या वतीने प्रश्न विचारण्याची स्वविवेकानुसार परवानगी ही नोटीस देणाऱ्या सदस्यांस या अधिनियमाद्वारे देण्यात आली. काही विशिष्ट विषयांच्या उदा. सैनिकी तयारी, वित्तीय नीती विषय इत्यादींच्या प्रश्नांना विचारण्याची परवानगी नाकारली जाऊ शकते. मात्र या प्रश्नांची योग्यायोग्यता, प्रश्न विचारण्याची वेळ व परिस्थितीवर आधारित राहील. सध्या सभापतीला काही विशिष्ट विषयावर लोकांच्या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने प्रश्न विचारण्याची परवानगी न देण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. त्यामुळे अधिनियमांमध्ये विशिष्ट विषयांचा उल्लेख अनावश्यक आहे. अध्यक्षाला त्याबाबतीत विशेषाधिकार प्रदान करणे पुरेसे आहे.

इ. स. वी सन 1937 मध्ये विधानसभेच्या नियमांमध्ये दुरुस्ती केली गेली आणि प्रश्न विचारण्याच्या पद्धतीमध्ये देखील दुरुस्ती केली गेली. या दुरुस्तीमध्ये प्रश्न कोणत्या खात्याकरिता आहे, हे स्वच्छ लिहिलेले नसेल तर प्रश्न स्वीकारला जाणार नाही, असे ठरविले आणि उत्तराची तारीख स्पष्ट करण्याचे बंधन टाकण्यात आले. इसवी सन 1937 मध्ये विधानसभा नियमांमध्ये केले गेलेले परिवर्तन देशाला स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत स्थापित राहिले. भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 1947 मध्ये वर्तमान काळातील कोणत्याही विषयावर प्रश्न विचारण्याचा अधिकार देण्यात आला. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर शासन हे विधिमंडळाला जबाबदार झाले. त्यामुळे पूर्वी ज्या विषयासंबंधी प्रश्न विचारणे बंधनकारक होते त्या विषयावर देखील संसद आणि विधिमंडळामध्ये प्रश्न विचारण्याची परवानगी प्राप्त झाली. राज्यघटनेच्या कलम 208 (2) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून राज्याच्या विधिमंडळाने कार्यपद्धतीचे नियम ठरविले असून प्रश्नोत्तरासंबंधी प्रश्न तरतूद केलेली आहे. इसवी सन 1952 मध्ये संसदेची प्रक्रिया आणि कार्यप्रणालीसंबंधि नियमांमध्ये दुरगामी परिवर्तन केले गेले. त्या नियमांच्या आधारेच विधानसभेने नियमांची रचना केली आहे.

प्रश्नोत्तराचा तास हा लोकशाहीच्या अंतरात्म्याचे द्योतक आहे. सरकारला बहुमत प्राप्त असले तरी प्रश्न उत्तराचा तास प्रभावित होऊ शकत नाही. यादरम्यान शासनाची खऱ्या अर्थाने सत्वपरीक्षा असते. मंत्रिमंडळातील प्रत्येक सदस्याला अपेक्षित परिस्थितीला सामोरे जाण्याची तयारी करावी लागते. विषयातील त्यांचे नेतृत्व आणि संसदीय प्रतिभेची ही कसोटी असते. सभागृह सदस्यांद्वारे विचारला गेलेला प्रश्न हा सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांकडे आहे का विरोधी पक्षांच्या सदस्या करीता आहे हा मुद्दा गौण असतो. सदस्यांद्वारे विचारला गेलेला प्रश्न हा सभागृहाची संपत्ती

असतो. वास्तविक लोकशाही कशाप्रकारे चालत आहे याचा अनुभव प्रश्नाद्वारेच प्राप्त होत असतो. प्रश्न द्वारे कायदेमंडळ कार्यकारी मंडळ सदैव सतर्क असते, सरकारची कार्य आणि तत्त्वांना दिशा देण्याचे काम केले जाते आणि चुका आणि कमतरतांना प्रकाशात आणले जाते. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरांकरिता शासनास अविश्रांत श्रम करावे लागतात. या प्रक्रिया करिता बराच पैसा देखील खर्च होतो. त्याकरता प्रश्नांचे महत्त्व दुर्लक्षिले जाऊ शकत नाही. खर्चाकडे देखील दुर्लक्ष केले जाते कारण लोकशाहीमध्ये संसदीय शासन प्रणाली जनतेच्या सर्वांगीण हितासाठीच कार्यरत असते. सदस्यांच्या खात्याविषयी प्रश्न विचारला असेल तर खात्याचे मंत्री उत्तर देतात. एखाद्या व्यक्तीवर किंवा संस्थेवर सरकारकडून अन्याय होत असेल किंवा कामाला दिरंगाई होत असेल तर त्याला प्रश्नरूपाने वाचा फोडता येते. नाशिकच्या शासकीय रुग्णालयात मुल मारल्याची दुर्घटना घडली. या दुर्घटनेमागील कारण जाणण्याच्या हेतूने महाराष्ट्र विधानसभेत प्रश्न विचारण्यात आला. संबंधित मंत्र्यांनी प्रश्नाचे उत्तर दिल्यानंतर सदस्यांतर्फे दुर्घटने मागील सत्य शोधन्याच्या हेतूने उपप्रश्नांची सरबत्ती करण्यात आली. अंततः मुलाच्या मृत्यूस दाईचा हलगर्जीपणा कारणीभूत असल्याची कबुली मंत्र्यांना द्यावी लागली. एखाद्या मंत्र्याची आपल्या विभागात पाहिजे तशी पकड आहे किंवा नाही याचाही लेखाजोखा घेतला जातो. ही एक प्रकारे प्रत्येक खात्याची जाहीर रित्या केली जाणारी चौकशीच असते. काही वेळा काही बाबींची चौकशी करण्याकरीता शासनाला एखाद्या निष्पक्ष, तज्ञ आणि जबाबदार व्यक्तीची नेमणूक करणे भाग पडते.

तारांकित प्रश्नाचे उत्तर ज्या तारखेला हवे असेल त्याच्या 30 दिवस आधी अशा प्रश्नाची सूचना विधानमंडळ सचिवालयात मिळणे आवश्यक आहे. तसेच प्रश्न देताना सदस्यांनी कोणत्या मंत्र्याला उद्देशून प्रश्न विचारला आहे, हे देखील त्या सूचनेत नमूद करावे लागते. अधिवेशनात सदस्यांना प्रश्नाचे उत्तर वेळेवर देता यावेत त्याकरिता त्यांच्याकडे विधानसभा सचिवालय मार्फत कार्यक्रम पत्रिकेतील प्रश्नांचा चक्राणुक्रम माहितीसाठी पाठवण्यात येतो. मंत्र्यांना त्यांच्या विभागाशी संबंधित प्रश्नांना उत्तरे देण्याच्या सोयीसाठी चक्राणु क्रमात मंत्र्यांची गटवार विभागणी केली जाते. त्यामध्ये मंत्र्यांकडे असलेल्या खात्यासंबंधीचे तारांकित प्रश्न तोंडी उत्तरा करिता ज्या तारखांना घेण्यात येतील त्या तारखा दिलेल्या असतात. अधिवेशनाच्या दरम्यान दर आठवड्याला सोमवार पासून शुक्रवार पर्यंत ज्या दिवशी विधानसभेच्या बैठका असतात त्या प्रत्येक सभेच्या वेळी सुरुवातिचा एक तास वेळ प्रश्न उत्तरासाठी देण्यात येतो. एखाद्या दिवशी सभागृहाची बैठक रद्द झाल्यास त्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तराची यादी दुसऱ्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येते. आपल्या तारांकित प्रश्नांची उत्तरे सभागृहात कोणत्या क्रमाने हवीत तो क्रमही प्रश्नांची सूचना देताना सदस्यांना त्यात नमूद करता येतो. असा कोणताही क्रम नमूद नसल्यास त्या दिवसाकरिता त्या सदस्यांचे प्रश्न ज्या क्रमाने विधिमंडळ सचिवालयाकडे आलेले असतील त्याच क्रमाने त्या दिवसाच्या प्रश्नांच्या यादीत दाखल करण्यात येतात. तारांकित प्रश्न केवळ माहिती मागविण्यासाठी असेल तर तो अतारांकित ठरविला जातो.

सारांश-

लोकशाहीत या प्रभावी आयुद्धावरच लोकशाहीची यशस्वीता अवलंबून असते. मात्र केवळ लोकशाहीचा ढाचा व यंत्रणा म्हणजे लोकशाही नाही तर लोकशाहीच्या तत्त्वांची किती प्रभावीपणे अंमलबजावणी होते आणि स्वातंत्र्य जनमानसांमध्ये किती खोलवर रुजलेले आहे, ही लोकशाहीची परिमाणे आहेत. प्रश्नोत्तराचा तास हे संसदीय शासन पद्धतीतील जबाबदारीचे तत्व राबविण्याचे महत्त्वाचे आयुध असले तरी बराचसा वेळ सत्तारूढ व विरोधी पक्षातील शह-काटशहाच्या राजकारणातच खर्च होतो. सरकारला पराभूत करण्याच्या अभिनिवेशात डावपेच व आरडा ओरड करून सरकारची कोंडी करण्यावर भर देण्यात येतो. सरकारही जबाबदार शासन पद्धतीच्या तत्त्वज्ञानाचा आशय नजरेआड करून वेळ निभावून नेण्याचा प्रयत्न करते. सभापती हे नि:पक्षपाती असावेत असे गृहीत असते. तरी अनेक

वेळा कळत-नकळतपणे आपल्या पक्षाची इब्रत सांभाळत सांभाळत कामकाज करण्याकडे त्यांचा कल दिसून येतो. त्यामुळे सत्तारूढ पक्ष शेफारतो तर विरोधी पक्ष इरेला पेटतो. परिणामी नियोजित कामकाजाच्या यादीतील एखाद दुसऱ्या प्रश्नावर चर्चा होऊन वेळ संपल्यामुळे प्रश्नोत्तराचा तासही संपतो. मात्र काही अपवादात्मक प्रसंग ही घडल्याचे दिसून आले आहे. जिथे विरोधी पक्ष प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी करतो व सरकारही त्यामागील सार्वजनिक हित विचारात घेऊन प्रश्नावरील चर्चेत सहभाग घेऊन धोरणात्मक निर्णय जाहीर करतात. सभापती ही काही वेळा प्रश्न राखून ठेवून किंवा मंत्र्यांना पुन्हा सविस्तर उत्तर देण्याचे आदेश देतात. यातून जनतेच्या हिताचे अनेक प्रश्न मार्गी लागत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासाची फलश्रुती व्यवस्थेवर अवलंबून नसून प्रभावी संसदपटू सदस्य, विरोधी पक्षाची मजबुती व सरकारची जनतेच्या प्रश्नाबाबतची संवेदनशीलता यावर अवलंबून असते. यासाठी विधिमंडळ सदस्यांबरोबरच राजकीय पक्षांनी आपापल्या सदस्यांच्या व पक्षांच्या विधिमंडळातील कामगिरीचा लेखाजोखा नियमितपणे लोकांसमोर मांडला तर सरकारच्या जनतेप्रति असलेल्या जबाबदारीचा ग्राफ उंचावून लोकांचे प्रश्न सुटतील. तेव्हा कुठे खऱ्या अर्थाने लोकशाही यशस्वी झाल्याचे आपल्याला म्हणता येईल.

संदर्भ:-

1. कश्यप सुभाष सी., ह्यूमन राइट्स अँड पॉलिटिक्स, नवी दिल्ली, 1978.
2. कौल एम. एन. , पार्लमेंटरी इन्स्टिट्यूशन अँड प्रोसिजर, नवी दिल्ली, 1979.
3. गिरमे के.टी., विधानसभा-परिचय आणि कामकाज, श्री विद्या प्रकाशन पुणे, 1983.
4. रॉय एस. के., डेमोक्रसी इन इंडिया, न्यू दिल्ली. 1983.
5. लोकसभा सचिवालय, केशचन अवर इन लोकसभा, नवी दिल्ली 1985.

गॅंगमॅन : मराठी दलित आत्मकथनातील भाषा वैशिष्ट्ये : इंग्रजी शब्द, शिव्या, म्हणी, वाक्प्रचार आणि हिंदी शब्द

संशोधक विद्यार्थी
प्रशांत आत्माराम गवळे
मराठी विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड

संशोधक मार्गदर्शक
प्रा. डॉ. अहेर डी. के.
विभाग प्रमुख, मराठी विभाग, म. ज्यो. फुले महाविद्यालय, मुखेड जि. नांदेड.

१९६० नंतर दलित साहित्याचा प्रवाह निर्माण झाला. प्रथमतः दलित लेखकांनी कवितेच्या माध्यमातून आपल्या वेदनांना वाट करून दिली तसेच इतर साहित्य प्रकारही जसे - कथा, कादंबरी हेही हाताळले. पण याहीपेक्षा जास्त मराठी साहित्यात दलित आत्मकथनांनी आपली स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण केली, विशेषतः दलित आत्मकथांची भाषा - भाषाशैली हे इतरांच्या तुलनेत फारच वेगळी होती आणि भाषाशैलीमुळेच दलित आत्मकथनांची अभिव्यक्ती ही इतरांच्या तुलनेने प्रभावी ठरली गेली.

भाषा ही देवाण-घेवाणाची प्रभावी असे साधन आहे. भारतीय समाजव्यवस्थेत जात - धर्म - तसेच उपजाती यांच्या वेगवेगळ्या भाषा दिसून येतात. त्याचप्रमाणे दलितांची देखील एक स्वतंत्र भाषा होती. अर्थात ती मराठी असली तरी त्यातील शब्दरचना व शब्द यात कमालीची तफावत दिसून येते. भाषेच्या संदर्भात रा.ग. जाधव म्हणतात, **"भाषेच्या स्तरावर वापरावर सांस्कृतिक मूल्य ठरते"** जमातीच्या संस्कृतीची ओळख भाषेमुळेच होते (१). भाषा ही जमातीच्या संस्कृतीची ओळख आहे भाषेच्या माध्यमातून समाजाचे वास्तव रूप प्रगट होते.

गॅंगमन मधील महार समाजाची भाषा:

दलित आत्मकथनातील महार समाजाची भाषा ही वेगळ्या पातळीवर जाते त्यात स्त्री-पुरुषांच्या भाषेचाही फरक दिसून येतो लेखकांच्या वडिलांना जेव्हा शेतातून निघून जायाला सांगतो तेव्हा त्याचे वडील घरच्यांना म्हणतात, "दुपारा मालकाच्या पोरान मलं लय इज्गज-इज्गज मायवर शिव्या देल्या, अन माराय बी आल्ता आंगावर. मप्लं आपलं रात पासून अंग बुखारल्यान कामात काय हात चालना गेला इतक्यातच मनी." (१८) कोणताही शब्द हा सरळ त्याच्या बोलीभाषेतून येतो अगदी सहज. लेखकांच्या जन्माबद्दल सांगताना त्याची आई म्हणते, "बाप्पा तुझ्या बाळातपणाच्या वक्ती लई पंचायतच झाल्ती. लेकी बाळीच पहिलं बाळातपण माहेरालं करावं म्हणतात. मातर मव्हं माहेरात कोणीच नवतं." (४६) आपल्या सहज बोलीतून भावनेला वाट मोकळी करून देताना दिसून येते. " काय मरण झालं माय, विचारीचा काहीतरी तरास आसलं ! त्याच्या बिगर जीव देतन्हाई, माय बाई मानुस ! भयंकार दुख आसल ! (१२) दलित स्त्री व पुरुष यांच्या भाषेत थोडा बहुत फरक दिसून येतो. भाषा त्या त्या प्रदेशानुसार बदलत बदलताना दिसून येते.

लेखकाचे वडील जेव्हा गॅंगमॅन म्हणून रेल्वे खात्यात लागतात त्यावेळेस मात्र त्यांच्या भाषेत बराच बदल होते ज्या ज्या ठिकाणी त्यांची बदली झाली त्या त्या ठिकाणी च्या भाषेचाही उल्लेख यात आढळून येतो.

गँगमन मधील इंग्रजी शब्द :

गँगमॅन मध्ये लेखकांचे वडील जेव्हा रेल्वे लाईन मध्ये कामाला लागतात तेव्हा त्यांच्या तोंडातून इंग्रजी शब्द येताना दिसतात.

"काय, कोणती गाडी हाय, सोयरे हो ?"

"मिक्स पाछिंदर गाडी आली दाजी" (३५).

'मिक्स पाछिंदर' हा शब्द लेखकांचे वडील म्हणतात. त्याची इंग्रजी ही अपभ्रंश सारखी आहे. जशी त्यांची जीभ वळेल तशी ती आहे. तसेच यात; सिग्नल कोटर, फलाट फार्म, रोळ, रेल्वे, पि डबल्या, आय डबल्या, बराडगेज, ठेसन, आडमिट, टाली संटीग, इंजन कॉसिंग, गार्ड असे अनेक इंग्रजी शब्द गँगमेंमध्ये दिसून येतात.

गँगमनमधील म्हणीचा वापर:

गँगमन हे दलित आत्मकथन असले तरी त्याला गाव गळयाचा स्पर्श आहे. रेल्वे लाईनच्या कामाचा स्पर्श आहे. सगळे अनुभव आहेत. माणूस बोलताना म्हणीचा वापर करत असतो. एखाद्या संकटाच्या परिस्थितीचा संदर्भ सांगण्यासाठी म्हणी खूप महत्त्वाच्या ठरतात. सदानंद पुंडगे यांनी यात म्हणीचा चपखल असा वापर केलेला दिसून येतो. सातपुड्याच्या परिसरात काम करत असताना, जो अनुभव आला, त्याचे वर्णन लेखकांनी केलेली आहे तसं पाहिलं तर सातपुडा म्हणजे निसर्गरम्य ठिकाण लोक दूरदूर वरून हे बघायला जातात पण लेखक म्हणतात, "पानझड झाल्यानं सावली नवती. बकी तितलं तापल्या सारखं पाणी झाल्त. तहान भागना केली. डोळे लाल झालते. मलं कळू लाग्ल यालच मन्तात, "दुरून डोंगर साजरे." ते बिल्कुल बरोबर हाय. (१७७) त्याच प्रमाणे लेखकाचे वडील म्हणतात, "गावकडं असताना मेलेलं ढोर गावाबाहेर फेकावा लागायचं, इथं रेल्वाईत कामालं लागल्यापासून बाया मान्साचं मास मजा कराव लागलय. हे बर हाय! का ते बर होतं? दोन्हीकडचं सारखाच! तिकडं आड! इकडं इहीर."(१४) "आगीतून फुरड्यात पल्डयावानी" (३१).

गॅंग मॅन मधील शिव्या:

दलित जीवनाचा आणि गावगाड्याचा एक भाग म्हणजे शिव्या. अगदी सहज बोलताना देखील तोंडातून शिव्या दिल्या जातात. तर अनेक ठिकाणी जाणीवपूर्वक अपमानजनक शिव्या दिल्या जातात. लेखकाने या शिव्यांचे वास्तव देखील तेवढ्याच सहजतेने हाताळलेले आहे. 'मायझ्या, म्हार्या माजलास काय? जरा थांब, मह्या बापाला सांगून वावराच्या बाहेर न्हाय काढल तं मव्ह नाव दुसरं ठेव." (१६) असे प्रसंग तर आहेतच पण जातिवाचीक शिव्या पण दिल्या जाते. "जाना बे धेड के बच्चे." अशा पण शिव्या येतात. शिव्या मधून सामाजिक मानसिकता दिसून येते. तसेच यात मायच्या, भाडखाऊ तुव्हा मुर्दा बसू दे, मड जाऊ दे, भडवीचे, बटक्या, मादरचोद, सडीरांड, परदिस तोंडया, छिनाल." अशा कितीतरी शिव्या यातून दिसून येतात .

गँगमनमधील वाक्प्रचार:

मध्ये जसे शिव्या, म्हणीचा वापर आला आहे. तसेच काही वाक्प्रचारही आली आहेत. आशयाच्या दृष्टीने वाक्प्रचार महत्त्वाचे ठरतात. हे वाक्प्रचार बोलीभाषेच्या वळणाने येत असल्यामुळे त्यात वेगळे सौंदर्य प्रकट करतात. 'अंगावर इज पडणे, डोळे पांढरे होणे, ढेकणावाणी इरघळणे, नाव दुसर ठेवणे, झेंडू फुटणे, खुर्दा होणे, अप्रूप वाटणे, पोटात रेघ ओढणे, माती आड होणे अश्या विविध वाक्प्रचारमुळे गँगमनमधून परिस्थितीची, दु:खाची जाणीव होते.

गॅंगमनमधील हिंदी भाषा:

सदानंद पुंडगे यांचे वडील जेव्हा रेल्वेलाईन मध्ये कामाला लागतात तेव्हा त्यांच्या बोलण्यात सहजपणे हिंदी भाषा येताना दिसते. कामानिमित्त वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या बदली मुळे तेथील भाषाचा ही त्यांच्या बोलण्यात प्रभाव दिसतो. पण ही हिंदी भाषा काही शुद्ध स्वरूपात नाही. ती बोलीभाषेच्याच रूपाने आलेली आहे. "जल्दी जाओ यहाँ से! से पुरी रात बायको लास को संभालो। सुबह पोलीस आकर पंचनामा करेगी। चलो, फॉर्म चलो निकलो फौरन।" (९)

"देखो आबी तुम टेम्पवारी है। तुम्हारा अच्छा काम देखके तुम को परमनन्ट करेगा। ठीक है। कलसे काम पार आ जाओ।" (२७)

"हामार नया चाबिदार छोडकरे का दिमाक कमजोर छे। थोड बडबडावन राहीन। (१११) अश्या प्रकारच्या हिद नेमाडी भाषेचा वापर यात दिसून येतो.

गॅंगमनमधून लेखकांनी प्रमाणभाषेचा उपयोग न करता पूर्णपणे बोलीभाषेच्या उपयोग केलेला आहे. त्यामुळेच या आत्मकथनाने वेगळेपण सिद्ध होते अत्यंत सरळ व सहज निवेदनामुळे या आत्मकथाने सौंदर्य खुलत जाते.

संदर्भ सूची :

1. पुंडगे, स. (वर्ष). *गॅंगमॅन*. पुणे: (प्रकाशकाचे नाव).
2. लिंबाळे, श.कु. (2004). *दलित आत्मकथन*. पुणे: पॉप्युलर प्रकाशन.
3. कांबळे, अ. (2008). *दलित साहित्य: स्वरूप आणि वाटचाल*. औरंगाबाद: साकेत प्रकाशन.
4. जाधव, रा. (2012). *दलित साहित्याचे सामाजिक संदर्भ*. मुंबई: ग्रंथाली.
5. पाटील, श. (1995). *जात, वर्ग आणि शोषण*. पुणे: प्रतिभा प्रकाशन.
6. रेगे, श. (2013). *Writing Caste / Writing Gender: Reading Dalit Women's Testimonios*. नवी दिल्ली: Zubaan.
7. देव्ही, जी. एन. (1997). *After Amnesia: Tradition and Change in Indian Literary Criticism*. हैदराबाद: Orient Longman.
8. दिवटे, हे. (2015). दलित आत्मकथनातील अनुभवविश्व: *गॅंगमॅन*चा विशेष संदर्भ. *अस्मितादर्श*, 8(2), 45–52.
9. कांबळे, अ. (संपा.). (2010). *दलित साहित्याची समीक्षा परंपरा*. पुणे: प्रतिष्ठान प्रकाशन.
10. जाधव, रा. (2016). श्रमिक जीवनाचे आत्मकथनात्मक दस्तऐवजीकरण. *प्रतिष्ठान*, 12(1), 33–41.

इराण–इस्त्रायल संघर्ष आणि डोनाल्ड ट्रम्प यांची कूटनीती: भारतासाठी वाढती आव्हाने

प्रा. डॉ. आरती राणे
अर्थशास्त्र विभाग
के. आर. एम. महिला महाविद्यालय, नांदेड

मध्यपूर्व हा जगातील सर्वात संवेदनशील आणि धोरणात्मक दृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश आहे. येथे इराण आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्ष केवळ प्रादेशिक नसून जागतिक स्थैर्यावर परिणाम करणारा आहे. त्याचबरोबर, डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळातील "अमेरिका प्रथम" कूटनीतीने या प्रदेशातील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची केली. या दोन्ही घटकांचा एकत्रित परिणाम भारतासाठी अनेक पातळ्यांवर आव्हाने निर्माण करतो.

सर्वप्रथम, ऊर्जा सुरक्षा हा भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. भारत आपली मोठी ऊर्जा गरज गल्फ मधून पूर्ण करतो. या भागातील तणावामुळे तेलपुरवठा विस्कळीत होण्याचा धोका वाढतो आणि कच्च्या तेलाच्या किमती वाढतात. याचा थेट परिणाम महागाईवर आणि सामान्य नागरिकांच्या आर्थिक स्थितीवर होतो. याशिवाय, डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर लादलेल्या कठोर निर्बंधांमुळे भारताला स्वस्त इराणी तेल आयात करणे मर्यादित झाले, ज्यामुळे ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण करण्याची गरज अधिक वाढली.

दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे भारताच्या परराष्ट्र धोरणातील संतुलन. भारताचे इस्त्रायल सोबत संरक्षण, कृषी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मजबूत संबंध आहेत, तर इराण हा भारतासाठी ऊर्जा आणि भू-राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा भागीदार आहे, विशेषतः चाबहार बंदर प्रकल्पाच्या दृष्टीने. अशा परिस्थितीत भारताला अत्यंत काळजीपूर्वक संतुलित धोरण स्वीकारावे लागते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अमेरिकेचा दबाव वाढल्याने हे संतुलन अधिक कठीण झाले आहे.

तिसरे आव्हान म्हणजे जागतिक व्यापार आणि आर्थिक स्थैर्य. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे शिपिंग मार्ग असुरक्षित होतात, ज्यामुळे आयात-निर्यातीवर परिणाम होतो. डॉलरच्या तुलनेत रुपयावर दबाव येतो आणि परकीय गुंतवणुकीत अनिश्चितता निर्माण होते. यामुळे भारताच्या आर्थिक विकासावर अप्रत्यक्ष परिणाम होतो.

चौथे, मध्यपूर्वेत मोठ्या संख्येने भारतीय कामगार कार्यरत आहेत. संघर्ष वाढल्यास त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीत भारत सरकारला मोठ्या प्रमाणावर बचाव आणि स्थलांतर मोहिमा राबवाव्या लागतात. हे एक मानवी आणि राजनैतिक दोन्ही प्रकारचे आव्हान आहे.

शेवटी, आंतरराष्ट्रीय कूटनीतीच्या पातळीवरही भारताची भूमिका महत्त्वाची ठरते. युनायटेड नेशन सारख्या संस्थांमध्ये भारताला शांतता आणि स्थैर्य यासाठी सक्रिय भूमिका घ्यावी लागते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या एकतर्फी बहुपक्षीय कूटनीती कमजोर झाल्याने भारतासारख्या देशांना अधिक जबाबदारीने वागावे लागते.

इराण–इस्त्रायल संघर्ष आणि डोनाल्ड ट्रम्प यांची कूटनीती यामुळे निर्माण झालेली जागतिक परिस्थिती भारतासाठी आव्हानात्मक आहे. ऊर्जा सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि संतुलित परराष्ट्र धोरण या तीन क्षेत्रांवर भारताला विशेष लक्ष द्यावे लागेल. योग्य धोरणात्मक पावले उचलल्यास भारत या आव्हानांना संधीमध्ये रूपांतरित करून जागतिक स्तरावर आपले स्थान अधिक मजबूत करू शकतो.

1) ऊर्जा सुरक्षेवरील परिणाम :

भारत हा जगातील सर्वात मोठ्या कच्च्या तेल आयातदार देशांपैकी एक आहे. भारताच्या ऊर्जा गरजांचा मोठा भाग हा मध्यपूर्वेतील देशांवर अवलंबून आहे. विशेषतः पॅरेसियन गल्फ आणि होरमूज सामुद्रधुनी हे जागतिक तेल

वाहतुकीचे अत्यंत महत्त्वाचे मार्ग आहेत. या भागात जर इराण–इस्त्रायल संघर्षामुळे तणाव निर्माण झाला, तर तेलपुरवठा विस्कळीत होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो.

या परिस्थितीचा थेट परिणाम आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींवर होतो. पुरवठा कमी झाला किंवा अस्थिर झाला की तेलाच्या किमती वाढतात. भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेत याचा परिणाम महागाई वाढण्यात दिसतो. पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किमती वाढल्यामुळे वाहतूक, उत्पादन आणि शेती या सर्व क्षेत्रांवर परिणाम होतो आणि एकूणच आर्थिक विकासाचा वेग मंदावतो.

याशिवाय, डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळात इराणवर लादण्यात आलेल्या कठोर आर्थिक निर्बंधांमुळे भारताला इराणकडून मिळणारे स्वस्त कच्चे तेल मोठ्या प्रमाणावर कमी झाले. याचा परिणाम असा झाला की भारताला तुलनेने महाग पर्याय शोधावे लागले, ज्यामुळे ऊर्जा आयात खर्च वाढला.

या सर्व परिस्थितीमुळे भारतासाठी ऊर्जा धोरण अधिक आव्हानात्मक बनले आहे. त्यामुळे भारताला एकाच स्रोतावर अवलंबून न राहता ऊर्जा स्त्रोतांचे विविधीकरण आवश्यक ठरते. यामध्ये नवीकरणीय ऊर्जा इतर भौगोलिक प्रदेशांतील तेल पुरवठा आणि ऊर्जा कार्यक्षमतेवर भर देणे हे महत्त्वाचे उपाय ठरतात.

एकूण निष्कर्ष असा की, मध्यपूर्वेतील तणाव आणि आंतरराष्ट्रीय निर्बंध यांच्या संयुक्त परिणामामुळे भारताची ऊर्जा सुरक्षा अधिक असुरक्षित बनते आणि त्यामुळे दीर्घकालीन स्थैर्यासाठी विविधीकरण हीच अपरिहार्य रणनीती ठरते.

2) परराष्ट्र धोरणातील संतुलन :

भारतासाठी परराष्ट्र धोरणातील सर्वात मोठे आणि गुंतागुंतीचे आव्हान म्हणजे विविध देशांशी संतुलित संबंध राखणे. जागतिक राजकारणात भारताला एकाच वेळी वेगवेगळ्या हितसंबंधांचा समतोल साधावा लागतो. विशेषतः इस्त्रायल आणि इराण यांच्याशी असलेले संबंध हे याचे उत्तम उदाहरण आहे. इस्त्रायल हा भारताचा अत्यंत महत्त्वाचा संरक्षण आणि तंत्रज्ञान भागीदार आहे. ड्रोन तंत्रज्ञान, क्षेपणास्त्र प्रणाली, सायबर सुरक्षा आणि शेती तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये घनिष्ठ सहकार्य आहे. त्यामुळे भारताच्या संरक्षण आधुनिकीकरणात इस्त्रायलची भूमिका महत्त्वाची ठरते.

दुसरीकडे, इराण हा भारतासाठी ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा देश आहे. भारताला इराणकडून स्वस्त कच्चे तेल मिळण्याबरोबरच, छबाहर पोर्ट सारखा प्रकल्प भारतासाठी मध्य आशिया आणि अफगाणिस्तानशी जोडणारा एक धोरणात्मक मार्ग आहे. त्यामुळे इराण भारताच्या भू-राजकीय हितांसाठीही महत्त्वाचा ठरतो.

या संतुलनाच्या पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांचा मोठा परिणाम दिसून येतो. त्यांच्या "अमेरिका प्रथम" दृष्टिकोनामुळे इराणवर कठोर आर्थिक निर्बंध लादले गेले, ज्यामुळे भारताला इराणसोबतचे आर्थिक व्यवहार मर्यादित करावे लागले. त्याचबरोबर, अमेरिकेच्या धोरणांचे पालन करण्याचा अप्रत्यक्ष दबाव भारतावर वाढला, विशेषतः ऊर्जा आयात आणि परराष्ट्र संबंधांच्या बाबतीत.

या परिस्थितीत भारताला "बहु संरेखन" म्हणजेच अनेक देशांशी स्वतंत्र पण संतुलित संबंध ठेवण्याचे धोरण अधिक काळजीपूर्वक राबवावे लागते. कोणत्याही एका शक्तीगटाकडे पूर्ण झुकाव न करता, भारताने आपल्या राष्ट्रीय हितांना प्राधान्य देत धोरणात्मक लवचिकता ठेवणे आवश्यक आहे.

इस्त्रायल–इराण संबंध आणि अमेरिकेच्या बदलत्या धोरणांमुळे भारताच्या परराष्ट्र धोरणातील संतुलन अधिक गुंतागुंतीचे झाले आहे, आणि त्यामुळे सूक्ष्म, लवचिक व हितसंबंध-आधारित कूटनीती ही काळाची गरज बनली आहे.

3) व्यापार आणि आर्थिक परिणाम :

भारतासाठी इराण- इस्त्रायल संघर्षासारख्या आंतरराष्ट्रीय तणावांचे आर्थिक परिणाम अत्यंत व्यापक आणि थेट स्वरूपाचे असतात. जागतिक व्यापार व्यवस्था आज परस्परावलंबी असल्यामुळे एका प्रदेशातील अस्थिरता संपूर्ण जगाच्या बाजारपेठांवर परिणाम करते.

सर्वप्रथम, संघर्षामुळे जागतिक बाजारपेठांमध्ये मोठी अस्थिरता निर्माण होते. विशेषतः पर्शियन गल्फ परिसर हा ऊर्जा आणि व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने, येथील तणावामुळे तेल, वायू आणि शिपिंग खर्चात वाढ होते. परिणामी, आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक महाग आणि अनिश्चित बनतो.

दुसरे महत्त्वाचे परिणाम म्हणजे शिपिंग मार्गांवरील धोका. होरमुज सारख्या सामुद्रधुनीत जर असुरक्षितता निर्माण झाली, तर भारताचा आयात-निर्यात व्यापार थेट प्रभावित होतो. कंटेनर वाहतूक उशिरा होणे, विमा खर्च वाढणे आणि लॉजिस्टिक्स महाग होणे यामुळे भारतीय निर्यातदारांना मोठा फटका बसतो. याचा परिणाम विशेषतः वस्त्रोद्योग, रसायन उद्योग आणि अभियांत्रिकी वस्तूंवर दिसतो.

तिसरे म्हणजे, आर्थिक बाजारांवर दबाव निर्माण होतो. अशा भू-राजकीय तणावाच्या काळात विदेशी गुंतवणूकदार सावध होतात, ज्यामुळे शेअर बाजारात चढ-उतार वाढतात. भारताच्या चलनावर म्हणजेच रुपयावरही दबाव येतो, कारण डॉलरची मागणी वाढते आणि आयात खर्च वाढतो.

याशिवाय, डोनाल्ड ट्रम्प कार्यकाळातील व्यापार धोरणे, विशेषतः व्यापार युद्ध आणि निर्बंध यांनी जागतिक व्यापार व्यवस्थेत आधीच अनिश्चितता निर्माण केली होती. चीन आणि अमेरिका यांच्यातील व्यापार संघर्ष, तसेच इराणसारख्या देशांवरील निर्बंधांमुळे जागतिक पुरवठा साखळी अस्थिर झाली. याचा अप्रत्यक्ष परिणाम भारताच्या निर्यातीवरही झाला, कारण आंतरराष्ट्रीय मागणी आणि व्यापार प्रवाहात बदल झाले.

इराण–इस्त्रायल संघर्ष आणि बदलते अमेरिकन व्यापार धोरण यामुळे भारतासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांसाठी व्यापार आणि आर्थिक स्थैर्य राखणे अधिक कठीण झाले आहे. त्यामुळे भारताला अधिक लवचिक, विविधीकृत आणि सुरक्षित व्यापार धोरण स्वीकारणे आवश्यक ठरते.

4) प्रादेशिक सुरक्षा आणि भारतीय नागरिक :

भारतासाठी मध्यपूर्वेतील अस्थिरता हा केवळ आर्थिक किंवा राजनैतिक मुद्दा नसून तो थेट मानवी सुरक्षिततेशी संबंधित अत्यंत संवेदनशील विषय आहे. इराण आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्यास संपूर्ण मध्यपूर्व प्रदेशात सुरक्षा परिस्थिती बिघडण्याची शक्यता असते.

मध्यपूर्वेत लाखो भारतीय नागरिक—विशेषतः कामगार, नर्सेस, अभियंते आणि सेवा क्षेत्रातील कर्मचारी—कार्यरत आहेत. हे सर्वजण पर्शियन गल्फ देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगारासाठी गेलेले आहेत. त्यामुळे कोणतीही युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सर्वात आधी उभा राहतो.

संघर्षाच्या काळात विमानसेवा, रस्ते आणि समुद्री मार्ग बाधित होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांचे स्थलांतर करणे अत्यंत कठीण आणि गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत भारत सरकारला मोठ्या प्रमाणावर आपत्कालीन मोहिमा राबवाव्या लागतात, जसे की "ऑपरेशन प्रकारच्या बचाव मोहिमा. यात लॉजिस्टिक्स, राजनैतिक समन्वय आणि सुरक्षित वाहतूक यांचा समावेश असतो.

याशिवाय, अस्थिरतेमुळे दहशतवाद आणि कट्टरतावाद वाढण्याचा धोका असतो. संघर्षग्रस्त प्रदेशात सुरक्षा यंत्रणा कमकुवत झाल्यास गैर-राज्य घटक सक्रिय होतात, ज्यामुळे केवळ स्थानिक नव्हे तर आंतरराष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण होतो. याचा अप्रत्यक्ष परिणाम भारताच्या अंतर्गत सुरक्षेवरही होऊ शकतो.

मध्यपूर्वेतील संघर्ष हा भारतासाठी मानवी सुरक्षा, स्थलांतर व्यवस्थापन आणि दहशतवाद प्रतिबंध या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये गंभीर आव्हाने निर्माण करतो. त्यामुळे भारताला सतत सज्ज राहून प्रभावी राजनैतिक आणि सुरक्षा उपाययोजना कराव्या लागतात.

5) आंतरराष्ट्रीय कूटनीती आणि भारताची भूमिका :

भारत आजच्या जागतिक व्यवस्थेत एक उदयोन्मुख शक्ती म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विशेषतः इराण–इस्त्रायल संघर्षासारख्या गुंतागुंतीच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत भारताला अत्यंत संतुलित आणि विचारपूर्वक

परराष्ट्र धोरण स्वीकारावे लागते. युनायटेड नेशन सारख्या बहुपक्षीय मंचांवर भारताची भूमिका नेहमीच शांतता, संवाद आणि सहकार्य यावर आधारित राहिली आहे. अशा संस्थांमध्ये भारताला कोणत्याही एका बाजूने न झुकता, आंतरराष्ट्रीय कायदा आणि मानवी मूल्ये यांना प्राधान्य देत संतुलित भूमिका घ्यावी लागते. त्यामुळे भारताची प्रतिमा एक जबाबदार जागतिक शक्ती म्हणून अधिक दृढ होते.

या पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळातील एकतर्फी धोरणांचा परिणाम जागतिक कूटनीतीवर दिसून आला. त्यांच्या "अमेरिका प्रथम" दृष्टिकोनामुळे बहुपक्षीय कूटनीती काही प्रमाणात कमकुवत झाली आणि आंतरराष्ट्रीय निर्णय प्रक्रियेत मतभेद वाढले. यामुळे लहान आणि मध्यम शक्ती असलेल्या देशांसाठी जागतिक धोरण समजून घेणे अधिक गुंतागुंतीचे झाले.

अशा परिस्थितीत भारतासाठी एक महत्त्वाची संधी निर्माण होते. भारत तटस्थ मध्यस्थ म्हणून भूमिका अधिक मजबूत करू शकतो. कारण भारताचे दोन्ही बाजूंशी इराण आणि इजराइल संबंध आहेत. त्यामुळे भारत संवाद आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी विश्वासार्ह पूल म्हणून काम करू शकतो.

याशिवाय, भारताची वाढती आर्थिक आणि लोकसंख्यात्मक ताकद यामुळे तो जागतिक पातळीवर एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उदयास येत आहे. ऊर्जा, व्यापार, तंत्रज्ञान आणि सुरक्षा या क्षेत्रांमध्ये भारताची भूमिका अधिक महत्त्वाची होत आहे. योग्य कूटनीतीच्या माध्यमातून भारत आपले स्थान केवळ प्रादेशिक शक्ती म्हणून नव्हे तर जागतिक निर्णय प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणून मजबूत करू शकतो.

आंतरराष्ट्रीय कूटनीतीच्या बदलत्या स्वरूपात भारतासाठी आव्हाने असली तरी त्याचबरोबर मोठ्या संधीही आहेत. संतुलित, शांततापप्रिय आणि संवादाधारित धोरण स्वीकारून भारत जागतिक स्तरावर आपली विश्वासार्हता आणि नेतृत्व क्षमता अधिक मजबूत करू शकतो.

6) दीर्घकालीन धोरणात्मक आव्हाने :

भारतासमोर इराण–इस्त्रायल संघर्षासारख्या आंतरराष्ट्रीय तणावांच्या पार्श्वभूमीवर काही दीर्घकालीन धोरणात्मक आव्हाने निर्माण झाली आहेत. ही आव्हाने केवळ तात्कालिक नसून देशाच्या भविष्यातील आर्थिक, सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारी आहेत.

सर्वप्रथम, ऊर्जा स्वावलंबनाची गरज ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. भारत आजही मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलासाठी पर्शियन गल्फ वर अवलंबून आहे. या अवलंबित्वामुळे जागतिक संघर्ष, निर्बंध किंवा पुरवठा अडथळयांचा थेट परिणाम भारतावर होतो. त्यामुळे सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहनं आणि हरित हायड्रोजन यांसारख्या पर्यायांवर भर देणे अत्यावश्यक झाले आहे. ऊर्जा स्वावलंबनामुळे केवळ आर्थिक स्थैर्य नाही तर धोरणात्मक सुरक्षितताही वाढते.

दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे संरक्षण क्षमता वाढवणे. जागतिक अस्थिरतेच्या काळात कोणत्याही देशाला आपली सुरक्षा यंत्रणा मजबूत ठेवणे आवश्यक असते. आधुनिक युद्धे ही केवळ पारंपरिक नसून सायबर, ड्रोन आणि तंत्रज्ञानाधारित आहेत. त्यामुळे भारताला संरक्षण संशोधन, स्वदेशी उत्पादन आणि तंत्रज्ञान विकासावर अधिक गुंतवणूक करावी लागते. मजबूत संरक्षण क्षमता ही देशाच्या सार्वभौमत्वाची हमी असते.

तिसरे आव्हान म्हणजे परराष्ट्र धोरणात लवचिकता राखणे. जागतिक राजकारण सतत बदलत असल्याने कोणत्याही एका गटावर किंवा देशावर पूर्ण अवलंबून राहणे धोकादायक ठरते. इराण इजराइल आणि इतर महासत्तांशी संतुलित संबंध राखणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत " बहु संरेखन" धोरण अधिक प्रभावी ठरते, ज्यामध्ये भारत आपल्या राष्ट्रीय हितांनुसार विविध देशांशी स्वतंत्र आणि लवचिक संबंध ठेवतो.

ऊर्जा स्वावलंबन, संरक्षण बळकटीकरण आणि लवचिक परराष्ट्र धोरण ही भारताच्या दीर्घकालीन स्थैर्याची तीन प्रमुख आधारस्तंभ आहेत. या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास भारत जागतिक अनिश्चिततेच्या काळातही मजबूत आणि आत्मनिर्भर राष्ट्र म्हणून पुढे जाऊ शकतो.

संदर्भ सूची :

1. Trita Parsi. (2007). Treacherous Alliance: The Secret Dealings of Israel, Iran, and the United States. Yale University Press
2. Vali Nasr. (2016). The Shia Revival: How Conflicts within Islam Will Shape the Future. W.W. Norton & Company.Newspapers :
3. The Hindu. (2026, March 3). Rising tensions between Iran and Israel raise global concerns.
4. The Indian Express. (2026, March 8). Middle East crisis: Impact on global oil prices.
5. The Times of India. (2026, March 12). India monitors Iran-Israel tensions closely.
6. दैनिक सकाळ(2026 मार्च 16)-युद्ध, बाजार आणि संधी-गौरव बोरा
7. दैनिक लोकमत(2026 मार्च 17)- मध्यपूर्वेच्या युद्धामुळे कुणाचे खिसे भरत आहेत-प्रभू चावला
8. Hindustan Times. (2026, March 18). Iran-Israel conflict: What it means for India.
9. The Hindu. (2026, March 22). Global reactions to escalating Middle East conflict.
10. The Indian Express. (2026, March 25). Strategic implications of Iran-Israel tensions.
11. दैनिक गोदातीर (2026 मार्च 29)-इराण इस्त्रायल संघर्ष आणि ट्रम्प यांची कूटनीती : भारतासाठी वाढती आव्हाने-डॉ.आरती राणे

"इराण-इस्त्रायल युद्ध : पार्श्वभूमी आणि परिणाम"

डॉ. शिवराज कदम

अर्थशास्त्र विभाग,

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जिल्हा नांदेड

इराण–इस्त्रायल युद्ध (2026) हे फक्त प्रादेशिक संघर्ष नाही, तर जागतिक अर्थव्यवस्था, भारत आणि आंतरराष्ट्रीय धोरणावर खोल परिणाम करणारे संकट आहे.

1) "इराण–इस्त्रायल युद्ध: पार्श्वभूमी"

इराण–इस्त्रायल युद्ध हे मध्यपूर्वेतील दीर्घकालीन तणावाचे उघड संघर्षात रूपांतर असून त्यामागे सुरक्षा, अणुकार्यक्रम आणि भू-राजकीय स्पर्धा हे प्रमुख घटक आहेत.

i. युद्धाची तात्काळ सुरुवात :

28 फेब्रुवारी 2026 रोजी संयुक्त राज्य अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराण मधील अणु व लष्करी ठिकाणांवर हल्ले केले. या कारवाईमागे इराणच्या अणुकार्यक्रमाला रोखण्याचा उद्देश होता.

ii. प्रत्युत्तर आणि संघर्षाची तीव्रता:

इराणने प्रत्युत्तरादाखल इस्त्रायल तसेच गल्फमधील अमेरिकन तळांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले. यामुळे संघर्ष वेगाने वाढून प्रादेशिक अस्थिरता निर्माण झाली.

ii. संघर्षाचा विस्तार :

हा संघर्ष द्विपक्षीय न राहता संपूर्ण मध्यपूर्वेत पसरला. अमेरिका थेट सहभागी झाली, तर इतर गल्फ देश सतर्क झाले. त्यामुळे हा संघर्षाने आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केले.

iv. ऊर्जा भू-राजकारण :

होरमूझ सामुद्रधुनी ही जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे, जिथून सुमारे 20 टक्के तेल पुरवठा होतो. युद्धामुळे या मार्गावर धोका निर्माण झाला.

परिणामी, हा संघर्ष "ऊर्जा युद्ध" म्हणून ओळखला जाऊ लागला.

इराण–इस्त्रायल युद्धाची पार्श्वभूमी ही केवळ तात्काळ घटनांवर आधारित नसून अणु स्पर्धा, प्रादेशिक वर्चस्व आणि ऊर्जा भू-राजकारण यांचा एकत्रित परिणाम आहे. त्यामुळे हा संघर्ष जागतिक स्थैर्यासाठी गंभीर आव्हान ठरतो.

2. भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम :

इराण–इस्त्रायल युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली असून त्याचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर दिसून येतो.

i. ऊर्जा आयात अवलंबित्व

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे 60 टक्के पेक्षा जास्त आयात मध्यपूर्व मधून करतो. त्यामुळे मध्यपूर्वेतील कोणतीही अस्थिरता भारताच्या ऊर्जा सुरक्षेला थेट धोका निर्माण करते.

ii. तेल दरवाढ आणि आर्थिक परिणाम

युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती 100 डॉलर ते 150 डॉलर प्रति बॅरलपर्यंत वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याचा भारतावर पुढील परिणाम होण्याची शक्यता आहे. पेट्रोल आणि डिझेलचे दर, एलपीजी सिलिंडर वाढण्याची भीती, वाहतूक खर्च वाढतो, उत्पादन खर्च वाढतो.

iii. महागाईवर परिणाम

ऊर्जा दरवाढीमुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेत " खर्च प्रेरित भाववाढ" निर्माण होते. कारण तेल हे सर्व उद्योगांचे मूलभूत इनपुट आहे.

परिणामी वस्तू आणि सेवा महाग होतात. सामान्य नागरिकांची क्रयशक्ती कमी होते. रिझर्व बँकेवर वर मौद्रिक धोरणात कडकपणा आणण्याचा दबाव वाढतो.

iv. शेअर बाजार आणि गुंतवणूक

निफ्टी 50 मध्ये सुमारे 2.5 टक्के घसरण आणि अस्थिरता दिसून आली आहे. तसेच परदेशी गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात भांडवल काढले आहे. याचा परिणाम म्हणून बाजारात अनिश्चितता वाढणे, आय टी, तेल आणि लॉजिस्टिक्स क्षेत्र प्रभावित होणे गुंतवणूक प्रवाह मंदावणे यासारखे परिणाम दिसून येतात.

v. परदेशी रोजगार आणि रेमिटन्स

गल्फ देशांमध्ये सुमारे 90 लाख भारतीय कामगार कार्यरत आहेत. युद्धामुळे स्थलांतराची ची शक्यता वाढली आहे. याचा परिणाम म्हणून रेमिटन्स (50 अब्ज डॉलर पर्यंत) घटण्याचा धोका, चालू खात्यावर दबाव, बेरोजगारी वाढण्याची शक्यता आहे.

vi. उद्योग आणि पुरवठा साखळी

